## * भारतातील विविध समुदायातील शिक्षणाचा दर्जा
## [Education Status Among Different Communities in India]

* आपल्या देशात विविध समुदाय आहेत. उदा. मुस्लीम समुदाय, शीख समुदाय, बौद्ध समुदाय त्याप्रमाणे सामाजिक आधारावर देशील आदिवासी समुदाय, अनुसूचित जाती समुदाय आणि इतर मागासलेला समुदाय (ओबीसी) असे समुदायाचे प्रकार आहेत. विभागीय आधारावर म्हणजे विशिष्ट भूभागावर समूह करून राहणाऱ्या लोकांचे आदिवासी, ग्रामीण आणि नागरी समुदाय असे प्रकार करता येतील या ठिकाणी आपण धर्म आणि सामाजिक आधारावरील समुदायाच्या अभ्यास करणार आहोत.

### * धार्मिक अल्पसंख्यांक समुदाय [Religious Minority Community] :-

* आपल्या देशात हिंदू, मुस्लीम, बौद्ध, शीख, ख्रिश्चन, जैन, पारसी इत्यादी विविध धर्माचे लोक वास्तव्य करतात. देशात हिंदू बहुसंख्यांक आहेत. तर मुस्लीम, बौद्ध, शीख, ख्रिश्चन, जैन आणि पारसी यांचा समावेश अल्पसंख्याक समुदायात केला जातो.

तक्ता क्रमांक – १

भारतातील विविध धर्मांच्या लोकसंख्येची टक्केवारी

| क्र | धर्म | १९३१ | १९४१ | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिंदू | ७०.६७ | ६९.४६ | ८४.१ | ८३.४५ | ८२.७३ | ८२.३० | ८१.५३ | ८०.४६ | ७९.८० |
| २ | मुसलमान | २३.४९ | २४.४८ | ९.८ | १०.६९ | ११.२१ | ११.७५ | १२.६१ | १३.४३ | १४.२३ |
| ३ | ख्रिश्चन | १.७७ | १.९१ | २.३ | २.४४ | २.६० | २.४४ | २.३२ | २.३४ | २.३० |
| ४ | शीख | १.२८ | १.४६ | १.७९ | १.७९ | १.८९ | १.९२ | १.९४ | १.८७ | १.७२ |
| ५ | बौद्ध | ०.१३ | ०.१२ | ०.०५ | ०.७४ | ०.७० | ०.७० | ०.७५ | ०.७७ | ०.७० |
| ६ | जैन | ०.३७ | ०.३७ | ०.४६ | ०.४६ | ०.४७ | ०.४७ | ०.४० | ०.४१ | ०.३७ |
| ७ | पारसी | | | ०.१३ | ०.०९ | ०.०९ | ०.०९ | .०८ | ०.०६ | - |
| ८ | अन्य धर्म | | | ०.४३ | ०.४३ | ०.४१ | ०.४२ | ०.४४ | ०.७२ | ०.७० |

तक्ता क्रमांक – २

२०११ च्या जनगणनेनुसार धर्मनिहाय लोकसंख्या

| अ.क्र. | धर्म | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | ९६.६३ कोटी | ७९.८० |
| २ | मुसलमान | १७.२२ कोटी | १४.२३ |
| ३ | ख्रिश्चन | २.७८ कोटी | २.३० |
| ४ | शीख | २.०८ कोटी | १.७२ |
| ५ | बौद्ध | ८४.४३ लाख | ०.७० |
| ६ | जैन | ४४.५२ लाख | ०.३७ |
| ७ | अन्य धर्म | ७९.३८ लाख | ०.६६ |
| ८ | धर्म नाही | २८.६७ लाख | ०.२४ |

* देशातील धर्मनिहाय लोकसंख्येचा विचार केल्यानंतर हे स्पष्ट होते की, मुस्लीम समुदाय हा आपल्या देशातील सर्वात मोठा अल्पसंख्यांक समुदाय आहे कारण इतर अल्पसंख्याक लोकांची लोकसंख्या ही फारच कमी आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारतात मुस्लीम धर्माची लोकसंख्या 17.22 कोटी आहे. अल्पसंख्याक समुदायाच्या शैक्षणिक दर्जा लक्षात घेण्याकरिता देशातील साक्षरतेचा विचार करणे आवश्यक आहे.

तक्ता क्रमांक – ३

भारतातील धर्मनिहाय साक्षरता दर (टक्केवारी)

| अ.क्र. | धर्म | २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | ५४.९२ | ६३.६० |
| २ | मुसलमान | ४८.०५ | ५७.२८ |
| ३ | ख्रिश्चन | ६९.४५ | ७४.३४ |
| ४ | शीख | ६०.५६ | ६७.५१ |
| ५ | बौद्ध | ६२.१६ | ७१.८३ |
| ६ | जैन | ९४.१० | ८६.७३ |

तक्ता क्रमांक – ४

विविध धार्मिक समुदायातील स्त्री–पुरुषांची निरक्षरता (२०११)

| धार्मिक समुदाय | निरक्षरता | | |
|---|---|---|---|
| | निरक्षरता | स्त्री | पुरुष |
| सर्व धार्मिक समुदाय | ३६.९३ | ४४.०२ | ३०.२४ |
| हिंदू | ३६.३९ | ४४.०२ | २९.२२ |
| मुस्लीम | ४२.७२ | ४८.०१ | ३७.५१ |
| ख्रिश्चन | २५.६५ | २८.०३ | २३.२२ |
| शीख | ३२.४९ | ३६.७१ | २८.६८ |
| बौद्ध | २८.१६ | ३४.०४ | २२.१३ |
| जैन | १३.५७ | १५.०७ | १२.१४ |
| इतर | ४९.६५ | ५८.६२ | ४०.६२ |

(02) * तक्ता क्रमांक - 3 वरून भारतातील धर्मनिहाय साक्षरता दर स्पष्ट होतो. 2001 च्या जनगणनेनुसार मुसलमान समुदायात साक्षरता दर हा 48.5% होता तर 2011 मध्ये 57.28% होता. 2001 आणि 2011 च्या जनगणनेच्या माहितीनुसार मुसलमान समुदायाच्या साक्षरता दर हा इतर धर्मांच्या तुलनेत कमी आहे. 2011 मध्ये भारताचा साक्षरता दर 74% इतका होता. भारतात सर्वात जास्त साक्षरता जैन धर्मात आहे. 2011 मध्ये जैन धर्मातील लोकांचा साक्षरता दर 86.73% होता. इतकेच नव्हे तर पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या लोकांचे प्रमाण जैन धर्मात जास्त आहे. ख्रिश्चन धर्मातील साक्षरता दर हा 74.34% होता. म्हणजेच भारताच्या साक्षरतेच्या दरापेक्षा थोडा जास्त होता. परंतु शीख आणि बौद्ध धर्माच्या लोकांचा साक्षरता दर भारताच्या साक्षर दरापेक्षा कमी होता.

* मुस्लिम समुदाय :- इतर अल्पसंख्याक समुदायापेक्षा मुस्लीम समुदायात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. मुस्लीम समाजाच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक दर्जाचा अभ्यास करण्यासाठी दिल्ली हायकोर्टाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती राजिंदर सच्चर यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्च स्तरीय कमेटी 2005 मध्ये नियुक्त करण्यात आली होती. या कमिटीने आपला अहवाल 17 नोव्हेंबर 2006 रोजी प्रधानमंत्र्यांना सादर केला आणि 30 नोव्हेंबर 2006 रोजी हा अहवाल लोकसभेत चर्चेसाठी ठेवला होता. (02)

* सच्चर कमिटीच्या अहवालानुसार 6 ते 11 वयोगटातील $\frac{1}{4}$ मुस्लीम मुले हे कधीच शाळेत गेले नाही किंवा मध्येच त्यांनी शाळा सोडली. 50% मुस्लीम विद्यार्थी माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात तर राष्ट्रीय स्तरावरील 72% विद्यार्थी माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात राष्ट्रीय स्तर आणि मुस्लीम समुदायातील स्तर यामध्ये बरीच तफावत आहे. म्हणजेच मुस्लीम विद्यार्थ्यांचे प्रमाण हे राष्ट्रीय स्तरापेक्षा 22% ने कमी आहे. सच्चर कमिटीनुसार मुस्लीम महिलांच्या शिक्षणाचा दर्जा अत्यंत निम्न आहे. ग्रामीण भागात देशातील मुस्लिमांचा शैक्षणिक दर्जा अतिशय खालचा आहे. तांत्रिक आणि उच्च शिक्षणात देशातील मुस्लिमांचे प्रमाण फारच अल्प आहे. सरकारी शाळांमध्ये जाणाऱ्या मुस्लिम विद्यार्थ्यांचे प्रमाण 66% तर खाजगी शाळांचे प्रमाण 30% आहे. विशेष बाब म्हणजे मदरशामध्ये शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण केवळ 4% आहे. म्हणून सच्चर कमिटीने असा निष्कर्ष काढला की, मुस्लीम लोक मदरसापेक्षा सरकारी शाळांना विशेष महत्त्व देतात. मुस्लीम लोक आपल्या मुलांना आधुनिक शिक्षण देऊ इच्छितात. उर्दू भाषेतून शिक्षण द्यावे असा त्यांचा आग्रह नाही असे सच्चर कमिटीने नमूद केले.

* 2014-15 मध्ये उच्च शिक्षणाबाबत अखिल भारतीय स्तरावर एक सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणात असे आढळून आले की, मुस्लिमांची लोकसंख्या 14.23% आहे परंतु त्यांची उच्च शिक्षणातील नोंदणी मात्र केवळ 4.4% आहे. 2000-2001 या वर्षात भारतीय स्तरावर उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी 12.4% होती. परंतु मुस्लिमांची केवळ 5.2% इतकीच नोंदणी होती. प्राथमिक शिक्षणापासून ते वरच्या शैक्षणिक पातळीचा विचार केला तर मुस्लीम विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण वाढत जाते. त्यांच्यात पदवीधरांचे प्रमाण फारच कमी आहे. 2001 मध्ये देशात 3 कोटी 76 लाख 70 हजार पदवीधर होते या पदवीधरांमध्ये मुस्लिम विद्यार्थ्यांची संख्या केवळ 23 लाख 90 हजार होती तर 2011 मध्ये मुस्लीम समुदायात पदवी आणि पदव्युत्तरांचे प्रमाण केवळ 2.76% होते. 2000 च्या दशकात उच्च शिक्षणात नोंदणी केलेल्या मुस्लीम विद्यार्थ्यांचे प्रमाण 13.8% होते. तर राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थ्यांचे हे प्रमाण 26.6% होते. राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणापेक्षा मुस्लिमांचे प्रमाण 12.8% टक्क्याने कमी होते.

* 2013 मध्ये 'भारतीय मुस्लीम आणि उच्च शिक्षण' याबाबत एक अध्ययन करण्यात आले होते. उत्तर भारतातील (अल्पसंख्याक विद्यापीठे सोडून) विद्यापीठात मुस्लीम विद्यार्थ्यांची पदवी, पदव्युत्तर आणि व्यावसायिक अभ्यासक्रमातील नोंदणी ही केवळ 1 ते 3% या दरम्यान होती. स्कॉलरशीप घेणाऱ्या मुस्लीम विद्यार्थ्यांचे प्रमाण फारच अल्प म्हणजे 1% टक्के होते तर दक्षिण भारतातील विद्यापीठात पदवी, पदव्युत्तर शिक्षणामध्ये मुस्लिमांची नोंदणी 9 ते 11 टक्के होती. स्कॉलरशीप घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 7% होते. याउलट उत्तर भारतातील जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठात 40% मुस्लीम विद्यार्थ्यांची नोंदणी होती तर अलीगड विद्यापीठात 20% मुस्लीम विद्यार्थ्यांची नोंदणी होती. या दोन्ही विद्यापीठात 50% विद्यार्थी स्कॉलरशीप घेतली होती.

* मुस्लीम समुदायाचा शैक्षणिक दर्जा अतिशय खालावलेला आहे हे लक्षात घेऊन सच्चर कमिटीने त्यांचा शैक्षणिक स्तर वाढविण्यासाठी काही उपाय योजना सुचविल्यात.

(1) शिक्षण हे मुक्त आणि अनिवार्य असावे. (2) मॅट्रिक नापास झालेल्या विद्यार्थ्यांकरिता आय टी आय (ITI) आणि तांत्रिक अभ्यासक्रमाच्या डिप्लोमा देण्यासाठी पॉलिटेक्निक महाविद्यालये सुरु करावीत (3) मुस्लिमांना उच्च शिक्षणाच्या संदर्भात अधिक प्रोत्साहन देण्यासाठी सर्व विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा 'वैविध्य निर्देशांक (Diversity Index)' वाढविण्यात यावा. मुस्लीम विद्यार्थ्यांना होस्टेल आणि शिक्षणाकरिता आर्थिक सहाय्य आणि स्कॉलरशीप देण्यात यावी

(4) शिक्षणाच्या अभ्यासक्रमात वैविध्य (Diversity) असले पाहिजे

(5) शिक्षकांमध्ये अल्पसंख्यांक समुदायांच्या संदर्भात संवेदनशीलता वाढवावी.

(6) उर्दू शिक्षणास रोजगाराभिमुख बनविणे.

(7) मदरसा आणि मुख्य धारेतील शाळांमध्ये समन्वय करण्यात यावा.

(8) उर्दू भाषेस भारतीय भाषेच्या रूपात संरक्षण देण्यात यावे. शाळांमध्ये उर्दू भाषा ऐच्छिक असावी.

* **अनुसूचित जाती समुदाय [Scheduled Caste Community]** अनुसूचित जाती समुदायात प्रामुख्याने पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातींचा समावेश आहे. अस्पृश्यांना शेकडो वर्ष पिढ्यान् पिढ्या मानवी हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यांना शिक्षणाचा अधिकार देखील नाकारण्यात आला होता. 1935 च्या भारतीय कायद्यानुसार अस्पृश्य जातींची जी अनुसूची तयार करण्यात आली, त्या अनुसूचित समाविष्ट करण्यात आलेल्या जातींना अनुसूचित जाती असे संबोधले जाते. त्यामुळे अनुसूचित जाती समुदाय शिक्षणापासून वंचित असा समुदाय होता. भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जातीच्या विकासाकरीता अनेक तरतुदी करण्यात आल्यात. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर त्यांच्यात काही प्रमाणात परिवर्तन झाले. भारतीय राज्यघटनेने देशातील सर्व लोकांना शिक्षण घेण्याचा हक्क बहाल केला. त्यामुळे त्यांची काही प्रमाणात शैक्षणिक प्रगती झालेली आढळून येते.

तक्ता क्रमांक – ५

अनुसूचित जाती समुदायातील साक्षरता

| | ग्रामीण | | | शहरी | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | स्त्री | पुरुष | एकूण | स्त्री | पुरुष | एकूण | स्त्री | पुरुष | एकूण |
| १९६१ | २.५२ | १५.०६ | ८.८९ | १०.०४ | ३२.२१ | २१.८१ | ३.२९ | १६.९६ | १०.२७ |
| १९७१ | ५.०६ | २०.०४ | १२.७७ | १६.०९ | ३८.९३ | २८.६५ | ६.४४ | २२.३६ | १४.६७ |
| १९८१ | ८.४५ | ३१.१२ | १८.४८ | २४.३४ | ४७.५४ | ३६.६० | १०.९३ | ३१.१२ | २१.३८ |
| १९९१ | १९.४५ | ४५.९५ | ३३.२५ | ४२.२९ | ६६.९० | ५५.११ | २३.७६ | ४९.९१ | ३७.४१ |
| २००१ | ३०.८४ | ६३.६६ | ५१.१६ | ५७.४९ | ७७.९३ | ६८.१२ | ४१.९० | ६४.६६ | ५४.६९ |
| २०११ | ५२.१० | ७२.६० | ६२.८० | ६८.६० | ८३.३० | ७६.२० | ५६.५० | ७५.२० | ६६.१० |

* 1961 मध्ये अनुसूचित जाती समुदायात केवळ 10.27% साक्षरता होती. 2011 मध्ये अनुसूचित जाती समुदायात साक्षरतेचे प्रमाण 66.10% होते. याचा अर्थ 1961 ते 2011 या पन्नास वर्षात त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढले. 2011 मध्ये भारताचा साक्षरता दर 74.4% होता. म्हणजे देशाच्या साक्षर दरापेक्षा अनुसूचित जाती समुदायाचा साक्षरता दर जवळपास 8% इतका कमी होता. अनुसूचित जाती समुदायात साक्षरता दर 66.10% असला तरी त्यांच्यामध्ये मधून शाळा सोडून देण्याचे प्रमाण जास्त आहे.

* 2000-2001 या वर्षात उच्च शिक्षणातील नोंदणी दर अनुसूचित जाती समुदायात केवळ 7.5% होता. परंतु त्याच वेळी भारताचा उच्च शिक्षणातील नोंदणी दर हा 12.4% होता. याचा अर्थ भारताच्या उच्च शिक्षण नोंदणी दरापेक्षा अनुसूचित जाती समुदायाचा नोंदणी दर 4.9% ने कमी होता. 2014-15 मध्ये देशाचा उच्च शिक्षणातील नोंदणी दर 23.6% होता परंतु त्यावेळी अनुसूचित जाती समुदायाचा नोंदणी दर 18.5% होता. उच्च शिक्षणात अनुसूचित जाती समुदायाचे प्रमाण अजूनही फारसे समाधानकारक नसल्याचे दिसून येते. अनुसूचित जाती समुदायाकरीता शासकीय महाविद्यालयात 15% आरक्षण आहे. तरी देखील त्यांच्या आरक्षणाच्या प्रमाणात त्यांच्या जागा भरल्या जात नाही. 2003-2004 या वर्षात देशातील कोणत्याही आय आय टी ने अनुसूचित जाती समुदायाकरिता असलेल्या 15% आरक्षणाचा कोटा पूर्ण नसल्याचे तक्ता क्रमांक 6 वरून स्पष्ट होते.

अनुसूचित जाती–जमातींचे आयआयटीमध्ये प्रतिनिधित्व

| अ.क्र | आयआयटी | वर्ष | अनुसूचित जातीच्या जागा भरल्यात | अनुसूचित जमातीच्या जागा भरल्यात |
|---|---|---|---|---|
| १) | मद्रास | २००३–२००४ | १४.० | ३.७ |
| २) | गुवाहाटी | २००३–२००४ | ९.४ | ४.३ |
| ३) | दिल्ली | २००३–२००४ | १०.६ | २.४ |
| ४) | मुंबई | २००३–२००४ | ९.१ | २.५ |
| ५) | खडगपूर | २००३–२००४ | १२.० | ३.२ |
| ६) | कानपूर | २००३–२००४ | ९.२ | २.० |
| ७) | रूडकी | २००३–२००४ | १०.६ | ३.७ |
| ८) | सर्व आयआयटी मिळून | २००५–२००६ | १२.० | ४.० |

* 2010-2011 मध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या 100 विद्यार्थ्यांमध्ये अनुसूचित जाती समुदायातील विद्यार्थ्यांचे प्रमाण 11 पेक्षा कमी असल्याचे आढळून आले. भारत सरकारने शिक्षणाचे खाजगीकरण करण्यास परवानगी दिल्यानंतर सर्वत्र शाळा, महाविद्यालये, वैद्यकिय आणि अभियांत्रिकी महाविद्यालये, डिम्ड विद्यापीठे इत्यादी सुरु झालेत. या सर्व शिक्षण संस्था खाजगी असल्यामुळे त्यामध्ये आरक्षण दिले जात नाही. शिवाय खाजगी महाविद्यालयातील फी जास्त असते. परिणामतः अनुसूचित जाती समुदायातील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित झाले आहेत.

## अनुसुचित जमाती किंवा आदिवासी समुदाय [Scheduled Tribe Community]

* देशात अनुसूचित जमाती किंवा आदिवासी समुदायाची लोकसंख्या 7.5% आहे. आदिवासी समुदाय हा दुर्गम भागात राहत होता. आजही मोठ्या प्रमाणात हा समुदाय डोंगराळ आणि दुर्गम भागात राहतो. त्यांची स्वतःची संस्कृती आहे. हा समुदाय शिक्षणापासून अलिप्त होता. परंतु आज त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळू लागले आहे. 1961 मध्ये आदिवासी समुदायात केवळ 8.53% साक्षरता होती. 2011 च्या जनगणनेनुसार त्यांच्यात साक्षरता 58.96% होती.



तक्ता क्रमांक – ६

अनुसूचित जमाती किंवा आदिवासी समुदायातील साक्षरता

| | ग्रामीण | | | शहरी | | | एकुण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | स्त्री | पुरुष | एकुण | स्त्री | पुरुष | एकुण | स्त्री | पुरुष | एकुण |
| १९६१ | २.९० | १३.३७ | ८.१६ | १३.४५ | ३७.०९ | २२.४१ | ३.१६ | १३.८३ | ८.५३ |
| १९७१ | ४.३६ | १६.९२ | १०.६८ | १९.६४ | ३७.०९ | २८.८४ | ४.८५ | १७.६३ | ११.३० |
| १९८१ | ६.८१ | २२.९४ | १४.९२ | २७.३२ | ४७.६० | ३७.९३ | ८.०४ | २४.५२ | १६.३५ |
| १९९१ | १६.०२ | ३८.४५ | २७.३८ | ४५.६६ | ६६.५६ | ५६.६० | १८.१९ | ४०.६५ | २९.६० |
| २००१ | ३२.४४ | ५७.३९ | ४५.०२ | ५९.८७ | ७७.७७ | ६९.०९ | ३४.७६ | ५९.१७ | ४७.१० |
| २०११ | ४६.९० | ६६.८० | ५६.९० | ७०.३० | ८३.२० | ७६.८० | ४९.३५ | ६८.५३ | ५८.९६ |

* मिझोरम, नागालँड, मणिपूर आणि मेघालय या उत्तरपूर्वेकडील राज्यातील आदिवासी समुदायात साक्षरतेचे प्रमाण चांगले आहे. मिझोरम आणि नागालँड या राज्यातील आदिवासी समुदायात अनुक्रमे 91.5% आणि 80% साक्षरता आहे. तर मणिपूर आणि मेघालय राज्यातील आदिवासी अनुक्रमे 77.4% आणि 74.5% साक्षर आहेत. म्हणजे या चारही राज्यातील आदिवासी समुदायातील साक्षरता देशाच्या साक्षरतेपेक्षा जास्त आहे. असे असले तरी आदिवासी लोकसंख्या जास्त असलेल्या झारखंड, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान आणि आंध्रप्रदेश राज्यात मात्र साक्षरतेचे प्रमाण देशातील आदिवासींमध्ये असलेल्या साक्षरतेपेक्षा कमी आहे. हे तक्ता क्र.-8 वरून स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक – ८

आदिवासीचे राज्यातील साक्षरता दर

| अ.क्र. | राज्याचे नाव | साक्षरता | |
|---|---|---|---|
| १) | मिझोरम | ९१.५% | देशातील एकूण साक्षरतेपेक्षा (७४.०४%) जास्त साक्षरता |
| २) | नागालँड | ८०.८% | |
| ३) | मणिपूर | ७७.४% | |
| ४) | मेघालय | ७४.५% | |
| ५) | झारखंड | ५७.१% | देशातील आदिवासी समुदायातील एकूण साक्षरतेपेक्षा (५८.९६%) कमी साक्षरता |
| ६) | मध्यप्रदेश | ५०.६% | |
| ७) | ओरिसा | ५२.२% | |
| ८) | राजस्थान | ५२.२% | |
| ९) | आंध्रप्रदेश | ४९.२% | |

* विशेष चिंतेची बाब म्हणजे आदिवासी समुदायातील विद्यार्थ्यांमध्ये शाळा गळतीचे प्रमाण हे सर्वात जास्त आहे. 2004-2005 या वर्षात 1 ते 5 व्या वर्गापर्यंत शाळा सोडण्याचे प्रमाण आदिवासी मुलांमध्ये 42.6% तर मुलींमध्ये 42% होते. तर 1 ते 7 व्या वर्गापर्यंत शाळा सोडण्याचे प्रमाण आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये 63.9% होते. 1 ते 10 व्या वर्गापर्यंत शाळा सोडण्याचे प्रमाण 79% होते म्हणजे पहिल्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या 100 आदिवासी विद्यार्थ्यांपैकी 21 विद्यार्थीच 10 पर्यंत शिकत होते. 2010-2011 मध्ये वर्ग 1 ते 5 पर्यंत शाळा सोडण्याचे आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रमाण 33.9% होते. 1 ते 7 वी पर्यंत शाळा सोडणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रमाण 54.5% तर 1 ते 10 वी पर्यंत शाळा सोडणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रमाण 71% होते. 1 ते 10 व्या वर्गापर्यंत शाळा सोडण्याचे आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे आदिवासी समुदायाचा शैक्षणिक दर्जा अतिशय निम्न आहे.

तक्ता क्रमांक – ९

आदिवासी समुदायातील विद्यार्थ्यांमध्ये शाळा गळती

| वर्ष | लिंग | वर्ग १ ते ५ | वर्ग १ ते ७ | वर्ग १ ते १० |
|---|---|---|---|---|
| २००४-२००५ | मुले | ४२.६ | ६५.० | ७७.८ |
| | मुली | ४२.० | ६७.१ | ८०.७ |
| | एकूण | ४२.३ | ६५.९ | ७९.० |
| २०१०-२०११ | मुले | ३७.२ | ५४.७ | ७०.६ |
| | मुली | ३३.९ | ५४.४ | ७१.३ |
| | एकूण | ३३.९ | ५४.५ | ७१.० |

* वर्ग 1 ते 10 पर्यंत शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण अधिक असल्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण देखील अल्प आहे. 2000-2001 या वर्षात उच्च शिक्षण घेणाऱ्या एकूण 100 विद्यार्थ्यांमध्ये आदिवासी विद्यार्थी हे 5% पेक्षा कमी होते. 2014-2015 मध्ये मात्र उच्च शिक्षणातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या नोंदणी दर 13.30% होता. 2005-2006 या वर्षात देशातील IIT मध्ये आदिवासी विद्यार्थी केवळ 4% होते. यावरून हे स्पष्ट होते की आदिवासी समुदायात साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आहे. उच्च शिक्षणात त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे.

## ओबीसी किंवा इतर मागासवर्गीय समुदाय [OBC-Other Backward Classes Community]

* मंडल आयोगाच्या माध्यमातून इतर मागासवर्गीय अर्थात ओबीसी समाजाची ओळख झाली. मंडल आयोग लागू झाल्यानंतर इतर मागासवर्गीय समुदायाकरीता शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये 27% आरक्षण देण्यात आले. परंतु ओबीसींच्या आरक्षणाची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यात आली नाही. ओबीसी समुदायातील बहुतांश लोक शेतकरी आणि कारागीर आहेत त्यांना शिक्षणाचे महत्व वाटले नाही. परंतु नव्या पिढीमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. 2004-2005 या वर्षात 6 ते 13 वर्षाच्या वयोगटात साक्षरता 80.8% होती तर 14 ते 15 वर्षाच्या वयोगटात 87.5% साक्षरता होती. हे तक्ता क्र. 10 वरून स्पष्ट होते. 2004-2005 मध्ये ओबीसी समुदायामध्ये साक्षरतेचे प्रमाण 63.4% होते.



तक्ता क्रमांक – १०

ओबीसी समुदायातील वयोगटानुसार साक्षरता

(२००४–२००५)

| वयोगट | सामान्य | ओबीसी |
|---|---|---|
| ६ ते १३ वर्ष | ९०.२ | ८०.८ |
| १४ ते १५ वर्ष | ९५.७ | ८७.५ |
| १६ ते १७ वर्ष | ९५.० | ८५.२ |
| १८ ते २२ वर्ष | ९१.४ | ७६.९ |
| २३ वर्ष आणि वरील | ७४.० | ५०.६ |

* ओबीसी समुदायातील 20 वर्ष आणि 20 पेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण ग्रामीण भागात केवळ 2.1% आहे. तर शहरी भागात 8.6% आहे. ओबीसी समुदायाकरीता शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचे प्रमाण 27% आहे. असे असले तरी पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या ओबीसी लोकांचे प्रमाण कमी आहे. 2000-2001 मध्ये उच्च शिक्षणात ओबीसींच्या विद्यार्थ्यांचा नोंदणी दर हा केवळ 7% होता. तर 2014-1015 मध्ये त्यांचा उच्च शिक्षणातील नोंदणी दर 22.1% इतका होता.

* 18 ते 22 या वयोगटातील देशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये ओबीसींची लोकसंख्या 34.4% होती. परंतु या वयोगटातील ओबीसींच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 30.5% होते तर 23 वर्ष आणि त्यावरील वयोगटातील देशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये ओबीसींची लोकसंख्या 35.1% होती. परंतु या वयोगटातील ओबीसींच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 29.2% इतके होते. 1999-2000 या वर्षात पदवी पर्यंतच्या शिक्षणात ओबीसी विद्यार्थ्यांचे प्रमाण 25% होते. कृषी अभियांत्रिक आणि वैद्यकिय शिक्षणातील पदवीमध्ये ओबीसी विद्यार्थ्यांचे प्रमाण शहरी भागात केवळ 4% होते. यावरून हे स्पष्ट होते की, ओबीसी समुदायाचे उच्च शिक्षणातील प्रमाण कमी आहे.

## भारतीय शिक्षणातील लिंग पक्षपात : महिलांच्या शिक्षणातील अडथळा [Gender Bais in Indian Education: Obstacles to Women's Education]

### लिंग पक्षपाताचा अर्थ (लिंग विषमता) [Meaning Of Gender Bais-Gender Discrimination]

* लिंग पक्षपात म्हणजेच लिंग विषमता होय. लिंगाच्या आधारावर मानवी समाजात फरक केला जातो. सर्वच मानवी समाजात स्त्री आणि पुरुष या आधारावर विभाजन केले जाते. कुटुंबाच्या स्थापनेसाठी स्त्री आणि पुरुष हे दोघेही महत्वाचे आहेत. स्त्री पुरुषांच्या मिलनातूनच नवीन जीव जन्माला येतो. म्हणूनच मानवी समाजाचे सातत्य टिकून आहे. असे असले तरी लिंगाच्या आधारावर स्त्री आणि पुरुष दोघेही मानव आहेत. त्या दोघांनाही सारखेच मानवी हक्क असले पाहिजे मानवी हक्काच्या संदर्भात स्त्री-पुरुष असा भेद करणे उचित नाही.

* जेव्हा लिंगाच्या आधारावर भेद केला जातो आणि विशेषतः महिलांच्या विरुद्ध विषमता पाळली जाते. तेव्हा त्यास लिंग विषमता असे म्हणतात. लोकांची अशी समजूत आहे की पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे. या समजुतीमुळे तो स्त्रीला कनिष्ठ मानतो आणि तिच्या संदर्भात विविध बाबतीत भेद करतो. तेव्हा त्यास लिंग विषमता असे म्हणतात.

* लिंगानुसार स्त्री-पुरुषांचा सामाजिक दर्जा निश्चित केला जातो. स्त्री-पुरुष या दोघांमध्ये पुरुष हा श्रेष्ठ मानला जातो. तर स्त्रीस कनिष्ठ मानले जाते. हर्टिकट आणि मेरिल यांनी स्पष्टपणे नमुद केले की, "व्यक्तीला समूहाअंतर्गत लिंगाच्या आधारावर जे स्थान दिले जाते ते स्थान म्हणजेच त्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा होय." याचा अर्थ लिंगाच्या आधारावर स्त्री किंवा पुरुषांना एक विशिष्ट सामाजिक दर्जा प्राप्त होतो. लिंगानुसार पुरुषांना श्रेष्ठ स्थान तर स्त्रियांना कनिष्ठ प्राप्त होते. भारतात स्त्रीपेक्षा पुरुषांना श्रेष्ठ मानून त्यानुसार त्यांच्या भूमिका समाजाने निर्धारित केल्या आहेत. म्हणून लिंग विषमता निर्माण झाली. लिंग विषमता ही देशातील सामाजिक विषमता आहे. कारण अशा प्रकारच्या विषमतेस सामाजिक रुढी, परंपरा, मूल्ये आणि प्रमाणकांद्वारे मान्यता देण्यात आली आहे. थोडक्यात स्त्री आणि पुरुष यांच्या संदर्भात भेद करणे म्हणजे लिंग विषमता होय. समाजात लिंग विषमता असल्यामुळे लिंगाच्या आधारावर पक्षपात केला जातो.

* प्राचीन काळापासून भारतीय समाजात लिंग विषमता पाळली जाते. हिंदू धर्मात स्त्रीची देवी लक्ष्मी म्हणून पूजा केली जाते. स्त्रीच्या सन्मानाचे उल्लेख करण्यात आला. असला तरी तीला पुरुषापेक्षा कनिष्ठ मानले होते. प्राचीन काळापासूनच स्त्रीला गौण मानण्यात आले होते. इतकेच नव्हे तर स्त्रीला स्वातंत्र्य असते ही गोष्ट नाकारण्यात आली होती. 'शूद्र आणि स्त्री' हेच निचे कार्यक्षेत्र मानण्यात आले होते. — 'न स्त्री स्वातंत्र्य मर्हति' असे स्त्रीच्या संदर्भात प्राचीन काळी नमूद करण्यात आले होते. म्हणजे स्त्रीला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नसते. तिला एक उपभोगाची वस्तू मानण्यात आले होते.

* भारतीय समाजात प्राचीन काळापासूनच स्त्रीचा सामाजिक दर्जा कनिष्ठ आहे. मुलगा जन्माला आल्यास आई-वडिलांना आणि त्यांच्या नातेवाईकांना विशेष आनंद होतो. उलट मुलींच्या जन्मामुळे त्यांना आनंद होत नाही. मुलीला कुटुंबावरील भार समजला जातो. ती परक्याचे धन आहे असे मानले जाते. हिंदू धर्मात पितृऋण फेडण्यासाठी मुलगा जन्माला येणे महत्त्वाचे मानले जाते. पुत्रप्राप्तीसाठी 'पुत्र कामेष्टी' हा यज्ञ केला जायचा. लिंगाबाबत पक्षपाती दृष्टीकोन असल्यामुळे मुलास प्राधान्य दिले जाते. काही समाजात मुलीचा जन्म झाल्याबरोबर तीला मारून टाकले जाते. — आजही अशा प्रकारच्या घटना सर्वत्र आढळतात. सुशिक्षित समाजात देखील मुलाला विशेष प्राधान्य दिले जाते. आधुनिक काळात सुशिक्षित लोक गर्भजलाचे परिक्षण करून गर्भाचे लिंग माहित करून घेतात. स्त्री लिंग असलेला गर्भ पाडला जातो. त्यामुळे भारतात एक हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण हे कमी आहे. 2001 च्या जनगणनेनुसार एक हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण 933 इतके होते; तर 2011 मध्ये स्त्रियांची संख्या 943 होती. 2011 च्या जनगणनेनुसार पुरुषांची संख्या 58 कोटी 64 लाख 69 हजार 174 होती याचा अर्थ 2011 मध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या 3 कोटी 72 लाख 55 हजार 74 इतकी कमी होती. मुलीचे योग्य संगोपन करणे तीच्या संगोपनाकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करणे, मुलगी गर्भात असतानाच मारून टाकणे आणि मुलीचा जन्म झाल्यानंतर तिला मारणे या कारणांमुळे आपल्या देशात मुलांपेक्षा मुलींच्या मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. म्हणून आपल्या देशात स्त्रियांची संख्या कमी आहे.

* कुटुंबात मुले-मुली असतील तर मुलाला चांगले खाऊ-पिऊ घालतात. त्याचे विशेष कौतुक केले जाते. त्याचा प्रत्येक हट्ट पूर्ण केला जातो. याउलट मुलीचे संगोपन योग्य प्रकारे केले जात नाही. मुलींच्या संदर्भात पक्षपात केला जातो. मुलीच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून मुलाच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविले जाते. मुलगा आपला वंश टिकवून ठेवतो. तो खरा कुटुंबाचा वारस आहे. तो शिकून मोठा झाल्यावर आपल्या कुटुंबाचे नाव मोठे करील अशी आई-वडिलांची समजूत असते. त्यामुळे मुलीपेक्षा मुलांना विशेष महत्त्व दिले जाते. म्हणून भारतीय समाजात लिंग पक्षपात मोठ्या प्रमाणात आढळून येतो.

## ✓ भारतीय शिक्षणातील लिंग पक्षपाताचा स्त्री शिक्षणास अडथळा

* भारतीय समाजात स्त्री-पुरुषांच्या संदर्भात विषमतावादी प्रवृत्ती आहे. भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष या दोघांनाही समान अधिकार दिले असले तरी देखील आजही लिंगाच्या आधारावर पक्षपात केला जातो. त्याचा फार मोठा प्रतिकूल परिणाम भारतातील स्त्री शिक्षणावर झाला आहे. भारतामधील शिक्षणात लिंग पक्षपात कशा प्रकारचा आहे, त्याचा स्त्री शिक्षणामध्ये कसा अडथळा निर्माण झाला? हे पुढील मुद्यांवरून स्पष्ट करता येईल.

**(1) मुली शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित** :- आधुनिक काळात सर्वांना शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. तरी देखील लिंग पक्षपातामुळे मुली शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित आहेत. प्रत्येक मुलीला शाळेत टाकले पाहिजे. तिचा विकास होण्यासाठी तिला शिकण्याची संधी मिळाली पाहिजे परंतु पालक मुलींना शाळेतच पाठवित नाही. कुटुंबात मुले-मुली असल्यास मुलाला शाळेत पाठवितात. परंतु मुलीला घरीच ठेवतात. कुटुंबात मुले-मुली असल्यास मुलाला शाळेत पाठवितात. परंतु मुलीला घरीच ठेवतात. तिला शिकून काय करायचे? लग्नानंतर तर तिला घरातच राहायचे आहे. असा विचार करणारे असंख्य पालक आहेत. म्हणून लाखो मुली शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित राहतात. मुलींना शिक्षण न देणे म्हणजे मानवी अधिकाराचे उल्लंघन होय.

**(2) मुलींच्या गळतीचे प्रमाण अधिक** :- पालक मुलींना शाळेत पाठवित नाही समजा शाळेत पाठविले तरी तिला जास्त शिक्षण दिले जात नाही. भावंडांना सांभाळणे, घरातील कामे करणे, शेतीतील काम करणे यामुळे तीचे शिक्षण मध्येच बंद केले जाते. एका शासकीय अहवालानुसार 1 ते 10 वर्षापर्यंत मुलींचे मध्येच शाळा सोडून देण्याचे प्रमाण 80% आहे. मुलींचे 1ल्या वर्गात नाव टाकण्यात आलेल्या 100 मुलींपैकी फक्त 42 मुली 5 व्या वर्गापर्यंत जातात. यावरून प्राथमिक शिक्षणातच मुलींचे गळतीचे प्रमाण 50% टक्के आहे. तर मुलींचे प्रमाण मात्र 26.6 इतके कमी आहे. यावरून हे स्पष्ट होते की लिंग पक्षपातामुळे मुलींचे गळतीचे प्रमाण मुलांपेक्षा खूप जास्त आहे.

**(3) शाळांमध्ये मुलींकरिता आवश्यक सोयींचा अभाव** :- शाळांमध्ये मुलां-मुलींकरीता आवश्यक सोयी उपलब्ध असल्या पाहिजेत विशेषता मुलींकरीता आवश्यक सोयी महत्वाच्या असतात

अमेरिकेच्या कॉमर्स विभागाच्या 1998 च्या अहवालानुसार भारतातील शाळांमध्ये मुलींकरीता महत्वाच्या असलेल्या सोयी नाहीत उदा. शाळांमध्ये मुलींकरीता शौचालयाची सोय नाही, स्त्री शिक्षिकांची कमतरता इत्यादी. मुलींकरीता आवश्यक सोयी शाळांमध्ये उपलब्ध नसल्यामुळे अनेक मुली मधेच शाळा सोडतात.

④ **मुलींना दुय्यम शिक्षण** :- लिंग पक्षपातामुळे मुलींना शिक्षण देण्याची आवश्यकता नाही, असे पालकांचे मत असते. समजा शिक्षण द्यायचे असेल तर थोडेफार द्यावे असा विचार करून पालक मुलींना चांगल्या दर्जेदार शाळांमध्ये प्रवेश देत नाही. ते सरकारी शाळांमध्ये मुलींना शिक्षण देतात. मुलांना मात्र चांगल्या दर्जेदार शाळांमध्ये प्रवेश देतात. मुलीला नोकरी करायची नाही मग तिला चांगले शिक्षण कशाला द्यायचे ? असा विचार करून ते मुलींना कामचलाऊ अर्थात दुय्यम शिक्षण देतात. पेज नं ⑦

⑤ **स्त्री-पुरुषांच्या साक्षरतेमध्ये फरक** :- भारतातील स्त्री-पुरुषामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता आढळते. स्त्री-पुरुषांच्या साक्षरतेमध्ये कशी विषमता आहे हे जनगणनेच्या 2001 आणि 2011 च्या स्त्री-पुरुष साक्षरतेच्या प्रमाणावरून अधिक स्पष्ट होते.

**नकाशा क्रमांक – 11**

**भारतातील स्त्री-पुरुषांच्या साक्षरतेमध्ये फरक**

| वर्ष | देशातील साक्षरता | पुरुष साक्षरता | स्त्री-साक्षरता |
|---|---|---|---|
| 2001 | 65.38 | 75.85 | 54.16 |
| 2011 | 74.04 | 82.14 | 65.46 |

* भारतात 2001 च्या जनगणनेनुसार 65.38 % साक्षरता होती. तर 2011 मध्ये लोकांच्या साक्षरतेचे प्रमाण 74.04 % पर्यंत वाढले. यावरून हे लक्षात येते की देशात साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. परंतु स्त्री आणि पुरुष यांच्यातील साक्षरतेमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता आहे. 2001 मध्ये पुरुषांमध्ये साक्षरतेचे प्रमाण 75.85 % तर स्त्रियांमध्ये 54.16 % साक्षरता होती तर 2011 मध्ये पुरुषांची साक्षरता 82.14 आणि स्त्रियांची साक्षरता 65.46 % होती. यावरून हे सिद्ध होते की, देशातील स्त्री-पुरुषांच्या साक्षरतेमध्ये विषमता असल्याचे एकमेव कारण म्हणजे लिंग पक्षपात होय.

⑥ **मुलींच्या शिक्षणावर कमी खर्च** :- मुलांच्या शिक्षणाच्या तुलनेत मुलींच्या शिक्षणावर पालक फारच कमी खर्च करतात. मुलगी ही परक्याचे धन आहे. तिला शिकविल्यास आपल्याला काहीच फायदा नाही. अशी मानसिकता अनेक लोकांची आहे. त्यामुळे ते मुलींच्या शिक्षणावर अधिक पैसा खर्च करीत नाही. त्यामुळे मुलींचे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. पालक आपल्या मुलींचे सरकारी शाळेत नाव टाकतात. परंतु त्याचवेळी ते आपल्या मुलांचे नाव चांगल्या आणि महागड्या शाळांमध्ये टाकतात. यावरून पालकांच्या मुली विषयीच्या पक्षपात स्पष्ट होतो.

⑦ **मुलींना व्यावसायिक शिक्षण न देणे** :- मुलांना अभियांत्रिकी, वैद्यकीय इत्यादी प्रकारचे व्यावसायिक शिक्षण देतात. परंतु मुलींना मात्र व्यावसायिक शिक्षण देण्याचा पालक विचार करीत नाही. त्यापेक्षा ते मुलीचा विवाह करून देणे अधिक पसंत करतात. 20-25 वर्षाआधी मुलींना व्यावसायिक शिक्षण देण्यास पालक प्रोत्साहन देत नसत. व्यावसायिक शिक्षण घेऊन मुली काय करणार ? तिला नोकरी करायची नाही. असा विचार करणारे पालक आपल्या मुलींना व्यावसायिक शिक्षण देत नाही.

⑧ **उच्च शिक्षणात मुलींचे अत्यल्प प्रमाण** :- मुलांना उच्च शिक्षण देण्याकडे पालकांचा विशेष कल असतो. परंतु मुलींना मात्र उच्च शिक्षण देत नाहीत. म्हणून देशात उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण अतिशय कमी आहे. उच्च शिक्षणाची सोय जवळपास नसल्यामुळे पालक मुलींना बाहेरगावी पाठविण्याचा विचार करीत नाही. अर्धवट शिक्षण बंद करून मुलींचा विवाह करून देतात. उच्च शिक्षण घेतल्यामुळे मुली बिघडतात. मग त्यांना उच्च शिक्षण द्यायचेच कशाला ? असा विचार करणारे असंख्य पालक आहेत त्यामुळे उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण अत्यल्प आहे.

⑨ **ग्रामीण भागात मुलींचे कमी शिक्षण** :- शहरांपेक्षा ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण फारच कमी आहे. शहरी भागात लिंग पक्षपात आहे. असे असले तरी आधुनिक विचारांच्या प्रभावामुळे ते मुलींना शिक्षण देतात. ग्रामीण भागातील लोकांमध्ये शिक्षणाचा अभाव आणि परंपरा, रूढी इत्यादींचा अधिक प्रभाव असल्यामुळे त्यांच्यात लिंग पक्षपाताचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे ग्रामीण लोक मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात परिणामतः ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

## शिक्षणातील लिंग पक्षपात दूर करण्याचे प्रयत्न

* भारतातील शिक्षणातील पक्षपात दूर करण्याचा प्रयत्न शासन आणि अनेक स्वयंसेवी संस्था करीत आहेत. मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याकरीता शासनाने अनेक उपाययोजना सुरू केल्यात ग्रामीण भागातील मुलींनी प्राथमिक शाळेत रोज जावे, याकरीता त्यांना पोषक आहार देण्याची योजना शासनाने सुरू केली. या योजनेचे प्राथमिक शिक्षणास प्रोत्साहन देणारा पौष्टिक आहाराचा राष्ट्रीय कार्यक्रम असे नाव आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक स्तरावरील मुलींच्या शिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम

## अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या (OBC) शैक्षणिक समस्या :

* अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या शिक्षणाच्या संदर्भात अनेक समस्या आहेत. अनुसूचित जातीच्या लोकांना शेकडो वर्षांपासून शिक्षणाचा अधिकार नव्हता. ओबीसी समुदाय ग्रामीण भागात होता. परंतु ते शेती आणि पारंपारिक कारागिरीच्या व्यवसायात होते. त्यामुळे त्यांना शिक्षणाचे विशेष महत्त्व वाटत नव्हते. परंतु आता ओबीसी समाज शिक्षणाकडे वळला तरी देखील त्यांचे शिक्षणातील प्रमाण कमी आहे. अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसी या तिन्ही समुदायांची सामाजिक सांस्कृतिक आणि धार्मिक पार्श्वभूमी ही वेगवेगळी असली तरी त्यांच्या शैक्षणिक समस्या या जवळपास सारख्या आहेत. त्यांच्या शैक्षणिक समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

### शैक्षणिक समस्या [Educational Problems.] :-



(1) अनुसूचित जाती-जमातीमध्ये गरिबी आणि दारिद्र्य मोठ्या प्रमाणात आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्यांना आपल्या उदरनिर्वाहाकरीता रात्रंदिवस काम करावे लागते. त्यामुळे ते आपल्या मुलांना शाळेत पाठवित नाहीत. अनेकदा लहान मुलांना कामाच्या ठिकाणी सोबत घेऊन जातात. अत्यंत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे अनेक पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवित नाही. ओबीसी समुदाय हा शेती करणारा आणि कारागीर आहे. त्यांची अनुसूचित जाती-जमातीपेक्षा थोडीफार चांगली परिस्थिती आहे. ओबीसी लोकांचा व्यवसाय प्रामुख्याने शेती आहे. त्यामुळे ते आपल्या मुलांना शेतीतील लहान-मोठी कामे करायला सांगतात. ते मुलांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने बघत नाही. अनुसूचित जाती-जमाती यांच्या तुलनेत थोडीफार चांगली परिस्थिती ओबीसी समुदायाची असली तरी त्यांच्यात गरीबी आहे. त्यामुळे ते देखील मुलांच्या शिक्षणाचा फारसा विचार करीत नाही. अशाप्रकारे गरिबी आणि दारिद्र्यामुळे अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसी समाजात शिक्षणाविषयी अनास्था आढळून येते.

(2) **शाळा गळतीचे प्रमाण जास्त** :- अलीकडे खेड्या-पाड्यात शाळा आहेत. आदिवासी क्षेत्रात देखील आश्रमशाळा सुरू झाल्यात. त्यामुळे अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी समुदायातील लोक मुलांना शाळेत पाठवितात. परंतु ते आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देऊ शकत नाही. पालकांना शिक्षणाविषयी आणि मुलांच्या होमवर्कविषयी काहीच माहिती नसते. त्यामुळे पालक आपल्या मुलांच्या होमवर्कविषयी काहीच मदत करू शकत नाही. पालक शिकणाऱ्या मुलांना शेती किंवा इतर कामे करायला सांगतात त्यामुळे मुलांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. म्हणून अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी विद्यार्थ्यांमध्ये मधूनच शाळा सोडण्याचे प्रमाण अधिक आहे. ओबीसींच्या तुलनेत अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये शाळा गळतीचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे या समुदायाची फार मोठी शैक्षणिक समस्या निर्माण झाली.

(3) **विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव** :- शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव मोठ्या प्रमाणात आढळतो. अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी मुलांचे राहणीमान, त्यांच्या आवडी-निवडी या निश्चितच इतर मुलांपेक्षा वेगळ्या असतात. त्यामुळे ते आदिवासी मुलांना आपल्यासोबत येऊ देत नाही. अनुसूचित जातीच्या मुलांसोबत तर मोठ्या प्रमाणात भेदाभेद केला जातो. "टाईम्स ऑफ इंडिया"च्या चेन्नई आवृत्तीमध्ये 17 जुन 2018 रोजी एक बातमी प्रकाशित झाली. त्या बातमीनुसार तामिळनाडू येथील श्रीपेरूम्बुदुर शहरापासून 15 किलोमीटर अंतरावर एका सरकारी शाळेतील 330 विद्यार्थी पैकी 220 विद्यार्थ्यांनी शाळेवर बहिष्कार टाकला कारण ती शाळा अनुसूचित जाती समुदायाच्या वस्तीजवळ आहे. त्यामुळे ती शाळा दुसरीकडे हलवावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. अजूनही इतर विद्यार्थ्यांच्या मनात अनुसूचित जातींच्या लोकांबद्दल भेदभावाची भावना अतिशय प्रखर आहे. त्यामुळे अनुसूचित जाती आणि जमातीच्या विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होतो. हीच भावना थोड्याफार फरकाने ओबीसी विद्यार्थ्यांविषयी इतर विद्यार्थ्यांमध्ये आहे. त्यामुळे ते शिक्षणात प्रगती करू शकत नाही परिणामतः ते शिक्षणापासून बाहेर फेकलेले दिसून येतात.

(4) **सरकारी शाळांचा निम्न दर्जा** :- अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसी समुदायातील विद्यार्थी प्रामुख्याने सरकारी शाळांमध्ये शिक्षण घेतात. या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा अतिशय निम्न असतो. शाळेत शिक्षक बरोबर शिकवित नाही. ते विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देत नाही. त्यामुळे सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा खालावला आहे. या शाळांमध्ये आवश्यक त्या सोयी सवलतींचा अभाव असतो. त्यामुळे अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर निम्न राहतो. हे विद्यार्थी इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांच्या तुलनेत खूप मागे असतात. हे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत साफल्य मिळवू शकत नाही.

(5) **शिक्षणाचे खाजगीकरण** :- शिक्षणाचे खाजगीकरण झाल्यामुळे त्याचा अतिशय गंभीर परिणाम अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींच्या शिक्षणावर झाला आहे. भांडवलदारांनी प्रचंड गुंतवणूक करून अत्याधुनिक सोयी-सवलती असलेल्या शाळा आणि महाविद्यालये सुरू केलेले. अनुसूचित जाती, जमाती, आणि ओबीसी समुदायातील लोक गरीब असल्यामुळे ते खाजगी शिक्षण संस्थांना डोनेशन देऊन आणि अधिक शिक्षण फी भरून आपल्या पाल्यांना

खाजगी शिक्षणसंस्थांच्या शाळा किंवा महाविद्यालयांमध्ये पाठवू शकत नाही. खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळा-महाविद्यालयांसारखे दर्जेदार शिक्षण सरकारी शाळा-महाविद्यालये देऊ शकत नाही. सरकारची शैक्षणिक नीती देखील खाजगी शिक्षण संस्थांच्या बाजूची आहे. त्यामुळे अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहावे लागते.



⑥ **शिष्यवृत्ती नियमित न मिळणे** :- अनुसूचित जाती आणि जमातींच्या मुलांची शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून भारत सरकारची शिष्यवृत्ती योजना आहे. अकरावी वर्गापासून शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु ही शिष्यवृत्ती अनुसूचित जाती-जमातींच्या मुलांना नियमित दिली जात नाही. शिष्यवृत्ती नियमीत न मिळाल्यामुळे त्यांच्या समोर आर्थिक प्रश्न निर्माण होतो. अनेक महाविद्यालयांनी बोगस अनुसूचित जाती-जमाती विद्यार्थ्यांची संख्या दाखवून शिष्यवृत्तीचा करोडो रुपयांचा घोटाळा केला त्याचा त्रास अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना होत आहे. ओबीसीच्या विद्यार्थ्यांकरीता महाराष्ट्र शासनाने शिष्यवृत्ती सुरू केली आहे. परंतु दोन-तीन वर्षांपासून शासनाने शिष्यवृत्ती देणे बंद केले खाजगी शिक्षण संस्थामधील शैक्षणिक फी जास्त असते. त्या फीच्या प्रमाणात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात नाही. त्यामुळे अनुसूचित जाती-जमातींच्या अनेक विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रम मध्येच सोडून दिले आहेत.

⑦ **शैक्षणिक योजनांची योग्य अंमलबजावणीचा अभाव** :- अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसी समुदायातील विद्यार्थ्यांकरीता अनेक शैक्षणिक योजना शासनाने सुरू केल्यात परंतु त्या शैक्षणिक योजनांची योग्यप्रकारे अंमलबजावणी केली जात नाही. या शैक्षणिक योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे या समुदायाच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये मोठा अडथळा निर्माण झाला आहे. शासनाच्या शैक्षणिक योजना फक्त कागदोपत्रीच राहतात. प्रत्यक्षात त्या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही त्यामुळे अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींचा शैक्षणिक दर्जा अतिशय निम्न आहे.

⑧ **शासकीय धोरण** :- शासन एकीकडे अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींच्या संदर्भात शैक्षणिक योजना सुरू असते. परंतु शासनाचे मुकुंदरीत शैक्षणिक धोरण हे या समुदायांच्या विरोधात असते. खाजगी शाळा, महाविद्यालये, व्यावसायीक शिक्षण संस्था आणि खाजगी विद्यापीठे सुरू करण्यास शासनाने परवानगी दिली. शासकीय शाळा आणि महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला नाही. शासकीय शाळा आणि महाविद्यालये बंद केली जात आहेत. 2017-2018 या सत्रात महाराष्ट्रातील अनेक शाळा बंद करण्यात आल्यात शासनाचे शैक्षणिक धोरण हे मुख्यतः अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींच्या विरोधात आहे. त्यांनी केवळ कामापुरते शिक्षण द्यावे असाच दृष्टीकोन आहे. उच्च शिक्षणाचे खाजगीकरण करण्याच्या शासकीय धोरणाचा अतिशय प्रतिकूल परिणाम अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींच्या शिक्षणावर पडला आहे.

## अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती समुदायाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न

① **अनुसूचित जमातीच्या मुलींकरिता वसतिगृह** :- अनुसूचित जमातीच्या मुलींकरिता वसतीगृह सुरू करण्याचा उपक्रम तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू करण्यात आला. 1996-97 च्या अर्थसंकल्पामध्ये 3.50 कोटींची तरतुद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात 59 वसतिगृहाकरिता 2.26 कोटी रुपये खर्च करण्यात आले.

② **मुलांकरिता वसतिगृह** :- मुलींच्या वसतीगृहाच्या धर्तीवर अनुसूचित जाती जमातीच्या मुलांकरिता वसतिगृह निर्माण करण्याचा कार्यक्रम 1989-90 मध्ये सुरू करण्यात आला. 1996-97 च्या अर्थसंकल्पामध्ये 3.50 कोटीची तरतुद करण्यात आली होती; परंतु प्रत्यक्षात राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना 68 वसतिगृहांकरीता 3.19 करोड रुपये देण्यात आले.

③ **जमाती उप-योजना क्षेत्रात आश्रम विद्यालय** :- केंद्र शासनाद्वारे प्रायोजित हा कार्यक्रम 1990-91 मध्ये सुरू करण्यात आला. या कार्यक्रमाअंतर्गत आश्रम पद्धतीचे विद्यालय सुरू करण्यासाठी राज्यांना 50% आणि केंद्रशासित प्रदेशांना 100% आर्थिक सहाय्य देण्यात येते. 1996-97 मध्ये आश्रम विद्यालयांचे निर्माण आणि विस्ताराकरीता 3 कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात 15 आश्रम विद्यालयांकरीता 2.87 कोटी रुपये देण्यात आले.

④ **आदिवासी क्षेत्रात व्यावसायिक प्रशिक्षण** :- आदिवासी क्षेत्रात व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा उपक्रम 1992-93 मध्ये सुरू करण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश अनुसूचित जमातींच्या बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करणे आणि विकासकारी प्रती यांचे... होता. या उपक्रमाअंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता प्रशिक्षण केंद्र उघडण्यात आले.

(5) **मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती** :- अनुसूचित जाती-जमातींच्या मुलांना मॅट्रिकनंतरचे महाविद्यालय शिक्षण, वाईट आर्थिक परिस्थितीमुळे घेता येत नाही. म्हणून अनुसूचित जाती जमातीच्या मुलांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती केंद्र सरकारने सुरू केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळाले.



(6) **प्रशिक्षण आणि अन्य कार्यक्रम** :- केंद्रिय लोक सेवा आयोग, राज्यलोकसेवा आयोग, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, बँकींग सेवा निवड बोर्ड आणि या प्रकारच्या इतर यंत्रणांद्वारे आयोजित विविध स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्यासाठी अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याच्या उपक्रम चवथ्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू करण्यात आला. त्याकरिता शासनातर्फे आर्थिक सहाय्य दिले जाते. विशेष म्हणजे या योजना अंतर्गत प्रशिक्षण घेऊन अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्याने 1996 च्या भारतीय प्रशासन सेवेच्या परीक्षेत भारतातून 5 वा क्रमांक प्राप्त केला होता.

(7) **पुस्तक पेढी उपक्रम** :- वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरीता अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक उपलब्ध करून देण्यासाठी पुस्तक पेढी उपक्रम 1991-92 पासून सुरू करण्यात आला. 1996-97 मध्ये या उपक्रमासाठी 1.83 कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले होते, ज्याचा 18 हजार 927 विद्यार्थ्यांनी फायदा घेतला.

(8) **उच्च शिक्षणाकरिता राष्ट्रीय विदेशी शिष्यवृत्ती आणि यात्रा अनुदान** :-

* या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती-जमाती, भटक्या विमुक्त जमाती, धर्मांतरीत (ख्रिश्चन) अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांकरिता विदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राष्ट्रीय विदेशी शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना पोस्ट डॉक्टरेट, पीएच डी, स्नातकोत्तर आणि स्नातक अभ्यासक्रमाकरीता शिष्यवृत्ती देण्यात येते. प्रत्येक वर्षाला 30 विद्यार्थ्यांना विदेशी शिष्यवृत्ती दिली जाते. यामध्ये अनुसूचित जाती-17, जमाती-9, अनुसूचित जाती (ख्रिश्चन)-1, भटक्या विमुक्त जमाती-1 आणि भूमीहीन शेतमजूर-1 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. 1997 पर्यंत 523 विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीचा लाभ घेतला.

## अनुसूचित जाती-जमातीच्या शैक्षणिक विकासाकरिता शिक्षण आयोगाने केलेल्या शिफारशी

* 1964 मध्ये प्रा. दौलतसिंह कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली 'भारतीय शिक्षण आयोग' (1964-66) स्थापन केला होता. या आयोगालाच 'कोठारी आयोग' या नावाने ओळखले जाते. कोठारी आयोगाने अनुसूचित जाती-जमातीच्या शैक्षणिक विकासासाठी पुढील शिफारसी केल्या आहेत.

(1) अनुसूचित जाती आणि जमातीच्या विकासासाठी जे अनेक कार्यक्रम आहेत ते विकासात्मकरित्या राबविले पाहिजेत.

(2) भटक्या विमुक्त जमातीसाठी शिक्षणाच्या विशेष सोयी केल्या पाहिजेत.

(3) विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची सोय करून दिली पाहिजे.

(4) आदिवासींकरीता निम्न्या इयत्तेपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रीय भाषा माध्यम म्हणून मान्य करावयास पाहिजे.

(5) माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शाळा, वसतीगृह, शिष्यवृत्ती इ. सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

(6) उच्च शिक्षणासाठी मिळत असणाऱ्या शिष्यवृत्तीचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी ती विभागून वितरित केली जावी.

(7) आदिवासींच्या विकासाकरीता कार्य करणाऱ्या शैक्षणिक संस्थांना प्रोत्साहन द्यावे.

(8) आदिवासी जमातीमधिल प्रतिभावंत तरुणांना कार्य करण्यास संधी द्यावी.

(9) आदिवासी क्षेत्रात कार्य करण्यासंबंधी प्रशिक्षण द्यावे.

(10) आदिवासी क्षेत्रात कार्य करण्यास तत्पर असणाऱ्या व्यक्तींसाठी अधिकाराच्या जागा निर्माण कराव्यात.

(11) आदिवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्या शिक्षकांना विशेष भत्ते द्यावेत.

(12) आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांच्या निवासाची व्यवस्था करून द्यावी.

(13) त्या शिक्षकांच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करावी.

(14) त्या शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देण्यात यावे.

## अनुसूचित जाती-जमातीच्या शिक्षणासाठी 1992 मध्ये तयार केलेली कृती योजना

* 1986 चे राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि प्रत्यक्ष धोरणाची अंमलबजावणी करतांना आलेल्या अनुभवांना लक्षात घेऊन 1992 च्या कृती योजनेमध्ये अनुसूचित जाती-जमातीच्या शिक्षणाबाबत पुढील नीती तयार करण्यात आली होती.

(क) **शाळांमध्ये प्रवेशाची सुलभता** :- (1) ग्रामीण भागातील अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांकरिता शिक्षण अधिक सुलभ बनविणे आणि त्यांचे नामांकन सुनिश्चित करण्याच्या उद्देशातून प्राथमिक शाळा सुरू करतांना अनुसूचित जातींच्या वस्त्यांना प्राधान्य दिले जाईल. पूर्व-प्राथमिक शिक्षण शाळांशी अनिवार्य जोडले जाईल.

(2) प्रत्येक अनुसूचित जमातीच्या वस्त्यांमध्ये मुलांची शाळेत भरती आणि सहभाग सुनिश्चीत करण्याकरिता आठवी पंचवार्षिक योजना समाप्त होण्यापूर्वी प्रथम एक शाळा किंवा अन्य उपयुक्त संस्था उघडण्यात येईल.

(3) अनुसूचित जमातीच्या क्षेत्रांमध्ये शैक्षणिक योजना आवश्यक रूपात लागू करण्यात येईल. पूर्व प्राथमिक शिक्षण (बालवाडीच्या माध्यमातून), अनौपचारिक शिक्षण, प्रारंभिक शिक्षण आणि प्रौढ शिक्षण संपूर्ण लोकसंख्येच्या पूर्ण साक्षर बनविण्यासाठी परस्पर जोडण्यात येऊन त्यांच्यात समन्वय ठेवण्यात येईल. या क्षेत्रातील 3-14 वयोगटातील सर्व मुलांना आणि 15 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांना प्रौढ शिक्षण हे क्षेत्र उत्तरदायी राहतील.

(4) अनुसूचित जातींच्या मुलांकरिता औपचारिक शाळामध्ये प्राथमिक रूपात प्रवेश आणि नामांकनास सुनिश्चित करण्यात येईल. जेथे अनुसूचित जातींचे मुल शाळेत जाण्याच्या स्थितीत नाही, तेथे गैर-औपचारिक आणि दूरशिक्षण केंद्राची व्यवस्था करण्यात येईल.

(5) शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना विशेषतः अनुसूचित जाती आणि जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याकरिता प्रत्येक शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला अभियान चालविण्याची जबाबदारी शिक्षकांची राहील.

पेज नं. (11)

(ख) सहभाग :-

(1) अनुसूचित जाती-जमातीच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी पुरेसे प्रोत्साहन दिल्या जाईल. त्यासाठी त्यांना शिष्यवृत्ती, युनिफार्म, पाठ्य-पुस्तके, लेखन सामग्री आणि दुपारचे भोजन देण्यात येईल.

(2) अनुसूचित जाती-जमातीच्या वस्त्यांतील सर्व शाळा, गैर-औपचारिक शिक्षण केंद्र आणि पूर्व शाळा केंद्रांना अध्ययनाच्या न्युनतम स्तरास प्राप्त करण्यासाठी आणि खडू-फळा मोहिम करिता निर्धारित मापदंडानुसार अनिवार्य आणि मूलभूत आवश्यकतापनात्मक सुविधा पुरविण्यात येतील.

(3) अनुसूचित जाती-जमातीमधील गरीब कुटुंबांना आपली मुले विशेषतः मुलींना शाळेत पाठविण्याकरिता प्रोत्साहन देण्यात येईल.

(ग) प्रोत्साहन :- (1) अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना पूर्व मॅट्रिक आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती निर्वाह खर्च सूचकांक मध्ये झालेल्या वृद्धीनुसार देण्यात येईल. (2) अप्पर प्राथमिक शाळा (मिडल) आणि त्यावरील वर्गातील अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती बँक किंवा पोस्टाच्या माध्यमातून वितरीत करण्यात येईल. (3) अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता कोचिंग, प्रशिक्षण आणि उपचारात्मक अध्यापन वर्ग आयोजित केले जातील. (4) स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करणाऱ्या अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता अतिरिक्त शिष्यवृत्त्या उपलब्ध करून देण्यात येतील. त्याबरोबर विशेष कोचिंग आणि सुधारात्मक पाठ्यक्रमाची व्यवस्था करण्यात येईल. (5) योग्यता शिष्यवृत्ती योजनेत 'क' श्रेणीच्या विद्यार्थ्यांना सहभागी केले जाईल. ही योजना सर्व राज्यात लागू करण्यात येईल. (6) अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षक बनण्यास देण्याकरिता माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि व्यावसायिक प्रशिक्षणास एकत्रित करून विशेष पाठ्यक्रम तयार करण्यात येईल.

## इतर मागासवर्गीय (ओबीसी) समुदायांच्या शिक्षणासाठी 1992 च्या कृती योजनेनुसार खालील प्रयत्न करण्यात येतील :-

(1) शाळेतील सर्व मुलांना विशेषतः इतर मागासवर्गीय जातींच्या मुलींना शाळेत दाखल करण्याकरिता प्रत्येक शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला एक मोहिम सुरु करण्याची जबाबदारी शिक्षकांची राहील.

(2) इतर मागासवर्गीय जातींच्या मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याकरीता शिष्यवृत्ती युनिफार्म, पाठ्यपुस्तक, लेखन सामग्री आणि दुपारचे भोजन देण्यात येईल.

(3) इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता कोचिंग, प्रशिक्षण आणि सुधारात्मक अध्यापन वर्ग आयोजित करण्यात येतील, ज्यामुळे या विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक योग्यता वाढविण्यात येईल (4) दुरच्या आणि दुर्गम क्षेत्र, सीमांत क्षेत्र आणि शैक्षणिक दृष्टीने मागासलेले वर्ग असलेल्या क्षेत्रात शैक्षणिक मुलभूत संरचनेत सुधारणा करण्याचे प्रयत्न केले जातील.

* अशाप्रकारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा आदिवासी आणि इतर मागासवर्गीय समुदायात शिक्षणाचा प्रसार आणि त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने विविध योजना सुरु केल्या आहेत परंतु या योजनांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने केली जात नाही.

## युनिट क्र. २ VI Semester विस्थापन आणि पुनर्वसन [Displacement and Rehabilitation]

* **विस्थापनाचा अर्थ** :- भूकंप, महापूर, वादळे, त्सुनामी, भूस्खलन इत्यादी नैसर्गिक कारणांमुळे मानवी जीवन उद्ध्वस्त होते. लोक आपला जीव वाचवून दुसरीकडे पळतात. या नैसर्गिक कारणांमुळे हजारो लोक मृत्युमुखी पडतात. तसेच मोठ्या प्रमाणात वित्तहानी होते. या नैसर्गिक कारणांमुळे विस्थापन होत असते. तर दुसरी देशाच्या विकास घडवून आणण्यासाठी मोठमोठे औद्योगिक प्रकल्प सुरू करण्यात आलेत. मोठमोठी धरणे बांधण्यात आलीत. अनेक औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्यात आलीत भूगर्भातील कोळसा, मँगनीज, लोखंड इत्यादी खनीज संपत्ती काढण्यासाठी खाणी सुरू करण्यात आल्यात या सर्व गोष्टी देशाच्या विकास घडवून आणण्यासाठी सुरू करण्यात आल्यात. औद्योगिक प्रकल्प, मोठ-मोठी धरणे, खाणी आणि औद्योगिक क्षेत्रासाठी त्या परिसरातील गावे उठविली जातात. जे लोक वर्षानुवर्ष ज्या गावांमध्ये राहिले ते गाव त्यांना सोडून देण्यास भाग पाडले जाते त्यामुळे लोक आपल्या मूळ गावातून विस्थापित होतात. आधुनिक काळात विस्थापनाचा प्रश्न हा विकासामुळे देखील निर्माण झाला आहे. याचाच अर्थ विकास हा विस्थापनाला प्रेरित करतो. विकासाच्या हव्यासापोटी विस्थापनाची समस्या निर्माण झाली आहे.

पेज नं (12)

* यावरून हे स्पष्ट होते की, विस्थापनाची पुढील दोन प्रमुख कारणे आहेत ① नैसर्गिक ② मानवनिर्मित नैसर्गिक आणि मानवनिर्मित या दोन कारणांमुळे विस्थापन घडून येते. म्हणून नैसर्गिक विस्थापन आणि मानवी विस्थापन असे विस्थापनाचे दोन प्रकार आहेत. जेव्हा भूकंप, महापूर आणि भूस्खलन या नैसर्गिक कारणामुळे विस्थापन होते तेव्हा त्यास नैसर्गिक विस्थापन असे म्हणतात. तर मानव निर्मीत कारणामुळे झालेल्या विस्थापनास मानवी विस्थापन असे म्हणतात. आजकाल नैसर्गिक कारणांपेक्षा मानवनिर्मित कारणामुळे मोठ्या प्रमाणात विस्थापन घडून येत आहे. मानवी विस्थापन हे प्रामुख्याने विकासाच्या प्रकल्पामुळे घडून येत आहे.

* व्यापक दृष्टिकोनातून विस्थापनाचा विचार केल्यास असे आढळून येते की, अनेक पिढ्यांपासून निर्माण झालेली सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संरचना नष्ट केली जाते. म्हणजेच सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय [illegible] लोकांना क्लेशदायक करते होय. विस्थापन ही जबरदस्त दुःखद धक्का देणारी प्रक्रिया आहे. ज्यामुळे लोक भूमिहीन, बेघर बेरोजगार बनतात. विस्थापनामुळे लोकांना नैसर्गिक संसाधनाच्या अर्थ अधिक स्पष्ट होईल.

① **कॉलीन्स कोबाइल्ड शब्दकोष (1988)** :- "लोक ज्या क्षेत्रात राहतात तेथून लोकांना जबरदस्तीने दूर पाठविणे होय!"

② **डॉ. जी. सत्यनारायण** :- "विस्थापन म्हणजे घर, जमीन व्यवसाय सोडणे आणि पर्यायी व्यवसाय करणे, नवीन घर करणे आणि नवीन नातेसंबंध जोडणे आणि नवीन संस्कृती आणि पर्यावरणाशी समायोजन करणे होय!"

③ **जोस मुरीकन, जार्ज आणि बलर** :- "विस्थापन अशी संकल्पना आहे की, विकासाच्या प्रकल्पाकरीता लोकांना त्यांच्या मूळच्या स्थानावरून उठविले जाते."

④ **भारत सरकार जमिन अधिग्रहण (सुधारीत) कायदा 1984** :- "कायदेशीर प्रक्रियेद्वारे एखाद्या व्यक्तीला त्याच्या घरापासून वा भूमीपासून जबरदस्तीने हलविणे!"

⑤ **निर्मला बॅनर्जी व सुषाना मरजीत यांच्या मते** :- "विस्थापन म्हणजे संघटनात्मक बदलाचे, संस्थात्मक परिवर्तनाचे प्रकटन होय. तसेच एका संघटनेद्वारे दुसऱ्या संघटनेचे स्थान ग्रहण करणे होय किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या संघटनेची व्याप्ती मर्यादित करणे होय!"

* वरील व्याख्यांवरून विस्थापनाची संकल्पना स्पष्ट होते. विस्थापनाच्या संकल्पनेमध्ये पुढील महत्वाचे मुद्दे आहेत.

① विकासामध्ये विस्थापन केले जाते. म्हणजेच विकास हा विस्थापनास प्रेरित करतो.
② विस्थापनामुळे लोकांचे पूर्वीचे सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, आर्थिक जीवन उध्वस्त होते.
③ शासकीय यंत्रणेद्वारे लोकांना जबरदस्तीने पूर्वीच्या जागेवरून हटविले जाते.
④ विस्थापनामुळे विस्थापितांच्या सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, कौटुंबिक आणि आर्थिक समस्या निर्माण होतात.
⑤ नवीन जागेवर राहण्यास आल्यानंतर विस्थापितांना नवीन सामाजिक जीवनाशी आणि पर्यावरणाशी समायोजन करावे लागते.

* वरील मुद्यावरून विस्थापनाची संकल्पना अधिक स्पष्ट होते. यावरून आपणास असे म्हणता येईल की, "विस्थापन म्हणजे नैसर्गिक घटनांद्वारे आणि मानवी विकासाच्या प्रकल्पांकरीता, लोकांचे पूर्वीचे संपूर्ण सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक जीवन उद्ध्वस्त करणे होय." किंवा "निसर्गाद्वारे आणि मानवाद्वारे विकासाकरिता लोकांचे पूर्वीचे संपूर्ण सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक, मानसिक जीवन ज्या प्रक्रियेद्वारे उद्ध्वस्त केले जाते. त्यास विस्थापन असे म्हणतात.

* **विस्थापनाची कारणे [Causes of Displacement]** :-

* विस्थापन हे नैसर्गिक किंवा मानवनिर्मित या दोन प्रमुख कारणांमुळे घडून येते. म्हणून नैसर्गिक व मानव निर्मित ही विस्थापनाची दोन कारणे आहेत. नैसर्गिक कारणामध्ये भूकंप, महापूर, वादळ, भूस्खलन यांचा समावेश होतो. तर मानवनिर्मित कारणांमध्ये युद्ध, औद्योगिकरण, धरणे तलाव, रस्ते, [illegible] यांचा समावेश होतो. मानवी व नैसर्गिक या दोन प्रकारच्या कारणांमुळे विस्थापन होत असते.

त्यामुळे लोकांना दुसऱ्या ठिकाणावरून उठविले जाते. शेकडो एकर जमीन खाली करण्याचा प्रयत्न राज्याचा असतो. यामुळे लोकांचे संपूर्ण जीवन उद्ध्वस्त होऊन अनेक समस्या निर्माण होतात.



## विस्थापनाची कारणे

① नैसर्गिक
- (i) महापूर
- (ii) वादळे, झंझावत
- (iii) भूकंप
- (iv) त्सुनामी

② मानव निर्मित
- (i) धरणे (ii) कारखाने आणि औद्योगिकरण
- (iii) कोळसा आणि खनिजांचे उत्पादन
- (iv) विद्युत परियोजना (v) राष्ट्रीय उद्यान
- (vi) रस्ते, सैनिक शिबीर आणि विमानतळ
- (vii) युद्ध आणि दंगली.

(1) **नैसर्गिक कारणे** :- भारतात नेहमीच जगाच्या पाठीवर कुठल्याही क्षेत्रात कधी घडून येणाऱ्या काही नैसर्गिक क्रिया असतात. या प्रकारच्या क्रिया प्रामुख्याने मानवी समाजाला व सजीव प्राण्यांना प्रभावित करतात. या प्रकारच्या नैसर्गिक क्रिया पाऊस, वादळ, ज्वालामुखी, पूर, भूस्खलन इत्यादी मुळे घडून येतात. त्यामुळे मानवी जीवन प्रभावित होत असते.

(i) **महापूर** :- महापूर ही संपूर्ण जगात नद्यांच्या खोऱ्यातील प्रदेशात वारंवार उद्भवणारी आपत्ती आहे. 1985 ते 1994 या वर्षात सरासरी 174 दशलक्ष लोकांना आपत्तीचा सामना करावा लागला ही संख्या 1995 ते 2004 या वर्षात 254 दशलक्षापर्यंत पोहोचली 30 जुलै 1991 च्या पहाटे वर्धा नदीला पूर आल्यामुळे नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील मोवाड, मुवाव, भरना, जलालखेडा इत्यादी गावांना पुराचा तडाखा बसला. त्यामुळे शेकडो लोक विस्थापित झाले होते. 2008 मध्ये दक्षिण आशिया आणि मेक्सिकोतील पुरामुळे 250 दशलक्ष लोक बेघर झाले. अचानक येणाऱ्या संकटामुळे दारिद्र्य रेषेखालील लोकांचे राहणीमान अधिकाधिक बिकट होत आहे. बांगलादेशात तर 83% प्रदेशाला महापुराची झळ पोहोचते.

* जेव्हा नद्यांच्या पात्रातून वाहून जाणाऱ्या पाण्यापेक्षा पावसामुळे पडलेल्या पाण्याचे प्रमाण अधिक असते त्यावेळी पुराचे संकट निर्माण होते. 26 जुलै 2005 ला मुंबई येथे 944 मि. मि. विक्रम पाऊस अवघ्या 24 तासात झाला. यामुळे एकदम पूर येऊन हाहाकार माजला, महाड या शहरात व परिसरात सावित्री नदीच्या पुराने तो परिसर जलमय झाला होता. 26 जुलै ते 2 ऑगस्ट 2005 पर्यंत हा परिसर पाण्याखालीच होता. महापुरामुळे शेतातील पिकांचे नुकसान होते. लोकांचा इतरांशी संपर्क तुटतो वीज पुरवठा खंडीत होतो अनेक माणसे व जनावरांचा पाण्यात बुडून मृत्यू होतो. पूर ओसरल्यानंतर आजार, रोगराई यामुळे लोकांचे आरोग्यमान खालावते. अन्नधान्याच्या व राहणीमानाच्या समस्या निर्माण होतात. लोकांचे कशाप्रकारे स्थलांतर करावे, त्यांचे मूळ गावी कशाप्रकारे पुनर्वसन करता येईल या बद्दल प्रशासनाला उपाय योजावे लागतात.

(ii) **वादळे, झंझावत** :- उत्तर अमेरिका आणि भारताची पूर्व किनारपट्टी या प्रदेशात वादळे ही सातत्याने निर्माण होणारी आपत्ती आहे. वादळे कॅटरीना, रिटा अशा वेगवेगळ्या नावांनी ती ओळखली जातात. सन 2005 मध्ये आलेल्या कॅटरीना आणि रिटा वादळामुळे न्यू ऑर्लिन्स, टेक्सास आणि फ्लोरिडा या अमेरिकेतील प्रदेशात प्रचंड जीवित आणि वित्त हानी घडून आली.

* भारतातही पूर्वेकडील ओरीसा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, बंगाल या राज्यात तसेच पश्चिमेकडील गुजरात या राज्यात वादळांचे संकट ओढवते. सामान्यतः जेव्हा हा वेग दर ताशी 119 किलोमीटर पेक्षा अधिक होतो. त्यावेळी त्या वादळासाठी झंझावर्त/तुफान (Storm) असा शब्द वापरला जातो. या झंझावताच्या वेगामुळे किनारपट्टीच्या प्रदेशांचे नुकसान होते. भूकंप, महापूर, यांच्या सारखीच झंझावत ही सुद्धा नैसर्गिक आपत्ती आहे. त्यामुळे अनेक गावातील लोकांचे विस्थापन होऊन राहणीमानाच्या व पुनर्वसनाच्या समस्या निर्माण होतात.

* 4 ऑक्टोबर 2013 ला बंगालच्या उपसागरात फायलिन वादळाची निर्मिती झाली. त्याचा प्रभाव 14 ऑक्टोबर 2013 पर्यंत होता. किनाऱ्याला 260 किमी या वेगाने 45 जणांचा मृत्यू झाला. तर 696 मिलियन डॉलर संपत्तीचे नुकसान झाले. थायलंड, म्यानमार व भारत हे तिन्ही देश सर्वात जास्त प्रभावित झाली.

* 23 ऑक्टोबर 2015 ला पॅसिफिक महासागरात हरीकेन पॅट्रिसिआ वादळामुळे मेक्सिकोमध्ये मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले. संपत्तीचे नुकसान झाले जीवितहानी, प्राणहानी वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाली. पॅट्रिसिआ वादळाच्या वेगाची तीव्रता 345 किमी होती. त्यामुळे घरांचे व झाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. म्हणून वादळामुळे लोक मोठ्या प्रमाणात विस्थापित होतात.

(iii) **भूकंप** :- भूगर्भात प्रचंड शक्ती निर्माण होऊन त्यामुळे भूपृष्ठाला हादरे बसतात. त्यातून काही वेळेस लाव्हारस ही मोठ्या प्रमाणात बाहेर पडतो. या भूपृष्ठांना बसणाऱ्या हादऱ्यांनाच भूकंप असे म्हणतात. भूपृष्ठांच्या हालचालीतून भूकंप निर्माण होतात. सामान्यतः प्रतिवर्षी 800 ते 1000 भूकंप होत असतात. ज्यावेळी 5 किंवा त्याहून अधिक 'रिक्टर स्केलचे' धक्के बसतात. त्यावेळी गंभीर परिस्थिती निर्माण होते. भूकंपामुळे नद्या-नाल्यांच्या प्रवाहाची दिशा बदलून प्रचंड नुकसान होते. दरडी कोसळणे, भूपृष्ठाला भेगा पडणे, घरे पडणे, झाडे पडणे, यासारख्या घटना घडतात.

इमारती व बांधकामे कोसळून, माती आणि घरांच्या ढिगाऱ्यात माणसे गाडली जातात. बांधकामे उद्ध्वस्त होऊन प्रचंड नुकसान होते.

* धरणांना तडे जाऊन धरणे फुटतात. जलाशयात साठलेले पाणी धरणांखालील प्रदेशात प्रलय घडवते. भूकंपामुळे जर रासायनिक कारखाने, अणुभट्ट्या यांना तडे गेले तर रासायनिक वायूगळती आणि किरणोत्सर्जन यामुळे मानवी जीविताची प्रचंड हानी होते. मोठ्या प्रमाणात नरसंहार होतो. 8 ऑक्टोबर 2005 रोजी पाकिस्तानमध्ये आलेल्या भूकंपाने जवळपास 1 लाख लोकांच्या मृत्यू झाला. प्रचंड जीवितहानी व वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे पाकिस्तानात हाहाकार माजलेला होता. घरांचे, शेतीचे, रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे त्याचा परिणाम पाकिस्तानमधील लोकांवर मोठ्या प्रमाणात पडला.



* 2 मार्च 2016 ला इंडोनेशियामधील सुमात्रा दक्षिण-पश्चिम भागात आलेल्या 7.8 % तीव्रतेच्या भूकंपात वित्तहानी मोठ्या प्रमाणात घडून आली. 24 जानेवारी 2016 ला अमेरिकेच्या अलास्का प्रांतात 7.1 रिक्टर स्केलच्या आलेल्या भूकंपाने वित्तहानी घडून येऊन लोक भयभीत झाले होते. 3 जानेवारी 2016 ला उत्तर-पूर्व भारतात आलेल्या भूकंपाने 11 लोकांचा मृत्यू झाला तर मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. अशाप्रकारे भूकंप हे सर्वात मोठे संकट आहे.

(iv) त्सुनामी ⇒ समुद्रासारख्या विस्तीर्ण जलाशयाच्या तळाशी असलेल्या भूभागात भूकंप झाल्याने ज्या पर्वतकाय लाटा उसळतात त्यांना त्सुनामी असे म्हणतात. या लाटांचा दर तासाला 800 ते 900 कि.मी. इतका वेग असतो. चिलीमध्ये 1960 ला भूकंपाच्या काळात त्सुनामी लाटांनी प्रशांत महासागरातील अनेक देश प्रभावित झाले. जपानमध्ये 200 लोक मृत्युमुखी पडले.

* किनारपट्टीपासून 1 ते 2 कि.मी. अंतरावर या लाटा प्रचंड वेगाने येतात. काही सेकंदात किनारपट्टीचा परिसर जलमय होतो. त्यामुळे त्या लाटा समुद्राच्या दिशेने परत वेगाने जातात आत इमारती, बांधकामे, घरे उद्ध्वस्त होतात. जीवित व वित्तहानी होते. 26 डिसेंबर 2004 या दिवशी त्सुनामी लाटांची सर्वाधिक झळ इंडोनेशियाला बसली. यात जीवित आणि मालमत्ता यांची प्रचंड हानी झाली. भारतातील तामिळनाडूच्या किनारपट्टीवरील परिसरात काहीही उरले नाही. त्यामुळे किनारपट्टीच्या परिसरातील लाखो लोक प्रभावित व विस्थापित होतात. संपूर्ण मानवी जीवन भीतीदायक असते. अशाप्रकारे त्सुनामी या नैसर्गिक कारणांमुळे लोकांचे विस्थापन घडून येते.

(2) मानव निर्मित कारणे [Man-Mode Causes] ⇒

* भारतात तसेच जगामध्ये विकास घडवून आणण्यासाठी नवीन औद्योगिक क्षेत्र निर्माण करणे, शेतीसाठी मुबलक पाणी पुरविण्याकरिता मोठमोठी धरणे बांधणे, कालवे काढणे, रस्ते निर्माण करणे, व्याघ्र प्रकल्प निर्माण करणे यासारखे नवीन प्रकारचे प्रकल्प निर्माण केले जातात. त्याकरिता जास्तीत जास्त जमिनीची आवश्यकता असते. विकास कार्यक्रमाकरिता अनेक गावांना उठविले जाते त्यामुळे त्या गावातील लोक विस्थापित होतात. त्यांना आपले गाव सोडून इतरत्र राहायला जावे लागते. विस्थापित लोकांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषत: त्यामध्ये आदिवासी सर्वात जास्त आहेत. मागासवर्गीय, अनुसूचित जातीचे लोक सुद्धा आहेत. मानवी विस्थापनाच्या कारणांमुळे प्रश्न निर्माण होऊन विस्थापितांच्या अनेक समस्या निर्माण होतात. विस्थापनाची मानव निर्मित कारणे पुढील प्रमाणे आहेत.

(i) धरणे ⇒ हजारो वर्षांपासून धरणांची निर्मिती केली जात आहे. पूर नियंत्रणाकरिता, जल विद्युत प्रकल्पाकरिता, पिण्याच्या पाण्याकरीता, शेतीच्या सिंचनाकरिता मोठे धरण बांधकाम केले जातात. सन 1950 पासून अनेक सरकारांनी व राष्ट्रांनी मोठ्या प्रमाणात धरणांची निर्मिती केली आहे. कमीत कमी 45,000 पेक्षा मोठे धरण निर्माण केले आहे.

* जागतिक पातळीवर चीनमध्ये 22,000 (45 %) मोठे धरण आहेत, अमेरिकेमध्ये 15 % भारत 9 %, जपान 8 % स्पेन 8 % स्पेन 2 % इतर देशात फ्रान्स, ब्राझील, दक्षिण कोरिया, कॅनडा, तुर्कस्थान या देशात 22 % मोठे बांध आहेत यामध्ये लाखो कुटुंबे विस्थापित झाली आहेत. भारतात 4 ते 8 करोड लोक धरणांमुळे विस्थापित झालेले आहेत.

* भारतात कर्नाटक राज्यातील कोलार जिल्ह्यात 'तुंगभद्रा सिंचन प्रकल्प' सुरू करण्यासाठी 1941 मध्ये 63 खेड्यातील एकूण 4 हजार कुटुंबातील लोक विस्थापित झाले होते. पश्चिम बंगालमधील 'दामोदर व्हॅली योजनेमुळे' 32 गावातील 4 हजार 500 कुटुंबातील लोक विस्थापित झाले. महाराष्ट्रातील जायकवाडी प्रकल्पामुळे त्या परिसरातील हजारो कुटुंबे विस्थापित झालीत. भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पामुळे त्या परिसरातील हजारो कुटुंबे विस्थापित झालीत अशाप्रकारे हजारो कुटुंबे विस्थापित होण्यास धरणे व विकास कारणीभूत होऊन त्यांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

(ii) कारखाने आणि औद्योगिकरण ⇒ भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच औद्योगिकरणाला सुरुवात झाली. त्यामुळे विस्थापितांचे प्रश्न निर्माण झालेत. ओरिसा राज्यातील कोरापूट जिल्ह्यात राष्ट्रीय ॲल्युमिनियम कंपनीसाठी शासनाने शेकडो एकर जमीन ताब्यात घेतली. त्यामुळे 15 गावातील 610 कुटुंब विस्थापित झालेत. राऊरकेला स्टील प्लॉन्टमुळे 32 गावातील 15 हजार 590 लोकांना विस्थापित व्हावे लागले. रांची जवळील हतीया येथील हेवी इंजीनियरिंग कार्पोरेशनमुळे 25 गावातील लोक विस्थापित झालेत. बोकारो स्टील प्लॅन्टमुळे त्या परिसरातील हजारो

लोक विस्थापित झाले. पश्चिम बंगालमधील नंदीग्राम व सिंगूर येथील होणाऱ्या औद्योगिकरणाने स्थानिक लोकांनी विस्थापनाच्या भीतीमुळे विरोध सुरु केला आहे. 

* महाराष्ट्रातील मिहान प्रकल्पांमुळे नागपूर जवळील 15 गावे विस्थापित होत आहेत. ओरीसातील कलिंगा नगर येथील औद्योगिकरणाने जवळपास अनेक गावातील हजारो आदिवासी कुटुंब विस्थापित झाली. अशाप्रकारे औद्योगिकरण व कारखान्यांमुळे आदिवासी, दलित, इतर मागासवर्गीय, स्त्रिया यांच्यावर वाईट परिणाम पडून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

(iii) **कोळसा आणि खनिजांचे उत्खनन** ⇒ 1960-70 च्या दरम्यान कोळसा आणि युरेनियमच्या शोधून 657 खाणी भाडे तत्वावर देण्याकरिता 86,06,72 हेक्टर जमीन घेतली. झारखंड येथे 227 कोळसा खाणी आहेत. यात भारत कोकींग कोल लिमीटेड (B.C.G.L) ईस्टर्न, कोल्ड फिल्डस् लिमीटेड (C.C.L) यातून 60% कोळशाचे उत्पादन होते. तसेच मध्ये ओपन कास्ट माईन्समध्ये जास्तीत जास्त कृषीची जमीन घेतल्या जाते.

* 1992 मधील एका अहवालानुसार देशात 1274 खाणी होत्या. संपूर्ण भारतात कोल इंडियाच्या 494 खदानी तसेच 15 कोटी लोकांचे वास्तव्य असलेल्या परिसरात आहेत. आर्थिक उदारीकरणामुळे ऑस्ट्रेलिया, कॅनडा यासारख्या देशांच्या कंपन्यांची पिपरवार आणि राजमहल येथे करोडो टन कोळसा काढणे सुरु केले आहे. या खदानीत होणाऱ्या विस्फोटामुळे कान फाटतात, घरांना भेगा पडतात. धूळ व धुवा मोठ्या प्रमाणात वातावरण दुषित करीत असते याचा परिणाम केवळ मनुष्यावरच नाही तर पीक, पाणी, प्राणी, झाडे, पिण्याचे पाणी यावर होते. कोळसा खदानीतून कोळसा काढल्यामुळे तेथे खड्डे निर्माण होतात. कोळसा खाणीमुळे विस्थापित झालेल्या लोकांना खड्डे बुजवून तेथे वास्तव्यात ठेवल्या जाऊ शकते. सोवटी परियोजनप्रमाणे कोळसा खाणीमध्ये विस्थापित किंवा प्रभावित लोकांना मजुरी शिवाय दुसरे कोणतेही काम मिळत नाही. अशाप्रकारे कोळसा खाणी व खनिजांचे उत्खनन केल्यामुळे लोकांचे विस्थापन होऊन अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. तसेच पर्यावरणाचे नुकसान होते.

(iv) **विद्युत परियोजना** ⇒ औद्योगिक विकासाकरिता विद्युत सर्वात जास्त महत्वपूर्ण आहे. विद्युत उत्पादनाकरिता कोळसा तथा कच्चा माल उपलब्ध आहे. स्वातंत्र्यानंतर देशाच्या विकासाकरिता प्रशासनाने या क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या साधन संपत्तीला ओळखले आणि सर्वप्रथम "दामोदर खोरे निगम" परियोजना निर्माण केली या परियोजनेमुळे केवळ नदीच्या वाहत्या धारेला विद्युत उत्पादनाकरिता परिवर्तित केले. तसेच उन्हाळ्यात सुध्दा पाण्याचे प्रमाण कमी असून सुध्दा विद्युत उत्पादनाकरीता तीन सुपर थर्मल पावर योजना बनविण्यात आल्यात सिंगरोलीला आज भारताची ऊर्जा राजधानी म्हणून संबोधल्या जाऊ लागले आहे. या ठिकाणी आशियातील सर्वात मोठी कोळसा खदान आहे.

* सिंगरोलीतील विस्थापनामुळे अनेक लोकांचे बळी दिल्या गेले. योजनाकार आणि प्रशासक विस्थापित ग्रस्त लोकांच्या अपेक्षाकृत कमकुवत सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीचा फायदा उचलतात. विस्थापितांची संख्या कमी दाखविली जाते. त्यांच्या सोबत अभद्र व्यवहार केल्या जाते. जर मोबदला दिल्या गेला तरी तो फार अल्प अथवा स्वरूपात असतो. विद्युत परियोजनेमुळे हजारो लोक विस्थापित होऊन लोकांच्या अनेक समस्या निर्माण होतात.

(v) **राष्ट्रीय उद्यान** ⇒ भारतात 15 व्याघ्र क्षेत्र सुरक्षित ठेवण्यात आलेत. त्यामुळे 677 गावातील लोकांना विस्थापित व्हावे लागले. जंगली प्राण्यांचे संरक्षण करणे मानवी समाजाचे कर्तव्य आहे. परंतु ज्याप्रमाणे सरकार त्यांच्या सुरक्षेच्या नावावर लोकांना उद्ध्वस्त करीत आहे. हे मान्य करण्यासारखे नाही जंगलाच्या सुरक्षेच्या नावावर लोकांना मनोरंजन स्थळ आणि पर्यटन स्थळे बनविली जातात यालाच "राष्ट्रीय उद्यान" म्हणतात. झारखंडमध्ये 10 राष्ट्रीय उद्यान व वन्यप्राणी अभयारण्य आहेत. यामुळे त्या परिसरातील 242 गावे प्रभावित झाली. यात आदिवासी अनुसूचित जातीच्या लोकांचा प्रामुख्याने समावेश आहे. राष्ट्रीय उद्यानासारख्या कारणांमुळे विशेषत: आदिवासी आणि अनुसूचित जातीच्या लोकांचे मोठ्या प्रमाणात विस्थापन होऊन त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

(vi) **रस्ते, सैनिक शिबीर व विमानतळ** ⇒ दळणवळणाकरिता रस्ते व रेल्वे मार्ग बांधल्या जाते याकरिता जमिनीचा वापर केला जातो. विमानतळे बांधण्यासाठी शेकडो एकर जमीन अधिग्रहीत केली जाते. त्यामुळे लोकांचे विस्थापन होते. शहराच्या विस्तारामुळे सुध्दा जमीन घेतली जाते. त्यामुळे लोकांचे विस्थापन होते. देशाची सुरक्षा व अंतर्गत शांतता प्रस्थापित करण्यासाठी सैन्याची आवश्यकता आहे. याकरिता विभिन्न क्षेत्रात सैनिक शिबीर बनविले जात आहे. झारखंड परिसरात मेक, रामगड, मेसरा, नामकुम रांची इ. ठिकाणी मोठ्या सैनिक छावण्या आहेत. या व्यतिरिक्त नेतरहाट सारख्या पहाडी क्षेत्रावर सैन्य मागील 30-40 वर्षांपासून युध्दातील शस्त्रास्त्रांच्या अभ्यासकरीत आहेत. नेतरहाट फिल्ड फायरींग रेंजमध्ये 245 गावं प्रभावित होणार आहेत.

(vii) **युध्द आणि दंगली** ⇒ जगातील अनेक राष्ट्रांमध्ये युध्दे झालीत. या युध्दांचा परिणाम पराजित राष्ट्रातील लोकांवर होतो. चीनने तिबेटवर आक्रमण करून तो प्रदेश आपल्या ताब्यात घेतला तिबेटमधील हजारो लोक भारतात आलेत. तिबेटमधून निर्वासित झालेल्या लोकांच्या पुनर्वसनासाठी भारताने पुढाकार घेतला. सामाजिक, धार्मिक आणि वांशिक दंगली सतत होतात. या दंगलीसाठी मानव कारणीभूत आहे. युध्द आणि सामाजिक, धार्मिक

व वांशिक दंगलीमुळे लोक विस्थापित होतात. अशा या विस्थापित लोकांच्या पुर्नवसनाचा फार मोठा प्रश्न निर्माण होतो.



## विस्थापनाचा परिणाम [Effect of Displacement]

* नैसर्गिक किंवा मानवनिर्मित कारणांमुळे झालेल्या विस्थापनातून सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, कौटुंबिक, आरोग्याची, राहणीमानाची, अन्नधान्याची इत्यादी प्रकारच्या समस्या निर्माण होतात. एखादा प्रकल्प निर्माण करतांना प्रकल्पांबद्दल खूप चर्चा केली जाते. परंतु प्रकल्पाच्या विस्थापित लोकांवर कोणत्या प्रकारचा परिणाम होईल याबद्दलचा विचार केला जात नाही. प्रकल्पात गेलेल्या लोकांच्या संपत्तीचा योग्य मोबदला मिळत नाही. आजही अनेक प्रकल्पग्रस्त लोकांच्या शेतजमिनीचा मोबदला शासनाद्वारे दिल्या गेला नाही. मोबदल्यापासून हजारो लोक वंचित आहेत.

* विस्थापनाचा आदिवासी तसेच तेथील मूळ रहिवाशांवर सर्वात जास्त परिणाम पडतो. तसेच इतर दुर्बल घटकांवर सुद्धा जास्त प्रमाणात प्रभाव पडतो. मायकेल सेरनियाच्या मते, "लोकांना फक्त सामाजिक आर्थिक लाभच होत नाही तर इतर प्रमुख आठ समस्येला सामोरे जावे लागते."

* विस्थापनाचा प्रभाव हा विशिष्ट समुदायावरच पडत नाही त्याचा महिलांवर जास्त परिणाम पडतो. भरपाईच्या दृष्टीकोनातून स्त्रियांना विस्थापित मानल्या जात नाही. फक्त पुरुषांनाच भरपाई दिल्या जाते. कारण स्त्रियांच्या नावावर कुठलीही संपत्ती नसते. त्यामुळे तिला भरपाई मिळत नाही. विस्थापनाचा परिणाम बालकांवर होतो. लहान वय असल्यामुळे ते आपल्या हक्कासाठी आवाज उठवू शकत नाही. बालकांवर विस्थापनाने अनेक दुष्परिणाम पडतात. त्यात घराची कमतरता, अन्नाची कमतरता, वाढती बिमारी आणि मृत्युदर, अपुरे शिक्षण आणि मनोरंजनाची कमतरता यासारख्या वाईट गोष्टी घडून येवून विस्थापनाचा विस्थापितांवर पुढील प्रकारचा परिणाम पडतो.

**(1) भूमीहिनता :-** विस्थापनामध्ये कायदेशीर अधिकाराशी संबंधाबाबतीत जमीन भूमीचे अधिग्रहण केले जाते त्यामुळे भूमीहिनता महत्वाचा मुद्दा आहे. कारण शासन भूमिच्या मोबदल्यात रक्कम देत असते. भूमिच्या मोबदल्यात भूमी देत नाही परिणामतः प्रकल्पग्रस्त लोकांना स्वतः करिता दुसरी जागा शोधावी लागते. अशा परिस्थितीत प्रभावित लोक निश्चितपणे मिळालेल्या रकमेत दुसरी तेवढीच जागा शोधतील परंतु वास्तविक भूमीचे अधिग्रहण व मिळणारी नुकसानभरपाई यामध्ये बराच वेळ निघुन जातो. त्यामुळे सदर कालावधीत जमीनीच्या किंमती वाढलेल्या असतात. कधी कधी ते अजिबात जमीन खरेदी करू शकत नाही. तसेच पुनर्वसन कार्यक्रम सुद्धा शासन राबवित असल्यामुळे इच्छित प्रमाणात व सोयीनुसार जमीन उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे मनुष्य दोन्ही नैसर्गिक व मानवी संपत्ती पासून वंचित होतो. विस्थापनामुळे लोकांच्या समोर भूमिहिनते सारखी अत्यंत तीव्र स्वरूपाची समस्या उभी राहून लोक आपल्या पूर्वीच्या भूमीपासून दुरावले जातात.

**(2) बेकारी किंवा रोजगारविहीन :-** भारतात आजही जवळपास 70% लोक कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. दक्षिण आशियातील देशांमध्ये आजही कृषीक्षेत्र सर्वात जास्त रोजगाराच्या संधी पुरविणारे क्षेत्र आहे. म्हणून भूमीहिनता याचा अर्थ बेकारी होय. भूमीहिनतेमुळे फक्त शेतकरीच प्रभावित होत नाहीत तर त्यावर अवलंबून असणारे सर्व व्यापारी, शेतमजूर कामगार व इतर उपजीविका चालविणारे लोक प्रभावित होतात. लोकांचे विस्थापन झाल्यामुळे लोकांना बेरोजगारीला तोंड द्यावे लागते. कामाकरिता इतरत्र भटकावे लागते त्यामुळे आपला व कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण कार्य होऊन जाते. म्हणून विस्थापन हे एक महत्वाचे कारण म्हटले जाते.

**(3) बेघर :-** शासनाचे भूमिचे अधिग्रहण केल्यानंतर जी भरपाई दिली जाते, त्या नुकसान भरपाईचे मूल्य व्यवस्थित ठरविले जात नसल्यामुळे दुसऱ्या जागी त्याच स्वरूपाचे दुसरे घर तयार केल्या जाऊ शकत नाही. विस्थापित लोकांकरिता विविध घटकांद्वारे तात्पुरत्या स्वरूपाच्या निवासाची सोय केली जाते जेथे विस्थापनानंतर सुविधा नाही तिथे राहणे हे कठीण आहे. आपले गावघर हे कसेही असले तरी ते सर्वांना आवडते टिनाचे छप्पर, लहान लहान खोल्या पाणी, ऊन, थंडी यात राहणे खूप त्रासदायक आहे. कितीतरी लोक आपल्या

नातेवाईकांकडे निघून जातात पण घराची कमतरता त्यांना नेहमी वाटते

* तसेच बेघर झाल्यामुळे लोकांचे सामाजिक संबंध, सांस्कृतिक अंतर आणि ओळख व नातेसंबंध दुरावतात. तसेच पुरामुळे सर्व घरदार वाहून जाऊन राहण्यायोग्य जागा राहत नाही. मूलभूत सुविधांच्या अभावाने प्रकल्पग्रस्तांना कुठल्याही संस्थांच्या प्राथमिक मिळत नाही. परिणामतः मानसिक स्थिती बिघडते. त्यामुळे ते उच्च दर्जाचा व योग्य जीवनमान जगू शकत नाही. अशाप्रकारे विस्थापनाच्या कारणांमुळे हजारो कुटुंब बेघर होतात.

④ **आर्थिक विपन्नता** :- जेव्हा व्यक्ती अथवा कुटुंबाची आर्थिक स्थिती कमकुवत होते. त्याला आर्थिक विपन्नता असे म्हणतात. या काय वेळेस संपत्तीच्या वास्तविक अधिग्रहणापूर्वी ही प्रक्रिया सुरु होते. एकदा हा प्रकल्प जाहीर झाला की इतर कोणत्याही आर्थिक संस्था त्या संपत्तीला आर्थिक सुरक्षा प्रदान करीत नाही. त्याचबरोबर शासन सुद्धा त्या भागात इतर मूलभूत सोयी सवलतीमध्ये गुंतवणूक करीत नाही. उदा :- शाळा सार्वजनिक सुविधा इत्यादी जवळच्या भूमिची किंमत मात्र वाढीस लागते. त्यामुळे आर्थिक मिळकतीच्या साधनांमध्ये कमतरता निर्माण होते. जेथे पूनर्निर्माण व्यवस्थित आखलेले नसते. तसेच इतर आर्थिक उत्पन्नाचे साधन निश्चित केलेले नसते. तेव्हा विस्थापित कुटुंबांना पुन्हा आर्थिक मिळकतीचे साधन प्राप्त होऊ शकत नाही. परिणामे संपत्तीचा अभाव जाणवते.

⑤ **आरोग्याचे नुकसान** :- मानसिक तणावामुळे प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे आरोग्य बिघडते. भूकबळी, सांडपाण्याचा अभाव, स्वच्छतेचा अभाव, व रोगराई इत्यादी मुळे व्यक्तीचे जीवनमान खालावते. जेव्हा वास्तविक पुनर्वसाहतीचे बांधकाम सुरु होते. त्या ठिकाणी बऱ्याचशा आरोग्याच्या सोईचा अभाव असतो. उदा :- दुषित पिण्याचे पाणी व इतर प्रादुर्भावामुळे निर्माण होणारी रोगराई तसेच पर्यावरण विषयक बदलामुळे सुद्धा व्यक्तीचे आरोग्यमान खालावते.

* विस्थापित लोक लवकरच कितीतरी रोगांचे बळी होतात. खराब पाणी तसेच मलमूत्राच्या विल्हेवाटाची सोयसोय यामुळे डायरीया, मलेरिया, हैजा, इंफेक्शन विस्थापित लोकांमध्ये व परिसरात पसरतात.

⑥ **अन्नधान्याची असुरक्षितता** :- विस्थापनाचा परिणाम सर्वसाधारणपणे अन्नधान्याच्या तुटवड्यामध्ये होतो. अन्नाच्या तुटवडा निर्माण होईल या भीतीपोटी प्रकल्पग्रस्त व्यक्ती एकतर कमी अन्नाचे सेवन करायला लागतो किंवा अन्नाची साठवणूक करतो याचा परिणाम कुपोषणामध्ये होतो. नवीन ठिकाणी जरी व्यक्तींचे पुनर्वसन झाले असले तरी सुद्धा त्या जमिनीवर शेती करणे सहज शक्य नसते. जेथे पारंपारिक शेतीची सुविधा उपलब्ध असते तेथे अन्न धान्याची असुरक्षा हा मुद्दा गंभीर बनतो.

* पुरामुळे सर्व वाहून गेल्याने लोकांना भोजनाची, स्वयंपाकाची, अन्नाची गुरुत्तर समस्या भेडसावते. त्यामुळे शासन, स्वयंसेवी संघटनांद्वारे, बिस्किटांची पाकिटे पुरविली जातात. योग्य अन्न न मिळाल्यामुळे त्यांना जिवंत राहणे कठीण जाते यासारखा अत्यंत वाईट परिणाम लोकांवर पडतो.

⑦ **सामान्य संपत्तीच्या स्त्रोतांचे नुकसान** :- सर्वसामान्य संपत्तीचे स्त्रोत भूमीहीन तसेच भूमीधारक लोकांना सामान्य जीवन जगण्यासाठी अन्न, इंधन, पाणी, वैरण इत्यादीचा पुरवठा करते. ग्रामीण आणि आदिवासी भागात या स्त्रोतांवर अवलंबून राहण्याचे प्रमाण जास्त असते. परंतु जेव्हा संपत्तीचे अधिग्रहण केले जाते तेव्हा या स्त्रोतांचा क्वचितच विचार केला जातो किंवा त्यांच्या मोबदला दिला जातो. जेव्हा या स्त्रोतांच्या प्रभाव भूमीहीन व भूमीधारकांवर कठोर प्रमाणात होतो. तेव्हा संपूर्ण समुदायाचे जीवन विस्कळीत होते. पुरामध्ये सर्व वाहून गेल्यानंतर, वाहून गेलेल्या संपत्तीची भरपाई केली जात नाही. अशावेळी तात्पुरत्या स्वरूपात मदत दिली जाते विस्थापनाने व्यक्तिकडील सर्व उत्पन्नाची साधने नष्ट होऊन उत्पन्नाच्या स्त्रोतांचा तुटवडा पडतो.

⑧ **सामाजिक संबंधात दुरावा** :- विस्थापनामुळे सामाजिक संबंध तुटतात. लोकांना त्यांचे निवासस्थान आणि नातेवाईकांपासून दूर जावे लागते. जरी पुनर्वसनाच्या पुरेशा सोयी उपलब्ध करून दिल्या गेल्या तरी सुद्धा लोकांना इतर बऱ्याचशा समस्यांना तोंड द्यावे लागते. उदा :- सुविधांचा अभाव, कमकुवत उत्पादन प्रणाली. सामाजिक संबंधाचा अभाव तसेच लोकांचा एक दुसऱ्यांना मदत करण्याच्या प्रवृत्तीचा अभाव आढळतो. नवीन ठिकाणी पुनर्वसन केल्यानंतर पूर्वी ज्या प्रकारची गावांची रचना होती. ती पूर्णतः विस्कटली जाते. नवीन रचनाची रचना अस्तित्वात येते, शेजारी देखील नवीन असतात.

## पुनर्वसन [Rehabilitation]

**अर्थ :-** विकासाकरिता मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे स्थापन केले जातात. विविध प्रकल्प सुरु करण्यात येतात. मोठी मोठी धरणे बांधली जातात. इत्यादी विकासाच्या योजना राबविल्या जातात. त्या योजनांतील विशेषत: आदिवासी आणि ग्रामीण लोकांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. कारण त्या क्षेत्रातील लोकांना आपल्या गावातून विस्थापित व्हावे लागते. तसेच नैसर्गिक आपत्तींमुळे विशेषत: पुरांमुळे नदिकाठावरील लोकांचे विस्थापन होते. त्याचप्रमाणे भूकंपामुळे लोकांचे विस्थापन होते. ज्वालामुखी, भूस्खलन, वादळ, त्सुनामी इत्यादी नैसर्गिक कारणांमुळे लोकांचे विस्थापन होते.

* विस्थापित झालेल्या सर्व लोकांचे पुनर्वसन करणे आवश्यक असते. कारण विस्थापनामुळे लोकांचे मानवी जीवन संपूर्णत: उद्ध्वस्त होते. त्यांच्यात जीवन जगण्याची मानसिकता राहत नाही. यामध्ये त्यांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक क्षमता नष्ट होते. संपूर्ण जीवन विस्कळीत झालेले पाहायला आढळून येते. विशेषत: नैसर्गिक कारणांनी म्हणजे पूर, वादळ, भूकंप, ज्वालामुखी, भूस्खलन या कारणांनी ज्या वेळेस विस्थापन होते. त्यावेळेस कुठल्याही प्रकारचा विलंब न होता संपूर्ण जीवनच तात्काळ नष्ट होते. यात प्राणहानी व वित्तहानी सुद्धा झालेली असते.

* झालेल्या या सर्व नुकसानीची भरपाई करण्याकरिताच त्यांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता असते. या सर्व विस्थापितांचे योग्य पद्धतीने व नियोजनबद्ध पुनर्वसन केले जात नाही. त्यामुळे पुनर्वसनाच्या समस्या निर्माण होतात. पुनर्वसनामध्ये पुनर्स्थापन तसेच भौतिक सवलती पुरविणे, उदा :- घरांच्या जागेची तरतूद, रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्याच्या सवलती, सामुदायिक केंद्रशाळा, दुकाने, मालवाहतुकीची सोय इत्यादी उपलब्ध करणे होय.

**व्याख्या :-** ① **सॅम्युअल व्हॅम :-** "पुनर्वसन ही अशी तवचिक संज्ञा आहे की, जी पूर्वीच्या सर्व प्रकारच्या संधी किंवा परिस्थिती पूर्ववत सुधारित स्वरूपात प्राप्त करून देण्याच्या संदर्भावर अवलंबून आहे."

② **रॉबर्ट स्ट्रॉस :-** "पुनर्वसनाची संज्ञा ही शिक्षण, भौतिक कार्ये, मानसिक समायोजन, सामाजिक अनुकूलन, व्यावसायिक योग्यता किंवा मनोरंजनाच्या क्रिया यांच्याशी विशेषत्वाने संबंधित असलेल्या सेवांशी निगडित आहे."

③ **के. सी. अलेक्झांडर, प्रसाद आणि जहांगीरदार :-** "पुनर्वसन म्हणजे लोकसंख्येची एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात नियोजनाच्या आधारावर बदली करणे होय."

④ **डी. एन. नायक :-** "संपूर्ण पुनर्वसनामध्ये सर्वांना समाविष्ट करणे सर्व घटकांना भौतिक दृष्ट्या परत वसविणे, त्यांची झालेली हानी भरून काढणे आणि सामाजिक सांस्कृतिक व्यवस्था, मानसिक तयारी करणे आणि तांत्रिक प्रशिक्षणाचा समावेश नवीन समाधान व आर्थिक व्यवस्थेत करणे होय."

⑤ **जमीन अधिग्रहण कायदा, 1984 :-** "संपूर्ण पुनर्वसन त्याला म्हणता येईल की जेव्हा प्रकल्पग्रस्त लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणणे तसेच पूर्वीच्या आर्थिक उत्पन्नात सुधारणा करणे किंवा त्यांच्या अपेक्षेनुसार सामाजिक सेवेत सुधारणा करणे होय."

* वरील व्याख्यावरून पुनर्वसनाचा अर्थ स्पष्ट होतो :-

① पुनर्वसन अशी प्रक्रिया आहे की ज्यामुळे पूर्वीचे जीवन प्राप्त करता येते.

② पुनर्वसनाद्वारे पूर्वीसारख्याच विविध प्रकारच्या संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न असतो.

③ शासनाद्वारे नियोजन करून लोकांची एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी बदली केली जाते.

④ पुनर्वसन करण्यासाठी शासन विविध कायदे करण्याचा प्रयत्न करीत असतो.

### पुनर्व्यवस्थापन आणि पुनर्वसनासंबधीचे सामान्य दृष्टीकोन

डॉ. ए. एम. भट्टाराय यांनी तीन दृष्टीकोन सांगितले.

① **परंपरागत दृष्टीकोन** ② **लोक केंद्रीत दृष्टीकोन** ③ **अधिकार विषयक दृष्टीकोन**

① **परंपरागत दृष्टीकोन :-** तिसऱ्या जगामधील देशातील शासकांनी, नोकरशाही आणि तंत्रज्ञानी पारंपारिक दृष्टीकोनाचा पुरस्कार केलेला आहे. या दृष्टीकोनाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे हा दृष्टीकोन संपूर्णत: कायदे आणि धोरणांवर अवलंबून आहे. त्यात प्रकल्पग्रस्त लोकांच्या समस्यांकडे पूर्णत: दुर्लक्ष करण्यात आले. तसेच हा दृष्टीकोन संपूर्णत: एकाकी स्वरूपाचा, गुप्तता पाळणारा ज्यामध्ये प्रकल्पग्रस्त लोकांचे अभिमत जाणून घेतले जात नाही.

* या दृष्टीकोनानुसार विस्थापन ही विकासाच्या मार्गातील मोठी समस्या नसेच. विस्थापित लोक प्रगतीच्या मार्गातील अडथळा ठरतात. त्यामुळे कार्यकारी मंडळाला शासनाने विकासासंबंधीचे संपूर्ण अधिकार प्रदान केलेले. जरी कार्यकारी मंडळात लोकांचे प्रतिनिधी असतात तरीपण विकासासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींना देण्यात आले. त्यांनी प्रकल्पग्रस्त भागातील लोकांच्या मानवीय, सामाजिक आणि पर्यावरणविषयक बाबींची काळजी घेतली नाही. प्रकल्पासंबंधीचा अहवाल अतिशय गुप्त ठेवण्यात आला. तांत्रिक बाबींना जास्त महत्व देऊन प्रकल्पग्रस्त लोकांच्या भावनांचा विचार केला नाही.

* एकदा का प्रकल्पाची घोषणा झाली की, संपत्तीच्या अधिग्रहणाला सुरुवात होते. अधिकाराची व्यक्तिशः विभागणी करण्यात येते. त्यानुसार भरपाई देण्यात येते. नुकसान भरपाईची कसोटी ही व्यक्तिगत मालकीवरून ठरविली जाते. त्यामध्ये उपयोगीता तसेच व्यवसायाचा विचार केल्या जात नाही. व्यक्तिगत भूमीच्या नुकसानाची तुलना ही उत्पादन व उपजिविकेच्या साधनांशी केली जाते. विस्थापनांच्या परंपरागत दृष्टीकोनात विस्थापनाकडे एकाकी दृष्टीने पाहिल्या जाते आणि पुर्नस्थापना ही शासकीय प्रक्रिया असून तो व्यक्तीचा अधिकार नाही. भूमी अधिग्रहणाच्या नुकसानभरपाईची प्रक्रिया कार्यालयीन स्तरावर पार पाडल्या जाते. जेथे वास्तविकतेचा विचार केल्या जात नाही. पुर्नस्थापनेची संपूर्ण प्रक्रिया एक धोरणात्मक बाब म्हणून समजल्या जाते. काही अंशी कागदी कारवाई केली जाते ज्यावर क्वचितच कार्यवाही केली जाते. विस्थापित लोकांच्या निकृतीच्या साधनात वाढ करणे या बाबींचा क्वचितच विचार केल्या जातो.

(2) **लोक केंद्रीत दृष्टीकोन** :- समाजशास्त्रज्ञ आणि अगदी खालच्या स्तरावर काम करणारे सामाजिक कार्यकर्ते या दृष्टिकोनाचे जनक आहेत. त्यांच्या मतानुसार विस्थापन ही बाब मानवी तसेच सामाजिक समस्या आहे. ती फक्त विकासाच्या मार्गातील समस्या नव्हे. या विचारांच्या लोकांनी विकासाच्या पारंपारिक दृष्टीकोनाला कडाडून विरोध केला. या लोकांनी मानवतावादी दृष्टीकोनाचा पुरस्कार केला जरी त्यांनी शासनाच्या विकासात्मक धोरणांचा सरळ विरोध केला नसला तरी केवळ लोकोपयोगी तसेच पर्यावरण विषयक प्रकल्पाचा पुरस्कार केला. प्रकल्प टाळणे किंवा त्याला लघुस्वरूपात करणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. परंतु जेथे प्रकल्प टाळल्या जाऊ शकत नाही तेथे विस्थापनाला विकासाची संधी म्हणून मान्यता दिली. यांचा प्रमुख भर हा पुर्नस्थापनेच्या धोरणाच्या निर्मितीवर होता.

(3) **अधिकार विषयक दृष्टीकोन** :- या दृष्टीकोनाचे पुरस्कर्ते विस्थापनाला मानवी अधिकार विषयक समस्या म्हणून संबोधतात. त्यांच्या मतानुसार विकास ही गरजेवर आधारित संकल्पना नसून ती अधिकारावर आधारित असलेली संकल्पना होय. त्यांच्या मते, जबरदस्तीने केलेले विस्थापन म्हणजे मानवी अधिकारांचे उल्लंघन होय. जर विस्थापनाच्या निर्णयामुळे व्यक्तीच्या मुलभूत अधिकाराला तडा जात असेल (उदा. आरोग्य, पर्यावरण, राहणीमान इत्यादी) तर प्रकल्पाच्या नियोजनाला पर्याय शोधला पाहिजे. राष्ट्रहीत ही बाब समोर करून व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांवर काही प्रमाणात बंधने येत असतील तर अशावेळी शासनाने मूलभूत कर्तव्य समजून प्रभावित व्यक्तींच्या पुनर्वसन तसेच जीवनमान विषयक गरजांची पूर्तता करावी. या दृष्टीकोनाच्या पुरस्कर्त्यांनी कार्यकारी मंडळाच्या अधिकारावर प्रश्नचिन्हे उपस्थित केली आहेत. तसेच प्रकल्पग्रस्त लोकांच्या अधिकारांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेतली आहे.

* त्यांच्या मतानुसार पुनर्वसन हे फक्त रोख स्वरूपात नुकसानभरपाई न देता त्या समोर जाऊन व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवन विषयक बाबींचा विचार करून त्या प्रकारची पूर्वस्थिती उपलब्ध करून द्यावी. त्यांच्या मतानुसार फक्त कठोर कायद्याच्या अंमलबजावणीने कार्यकारी मंडळाच्या बेबंद कारभाराला आळा बसू शकतो. व व्यक्तीच्या अधिकारांचे रक्षण होऊ शकेल. मानविय दृष्टीकोन लक्षात घेऊन अनेक राष्ट्रांनी पुनर्वसनासंबंधी कायदेशीर धोरण आखलेले आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या कायदेशीर तरतुदींची अंमलबजावणी करून न्यायाचा राज्यांनी सकारात्मक पावले उचलून भूतकाळातील उणीवा व भविष्यकाळातील संभाव्य अडचणींचे निरसन केले आहे. तसेच त्यांनी व्यापक दृष्टीने कायदेशीर नियोजनावर भर देऊन विकासात्मक पुनर्वसनाची बाब हाताळण्यावर भर दिला आहे.

## पुनर्वसनाच्या समस्या [Problems of Rehabilitation]

* विस्थापित झालेल्या लोकांवर विस्थापनाचे अतिशय गंभीर स्वरूपाचा प्रभाव पडतो. विस्थापितांचे पुनर्वसन करणे अनिवार्य असते. परंतु त्यांचे योग्यप्रकारे पुनर्वसन केले जात नाही. पुनर्वसन आणि पुनर्व्यवस्थापनाच्या समस्या आहेत. पुनर्वसन आणि पुनर्व्यवस्थापनाच्यासंदर्भात पुढील काही समस्या आहेत.

① **थोडे किंवा कोणते समर्थन नसणे** :- विस्थापन हे प्रामुख्याने अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती आणि ग्रामीण लोकांचे होत असते. या लोकांच्या विस्थापनाचा प्रश्न प्रभावीपणे मांडल्या जात नाही. या लोकांची बाजू मांडणारा कोणता राजकीय नेता नसतो. त्यामुळे विस्थापित झालेल्या या लोकांचे योग्य पुनर्वसन करण्याच्या संदर्भात इतर जनतेचे थोडे फार समर्थन मिळते. किंवा अनेकदा कुणी त्यांचे समर्थन देखील करीत नाही. त्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात शासन लक्ष देत नाही.



② **अत्यल्प भरपाई** :- विस्थापितांना त्यांच्या जमिनीची योग्य भरपाई मिळत नाही. त्यांना भरपाई उशीरा दिल्या जाते. त्यांच्या जमिनीचा मोबदला जुन्या बाजारभावात दिल्या जातो. परिणामत: त्यांना दिल्या जाणारी भरपाईची रक्कम अतिशय कमी असते त्यामुळे त्यांच्या उपजिविकेच्या संदर्भात अत्यंत गंभीर स्वरूपाची समस्या निर्माण होते.

③ **उपजिविकेचे नुकसान** :- विस्थापित लोकांकरीता विस्थापन ही एक साधारण घटना नसते. कारण विस्थापनामुळे त्यांना आपली पिढीजात भूमी आणि जंगलास मुकावे लागते ज्या भूमी आणि जंगलावर ते उपजिविकेसाठी निर्भर असायचे. परंतु विस्थापनामुळे त्याचे उपजिविकेचे साधनच नष्ट होते. दुसऱ्या ठिकाणी नवीन काम करण्याचे कौशल्य त्यांच्याकडे नसते. अनेकदा विस्थापितांना दिलेली जमीन ही त्यांगल्या प्रतीची नसते त्यामुळे त्यांच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण होतो.

④ **सुविधांच्या अभाव** :- विस्थापितांचे नवीन ठिकाणी पुनर्वसन केले जाते. परंतु त्या ठिकाणी पायाभूत सुविधा आणि सवलती उपलब्ध करून दिल्या जात नाही. बहुधा अस्थायी शिबीरेच स्थायी वस्ती बनतात. ही पुनर्वसनाची एक मोठी समस्या आहे. ज्याचा विस्थापितांना सामना करावा लागतो.

⑤ **तणावात वृद्धी** :- पुर्नवसन हे विस्थापितांच्या जीवनास बाधित करते. आपले मुळचे स्थान सोडावे लागल्यामुळे त्यांच्या जीवनात रिक्तता निर्माण होते. ते आपल्या मूळ स्थानाशी त्यांचे भावनिक संबंध असतात. पुर्नवसन केलेल्या ठिकाणी त्यांचे मन रमत नाही. विस्थापनाची नुकसान भरपाई ही कुटुंब प्रमुखाला दिली जाते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबात नुकसान भरपाईच्या पैशावरून वाद होतात. ज्यामुळे कुटुंबात तणाव निर्माण होतो. विस्थापितांचे पुनर्वसन नवीन ठिकाणी केले जाते. पुनर्वसन करण्यात आलेल्या लोकांची पूर्वीची जी प्रतिष्ठा होती, ती त्यांना नवीन ठिकाणी मिळत नाही. पुनर्वसित कुटुंबातील मुला-मुलींच्या वैवाहिक संबंध जोडण्यामध्ये अडचणी निर्माण होते. ओडक्यात पुनर्वसन लोकांच्या जीवनात अनेक अडचणी निर्माण करतात. त्यामुळे पुनर्वसित कुटुंबातील लोकांमध्ये तणाव असतो.

⑥ **आरोग्यविषयक समस्यांमध्ये वृद्धी** :- पुर्नवसित लोकांची उपजिविका शेती आणि वनावर होती. परंतु विस्थापनामुळे त्यांच्या उपजीविकेचा आधारच नष्ट झाला. या कारणामुळे त्यांचे आरोग्य बिघडते. पूर्वी लोक पारंपारिक घरगुती उपचार करायचे. त्यासाठी ते वनातील उपलब्ध वनस्पतींचा उपचारांकरीता उपयोग करायचे. परंतु विकासाच्या प्रकल्पामुळे त्यांची मुळ जमीन आणि जंगलापासून ते दूर झालेत. त्यामुळे पारंपारिक घरगुती उपचार करू शकत नाही.

⑦ **ओळखीचे नुकसान** :- अनुसूचित जमातीचे जीवन सामुदायीक असते. त्यांची स्वतंत्र अशी जीवनशैली होती. परंतु विस्थापनामुळे त्यांची मूळ ओळख संपुष्टात आली. उपजिविका, संस्कृती आणि रूढी-परंपरांवर विस्थापनाचा नकारात्मक प्रभाव पडला. त्यामुळे त्यांची स्वतंत्र ओळख संपुष्टात आली.

⑧ **सदोष अंमलबजावणी** :- विस्थापीतांच्या पुर्नवसनाच्या संदर्भात शासनाचे धोरण योग्य नाही. पुनर्वसन अधिकारी योग्य प्रकारे पुनर्वसन कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत नाहीत. त्यामुळे पुनर्वसनात अनेक दोष राहतात. त्याचा परिणाम विस्थापित लोकांवर पडतो. विस्थापित लोकांच्या पुनर्वसनाबाबत शासन अधिकारी आणि राजकीय नेते देखील गांभिर्यपणे विचार करीत नाही. त्यामुळे विस्थापित लोकांना अनेक प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागतो. जर नियोजनबद्ध पद्धतीने विस्थापितांचे पुनर्वसन केले तरच त्यांना न्याय मिळू शकेल.

## विस्थापनाचे पुनर्वसन करण्यासंबंधीचे उपाय

* विस्थापितांचे पुनर्वसन योग्य प्रकारे केले तर त्यांच्या बऱ्याच समस्यांचे समाधान करता येईल. म्हणून विस्थापितांचे पुनर्वसन योग्य प्रकारे करणे आवश्यक आहे. पुनर्वसनाच्या संदर्भात पुढील उपाय महत्त्वाचे आहेत.

① **घरासाठी विनामूल्य जागा** :- विस्थापित लोकांना आपले परंपरागत गाँव आणि घर सोडावे लागते. विस्थापित लोकांपुढे कुठे राहावे हा प्रश्न असतो म्हणून विस्थापित लोकांना घरासाठी मोफत जागा द्यावी.

② **शेतीसाठी जमीन** :- विस्थापित लोकांना उदरनिर्वाहासाठी शेतजमीन देण्यात यावी. नव्या ठिकाणी ते त्यांचे जुने व्यवसाय सुरु करु शकत नाही. तसेच बहुतांश लोकांचा व्यवसाय शेती असतो. म्हणून केवळ घरासाठी जमीनच नाही तर उपजिविका चालविण्यासाठी चांगली शेतजमीन त्यांना देण्यात यावी.



③ **भरपाई वेळेवर द्यावी** :- विस्थापित लोकांची शेती, प्रकल्पात जाते. तसेच अचल संपत्तीस मुकतात म्हणून विस्थापित लोकांच्या संपत्तीचे योग्य मूल्यांकन करुन त्यांना त्यांच्या संपत्तीची भरपाई वेळेवर द्यावी. अनेक प्रकल्पांमध्ये संपत्तीचे मूल्यांकन झाल्यापासून 10 वर्षाचा काळ लोटला जातो तरी त्यांची भरपाई रक्कम त्यांना मिळत नाही. त्यामुळे विस्थापित लोकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होते. इतकेच नव्हे तर त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे विस्थापित लोकांमध्ये असंतोष निर्माण होतो.

④ **घरे बांधून देणे** :- विस्थापित लोकांना घरांसाठी जागा देऊनच भागत नाही त्या जागेवर घरे बांधून द्यावीत. घरे बांधून दिल्याशिवाय लोक नव्या वसाहतीत राहायला जाणार नाही. घर बांधणीचा जास्त खर्च येत असेल तर तो सवलतीच्या हप्त्याने व्याजासह वसूल करण्यात यावा.

⑤ **नागरी सोयी पुरविणे** :- पुनर्वसन वसाहतील सर्व प्रकारच्या सोयी-सवलती पुरविणे आवश्यक आहे. पाण्यासाठी विहीर बांधणे, कूपनलिका बसविणे, रस्ते तयार करणे, विद्युत, दवाखाना, प्राथमिक शाळा, समुदाय सभागृह, खेळण्याचे मैदान, स्मशानभूमी, मनोरंजन इत्यादी प्रकारच्या नागरी सोयी नव्या वसाहतीमध्ये पुरविणे आवश्यक आहे. त्याशिवाय लोक नव्या वसाहतीमध्ये राहायला जाणार नाही.

⑥ **इतर सोयी** :- विस्थापित झालेल्या कुटुंबातील कमीत कमी एका सदस्यास प्रकल्पामध्ये किंवा इतर ठिकाणी नोकरी देण्यात यावी. त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी सवलत देण्यात यावी. दुकाने आणि इतर व्यवसायांसाठी प्लॉट पाडून त्यामध्ये विस्थापितांना विशेष प्राधान्य द्यावे.

* विस्थापितांचे नियोजनपूर्वक पुनर्वसन केले तर त्यांच्या पुनर्वसनाच्या विविध समस्या निर्माण होणार नाहीत. परंतु मुख्य प्रश्न हा आहे की, पुनर्वसनासाठी प्रचंड पैसा लागतो. हा पैसा खर्च करण्यास शासन देखील तयार नसते. म्हणून विस्थापितांच्या पुनर्वसनाबाबत विविध समस्या निर्माण झाल्या आहेत.

युनिट क्र. 1 Semester II B.A. Part I (01)

## संस्कृती [Culture] आणि समाज [Society]

<u>अर्थ</u> :- दैनंदिन व्यवहारात 'संस्कृती' या शब्दाचा उपयोग आपण करीत असतो. सुशिक्षित व्यक्ती ही सुसंस्कृत असते तर, अशिक्षित व्यक्ती असंस्कृत असते, असे मानले जाते. [illegible] संस्कृती उच्च असते. [illegible] राहणारा समाज संस्कृतीहीन असतो [illegible] दऱ्या खोऱ्यात राहणारा समाज संस्कृतीहीन नाही. [illegible] एक विशिष्ट संस्कृती आहे. प्रत्येक व्यक्तीची त्याच्या समाजानुसार एक विशिष्ट संस्कृती असते आणि प्रत्येक व्यक्ती आपल्या संस्कृतीनुसार आपले जीवन जगत असते.

मानव समाज आणि संस्कृती या दोहोंचा परस्पर संबंध आहे. संस्कृतीशिवाय मानव समाजाची कल्पनाच करता येत नाही. 'मानव हा एक सामाजिक प्राणी आहे' असे ॲरिस्टॉटलने म्हटले आहे. व्यक्तीच्या आंतरक्रियांमधूनच संस्कृतीची निर्मिती झाली आहे. [illegible] व्यक्ती सामाजिक आंतरक्रिया [illegible] संस्कृती शिकत असतो. जन्मानंतर व्यक्ती प्रथम कुटुंबातून नंतर समाजातील [illegible] संपर्कात येऊन आंतरक्रियांच्या माध्यमातून संस्कृती शिकतो. मानव आणि [illegible] प्राणी [illegible] संस्कृतीच्या [illegible] केला जातो. मानव आणि प्राणी [illegible] भूक, मैथुन, झोप या जैविक गरजा सारख्या असल्या तरी मानवाने आपल्या जैविक गरजांच्या पूर्तीच्या संदर्भात विशिष्ट प्रकारचे नियम तयार केले आहेत. हे विशिष्ट प्रकार समाजाच्या संस्कृतीद्वारे [illegible] आहेत. व्यक्ती आपल्या संस्कृतीनुसार वर्तन करीत असते परंतु [illegible] गोष्ट आढळत नाही. संस्कृतीचा अभ्यास करीत असताना एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे संस्कृती [illegible] निर्माण केली [illegible] ती मानव निर्मित आहे. [illegible] व प्रमाण [illegible] यांचा समावेश संस्कृतीमध्ये केला जातो. समाजशास्त्रात संस्कृतीचा एक विशिष्ट अर्थ आहे. हा अर्थ समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या व्याख्यांद्वारा स्पष्ट केला आहे.

<u>व्याख्या</u> :-

① <u>एडवर्ड टायलर</u> :- "समाजाचा एक सदस्य म्हणून मानव जे ज्ञान, कला, श्रद्धा, नीतितत्वे, कायदे, परंपरा आणि इतर क्षमता, सवयी तसेच इतर तत्सम गोष्टी संपादित करतो, त्या सर्वांच्या संमिश्र [illegible] संस्कृती असे म्हणतात."

② <u>राल्फ लिन्टन</u> :- "संस्कृती ही शिकित वर्तन प्रकार व शिकित वर्तन प्रकाराच्या फलांची संघटित किंवा साचेबंद समग्रता होय. मनुष्य एका विशिष्ट समाजाचा सदस्य या नात्याने जे जे वर्तन प्रकार शिकतो ते सर्व वर्तन प्रकार व या वर्तन प्रकाराची फले संस्कृतीमध्ये समाविष्ट होतात."

③ <u>हर्सकोव्हिट्स</u> :- "संस्कृती वातावरणाचा मानव निर्मित भाग आहे."

④ <u>कीसिंग</u> :- "संस्कृती म्हणजे शिक्षित संपूर्णता व वर्तन किंवा रूढी, [illegible] रीतीने हस्तांतरित करणे होय."

⑤ <u>बोगार्डस</u> :- "समुहाच्या कार्य करणे आणि विचार करण्याच्या सर्व गोष्टी म्हणजे संस्कृती होय."

⑥ <u>मॅलिनोवस्की</u> :- "ज्यांच्याद्वारे मानव आपली उद्दिष्टे साध्य करतो ती मानव निर्मित साधने व माध्यम म्हणजेच संस्कृती होय."

→ संस्कृती ही संपादित केली जाते. संस्कृती ही मानवनिर्मित असून ती व्यक्तीला शिकावी लागते. संस्कृती ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असते. [illegible] संस्कृती ही अमूर्त असते.

## संस्कृतीचे प्रकार

① भौतिक संस्कृती | ② अभौतिक संस्कृती

① <u>भौतिक संस्कृती</u> :- मानवाने आपल्या विविध गरजांची पूर्ती करण्याकरिता अनेक भौतिक गोष्टींची निर्मिती केली आहे. उदा. [illegible] कपडे, [illegible] फर्निचर, घरे, [illegible] इत्यादी अनेक [illegible] वस्तूंची निर्मिती मानवाने केली [illegible]. भौतिक वस्तू आपण [illegible] पाहू शकतो. त्या वस्तूंना स्पर्श करू शकतो. या सर्व मानव निर्मित भौतिक वस्तूंचा समावेश भौतिक संस्कृतीमध्ये केला जातो. एका वस्तूपासून दुसरी वस्तू निर्माण करताना मानवाने आपल्या बुद्धीचा [illegible] भौतिक संस्कृतीची निर्मिती केली आहे [illegible]. [illegible] मानवाने निर्माण केली आहे ती मानवाची निर्मिती मानता येईल पण मानवाची निर्मिती मात्र मानवाने केली नाही.

② <u>अभौतिक संस्कृती</u> :- अभौतिक गोष्टी या अदृश्य स्वरूपाच्या आणि अमूर्त असतात. म्हणजे डोळ्यांना न दिसणाऱ्या [illegible] गोष्टींचा समावेश [illegible] अभौतिक गोष्टी मानवाच्या जीवनावर फार मोठा प्रभाव पाडतात. प्रत्येक संस्कृतीमध्ये ज्ञान, मूल्ये, विचार, परंपरा, विश्वास [illegible] अभौतिक गोष्टी [illegible]. या अभौतिक गोष्टीनुसार व्यक्ती आपले सामाजिक जीवन व्यतीत करीत असते.

हॅरी जॉन्सन यांनी अभौतिक गोष्टींनाच संस्कृती मानले आहे. त्यांनी समाजशास्त्र (22)
आणि मानवशास्त्र यांनी संस्कृतीमध्ये केवळ अभौतिक गोष्टींचाच समावेश केला आहे. अभौतिक संस्कृतीला
विशेष महत्त्व दिले आहे. भौतिक गोष्टींना संस्कृती का मानू नये? या संदर्भात हॅरी जॉन्सन यांनी दोन
कारणे सांगितली आहेत.

① अभौतिक ज्ञानाच्या अभावी भौतिक वस्तूंचा उपयोग करता येत नाही. उदा. कॉम्प्युटर ही
एक भौतिक वस्तू आहे. ज्याला कॉम्प्युटरचा उपयोग कसा करायचा याचे ज्ञान आहे. त्यांच्याकरिता
कुणीतरी कॉम्प्युटर महत्त्वाचे आहे. परंतु आदिम समाजातील व्यक्तीला कॉम्प्युटरचे ज्ञान नसेल,
तर त्यांच्या दृष्टीने कॉम्प्युटरचे कोणतेच महत्त्व नाही. म्हणून जॉन्सन म्हणतो, भौतिक वस्तूच्या
संदर्भात जे ज्ञान आहे ते महत्त्वाचे आहे. आणि ज्ञान हे अभौतिक आहे.

② भौतिक वस्तू दुसऱ्या व्यक्तीला दिली तर वस्तू देणाऱ्या व्यक्तीजवळ ती वस्तू राहात
नाही परंतु ती वस्तू कशी तयार करायची याचे ज्ञान दुसऱ्या व्यक्तीला दिले तर ज्ञान देणाऱ्या
व्यक्तीचे ज्ञान कमी होत नाही. म्हणून भौतिक गोष्टींपेक्षा अभौतिक गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत.

## संस्कृतीची वैशिष्ट्ये

① **संस्कृती ही मानवनिर्मित आहे** :- निसर्ग किंवा निसर्गनिर्मित विविध गोष्टी या
मानवनिर्मित नाहीत. उदा. समुद्र, आकाश, वन, पहाड, सूर्य, चंद्र या सर्व गोष्टी निसर्गनिर्मित आहेत.
आहेत. परंतु मानवाने आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग करून त्यातून अनेक गोष्टींची निर्मिती
केली आहे. उदा. मातीपासून विटा, विटांपासून घरे, अवजारे, दगडातून शिल्पकला, सोन्यापासून
दागिने इत्यादी. सामाजिक विकास, धर्म, प्रमाणे, [illegible] आदर्श, [illegible]
अभौतिक गोष्टी मानवनिर्मित आहेत. या सर्व गोष्टींचा समावेश संस्कृतीमध्ये केला जातो.
म्हणून संस्कृती ही मानव निर्मित आहे.

② **संस्कृती अमूर्त असते** :- संस्कृतीमध्ये विचार, ज्ञान, श्रद्धा, परंपरा, कायदा,
नियम इत्यादी घटकांचा समावेश होतो. हे सर्व घटक अदृश्य आणि अमूर्त आहेत. त्यांना आपण
दृष्टीस करता येत नाही. परंतु त्या गोष्टींचा बोध होतो. त्या आपण [illegible] म्हणून
हे सर्व घटक अमूर्त आहेत. संस्कृतीमध्ये या अमूर्त घटकांचा समावेश होत असल्यामुळे संस्कृती
ही अमूर्त आहे.

③ **संस्कृती शिक्षित व्यवहार** :- संस्कृती ही जन्मतःच प्राप्त होत नाही, तर
संस्कृती ही शिकावी लागते. त्यामुळे संस्कृती ही एक शिक्षित व्यवहार मानला जातो.
प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे समाजाचा एक सदस्य म्हणून व्यक्ती सांस्कृतिक व्यवहार
शिकत असते. म्हणूनच संस्कृती हा एक शिक्षित व्यवहार आहे.

④ **संस्कृती हस्तांतरित होत असते** :- संस्कृती ही एका पिढीकडून दुसऱ्या
पिढीकडे हस्तांतरित होत असते. भाषा आणि संकेतांद्वारे संस्कृतीचे हस्तांतरण होत असल्यामुळे
संस्कृती टिकून आहे. सामाजिक विचार, श्रद्धा, परंपरा यांच्याविषयी अनेक गोष्टी एका पिढीकडून
दुसरी पिढी शिकत असते. त्यामुळे संस्कृतीचे हस्तांतरण किंवा संक्रमण होते.

⑤ **संस्कृती संचयशील आहे** :- संस्कृतीचे हस्तांतरण होत असल्यामुळे
संस्कृती टिकून असते. परंतु त्याच बरोबर नवनवीन ज्ञानाची भर संस्कृतीमध्ये पडत
असते. त्यामुळे संस्कृती ही निरंतर विकसित होते. आपण आपल्या बुद्धीचा
उपयोग करून सतत नवनवीन ज्ञान मिळवित असतो. जुन्या ज्ञानाबरोबरच नवीन
ज्ञानाचा संचय केला जातो.

⑥ **संस्कृती परिवर्तनशील आहे** :- संस्कृती ही स्थिर स्वरूपाची नाही.
काळाच्या प्रवाहानुसार संस्कृतीत परिवर्तन होत असते. मानवाला जसजसे नवीन
ज्ञान प्राप्त झाले, तसतसे त्याने संस्कृतीत नवीन ज्ञानाची भर टाकून परिवर्तन केले आहे.
त्याच प्रमाणे जुन्या पिढीकडून नवीन पिढीकडे संस्कृतीचे हस्तांतरण होत असताना
संस्कृतीमधील सर्व गोष्टी जशाच्या तशा स्वीकारल्या जात नाही. त्यात थोडे-
फार परिवर्तन होत असते. संस्कृतीत परिवर्तन होण्याकरीता प्रदीर्घ कालावधी लागतो.

⑦ **संस्कृतीचे स्वतंत्र अस्तित्व आहे** :- संस्कृती ही मानव निर्मित आहे.
हे सत्य असले तरी संस्कृतीची निर्मिती करणारा मानव मात्र मर्त्य आहे. परंतु
संस्कृती मात्र नष्ट होत नाही. संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे
हस्तांतरण होत असते. म्हणूनच जुनी पिढी निघून गेल्यानंतर संस्कृती नष्ट
होत नाही म्हणून संस्कृतीला स्वतंत्र अस्तित्व आहे.

## संस्कृतीची मूलतत्वे किंवा घटक [Elements of Culture] :-> (04)

* संस्कृतीची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी संस्कृतीचे घटक लक्षात घेणे आवश्यक आहे. रॉबर्ट बिरस्टीड यांनी संस्कृतीचे 13 मूर्त घटक आणि 14 अमूर्त घटक सांगितले आहेत. बिरस्टीड यांनी अभौतिक आणि भौतिक दोन्ही बाबींचा संस्कृतीच्या घटकांमध्ये समावेश केला आहे. पुढे टायलर आणि जे. एफ. क्यूबर यांच्या व्याख्यावरून संस्कृतीतील घटकांची स्पष्ट कल्पना येते.

* हॅरी जॉन्सन यांनी ज्ञान, विश्वास, मूल्ये व प्रमाणके आणि चिन्हे हे चार संस्कृतीचे मूलतत्वे किंवा घटक सांगितले आहेत. संस्कृतीतील या चार मूलतत्व किंवा घटकतत्वांचा उल्लेख पुढील प्रमाणे आहे.

संस्कृतीची मूलतत्वे किंवा घटक [Element of Culture]

| ① ज्ञान [Knowledge] | ② विश्वास [Beliefs] | ③ मूल्ये आणि प्रमाणके [Values and Norms] | ④ चिन्हे [Signs] |
|---|---|---|---|

* ज्ञान [Knowledge] :-> ज्ञान हा संस्कृतीचा एक घटक आहे. सर्वच समाजाच्या संस्कृतीमध्ये भौतिक आणि सामाजिक विश्वासंबंधीच्या ज्ञानाचा समावेश आहे. ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत असते. भौतिक विश्वासंबंधीच्या ज्ञानात जमीन, डोंगर-दऱ्या, नद्या, तलाव, हवामान, वृक्ष, पशुपक्षी, आकाश, चंद्र-सूर्य, ग्रह तारे इत्यादी गोष्टी विषयीच्या ज्ञानाचा समावेश असतो तर सामाजिक विश्वासंबंधीच्या ज्ञानात अन्न संपादन करणे, घरे बांधणे, शिकार, संरक्षण, आचार विचार, परंपरा, विश्वास, सामाजिक संस्था इत्यादी प्रकारच्या ज्ञानाचा समावेश होतो. ज्ञान प्राप्त करण्याची प्रक्रिया ही प्रत्येक समाजात निरंतर सुरू असते. अप्रगत समजल्या जाणाऱ्या आदिवासी समाजात देखील ज्ञान प्राप्त करण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू असलेली आढळून येते. प्रगत समाजात मात्र विविध प्रकारचे ज्ञान मिळविले जाते. म्हणून ज्ञान हा संस्कृतीचा एक महत्वाचा घटक आहे.

* विश्वास [Beliefs] :-> प्रत्येक मानवी समाजात विविध प्रकारचे विश्वास असतात. संस्कृती म्हणजे विविध प्रकारच्या विश्वासांचा समुच्चय होय असे म्हटल्या जाते. आदिवासी समाजाप्रमाणेच प्रगत समाजात देखील अनेक विश्वास असतात. मुरिआ जमातीमध्ये शामन आजारी व्यक्तीच्या शरीरातील प्रेतात्म्यांना काढून टाकण्यासाठी जादूच्या पदार्थांचा उपयोग करतो. अशाप्रकारची क्रिया केल्यानंतर आजारी व्यक्तीच्या शरीरातील प्रेतात्मा निघून जातो, त्याचा आजार बरा होतो. अशा प्रकारचा विश्वास मुरिआ लोकांचा आहे. आपल्याकडे देखील काही लोक आजारी व्यक्तीला मांत्रिकाकडे नेतात, मांत्रिक त्या आजारी व्यक्तीला लागलेले भूत उतरवितो. परंतु हे विश्वास सत्य असतातच असे नाही. तरी देखील अशाप्रकारचे विविध विश्वास प्रत्येक समाजाच्या संस्कृतीमध्ये आढळतात.

* संस्कृती मधील विश्वासांचा लोकांवर फार मोठा प्रभाव असतो. लोक संस्कृतीतील विश्वासांना खरे मानून त्यानुसार आचरण करतात. जे लोक संस्कृतीनुसार व्यक्तीने आचरण करावे अशी समाजाची अपेक्षा असते. जे लोक संस्कृतीतील 'विश्वास' मान्य करत नाही अशा लोकांचे आचरण हे संस्कृती विरोधी मानले जाते. शुभ-अशुभ, स्वर्ग-नरक, ईश्वर इत्यादी अनेक गोष्टींसंबंधीचे विश्वास हिंदू संस्कृतीमध्ये आढळतात. त्यामुळे लोक संस्कृती मधील विश्वासांना विशेष महत्व देतात.

* मूल्ये व प्रमाणके :-> मूल्ये व प्रमाणके हे संस्कृतीतील तिसरा घटक होय. सर्वच समाजाच्या संस्कृतीत मूल्ये व प्रमाणके आढळतात. विशेष म्हणजे समाज स्वीकृत मूल्यांवर प्रमाणके आधारलेली असतात. मूल्यांमध्ये बदल झाल्यास प्रमाणकांमध्ये देखील बदल घडून येतो.

* उदा :-> पूर्वी भारतात विषमता हे मूल्य होते. म्हणून या विषमता या मूल्यावर आधारित जाती व्यवस्था निर्माण करण्यात आली. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीच्या नियमानुसार वर्तन करणे अनिवार्य होते परंतु आधुनिक काळात समानता हे मूल्य स्वीकृत केल्यानंतर समाजात विषमता, जातीभेद पाळू नका नये असे प्रतिपादन करणारी प्रमाणके तयार करण्यात आली.

* हॅरी जॉन्सन यांच्या मते, 'मूल्य म्हणजे असे मापदंड आहे की ज्यांच्या आधारावर योग्य किंवा अयोग्य, वांछनीय किंवा अवांछनीय इत्यादी बाबतचे निर्णय घेतले जातात? दैनंदिन जीवनात या मूल्यांचा फार मोठा प्रभाव आढळतो. मूल्यांना सार्वत्रिक आदर्श मानले जाते मूल्ये माणसाचे वर्तन नियंत्रित करतात.

* प्रत्येक संस्कृतीमध्ये मूल्ये आढळून येत असली तरी ही मूल्ये सारखी असतीलच असे नाही. समाजाच्या संस्कृतीप्रमाणे मूल्ये ही वेगवेगळी असतात. इतकेच नव्हे तर एका समाजात ज्या गोष्टींना मूल्य मानले असते, अशाही त्या विरुद्धची गोष्ट दुसऱ्या संस्कृतीत मूल्य म्हणून मानलेली आढळते.

* उदा :-> भारतात गोमांस खाऊ नये हे मूल्य आहे तर याउलट अमेरिकेत गोमांसापासून बनलेला 'बीफ स्टेक' हा पदार्थ खाणे एक मूल्य मानले जाते.

* संस्कृतीत मूल्यांप्रमाणेच प्रमाणकांची व्यवस्था असते. समाजातील सदस्यांच्या वर्तनास नियंत्रित करणाऱ्या नियमांना प्रमाणके म्हणतात. समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे व्यक्ती प्रमाणके आत्मसात करतात त्यामुळे प्रमाणकांचे नवीन पिढीकडे संक्रमण [हस्तांतरण] केले जाते. प्रमाणके ही व्यक्ती [illegible]

किंवा धार्मिक पारंपारिक असतात. ती लिखित किंवा अलिखित असतात. त्यांचे नी आदेशात्मक किंवा निषेधात्मक स्वरूपाची असतात. संबंधात्मक प्रमाणके आणि नियमनात्मक प्रमाणके असे देखील प्रमाणकांचे दोन प्रकार आहेत. संबंधात्मक प्रमाणकांद्वारे सदस्यांच्या संबंधाचे निर्धारण करण्यात येते तर नियमनात्मक प्रमाणकांद्वारे व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण केले जाते. प्रमाणकांचे उल्लंघन केल्यास त्या व्यक्तीस दंड केला जातो. संस्कृतीमधील लोकाचार, रूढी, कायदे, लोकनीती, शिष्टाचार ही सर्व प्रमाणकांची उदाहरणे होत. मूल्य व प्रमाणकानुसार व्यक्तीने आचरण करावे अशी समाजाची अपेक्षा असते.

* (4) चिन्हे [Signs] → संस्कृतीतील चौथे घटक म्हणजे चिन्हे होत. संस्कृतीमध्ये चिन्हांना विशेष महत्त्व आहे. हॅरी जॉन्सन यांनी चिन्हांमध्ये संकेत आणि प्रतिके यांचा समावेश केला आहे. श्रीमती एस.के. टेंभर यांच्या मते, 'संकेतातून भूत, वर्तमान किंवा भविष्यातील एखाद्या वस्तू, घटना किंवा परिस्थितीच्या अस्तित्वाचा निर्देश करण्यात येतो.' रस्ता ओलसर असणे हा पाऊस येऊन गेल्याचा संकेत आहे. दार ठोठावणे किंवा छतावर टप टप आवाज येणे किंवा पाऊस येण्याचा संकेत आहे. प्रत्येक समाजात विविध प्रकारचे सामाजिक संकेत असतात. हे संकेत समाजातील सदस्यांनी निर्माण केलेले असतात. टेंभर यांनी घंटानाद द्वारा विविध प्रकारचे संकेत दिले जात असल्याची उदाहरणे दिली आहेत. उदा. विविध प्रकारच्या घंटानादामुळे आगगाडी येत असल्याचा, शाळा सुटल्याचा, आग लागल्याचा, आरतीचा आरंभ होत असल्याचा, धोक्याची सूचना मिळाल्याचा इत्यादी विविध संकेत सूचित होतात. संकेताचा अर्थ विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात जाणून घ्यावा लागतो. (05)

* संस्कृतीमधील वर्तन प्रकार शिकत असताना व्यक्तीस संकेतांचा अर्थ लक्षात घ्यावा लागतो. संकेतामुळे संस्कृतीच्या आदान-प्रदानाचे कार्य सहज सुलभ झाले आहे. संकेतांच्या माध्यमातून व्यक्तीच्या भावना, विचार, धारणा इत्यादी व्यक्तीकडे हस्तांतरीत होत असतात.

* संकेताप्रमाणेच प्रतिकांचा देखील संस्कृतीमध्ये अंतर्भाव होतो. भाषा ही प्रतिकांची व्यवस्था आहे. शब्द हे प्रतिक स्वरूप असतात. ज्याप्रमाणे समाज संकेतांची निर्मिती करतो त्याचप्रमाणे प्रतिकांची देखील निर्मिती करतो. समाजाद्वारे प्रतिकांना एक निश्चित अर्थ असतो. संस्कृती-संस्कृतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारची प्रतिके आढळून येतात. उदा. → राष्ट्रध्वज, अलंकार, चिन्हे, आलिंगन, हस्तांदोलन इत्यादी.

* अशाप्रकारे ज्ञान, विश्वास, मूल्ये व प्रमाणके आणि चिन्हे हे चार संस्कृतीचे मूलतत्त्वे किंवा घटक होत. संस्कृतीमधील हे सर्व घटक परस्पर संबंधीत आणि परस्परावलंबी असतात. या घटकांमधील परस्पर संबंधीत व्यवस्था म्हणजे सामाजिक व्यवस्था होय.

* (5) तंत्रज्ञान [Technology] → संस्कृतीचे भौतिक आणि अभौतिक असे दोन प्रकार आहेत. टायलर, सोरोकिन, मॅकआयव्हर, हॅरी जॉन्सन यांनी फक्त अभौतिक संस्कृतीला महत्त्व दिले आहे. हॅरी जॉन्सन यांनी प्रतिपादन केलेली ज्ञान, विश्वास, मूल्ये व प्रमाणके आणि चिन्हे ही चार घटकतत्त्वे लक्षात घेतली आहे. परंतु हरस्कोविट्स, डेव्हिड बिडने, ग्रिडिंग्ज, ऑगबर्न आणि न्यूमर यांनी अभौतिक गोष्टींचा संस्कृतीमध्ये समावेश केला आहे. म्हणून तंत्रज्ञान देखील संस्कृतीचा घटक मानला जातो.

* मानवाने आपल्या बुद्धीचा उपयोग करून तंत्रज्ञानाचा विकास केला आहे. तंत्रज्ञान हा भौतिक संस्कृतीचा आविष्कार मानला जातो. मानवाने तंत्रज्ञानाचा विकास करून त्याचा उपयोग आपल्या भौतिक गरजांची पूर्तता करण्यासाठी केला आहे. तंत्रज्ञानामुळे मानवाने आपला विकास घडवून आणला आहे. आज तर तंत्रज्ञान ही आधुनिक समाज आणि त्यांच्या संस्कृतीच्या विकासाचा मूलभूत घटक बनला आहे. तंत्रज्ञानाच्या विकासाच्या आधारावर कोणती संस्कृती विकसित आणि कोणती संस्कृती अविकसित किंवा मागासलेली आहे हे ठरविले जाते. उदा. → आदिवासी किंवा भटक्या जमातीची संस्कृती ही मागासलेली आहे असे म्हटले जाते कारण या समाजात तंत्रज्ञानाचा अभाव आहे. याउलट ज्या समाजात तंत्रज्ञानाची प्रगती झाली तो समाज आणि त्या समाजामधली संस्कृती ही प्रगत संस्कृती आहे असे मानले जाते.

* यावरून हे स्पष्ट होते की, संस्कृतीच्या ज्ञान, विश्वास, मूल्ये व प्रमाणके आणि चिन्हे या घटकांप्रमाणेच तंत्रज्ञान हे देखील एक महत्त्वाचे मूलतत्त्व किंवा घटक मानला जातो.

## संस्कृती आणि सभ्यता [Culture and Civilization] (06)

* संस्कृती आणि सभ्यता या दोघांचा परस्पर संबंध आहे. वास्तविकता ही आहे की संस्कृती आणि सभ्यता या दोन्ही एकाच प्रकारच्या नाण्याच्या दोन बाजू होत. संस्कृतीचा सभ्यतेवर आणि सभ्यतेचा संस्कृतीवर परिणाम होत असतो.

* ऑगबर्न यांनी संस्कृतीचे भौतिक आणि अभौतिक असे दोन प्रकार सांगितले आहेत. मॅकआयव्हर आणि पेज यांनी संस्कृतीच्या भौतिक आणि अभौतिक या दोन प्रकारांना अधिक स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, "भौतिक संस्कृती आपली सभ्यता आहे तर अभौतिक संस्कृती ही आपली संस्कृती आहे.

* **सभ्यतेचा अर्थ** :- साधारणतः समाजाच्या भौतिक, यांत्रिक संपूर्ण संबोधले जाते. सभ्यतेच्या अंतर्गत अशा वस्तूंचा समावेश होतो की, ज्या साधनाचा उपयोग करून मानवी समाजाच्या आवश्यक गरजांची पूर्तता केली जाते. या दृष्टीकोनातून सभ्यतेच्या अंतर्गत मानवी आवश्यकतांची पूर्ती करणाऱ्या आणि ज्यामध्ये उपयोगीतेचे तत्व आहे अशा सर्व भौतिक साधनांचा समावेश होतो. उदा. टेबल, पेन, कारखाने, बँक इत्यादी, या सर्व वस्तूमध्ये उपयोगितेचे तत्व आढळून येते. कारण या भौतिक साधनांद्वारा कोणत्या ना कोणत्या आवश्यकतांची पूर्तता केली जाते. या अर्थाने या सर्व वस्तूंचा सभ्यतेच्या दृष्टीने विचार केला जातो.

* मॅकआयव्हर आणि पेज यांनी सभ्यतेची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, "सभ्यता म्हणजे असे संपूर्ण यांत्रिक संघटन होय की ज्याद्वारे मानव आपल्या जीवनाच्या परिस्थितींना नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतो."

### * सभ्यता आणि संस्कृतीमधील फरक :-

* सभ्यता आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तसेच त्यांच्यात परस्पर संबंध असल्यामुळे सभ्यता आणि संस्कृती या दोहोंना एकच समजले जाते. परंतु या दोहोंमध्ये बराच फरक आढळून येतो. मॅकआयव्हर आणि पेज यांनी सभ्यता आणि संस्कृतीमध्ये पुढील पाच प्रकारचे फरक विशद केले आहेत.

* (1) सभ्यतेचे उपयोगितेच्या आधारे मोजमाप केले जाते. परंतु संस्कृतीचे मोजमाप केले जात नाही कारण संस्कृतीमधील घटकांचे उपयोगितेच्या आधारे मोजमाप करणे शक्य नाही.

(2) सभ्यता एक साधन आहे. परंतु संस्कृती मात्र साध्य आहे. सभ्यतेमधील प्रत्येक वस्तूचा आवश्यकतेनुसार साधनाच्या रूपात उपयोग करता येतो, परंतु संस्कृतीचा नाही.

(3) सभ्यता ही सतत पुढे जात असते परंतु संस्कृती मात्र सतत पुढे जात नाही. मॅकआयव्हर आणि पेज यांच्या मते, सभ्यता ही केवळ पुढे जाते आणि ती प्रकाशाच्या वेगाने पुढे जात असते. परंतु संस्कृतीच्या संदर्भात ही गोष्ट लागू होत नाही.

(4) सभ्यता ही अपरिवर्तित स्वरूपामध्येच ग्रहण करावी लागते. परंतु संस्कृतीमध्ये परिवर्तन केले जाते. सभ्यतेमध्ये उपयोगितेचा तत्व असल्यामुळे ज्या गोष्टींचा स्विकार केला जातो त्या गोष्टींना त्याच स्वरूपात स्विकारले जाते. परंतु एका समूहाची संस्कृती दुसरा समूह स्वीकारतो. तेव्हा त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीनुसार परिवर्तन केले जाते.

(5) सभ्यता ही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहजपणे जाऊ शकते. कारण सभ्यतेमधील उपयोगीता तत्वामुळे लोक त्याकडे लवकर आकर्षित होतात. त्यामुळे सभ्यता ही एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी सहजपणे जाऊ शकते. याउलट संस्कृतीचे प्रसरण सहजतेने होत नाही कारण संस्कृतीची कोणतीही तत्वे आत्मसात करण्यासाठी व्यक्तीला आपले विचार, भावना इत्यादीमध्ये परिवर्तन करावे लागते.

## संस्कृती आणि व्यक्तिमत्व (Culture and Personality)

* व्यक्तींचे व्यक्तीमत्व घडविण्यामध्ये संस्कृतीचे महत्वपूर्ण योगदान आहे. व्यक्तीचे व्यक्तीमत्व हे त्याच्या संस्कृतीनुसार घडत जाते त्यामुळेच समाजशास्त्रज्ञ राल्फ लिन्टन आणि अब्राहम कार्डिनर यांनी, व्यक्तीमत्व हे संस्कृती सापेक्ष असल्याचे प्रतिपादन केले आहे.

* प्रत्येक संस्कृतीमधील व्यक्तीचे विशिष्ट प्रकारचे व्यक्तीमत्व असते. संस्कृती परत्वे वेगवेगळ्या लोकांचे वेगवेगळे व्यक्तीमत्व आढळून येते. लिन्टन आणि अब्राहम कार्डिनर यांनी संस्कृती आणि व्यक्तिमत्व यामधील संबंध स्पष्ट करण्याकरीता आदिवासी जमाती आणि व्यक्तिमत्वांचे तुलनात्मक अध्ययन केले आहे. त्यांच्या या अध्ययनातून हे स्पष्ट करण्यात आले की, संस्कृतीनुसार व्यक्तिमत्व बदलत असते.

* व्यक्तिमत्वाची व्याख्या [Defination of Personality] :- (07)

* ① गार्डन ऑलपोर्ट :- "व्यक्तीस व्यक्तीमधील सर्व शारीरिक आणि सामाजिक गुणांचा प्रत्ययात्मक किंवा अनिमान अनुभव येतो, त्यास व्यक्तिमत्व असे म्हणतात."

* ② नार्मन मन :- "व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तीची शरीररचना, वर्तनविशेष, अभिरुची, अभिवृत्ती तसेच क्षमता आणि योग्यता या सर्वांचे वैशिष्ट्यपूर्ण एकीकरण होय."

* ③ टीवर :- "मानसशास्त्रीय आणि सामान्य स्वरूपात व्यक्तिमत्व हा शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरण्यात आला आहे. परंतु सर्वात व्यापक आणि समाधानकारक व्याख्येनुसार व्यक्तिमत्व हे व्यक्तीच्या अशा शारीरिक, मानसिक, नैतिक आणि सामाजिक गुणांचे सुसंघटीत आणि गतिशील संघटन आहे की, जे व्यक्ती अन्य व्यक्तींच्या सोबत स्वतः जीवनाच्या सामाजिक जीवनाच्या आदानप्रदानामध्ये एक दुसऱ्यांच्या प्रती प्रदर्शित करतात."

* वरील व्याख्यांवरून व्यक्तिमत्वाची संकल्पना स्पष्ट होते. व्यक्तिमत्वाचे स्वरूप पुढील काही मुद्यावरून अधिक स्पष्ट होते.

① व्यक्तिमत्व म्हणजे शारीरिक व मानसिक वैशिष्ट्यांचे संघटन होय.
② व्यक्तिमत्वात व्यक्तीच्या गुणवैशिष्ट्यांचे अर्थपूर्ण संघटन होत असते.
③ व्यक्तिमत्व वैशिष्ट्यपूर्ण असते.
④ व्यक्तिला व्यक्तीमत्व जन्मतः प्राप्त होत नाही, त्याचा विकास होतो.
⑤ व्यक्तिमत्वाला बाह्य आणि आंतरिक असे दोन पैलू असतात. बाह्य पैलूमध्ये व्यक्तीची भूमिका, आंतरक्रिया इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. तर आंतरिक पैलूमध्ये भावना, प्रेरणा, अभिवृत्ती दृष्टीकोन इत्यादी गोष्टी असतात.
⑥ व्यक्तिमत्व बरेचसे स्थायी असते.
⑦ व्यक्तिमत्व परिवर्तनशील देखील असते.

## संस्कृतीचा व्यक्तिमत्वावर प्रभाव [Impact of Culture on Personality]

* भौतिक वातावरण, आनुवंशीकता, संस्कृती आणि विशिष्ट अनुभव हे चार व्यक्तिमत्वाचे निर्धारक आहेत. जन्मतः व्यक्तीला संस्कृतीचे कोणतेच ज्ञान नसते. व्यक्ती समाजशील प्राणी असल्याने व्यक्ती आपोआपच आत्मसात करीत असते. व्यक्ती ज्या समाजात जन्म घेते आणि वाढते त्या संस्कृतीचा व्यक्तीच्या सवयी, क्षमता, दृष्टीकोन इत्यादींवर परिणाम पडत असतो. म्हणजेच व्यक्तीचे व्यक्तिमत्व निर्धारित करण्यामध्ये संस्कृतीचे विशेष महत्व आहे. त्यामुळे व्यक्तीमत्व हा व्यक्तीने सामाजीकरणामुळे संस्कृतीचा आत्मसात केलेला आकार होय. अशी व्यक्तीमत्वाची व्याख्या केली जाते.

* काही विचारवंतांनी व्यक्तिमत्व आणि संस्कृतीला एकाच नाण्याच्या दोन बाजू मानतात. स्पायरो यांच्या मते, 'व्यक्तिमत्वाचा विकास आणि संस्कृतीचे अर्जन करणे या वेगवेगळ्या प्रक्रिया नाहीत तर त्या समान शिक्षण प्रक्रिया होत.' व्यक्तिमत्व हे संस्कृतीचे व्यक्तिगत स्वरूप आहे. तर संस्कृती ही व्यक्तिमत्वाचे सामूहिक स्वरूप होय. प्रत्येक संस्कृती एका आधारभूत व्यक्तिमत्वप्रकाराला जन्म देते. मुलाचा जन्म एका विशिष्ट सांस्कृतिक परिस्थितीमध्ये होत असतो. ती सांस्कृतिक परिस्थिती त्याची मानसिक रचना, मनोवृत्ती आणि सवयींना प्रभावित करते. हेक यांच्या मते, 'संस्कृतीचा व्यक्तिमत्वावर प्रबळ आणि दमनकारी प्रभाव पडतो जो व्यक्तीच्या व्यक्तिमत्वास आचार विचार, विश्वासाद्वारे प्रभावित करतो.' जन्मापासून मुलाचे ज्या प्रकारे पालन-पोषण होते त्यांचा प्रभाव त्या त्या व्यक्तीमत्वावर पडतो.

* सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. ब्राऊन यांनी व्यक्तिमत्वावर संस्कृतीच्या भौतिक आणि अभौतिक अशा दोन्ही घटकांचा प्रभाव पडतो असे स्पष्ट केले आहे. अमेरिकेतील आदिवासींमध्ये वेळेचे महत्व नाही. त्यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्वात आढळून येत नाही. परंतु अमेरिकेतील गोऱ्या (श्वेत) लोकांना वेळेचे विशेष महत्व वाटते असे ब्राऊन यांनी स्पष्ट केले आहे.

* व्यक्तिमत्वाचा विकास हा प्रामुख्याने भाषेवर अवलंबून असतो. भाषा ही केवळ समाजामध्ये राहून शिकता येते. भाषेच्या माध्यमातून संस्कृतीमधील आचार-विचार सहजपणे आत्मसात केले जातात. भाषेच्या विकासामुळेच संस्कृती ही समृद्ध होण्यास विशेष मदत होते. आणि समृद्ध संस्कृतीमुळे भाषेचा प्रभावीपणा अधिक वाढत जातो. त्यामुळेच अशा संस्कृतीमधील व्यक्तिच्या व्यक्तिमत्व विकासाला अधिकचा वाव असतो. पण ज्या समाजात भाषेचा विकास झाला नाही. त्या समाजातील व्यक्तींच्या व्यक्तिमत्व विकासाला वाव मिळत नाही. काही अभ्यासकांच्या मते, 'ज्या समाजामध्ये जातीय आणि ... अशा समाजातील लोक अत्यंत असुरक्षित अवस्थेत जीवन जगतात. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊ शकत नाही.'

* यावरून हे स्पष्ट होते की, भाषेनुसार वर्तनप्रकार बदलतात आणि त्याचा व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर विशेष प्रभाव पडत असतो. प्रत्येक समाजाच्या संस्कृतीमध्ये विशिष्ट सांस्कृतिक मूल्ये आणि सामाजिक दृष्टीकोन असतात. ते सामाजिक संबंध आणि संस्कृती मधून उदयास येतात. त्यांचा परिणाम सुद्धा व्यक्तिमत्वावर पडतो.

## सामाजिक अनुवर्तन, सामाजिक विचलन आणि सामाजिक नियंत्रण

[Social Conformity]

**सामाजिक अनुवर्तनाचा अर्थ** :- समाजात वावरत असतांना व्यक्तीने कोणत्या प्रकारचे वर्तन करावे अथवा कोणते वर्तन करू नये याबाबत निश्चित असे नियम असतात. व्यक्तीने या नियमानुसार वर्तन केले पाहिजे अशी समाजाची अपेक्षा असते. प्रत्येक समाजात प्रमाणके असतात. व्यक्तीने इतरांशी कसे वागावे, कोणत्या प्रकारे पारस्परिक संबंध प्रस्थापित करावे याविषयीची निश्चिती प्रमाणकांद्वारे केली जाते. समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रमाणके आढळतात. सामाजिक व्यवस्था टिकून ठेवण्याच्या संदर्भात व्यक्तीने प्रमाणकानुसार वर्तन करणे आवश्यक असते. समाजव्यवस्थेतील आंतरक्रियांचे निर्धारण प्रमाणके आणि मूल्यांद्वारे केले जाते. व्यक्ती जेव्हा प्रमाणकांनुसार वर्तन करते तेव्हा त्या वर्तनास सामाजिक अनुवर्तन म्हणतात. प्रमाणकांनुसार वर्तन करणे, समाजाच्या स्थैर्याच्या दृष्टीने आणि सामाजिक व्यवस्था टिकविण्याच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचे आहे.

⇒ मानव-मानवामधील व्यवहारांचे सातत्य आणि त्याची व्यवस्था टिकविणारी ही प्रमाणके दोन गोष्टींवर अवलंबून आहेत.

(1) प्रमाणके व्यक्ती - व्यक्ती मधील संबंधाचे - व्यवहाराचे निर्धारण आणि निर्देशन करणारी असली पाहिजे.

② सामान्यतः संबंधामध्ये किंवा व्यवहारामध्ये भाग घेणाऱ्या व्यक्तींचा या प्रमाणकांवर विश्वास असला पाहिजे आणि त्या प्रमाणकानुसार वर्तन करण्याची व्यक्तीची तयारी असली पाहिजे. समाजातील प्रमाणकांनुसार व्यक्तीने वर्तन केले पाहिजे म्हणून सामाजीकरणाद्वारे व्यक्तीला प्रमाणकांचा परिचय करून दिला जातो इतकेच नव्हे तर सामाजिकरणाच्या माध्यमातून व्यक्ती प्रमाणकांचे आंतरीकरण करते आणि प्रमाणके व्यक्तीच्या जीवनातील एक अविभाज्य अंग बनतात. जर व्यक्तीचा प्रमाणकांवर विश्वास नसेल, तर व्यक्ती प्रमाणकानुसार वर्तन करणार नाही.

⑨ B.A. I

"मनोमन स्वीकारलेल्या अमूर्त प्रतिमानाद्वारे वर्तनावर मर्यादा टाकल्या जातात त्यास प्रमाणक म्हणतात." अशी हॅरी जॉन्सन यांनी प्रमाणकाची व्याख्या केली आहे. म्हणजेच व्यक्तीच्या वर्तनाचे नियमन आणि निर्देशन करणारी प्रमाणके ही अमूर्त असतात. या प्रमाणकांची व्यक्तीस मनोमन जाणीव होते. व्यक्तीने कोणत्या प्रसंगी कसा व्यवहार केला पाहिजे हे प्रमाणकाद्वारे निश्चित केले जाते.

व्याख्या: जे. एम. रोपर्ड यांच्या मते "व्यक्ती समूहास अपेक्षित रीतीनुसार व्यक्ती ज्यावेळी वर्तन करतात, तेव्हा त्या आंतरक्रिया प्रकारास अनुपालन म्हणतात."

थोडक्यात, सामाजिक प्रमाणकांना आणि नियमांना अनुकूल असणारी आणि या प्रमाणकाद्वारा निर्धारित वर्तन मर्यादेत आत असणारी क्रिया म्हणजेच सामाजिक अनुपालन होय. अनुपालनाचे सामाजिक जीवनात विशेष महत्त्व आहे. अनुपालनामुळे विविध सामाजिक संस्थांचे कार्य सुरळीतपणे चालत असते.

## अनुपालनात्मक वर्तनाची कारणे (Causes of Conformity)

① **सामाजीकरण** :- सामाजीकरणाच्या प्रक्रियेचे मानवी जीवनात विशेष महत्त्व आहे. कारण व्यक्तीच्या जन्मापासून तर मृत्युपर्यंत सामाजीकरणाची प्रक्रिया सुरू असते. प्रमाणकांचे आंतरीकरण करण्याच्या दृष्टीने सामाजीकरणाचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. कुटुंब, शेजार, क्रिडासमूह, शाळा इत्यादी सामाजीकरणाच्या माध्यमातून प्रमाणकांचे आंतरीकरण करण्याचे शिक्षण दिले जाते. मुले अशा प्रमाणकांना आत्मसात करून त्यानुसार वर्तन करतात. अनुपालनात्मक वर्तन असे की त्यांच्या जीवनाचे एक अविभाज्य अंग बनते.

अशाप्रकारे सामाजीकरणामुळे प्रमाणकांचे पालन करण्यास व्यक्तीस प्रवृत्त केले जाते. सामाजीकरण जितके प्रभावी असेल त्या प्रमाणात अनुपालनात्मक वर्तन प्रभावी असते. म्हणून अनुपालनात्मक वर्तनाच्या दृष्टीने सामाजीकरणाचे विशेष योगदान असल्याचे आढळून येते.

② **पृथक्करण** :- समाजात व्यक्तीला अनेक भूमिका वठवाव्या लागतात प्रत्येक भूमिकेच्या वर्तनाबाबत वेगवेगळी प्रमाणके असतात. भूमिकाधारकांनी आपल्या भूमिकेनुसार वर्तन करावे अशी अपेक्षा केली जाते. सर्व भूमिका परस्परपूरक असतीलच असे नाही त्या भूमिका परस्पर विरोधी देखील असू शकतात. अशावेळी भूमिका संघर्ष निर्माण होतो. आणि व्यक्तिकडून विचलनात्मक वर्तन घडून येते. व्यक्तीकडून विचलनात्मक वर्तन घडू नये आणि भूमिकांमधील म्हणजेच प्रमाणकांमधील संघर्ष टाळला जावा याकरिता पृथक्करण मार्गाचा अवलंब केला जातो.

व्यक्तीला वठवाव्या लागणाऱ्या अनेक भूमिकांशी संबंधित अपेक्षांचा संघर्ष होणार नाही अशी व्यवस्था पृथक्करणाद्वारे केली जाते. पृथक्करणाद्वारे ज्या भूमिकांच्या प्रमाणकांमध्ये संघर्ष होण्याची शक्यता असते त्यांना वेगवेगळी वेळ आणि भिन्न भिन्न स्थाने वाटून दिली जातात. उदा. :- नोकरी करणाऱ्या महिलेला ऑफिसमधील नोकरी आणि घरची कामे देखील करावी लागतात. म्हणजेच त्या महिलेला कुटुंबात गृहिणी आणि ऑफिसमध्ये कर्मचारी या दोन्ही भूमिका वठवाव्या लागतात. त्यानुसार सकाळी १० ते ६ पर्यंत ती महिला ऑफिसमध्ये कर्मचारी म्हणून काम करते तर बाकीच्या वेळी ती गृहिणी म्हणून आपली भूमिका वठविते त्यामुळे भूमिकांच्या प्रमाणकामध्ये संघर्ष निर्माण होत नाही. आणि ती आपल्या भूमिकेनुसार कार्य पार पाडते.

पृथक्करणाचा एक दुसरा प्रकार आहे. व्यक्ती आपल्या वेगवेगळ्या भूमिका वेगवेगळ्या भूमिका संचांच्या संदर्भात पार पाडते. त्यातून पृथक्करणाचा दुसरा प्रकार निर्माण होतो. प्रत्येक भूमिकेबाबत अपेक्षा व्यक्त करणाऱ्या काही व्यक्ती वा समूह असतात. त्यांना त्या भूमिकेचा भूमिका संच म्हणतात. उदा. :- ऑफीस मधील अधिकाऱ्यांच्या भूमिकेचा भूमिका संच हा दुय्यम अधिकारी, टायपिस्ट, लिपिक, चपराशी इत्यादी पासून बनलेला असतो. जितक्या भूमिका असतील, तितके त्यांचे वेगवेगळे भूमिका संच असतात, व्यक्तीला वेगवेगळ्या भूमिका संचाच्या संदर्भात वेगवेगळ्या भूमिकांशी संबंधित क्रिया कराव्या लागतात. त्यातून पृथक्करण घडून येते. आणि व्यक्ती अनुपालनात्मक वर्तन करते.

(3) <u>प्रमाणकांचे क्रमनिर्धारण</u> :- समाजात विविध प्रकारची प्रमाणके असतात. या विविध प्रमाणकांचे पालन करणे आवश्यक असते. परंतु एकाच वेळी सर्व प्रमाणकांचे अनुसरण करणे शक्य नसते. सर्वच प्रमाणके ही सारखी महत्त्वाची नसतात. त्यामुळे कोणत्या प्रमाणकाचे विशिष्ट वेळी पालन करायचे या बाबत प्रमाणकांच्या महत्त्वानुसार त्यांचा क्रम ठरविला जातो. प्रमाणकांचे क्रमनिर्धारण झाल्यामुळे व्यक्ती प्रमाणकानुसार वर्तन करतात. म्हणून सर्व प्रमाणकांचे क्रमनिर्धारणातून अनुरूपतात्मक वर्तनास प्रेरणा मिळते.

प्रमाणकांचे क्रमनिर्धारण आणि प्रमाणकांच्या वेळ-स्थानाची निश्चिती या दोन्ही गोष्टी प्रत्येक संस्कृतीचा अविभाज्य भाग असतो. सामाजीकरणाद्वारे प्रमाणकांचे क्रमनिर्धारण आणि विशिष्ट वेळी, विशिष्ट स्थानी कोणती प्रमाणके पाळावी या नियमांची जाणीव मुलांना करून दिली जाते. सामाजीकरणातून प्रमाणकांच्या पालनासंबंधी मार्गदर्शन केले जाते. म्हणून व्यक्तीच्या हातून ते अनुरूपतात्मक वर्तन घडते.

(4) <u>सामाजिक नियंत्रण</u> :- अनुरूपतात्मक वर्तनाच्या दृष्टीने समाजजीवनात सामाजिक नियंत्रणाचे विशेष महत्त्व आहे. जर व्यक्ती या प्रमाणकानुसार योग्य वर्तन करीत असेल, तर त्या व्यक्तीस प्रतिष्ठा दिली जाते. जर व्यक्ती प्रमाणकांचा भंग करीत असेल, तर अशावेळी त्या व्यक्तीस शिक्षा केली जाते. विचलित वर्तनातून त्यांचे नियमन होत नाही. समाजात [illegible] इत्यादी गोष्टींची सतत जाणीव सामाजिक नियंत्रणाच्या साधनातून व्यक्तीला करून दिली जाते. विशेष म्हणजे लहान पणापासून व्यक्तीला सामाजिक नियंत्रणाचे महत्त्व पटवून दिले जाते. कुटुंब, नातेवाईक, शेजार, समूह इत्यादी प्राथमिक समूहात व्यक्तीला अनुरूपतात्मक वर्तनाचे शिक्षण देऊन त्याची आवश्यकता विशद केली जाते. प्रमाणकाचे पालन करण्यामध्येच व्यक्तीचे हित आहे याची जाणीव करून दिली जाते. त्यामुळे व्यक्ती अनुरूपतात्मक वर्तन करते.

(5) <u>विचार प्रणाली</u> :- समाजव्यवस्थेतील व्यक्तीचे स्थान कोणते, समूह कोणत्या पद्धतीने कार्य करतो आणि समूहाचे कार्य कोणत्या प्रकारे व्हायला पाहिजे याबाबत समूहाच्या सदस्यांच्या सामान्य कल्पना असतात. त्याला विचार प्रणाली असे म्हणतात. समाजातील प्रत्येक समूहाची एक स्वतंत्र विचारप्रणाली असते. समूहाद्वारे आपापल्या विचार प्रणालीचे संस्करण झालेले असते. विचारप्रणाली व्यक्तीच्या समाजात असलेल्या निष्ठेला अधिक प्रबळ बनविते.

- आधुनिक समाज हा जटिल, विशाल आणि विभाजनीय असल्यामुळे, विविध समूहांच्या विचार प्रणालीत मात्र भिन्नता असते. व्यक्ती आपल्या समूहाच्या विचारप्रणालीनुसार वर्तन करते. परंतु त्यावेळी व्यक्तीकडून इतर विचारप्रणालीच्या विरुद्ध वर्तन घडून येते. उदा. [illegible] समूहातील सदस्यांचे वर्तन त्यांच्या विचारप्रणाली नुसार असते. परंतु त्यांचे ते वर्तन समाजाच्या दृष्टीने विचलनात्मक असते.

(6) <u>गुंतलेले हितसंबंध</u> :- सामाजिक प्रमाणकाद्वारे व्यक्तीच्या हक्कांचे आणि कर्तव्यांचे निर्धारण करण्यात येते. व्यक्तीला प्राप्त झालेल्या हक्कांमुळे तिला काही फायदे मिळतात. हक्क हे व्यक्तींच्या फायद्यांचे संरक्षण करतात. समाजातील प्रमाणक व्यवस्था टिकून ठेवण्यामध्ये काही व्यक्तींचे किंवा समाजाचे हितसंबंध गुंतलेले असतात. जी प्रमाणके व्यक्तीच्या हितसंबंधाशी संबंधित असतात त्या प्रमाणकांचे व्यक्तीकडून पालन केले जाते. [illegible] इतरांनी त्याचे पालन करावे असा आग्रह धरला जातो. उदा. मतदान करणे हे लोकशाही व्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक आहे. लोकांनी हा अधिकार बजावला पाहिजे असे लोकांना सांगितले जाते. लोकांनी मतदानाचा अधिकार बजावण्यामध्ये राजकीय पक्ष आणि उमेदवारांचे हितसंबंध गुंतलेले असतात. प्रमाणकात व्यक्तीचे हितसंबंध असल्यामुळे अनुरूपतेस प्रोत्साहन दिले जाते.

## <u>सामाजिक विचलन</u> (<u>Social Deviation</u>)

<u>अर्थ</u> :- प्रत्येक समाजात विशिष्ट प्रमाणके असतात. ज्यावर समाजव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य अवलंबून असते. समाजात व्यवस्था आणि स्थैर्य कायम रहावे याकरिता सामाजीकरण, सामाजिक नियंत्रणाच्या माध्यमांचा अवलंब करण्यात येतो. विचलनात्मक वर्तनामुळे समाजाचे स्थैर्य, समाजव्यवस्थेची निरंतरता आणि सामाजिक ऐक्य यासंबंधी अनेक अडचणी निर्माण होतात. म्हणून व्यक्ती विचलनात्मक वर्तन करणार नाही याची काळजी सामाजिक नियंत्रणाद्वारे घेतली जाते.

⇒ समाजाचे अस्तित्व कायम राहावे, समाजात शांतता, सुव्यवस्था राहावी याकरिता प्रमाणकांची व्यवस्था असते. व्यक्तीचे वर्तन प्रमाणकानुसार म्हणजेच अनुरूपतात्मक असावे याकरिता विशेष प्रयत्न केले जातात. तरीही समाजात विचलन घडून येते. दुर्खिम, विलियम सम्नर, सदरलँड, पारसन्स, मर्टन इत्यादी समाजशास्त्रज्ञांनी याचे अध्ययन केले आहे.

② सामान्यतः संदर्भसमूहाचे किंवा व्यवहारसमूहाचे भाग होणाऱ्या व्यक्तींचा या प्रमाणकांवर विश्वास असला पाहिजे आणि त्या प्रमाणकानुसार वर्तन करण्याची व्यक्तीची तयारी असली पाहिजे. समाजातील प्रमाणकांनुसार व्यक्तीने वर्तन केले पाहिजे म्हणून सामाजीकरणाद्वारे व्यक्तीला प्रमाणकांचा परिचय करून दिला जातो. इतकेच नव्हे तर सामाजीकरणाच्या माध्यमातून व्यक्ती प्रमाणकांचे आंतरीकरण करते आणि प्रमाणके व्यक्तीच्या जीवनातील एक अविभाज्य अंग बनतात. जर व्यक्तीचा प्रमाणकांवर विश्वास असेल, तर व्यक्ती प्रमाणकानुसार वर्तन करणार नाही.

⑨ B.A. I

"मनोमन असलेल्या अमूर्त प्रतिमानाद्वारा वर्तनावर मर्यादा टाकल्या जातात त्यास प्रमाणक म्हणतात." अशी शेरी जॉनसन यांनी प्रमाणकाची व्याख्या केली आहे. म्हणजेच व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण आणि निर्देशन करणारी प्रमाणके ही अमूर्त असतात. या प्रमाणकांची व्यक्तीला मनोमन जाणीव होते. व्यक्तीने कोणत्या प्रसंगी कसा व्यवहार केला पाहिजे हे प्रमाणकाद्वारे निर्देशन केले जाते.

व्याख्या :- प्रा. शेरीफ यांच्या मते "लोक समूहास अपेक्षित रीतीनुसार व्यक्तीसंबंधी वर्तन करतात, तेव्हा त्या आंतरक्रिया प्रकारास अनुपालन म्हणतात."

थोडक्यात, सामाजिक प्रमाणकांना अनुसरून अभिमुख असणारी आणि या प्रमाणकाद्वारा निर्धारित वर्तन मर्यादेच्या आत असणारी क्रिया म्हणजेच सामाजिक अनुपालन होय. अनुपालनाचे सामाजिक जीवनात विशेष महत्त्व आहे. अनुपालनामुळे विविध सामाजिक संस्थांचे कार्य सुरळीतपणे चालत असते.

## अनुपालनात्मक वर्तनाची कारणे (Causes of Conformity)

① **सामाजीकरण** :- सामाजीकरणाच्या प्रक्रियेचे मानवी जीवनात विशेष महत्त्व आहे. कारण व्यक्तीच्या जन्मापासून तर मृत्यूपर्यंत सामाजीकरणाची प्रक्रिया सुरू असते. प्रमाणकांचे आंतरीकरण करण्याच्या दृष्टीने सामाजीकरणाचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. कुटुंब, शेजार, क्रीडासमूह, शाळा इत्यादी सामाजीकरणाच्या माध्यमातून प्रमाणकांचे आंतरीकरण करण्याचे शिक्षण दिले जाते. मुले अशा प्रमाणकांना आत्मसात करून त्यानुसार वर्तन करतात. अनुपालनात्मक वर्तन असे हे त्यांच्या जीवनाचे एक अविभाज्य अंग बनते.

अशाप्रकारे सामाजीकरणामुळे प्रमाणकांचे पालन करण्यास व्यक्तीस प्रवृत्त केले जाते. सामाजीकरण जितके प्रभावी असेल त्या प्रमाणात अनुपालनात्मक वर्तन प्रभावी असते. म्हणून अनुपालनात्मक वर्तनाच्या दृष्टीने सामाजीकरणाचे विशेष योगदान असल्याचे आढळून येते.

② **पृथक्करण** :- समाजात व्यक्तीला अनेक भूमिका वठवाव्या लागतात. प्रत्येक भूमिकेच्या संदर्भात वेगवेगळी प्रमाणके असतात. भूमिकाधारकांनी आपल्या भूमिकेनुसार वर्तन करावे अशी अपेक्षा केली जाते. सर्व भूमिका परस्परपूरक असतीलच असे नाही. त्या भूमिका परस्पर विरोधी देखील असू शकतात. अशावेळी भूमिका संघर्ष निर्माण होतो. आणि व्यक्तीकडून विचलनात्मक वर्तन घडून येते. व्यक्तीकडून विचलनात्मक वर्तन घडू नये आणि भूमिकांमधील म्हणजेच प्रमाणकांमधील संघर्ष टाळता यावा याकरिता पृथक्करण याचा अवलंब केला जातो.

व्यक्तीला वठवाव्या लागणाऱ्या अनेक भूमिकांशी संबंधित अपेक्षांचा संघर्ष होणार नाही अशी व्यवस्था पृथक्करणाद्वारे केली जाते. पृथक्करणाद्वारे ज्या भूमिकांच्या प्रमाणकांमध्ये संघर्ष होण्याची शक्यता असते त्यांना वेगवेगळी वेळ आणि निरनिराळी स्थाने वाटून दिली जातात. उदा. :- नोकरी करणाऱ्या महिलेला ऑफीसमधील नोकरी आणि घरची कामे देखील करावी लागतात. म्हणजेच त्या महिलेला कुटुंबात गृहिणी आणि ऑफीसमध्ये कर्मचारी या दोन्ही भूमिका वठवाव्या लागतात. त्यानुसार सकाळी 10 ते 6 पर्यंत ती महिला ऑफीसमध्ये कर्मचारी म्हणून काम करते तर बाकीच्या वेळी ती गृहिणी म्हणून आपली भूमिका वठविते त्यामुळे भूमिकांच्या प्रमाणकामध्ये संघर्ष निर्माण होत नाही. आणि ती आपल्या भूमिकेनुसार कार्य पार पाडते.

पृथक्करणाचा एक दुसरा प्रकार आहे. व्यक्ती आपल्या वेगवेगळ्या भूमिका वेगवेगळ्या भूमिका संचाच्या संदर्भात पार पाडते. त्यातून पृथक्करणाचा दुसरा प्रकार निर्माण होतो. प्रत्येक भूमिकेबाबत अपेक्षा व्यक्त करणाऱ्या काही व्यक्ती व समूह असतात. त्यांना त्या भूमिकेच्या भूमिका संच म्हणतात. उदा. :- ऑफीस मधील अधिकाऱ्यांच्या भूमिकेचा भूमिका संच हा दुसरा अधिकारी, टायपिस्ट, शिपाई, चपराशी इत्यादी यांच्यापासून बनलेला असतो. जितक्या भूमिका आहेत, तितके त्यांचे वेगवेगळे भूमिका संच असतात. व्यक्तीला वेगवेगळ्या भूमिका संचाच्या संदर्भात वेगवेगळ्या भूमिकांशी संबंधित क्रिया कराव्या लागतात. त्यातून पृथक्करण घडून येते. आणि व्यक्ती अनुपालनात्मक वर्तन करते.

③ **प्रमाणकांचे क्रमनिर्धारण** :→ समाजात विविध प्रकारची प्रमाणके असतात. या विविध प्रमाणकांचे पालन करणे आवश्यक असते. परंतु एकाच वेळी सर्व प्रमाणकांचे अनुसरण करणे शक्य नसते. सर्वच प्रमाणके ही सारख्या महत्वाची नसतात त्यामुळे कोणत्या प्रमाणकाचे विशिष्ट वेळी पालन करायचे याबाबत प्रमाणकांच्या महत्वानुसार त्यांचा क्रम ठरविला जातो. प्रमाणकांचे क्रमनिर्धारण झाल्यामुळे व्यक्ती प्रमाणकानुसार वर्तन करतात. त्यामुळे सर्व प्रमाणके क्रमनिर्धारणातून अनुरूपतात्मक वर्तनास प्रेरणा मिळते.

प्रमाणकांचे क्रमनिर्धारण आणि प्रमाणकांच्या वेळ-स्थानाची निश्चिती या दोन्ही गोष्टी प्रत्येक संस्कृतीचा अविभाज्य भाग असतो. सामाजीकरणाद्वारे प्रमाणकांचे क्रमनिर्धारण आणि विशिष्टवेळी, विशिष्ट स्थानी कोणती प्रमाणके पाळावी या विषयीची जाणीव मुलांना करून दिली जाते. सामाजीकरणातून प्रमाणकांच्या पालनासंबंधी मार्गदर्शन केले जाते. म्हणून व्यक्तीच्या हातून ते अनुरूपतात्मक वर्तन घडते.

④ **सामाजिक नियंत्रण** :→ अनुरूपतात्मक वर्तनाच्या दृष्टीने समाजजीवनात सामाजिक नियंत्रणाचे विशेष महत्व आहे. जर व्यक्ती या प्रमाणकानुसार योग्य वर्तन करीत असेल, तर त्या व्यक्तीस प्रतिष्ठा दिली जाते. जर व्यक्ती प्रमाणकांचे उल्लंघन करीत असेल, तर [illegible] शिक्षा केली जाते. विचलित वर्तनातून व्यक्तीचे हित होत नाही. समाजात [illegible] इत्यादी गोष्टींची जाणीव सामाजिक नियंत्रणाच्या माध्यमातून व्यक्तीला करून दिली जाते. विशेष म्हणजे लहान पणापासूनच व्यक्तीस सामाजिक नियंत्रणाचे महत्व पटवून दिले जाते. कुटुंब, नातेवाईक, शेजार, समूह इत्यादी प्राथमिक समूहात व्यक्तीला अनुरूपतात्मक वर्तनाचे शिक्षण देऊन त्याची आवश्यकता विशद केली जाते. प्रमाणकाचे पालन करण्यामध्येच व्यक्तीचे हित आहे याची जाणीव करून दिली जाते. त्यामुळे व्यक्ती अनुरूपतात्मक वर्तन करते.

⑤ **विचार प्रणाली** :→ समाजव्यवस्थेतील व्यक्तीचे स्थान कोणते, समूह कोणत्या पद्धतीने कार्य करतो. आणि समूहाचे कार्य कोणत्या प्रकारे व्हायला पाहिजे याबाबत समूहाच्या सदस्यांच्या सामान्य कल्पना असतात. यालाच विचारप्रणाली असे म्हणतात. समाजातील प्रत्येक समूहाची एक स्वतंत्र विचारप्रणाली असते. समूहाद्वारे आपआपल्या विचारप्रणालीचे संस्थाकरण झालेले असते. विचारप्रणाली व्यक्तीच्या समाजाप्रती असलेल्या निष्ठेला अधिक प्रबळ बनविते.

⇒ आधुनिक समाज हा जटिल, विशाल आणि विजातीय असल्यामुळे, विविध समूहांच्या विचारप्रणालीत मात्र भिन्नता असते. व्यक्ती आपल्या समूहाच्या विचारप्रणालीनुसार वर्तन करते. परंतु त्याचवेळी व्यक्तीकडून इतर विचारप्रणालीच्या विरुद्ध वर्तन घडून येते. उदा. नक्षलवादी परंतु त्याचवेळी व्यक्तीकडून इतर विचारप्रणाली नुसार असते. परंतु त्यांचे हे वर्तन समाजव्यवस्था समूहातील सदस्यांचे वर्तन त्यांच्या विचारप्रणाली नुसार असते. परंतु त्यांचे हे वर्तन समाजाच्या दृष्टीने विचलनात्मक असते.

⑥ **गुंतलेले हितसंबंध** :→ सामाजिक प्रमाणकाद्वारे व्यक्तीच्या हक्कांचे आणि कर्तव्यांचे निर्धारण करण्यात येते. व्यक्तीला प्राप्त झालेल्या हक्कांमुळे तिला काही फायदे मिळतात. हक्क हे व्यक्तींच्या कामांचे संरक्षण करतात. समाजातील प्रमाणक व्यवस्था टिकून ठेवण्यामध्ये काही व्यक्तींचे किंवा समाजाचे हितसंबंध गुंतलेले असतात. जी प्रमाणके व्यक्तीच्या - हितसंबंधाशी संबंधित असतात त्या प्रमाणकांचे व्यक्तीकडून पालन केले जाते. [illegible] इतरांनी त्याचे पालन करावे यावर भर दिला जातो. उदा. :→ मतदान करणे हे लोकशाही व्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक आहे. लोकांनी हा अधिकार बजावला पाहिजे असे लोकांना सांगितले जाते. लोकांनी मतदानाचा अधिकार बजावण्यामध्ये राजकीय पक्ष आणि उमेदवारांचे हितसंबंध गुंतलेले असतात. प्रमाणकात व्यक्तीचे हितसंबंध असल्यामुळे अनुसरणास प्रोत्साहन दिले जाते.

## सामाजिक विचलन (Social Deviation)

**अर्थ** :→ प्रत्येक समाजात विशिष्ट प्रमाणके असतात. ज्यावर समाजव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य अवलंबून असते. समाजात व्यवस्था आणि स्थैर्य कायम रहावे याकरिता सामाजीकरण, सामाजिक नियंत्रणाच्या माध्यमांचा अवलंब करण्यात येतो. विचलनात्मक वर्तनामुळे समाजाचे स्थैर्य, समाजव्यवस्थेची निरंतरता आणि सामाजिक ऐक्य [illegible] याची काळजी सामाजिक नियंत्रणाद्वारे घेतली जाते. म्हणून व्यक्ती विचलनात्मक वर्तन करणार नाही [illegible] निर्माण होतात.

⇒ समाजाचे अस्तित्व कायम रहावे, समाजात शांतता, सुव्यवस्था रहावी याकरिता प्रमाणकांची व्यवस्था असते व्यक्तीचे वर्तन प्रमाणकानुसार व्हावे व अनुरूपतात्मक व्हावे याकरिता विशेष प्रयत्न केले जातात तरीही समाजात विचलन घडून येते. दुर्खिम, विलियम मर्टन, सदरलँड, पारसन्स, मर्टन इत्यादी समाजशास्त्रज्ञांनी याचे अध्ययन केले.

**व्याख्या** :- (1) **हॅरी जॉन्सन** :- "विचलित वर्तन म्हणजे फक्त प्रमाणकांच्या भंग करणारे वर्तन नव्हे तर ते अशा प्रकारचे वर्तन असते की, त्यावेळी प्रमाणकांशी अभिमुख असलेला कर्ता प्रमाणकांचा जाणूनबुजून भंग करतो एकप्रकारे ते उद्देशपूर्ण उल्लंघन असते."

(2) **विलियम जे. गुड** :- "समूह सदस्यांनी आपल्या समूहातील प्रमाणकांचा भंग करणारी क्रिया म्हणून निर्देश केला आहे, अशी कोणतीही क्रिया किंवा विधान म्हणजे विचलित वर्तन होय."

(3) **प्रटिस व लिपेटस** :- "समाजाने संमत केलेल्या प्रमाणकांपेक्षा वेगळे आचरण म्हणजे विचलित वर्तन होय."

(4) **रोझ, ग्लेस्सर आणि ग्वर** :- "विचलित वर्तन म्हणजे आवश्यक असलेल्या प्रमाणक किंवा प्रमाणकांचा भंग होय."

विचलित वर्तनाच्या संदर्भात आणखी एक महत्वाचा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे तो म्हणजे व्यक्तीच्या हातून जर नकळत विचलित वर्तन घडले असेल तर ते वर्तन विचलित वर्तन होऊ शकते नाही जर मुद्दाम प्रमाणकांविरोधी वर्तन केलेले असेल तर, ते वर्तन विचलित वर्तन होय.

**रॉबर्ट मर्टन** यांनी 'Social Structure and Anomie' (1938) या लेखात विचलना बाबत अधिक विस्तृत विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, 'व्यक्तीच्या अस वर्तनाप्रमाणेच विचलनात्मक वर्तन हे देखील सामान्य वर्तन (Normal Behaviour) होय! विशिष्ट परिस्थितीच्या दबावामुळे व्यक्ती विचलन करते. या विचारनाची दोन कारणे आहेत.

(1) प्रमाणकांचे ज्ञानसत्व व्यक्तीस मान्य नसते.

(2) प्रमाणकांचे पालन करणे काही व्यक्तींना गैरसोयीचे असते.

→ समाजातील प्रमाणके काही व्यक्तीस मान्य नसतात. ही प्रमाणके अन्यायकारक आहेत असा त्यांच्या दृष्टीकोन असतो त्यामुळे त्या व्यक्ती त्या प्रमाणकांचे मुद्दाम उल्लंघन करतात. भारतीय समाजाचा विचार केल्यास स्त्रियांनी शिक्षण घेऊ नये, अस्पृश्यता पाळली पाहिजे, शुद्रातिशुद्रांनी शिक्षण घेऊ नये, पत्नीने सती जावे, विधवांनी पुनर्विवाह करू नये इत्यादीबाबत अनेक प्रमाणके होती. ही प्रमाणके समाजसुधारकांना संयुक्तिक वाटली नाही त्यांनी या प्रमाणकांच्या विरोध केला त्याकरीता आंदोलने केली महात्मा ज्योतीराव फुले, राजा राममोहन रॉय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सुधारकांना समाजातील प्रचलित प्रमाणकांची मान्यता नव्हती म्हणून त्यांचे वर्तन हे विचलितवर्तन होय. या समाजसुधारकांचे वर्तन विचलित असले तरी दूरदृष्टीने त्यांच्या वर्तनाचा आणि कार्याचा विचार केल्यास, त्यांचे हे विचलित वर्तन समाजाला दिशा देणारे ठरले.

→ अनेकदा प्रमाणकांचे पालन करणे व्यक्तीच्या दृष्टीने गैरसोयीचे असते. तेव्हा व्यक्ती स्वतःच्या सोयीसाठी मुद्दाम त्या प्रमाणकांचे उल्लंघन करते. उदा. :- परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब करू नये असा विद्यापीठाचा नियम आहे. पण जो विद्यार्थी अभ्यास करून परीक्षेत पास होऊ शकत नाही तो विद्यार्थी परीक्षेत कॉपी करून परीक्षेच्या नियमांचे उल्लंघन करतो, कर चुकविणे, गुंडा होणे, चोरी करणे, भ्रष्टाचार इत्यादी प्रकारचे विचलनात्मक वर्तन व्यक्ती स्वतःच्या सोयीकरीता करीत असतो. त्यांना प्रमाणकांची ~~मान्य~~ त्यामना मान्य असते. परंतु प्रमाणकांचे पालन करणे गैरसोयीचे असल्यामुळे व्यक्ती विचलनात्मक वर्तन करतात. मर्टनच्या मते प्रमुख परिस्थितीशी व्यक्तीचे समायोजन घडून न येणारे वर्तन या दृष्टीने विचलनात्मक वर्तनाचा विचार केला पाहिजे.

## विचलन एक सापेक्ष संकल्पना

:- विचलनाची संकल्पना ही विशिष्ट काळात अस्तित्वात असलेल्या प्रमाणकांच्या संदर्भात वापरली जाते समाजात सतत परिवर्तन होत असते सामाजिक परिवर्तनामुळे सामाजिक आदर्श प्रमाणके, मूल्ये, यामध्ये देखील बदल होत असतो. एका विशिष्ट काळात जे वर्तन विचलित मानले जाते तेच वर्तन काही काळानंतर योग्य मानले जाते. आणि जे वर्तन अनुरूपतात्मक होते ते वर्तन नंतरच्या काळात विचलनात्मक मानले जाऊ शकते. पूर्वी स्त्रियांनी घराबाहेर जाऊ नये, नोकरी करू नये इत्यादी बाबतची प्रमाणके होती. म्हणूनच स्त्री कामासाठी घराबाहेर गेल्यास ते विचलनात्मक वर्तन मानले जायचे परंतु बदलत्या परिस्थितीनुसार आज स्त्रियांनी घराबाहेर जाणे विचलन मानले जात नाही.

→ प्रत्येक समाजानुसार आदर्श आणि प्रमाणके वेगवेगळी असतात. एका विशिष्ट समाजातील अनुरूपतात्मक वर्तन दुसऱ्या समाजाच्या दृष्टीने विचलनात्मक असू शकते कारण समाजापरत्वे प्रमाणकांमध्ये फरक असतो. उदा. :- मुस्लीम धर्मात बहुपत्नी विवाह मान्यता आहे. त्यामुळे मुस्लीम माणसाने दोन स्त्रीयांशी विवाह केल्यास हे वर्तन अनुरू-

र्चनात्मक मानले जाते. आजकाल हिंदू धर्मात मुलगी विवाहास मान्यता असल्यामुळे पळवून आणलेल्या स्त्रियांशी विवाह करणे विचलनात्मक वर्तन मानले जाते. यावरून असे आढळून येते की एका समाजासाठी अनुरूपतात्मक असणारे वर्तन दुसऱ्या समाजासाठी विचलनात्मक ठरू शकते.

⇒ नेहमी अनुरूपतात्मक वर्तन करणारी व्यक्ती काही विशिष्ट परिस्थितीत विचलनात्मक वर्तन करते. कोणत्याही व्यक्तीचे विचलन हे त्या समाजाच्या विशिष्ट परिस्थिती, मानसिकता, अभिरुची आणि सहनशीलता यावर अवलंबून आहे. म्हणून विचलन ही एक सापेक्ष कल्पना आहे. समाजातील विचारवंत, सुधारक आणि क्रांतिकारी नेते हे एका अर्थाने विचलित वर्तन करतात कारण ते समाजातील काही प्रमाणके, मूल्ये, समस्या यांविरुद्ध लढा देतात. त्यांचे वर्तन हे विचलित वर्तन असले तरी समाजात परिवर्तन आणणे, समाजाला दिशा देणे या दृष्टीने त्यांचे हे वर्तन अतिशय महत्त्वाचे असते.

## विचलनात्मक वर्तनाचे सिद्धांत (Theories of Deviant Behaviour)

⇒ अनुरूपता आणि विचलन हे जर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत तर अनुरूपतेऐवजी विचलनाकडे व्यक्ती का वळतात? याचा शोध घेण्याचा प्रयत्न समाजशास्त्रज्ञांनी केला आहे. या संदर्भात अनेक सिद्धांत मांडण्यात आलेले आहेत. यापैकी तीन प्रमुख सिद्धांत आहेत.

(1) **जैविक सिद्धांत** ⇒ लोम्ब्रोसो आणि शेल्डन यांनी हा सिद्धांत मांडला. या सिद्धांतानुसार शारीरिक वैशिष्ट्यामुळे विचलन घडून येते. इटली मधील लोम्ब्रोसो यांनी गुन्हेगारी वर्तनाचा संबंध त्यांच्या शारीरिक लक्षणांशी जोडला आहे. त्यांच्या मते, गुन्हेगारी वृत्ती ही निर्माण केली जात नाही तर जन्मत:च काही लोक गुन्हेगार प्रवृत्तीचे असतात. तर शेल्डन यांनी शरीराच्या संरचनेला महत्त्व दिले. त्यांच्या मते, काही शरीराची रचना अशी असते की जी विचलनात्मक वर्तन करण्यास प्रवृत्त करते. शेल्डन यांनी शारीरिक वैशिष्ट्यांच्या आधारावर व्यक्तीचे एण्डोमार्फिक, मेसोमॉर्फिक, आणि एक्टोमार्फिक असे तीन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

(1) **एण्डोमार्फिक** ⇒ या प्रकारच्या व्यक्तीच्या पोटाचा घेर मोठा असतो. यांचे एकूण शरीर गोलाकार असते. आरामप्रियता, सामाजिक मान्यतेची गरज, अवलंबनाची भावना ही या प्रकारच्या व्यक्तीची स्वभाव वैशिष्ट्ये होत. (12)

(2) **मेसोमॉर्फिक** ⇒ या प्रकारच्या व्यक्तींमध्ये अस्थी आणि स्नायूंचे प्राबल्य असते. आत्मप्रकटन, उत्साह व धाडसाची आवड ही वैशिष्ट्ये यांच्यात आढळतात.

(3) **एक्टोमॉर्फिक** ⇒ यांच्यात त्रोटक आकाराची शरीररचना आढळते. यांचे स्नायू अविकसित असतात. एकांतवासाची आवड, शांततेची आवड हे गुणधर्म या प्रकारच्या व्यक्तींमध्ये दिसून येतात. अशाप्रकारे लोम्ब्रोसो आणि शेल्डन यांनी आपल्या सिद्धांताच्या आधारे स्पष्ट केले की, काही व्यक्तींची शारीरिक लक्षणे अशा प्रकारची असतात की, ज्यामुळे ते विचलित वर्तन करण्यास प्रवृत्त होतात. जैविक सिद्धांताच्या संदर्भात पुढे विशेष संशोधन झाले नाही. गुन्हेगार हे जन्मतात असतात किंवा विशिष्ट प्रकारच्या शरीररचनेमुळे विचलित वर्तन त्यांच्याकडून केले जाते असे प्रकारचे विश्लेषण योग्य वाटत नाही. या सिद्धांतामध्ये अनेक त्रुटी आहेत.

(2) **मानसशास्त्रीय सिद्धांत** ⇒ मानसशास्त्रीय सिद्धांतानुसार विचलित वर्तनाची मुळे ही मानवाच्या व्यक्तिमत्त्वामधील दोषामध्ये शोधता येतात. फ्रॉईड यांनी इड, अहम्, परम अहम् या मानवाच्या तीन अवस्थांचे विश्लेषण केले आहे. इड आणि अहम् किंवा इड आणि परम अहम् यांमधील झगड्याचा परिणाम म्हणजे विचलित वर्तन होय असे फ्रॉईडने स्पष्ट केले आहे.

⇒ मानसशास्त्रज्ञांनी मानसिक वैफल्यामुळे देखील विचलनात्मक वर्तन घडून येते असे प्रतिपादन केले आहे. केफर यांच्या मते 'संतुलित व्यक्ती आपल्या वर्तनावर नियंत्रण ठेवू शकतात. कारण त्यांना भविष्यकालीन परिणामांची जाणीव असते. त्याप्रमाणे आपली प्रतिमा भंग पावू नये याची ते काळजी.' मानसिक असमाधानामुळे मात्र व्यक्ती विचलित वर्तन करतात.

⇒ मानसशास्त्रीय सिद्धांतानुसार व्यक्तीच्या विचलित वर्तनाचे मानसिक दृष्टीकोनातून विश्लेषण करण्यात आले आहे. परंतु समाजशास्त्रज्ञांना मानसशास्त्रीय विश्लेषण मान्य नाही. कारण या सिद्धांतात विचलित वर्तनास कारणीभूत असलेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांकडे पूर्णत: दुर्लक्ष करण्यात आले आहे.

(3) **समाजशास्त्रीय सिद्धांत** ⇒ दुर्खीम, मर्टन, मिल्लर, सदरलँड, क्लॉवर्ड, ओहलिन इत्यादी समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक विचलनात्मक संदर्भात वेगवेगळे सिद्धांत मांडलेत. या विविध सिद्धांतापैकी प्रमाणशून्यता, सामाजिक विघटन, सांस्कृतिक सिद्धांत इत्यादी सिद्धांत प्रमुख आहेत.

इमाईल दुर्खीम यांनी 'The Division of Labour in Society (1893)' या ग्रंथात सर्वप्रथम प्रमाणकशून्यतेची संकल्पना मांडली. दुर्खीमच्या मते, प्रमाणकशून्यता ही एक सामान्य आहे. 'सामाजिक शक्ती' ज्याप्रमाणे व्यक्तींच्या विविध आवश्यकता आहेत आणि त्या आवश्यकतांची पूर्ती करण्यासाठी व्यक्ती समाजाशी आपला संबंध प्रस्थापित करतो परंतु जेव्हा व्यक्तीच्या आवश्यकतांची पूर्ती होत नाही तेव्हा व्यक्तीमध्ये निराशा, असंतोष, वाढता रोष आणि असुरक्षितता निर्माण होतात आणि व्यक्ती समाजाद्वारा मान्य प्रमाणके, मूल्ये, आदर्श यांचा स्वीकार करण्यास नकार देते ती अशाप्रकारे व्यवहार करते की, त्यामुळे वर्तमान विसंगती निर्माण होते. प्रमाणकांचे पालन होत नाही त्यामुळे प्रमाणक शून्यता निर्माण होते. (13)

⇒ सामाजिक प्रमाणकशून्यतेचा अर्थ स्पष्ट करताना दुर्खीम म्हणतो की, 'प्रमाणकशून्यता ही आदर्शविहिनतेची अशी एक अवस्था आहे की, ज्यामध्ये स्वाभाविकतेचा अभाव असतो, नियमांचे निलंबन असते ही एक अशी परिस्थिती आहे की, ज्यात नियमांचा अभाव असतो. प्रमाणक शून्यतेची चर्चा करताना दुर्खीमने म्हटले आहे की, सामूहिक शक्ती अथवा सामाजिक नियंत्रणाच्या अभावी, अचानक तांत्रिक परिवर्तन होणे किंवा युद्धजन्य प्रगती किंवा मुक्त प्रगती किंवा दुर्गती होणे इत्यादी कारणामुळे समाजात एक नवीन परिस्थिती निर्माण होते. त्यातून समाजात नियम नसलेली किंवा प्रमाणकशून्यतेची परिस्थिती निर्माण होते. उदा. व्यापारात अचानक फार मोठे नुकसान आल्यामुळे श्रीमंत व्यक्तींची आर्थिक परिस्थिती मध्यम आकाराची होते. अशा अवस्थेत त्या व्यक्तीने आपल्या आवश्यकता कमी केल्या पाहिजेत. जी व्यक्ती आवश्यकता कमी करण्यास असमर्थ होते सामाजिक मूल्यांना विसरून आदर्शविहीन आणि असामाजिक व्यवहार करण्यास ती व्यक्ती प्रवृत्त होते म्हणजे अनैतिकता आणि प्रमाणांच्या विरुद्ध असणाऱ्या मार्गांचा अवलंब करून ती व्यक्ती आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करते.

⇒ दुर्खीमच्या मते, समाजात विघटनात्मक वर्तन करण्यास प्रवृत्त होते असे दुर्खीमने स्पष्ट केले आहे. दुर्खीमच्या मते, समाजात जेव्हा प्रमाणकशून्यतेची परिस्थिती निर्माण होते तेव्हा सीमारहित [illegible] ती परिस्थिती संपूर्ण समाजात पसरते आणि संपूर्ण समाजात मूल्यविहीन आणि आदर्शविहीन स्थिती लोपल्याने अस्तित्वात असलेल्या सामाजिक शक्ती समाजाचे संघटन आणि सहकार्याची परिस्थिती निर्माण करीत नाही.

⇒ मर्टन यांनी देखील प्रमाणकशून्यतेमुळे सामाजिक विघटन घडून येते असल्याचे प्रतिपादन केले आहे. मर्टनच्या मते, प्रत्येक समाजात सांस्कृतिक साध्ये आणि संस्थागत प्रमाणके असतात. व्यक्तींना सांस्कृतिक साध्ये प्राप्त करतांना संस्थागत प्रमाणकांचे अनुसरण केले पाहिजे अशी व्यक्तींकडून अपेक्षा केली जाते. परंतु अनेकदा संस्थागत साधनांचा अभाव निर्माण होतो व संतुलन विचलित होते म्हणजेच व्यक्ती साधनांच्या प्राप्तीसाठी वेगळ्या मार्गांचा अवलंब करतात त्यामुळे प्रमाणकशून्य वर्तन घडून येते.

⇒ सामाजिक संघटनातून देखील सामाजिक विघटन घडून येते, जेव्हा समाजात विविध धर्म, पंथ, सामाजिक समूह समाजात असतात. आणि त्यांच्या उद्दिष्टांमध्ये भिन्नता असते. अशावेळी कधीकधी समाजातील लोक विघटीत वर्तन करण्यास प्रवृत्त होतात. म्हणून समाजशास्त्रज्ञांनी स्पष्टपणे प्रतिपादन केले की, सामाजिक विघटनातून विघटनात्मक वर्तन घडून येते. यातून अनेक सामाजिक समस्या देखील निर्माण होतात.

अशाप्रकारे समाजशास्त्रज्ञांनी प्रमाणकशून्यता, सामाजिक विघटन, सांस्कृतिक संघर्ष इत्यादी सिद्धांताद्वारे समाजात सामाजिक विघटन घडून येते असे म्हटले आहे.

## प्रमाणकशून्यता आणि सामाजिक विघटनाचा मर्टनचा सिद्धांत :-

⇒ रॉबर्ट मर्टन यांनी 1938 मध्ये 'Social Structure and Anomie' या लेखात प्रमाणकशून्यता किंवा विसंगती बाबत आपले विचार विस्तृतपणे मांडले आहेत. प्रमाणकशून्यता ही समाजाशी संबंधित आहे. व्यक्ती हा सामाजिक संरचनेचा एक अविभाज्य घटक आहे. सामाजिक संरचना ही व्यक्तींना प्रमाणक न मानण्याच्या प्रवृत्तीकडे ओढते आणि त्यातून प्रमाणकशून्यतेची अवस्था निर्माण होते असे विचार मर्टनने मांडले आहेत. मर्टनच्या मते, 'काही सामाजिक संरचना व्यक्तींनी समाजमान्य मूल्यानुसार वर्तन न करता त्यांनी समान्य मार्गांच्या आधारे वर्तन करावे असा निश्चित दबाव टाकते.' अशा सामाजिक संरचनेतील विशिष्ट परिस्थितील व्यक्ती स्वतः विचलित वर्तन करीत नाहीतर सामाजिक संरचनेतील विशिष्ट परिस्थिती विचलीत वर्तन करण्यास व्यक्तींवर दबाव टाकते म्हणून विचलनात्मक ही विशिष्ट सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीच्या संदर्भात असणारी व्यक्तीची प्रतिक्रिया होय. मर्टनच्या मते, 'व्यक्तीच्या अन्य वर्तनाप्रमाणेच विचलनात्मक वर्तन हे देखील सामान्य वर्तन आहे.'

सांस्कृतिक साध्ये किंवा उद्दिष्ट्ये आणि संस्थागत प्रमाणके प्रतिमान (14) B.A.I

[अ] सांस्कृतिक साध्ये किंवा उद्दिष्ट्ये :- प्रत्येक व्यक्ती आपल्या समूहाच्या साध्ये किंवा उद्दिष्टांच्या दृष्टीकोनातून वर्तन करीत असते. म्हणून प्रत्येक व्यक्तीचे वर्तन समूहाच्या उद्दिष्टांच्या संदर्भाविना उपयुक्त ठरत नाही. समूहाची साध्ये ही संपूर्ण व्यवस्थेद्वारे निर्धारित झालेली असतात. त्यामुळे कोणत्याही समूहातील व्यक्तीच्या वर्तनाचे विश्लेषण करताना त्या समूहाची सामान्य साध्ये कोणती हे लक्षात घेणे आवश्यक असते. सामाजिक संस्थेद्वारा संस्कृतीद्वारा साध्यांचे किंवा उद्दिष्टांचे निर्धारण झालेले असते. संस्कृतीद्वारा निर्धारित करण्यात आलेल्या साध्यांना सांस्कृतिक साध्ये (उद्दिष्टे) असे म्हणतात. सांस्कृतिक साध्ये व्यक्तीच्या दृष्टीने प्रेरणादायी असतात. प्रत्येक समाजाची साध्ये त्या त्या समाजाच्या सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेद्वारा निर्धारित केलेली असतात. सांस्कृतिक साध्ये असतात. ही साध्ये (उद्दिष्टे) समाजमान्य असतात कारण ही उद्दिष्टे सामाजिक व्यवस्थेने निश्चित केलेली असतात. म्हणून व्यक्ती सांस्कृतिक साध्ये प्राप्त करण्याच्या दृष्टीने कार्यरत असतात.

[ब] संस्थागत प्रमाणके किंवा साधने :- व्यक्तीचे समूहातील वर्तन कोणत्या साध्य वा उद्दिष्टांशी युक्त असले पाहिजे याचे निश्चित सामाजिक व्यवस्थेद्वारे ठरविलेले असते. तसेच ही साध्य किंवा उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी व्यक्तीने कोणत्या साधनांचा किंवा नियमांचा स्विकार केला पाहिजे हे देखील संस्कृतीद्वारे निर्धारित झालेले असते. सांस्कृतिक साध्ये प्राप्त करण्याच्या दृष्टीने समाजमान्य साधनांचा अवलंब होणे आवश्यक असते. यालाच मर्टनने संस्थागत प्रमाणके किंवा साधने म्हटले आहे.

→ जेव्हा समूहातील व्यक्ती सांस्कृतिक साध्यांची पूर्ती संस्थागत साधनांच्या माध्यमातून करतो तेव्हा व्यक्तीचे वर्तन हे अनुसरणात्मक असते. व्यक्तीने नेहमीच अनुसरणात्मक वर्तन करावे अशी समाजाची अपेक्षा असते. परंतु ज्यावेळी व्यक्ती सांस्कृतिक साध्ये किंवा उद्दिष्टांची पूर्तता समाजमान्य साधनाद्वारे करण्यास असमर्थ असते तेव्हा अशी परिस्थिती निर्माण होते की व्यक्तीवर उद्दिष्ट पूर्तीबाबत समाजाचे दडपण येते. आणि दडपणामुळे ती व्यक्ती विचलनात्मक वर्तन करण्यास प्रवृत्त होते. म्हणजेच सांस्कृतिक उद्दिष्टे आणि संस्थागत साधने या संदर्भ चौकटीत घडणारे वर्तन हे अनुसरणात्मक किंवा विचलनात्मक असू शकते. (14)

→ मर्टनच्या मते, 'प्रत्येक समूहात सांस्कृतिक साध्ये वा उद्दिष्टांसोबत संस्थागत साधने जोडलेली असतात. ही साधने समाजमान्य असून त्याची मुळे ही प्रथा, परंपरा आणि संस्थांमध्ये सामावलेली असतात.' सांस्कृतिक साध्ये वा उद्दिष्ट्ये आणि संस्थागत साधने यात निर्माण होणारी तफावत किंवा विसंगती ही सामाजिक संरचनेच्या व्यक्तींवरील दबावामुळे आहे. त्यातून प्रमाणकशून्यता निर्माण होते. असे मर्टनने प्रतिपादन केले आहे.

व्यक्तीगत अनुकूलन किंवा समायोजनाचे प्रकार

① अनुसरण :- सांस्कृतिक साध्ये वा उद्दिष्टे व्यक्तीला मान्य असतात. त्याचप्रमाणे संस्थागत साधने देखील मान्य असतात. म्हणून व्यक्ती संस्थागत साधनांचा अवलंब करून सांस्कृतिक उद्दिष्टांची पूर्तता करते. अशावेळी व्यक्तीचे हे वर्तन समाजमान्य मूल्यांनुसार असते. म्हणून व्यक्तीचे हे वर्तन अनुसरणात्मक असते. सामान्यपणे समाजातील लोक अनुसरण करतात.

② नवकल्पनी :- व्यक्ती सांस्कृतिक साध्याला विशेष महत्त्व देते आणि साधनाकडे म्हणजेच संस्थागत प्रमाणकांकडे दुर्लक्ष करते. तेव्हा त्या विचलित वर्तनास नवकल्पनी म्हणतात. नवकल्पनी हा विचलित वर्तनाचा पहिला प्रकार होय. या वर्तन प्रकारात व्यक्ती साध्य आणि साधने यांना सारखे महत्त्व देत नाही. तर फक्त सांस्कृतिक साध्याला विशेष महत्त्व देते आणि साधनांना मात्र दुय्यम लेखले जाते. उदा :- पास होणे हे साध्य आहे परंतु हे साध्य प्राप्त करण्यासाठी अभ्यास या साधनास दुय्यम लेखून कॉपी किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केला जातो. तेव्हा व्यक्तिकडून विचलन घडून येते. अशा प्रकारचे विचलनात्मक वर्तन म्हणजे नवकल्पनी होय.

③ कर्मकांड :- या वर्तनप्रकारात व्यक्ती सांस्कृतिक साध्यापेक्षा संस्थागत साधनांना विशेष महत्त्व देतात. येथे सांस्कृतिक साध्याकडे दुर्लक्ष केले जाते आणि साधने हीच [illegible] मानली जातात. अशा वर्तनास मर्टनने कर्मकांड किंवा कर्मकांडवादी वर्तन म्हटले आहे. ज्या समाजात आर्थिक यशाला विशेष महत्त्व दिले जाते त्या समाजात कर्मकांड हा प्रकार आढळतो. मध्यम आणि कनिष्ठ वर्गातील बहुतांश लोक अशा प्रकारचे वर्तन करतात असे मर्टनने प्रतिपादन केले आहे. जेव्हा लोक आर्थिक संघर्षातून यश प्राप्त करू शकत नाहीत तेव्हा आपल्या महत्त्वाकांक्षेची पातळी कमी करतात. कर्मकांड हा विचलित वर्तनाचा दुसरा प्रकार होय.

④ **अपगमन** :- अपगमन हा विचलित वर्तनाचा तिसरा प्रकार होय. समाजातील सांस्कृतिक साध्ये आणि संस्थात्मक साधने यांच्याशी व्यक्ती प्रतिमुख असते. साध्ये प्राप्त करण्याच्या दृष्टीने संस्थात्मक साधनांचा अवलंब केला पाहिजे याची त्यांना जाणीव असते. परंतु त्या साधनांद्वारे आपण साध्ये प्राप्त करू शकत नाही. या जाणिवेने व्यक्ती सांस्कृतिक साध्ये आणि संस्थात्मक साधने या दोहोंना महत्त्व न देता, प्रचलित राहण्याच्या [illegible] पलायनवादी भूमिका स्वीकारते. अशा वर्तनास अपगमन असे [illegible] दुहेरी अपयश असते. मर्टनच्या मते, या वर्तन प्रकारात सामान्यतः 'अशा व्यक्तींचा समावेश करता येईल की, ज्या समाजव्यवस्थेत अपकार्यात्मक आहे. उदा. मद्यपान करणाऱ्या व्यक्ती, भावारा, भटक्या [illegible] व्यक्तींनी सांस्कृतिक साध्ये आणि संस्थात्मक साधने आत्मसात केलेली असतात परंतु उपलब्ध साधनांमुळे त्यांना यश मेळत नाही तेव्हा व्यक्ती पलायनाची भूमिका स्विकारतात.

पेज नं.(15) B.A.I

⑤ **बंडखोरी किंवा विद्रोह** :- बंडखोरी किंवा विद्रोह हा विचलनात्मक वर्तनाचा चौथा प्रकार होय. यामध्ये व्यक्तीला सांस्कृतिक साध्ये आणि संस्थात्मक साधने ही मंजूर नसतात. त्यामुळे व्यक्ती साध्ये आणि साधनांना महत्त्व देत नाही. [illegible] विरुद्ध विद्रोह करतो अशा वर्तनास बंडखोरीचे वर्तन असे म्हणतात. बंडखोरीचे वर्तन हे विचलनात्मक असले तरी समाजात योग्य बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने खूप अतिशय महत्त्वाचे असते. म. ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आगरकर, राजा राममोहन रॉय, मार्टिन ल्यूथर किंग यांचे वर्तन हे बंडखोरीचे होते.

अशाप्रकारे मर्टन यांनी व्यक्तिगत अनुकूलनाच्या पाच प्रकारांचे विश्लेषण केले. मर्टनच्या मते, 'सांस्कृतिक साध्ये आणि संस्थात्मक साधने यातील संघर्ष हा प्रामाणिक स्वरूपाची प्रमाणकशून्यता उत्पन्न करते. प्रमाणकशून्यता ही व्यक्तीची मनस्थिती असते' हेच मर्टन यांनी या सिद्धांताद्वारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

## सामाजिक विचलनाची कारणे किंवा स्त्रोत (घटक)

① **दोषपूर्ण सामाजीकरण** :- जन्मत: व्यक्तीमध्ये सामाजिक प्रमाणकांचे पालन करण्याची वृत्ती नसते. तर सामाजीकरणाद्वारे व्यक्तींना सामाजिक प्रमाणकांचा परिचय करून दिला जातो. एवढेच नव्हे तर प्रमाणकांचे आंतरीकरण करून प्रमाणकाभिमुख वर्तन करण्याचे शिक्षण हे सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून दिले जाते. परंतु व्यक्तीचे सामाजीकरण जर योग्य पद्धतीने झालेले नसेल तर प्रमाणकांचे आंतरीकरण व्यवस्थित होणार नाही. तसेच व्यक्ती प्रमाणकानुरूप वर्तन देखील करणार नाही.

पारसन्स यांनी विचलीत वर्तनाच्या निर्मितीबाबत असे प्रतिपादन केले की, सामाजीकरणाची माध्यमे ही अनेकदा सुप्त किंवा व्यक्त पातळीवर प्रकटपणे विचलित वर्तनाचा स्वीकार करतात. या व्याख्येवरून असे लक्षात येते की अप्रकटरीत्या आणि अप्रत्यक्षपणे त्या वर्तनाचे समर्थन करतात.' यावरून हे स्पष्ट होते की व्यक्तीचे सामाजीकरण योग्य रीतीने झाल्यास, ती अनुरूपतात्मक वर्तन करते. परंतु सामाजीकरण जर दोषपूर्ण असेल तर व्यक्ती विचलनात्मक वर्तन करण्यास मागेपुढे पाहत नाही. म्हणून दोषपूर्ण सामाजीकरण हे विचलीत वर्तनाचे एक प्रमुख कारण आहे.

② **निष्प्रभावी मान्यता** :- प्रत्येक समाजात अनुरूपतात्मक वर्तन करणाऱ्यांना पुरस्कार आणि विचलनात्मक वर्तन करणाऱ्यांना शिक्षा देण्याची व्यवस्था आहे. पुरस्कार आणि शिक्षा देण्याची व्यवस्थाही किती प्रभावी आहे यावर सुद्धा अनुपालन आणि विचलनाचे प्रमाण अवलंबून असते. व्यक्तीने प्रमाणकांचा भंग केल्यास अशा विचलीत वर्तनाबद्दल त्यास शिक्षा मिळणे आवश्यक आहे. जर त्यास शिक्षा झाली नाही तर प्रमाणकांचा भंग करण्याची प्रवृत्ती वाढते. तसेच इतर लोकांवर देखील त्याचा अनिष्ट परिणाम होतो. म्हणून समाजातील दंड आणि पुरस्कार व्यवस्था जर प्रभावी असेल तर समाजात अनुपालन घडून येईल. याउलट ही व्यवस्था निष्प्रभावी असेल तर व्यक्ती विचलित वर्तन करण्यास प्रवृत्त होतात.

③ **कमकुवत अंमलबजावणी** :- समाजातील दंड आणि पुरस्कार व्यवस्था ही प्रभावी असली तरी त्याची अंमलबजावणी कशी केली जाते यावर देखील विचलन निर्भर असते. जर काही कारणामुळे प्रमाणकांची अंमलबजावणी ही नियमितपणे होत नसेल तर त्यामुळे प्रमाणकांचे महत्त्व कमी होते. प्रमाणकानुसार वागले नाही तरी कारवाई होत नाही असा लोकांचा समज होतो. प्रमाणकांचा भंग करण्यास ते मागे-पुढे पाहत नाही. प्रमाणकांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची कमतरता असते त्यांच्यावर असणारा अतिभार असतो इत्यादी कारणे कमकुवत अंमलबजावणीस जबाबदार आहेत.

(९) <u>सामाजिक नियंत्रणकर्त्यांची द्विधा मनःस्थिती</u> :- सामाजिक नियंत्रणकर्त्यांची वृत्ती कोणत्या प्रकारची आहे यावर सामाजिक नियंत्रणाचे यश अवलंबून असते. विशेषतः सामाजीकरणामध्ये नियंत्रण ठेवणाऱ्या व्यक्ती या द्विधा मनःस्थितीत असतील तर मुलाने कोणत्या प्रमाणकाचे कशाप्रकारे अंगीकरण करावे यासंबंधीचे त्याला योग्य मार्गदर्शन होणार नाही म्हणून नियंत्रणकर्त्यांच्या द्विधा मनःस्थितीमुळे विचलनास प्रोत्साहन मिळते. विचलित वर्तन करणाऱ्या व्यक्ती नियंत्रणकर्त्यांच्या प्रमाणकांचे पालन करणे अशक्य आहे. प्रमाणकांचे उल्लंघन केल्याशिवाय त्यांना पर्याय नाही. असे सांगून नियंत्रणकर्त्यांची द्विधा मनःस्थिती सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करतात. [illegible] नियंत्रणकर्ता स्वतः द्विधा मनःस्थितीत असेल तर तो विचलित वर्तन करणाऱ्या व्यक्तीच्या शोषणास होकार देतो. आई-वडील, शिक्षक, मालक, अधिकारी या सारख्या नियंत्रणाचे माध्यम असणाऱ्या व्यक्तींमध्ये सुद्धा अशा विचलनात्मक प्रवृत्ती असण्याची शक्यता असते. नियंत्रणकर्त्यांच्या द्विधा मनःस्थितीमुळे देखील विचलनास प्रोत्साहन मिळते.

(१०) <u>विचलित समूहाप्रती भावनात्मक निष्ठा</u> :- समाज व्यक्ती ही गुन्हेगारांची टोळी, प्रतिस्पर्धी करणाऱ्यांची टोळी इत्यादी विचलित समूहाची सदस्य असेल तर त्या व्यक्तींची आपल्या समूहाविषयी भावनात्मक निष्ठा असते. अशा विचलित समूहाचे सदस्य एकमेकांना मदत करतात. अशा समूहातील लोकांचा एक-दुसऱ्यावर विश्वास असतो. समजा एखाद्या सदस्यांना आपल्या समूहाचे कार्य योग्य वाटत नसेल, तरी तो त्या समूहाला सोडून जाऊ शकत नाही त्यांचे परस्पर संबंध हे भावनात्मक असतात. त्यामुळे अशा विचलित समूहाप्रती भावनात्मक निष्ठेमुळे त्या समूहातील सदस्य विचलनात्मक वर्तन सतत करीत असतात.

(११) <u>उपसंस्कृतीद्वारा विचलनाचे समर्थन</u> :- समाजात समूह आणि उपसमूहांचा अंतर्भाव असतो. असे काही समूह असतात की, ज्या समूहाच्या प्रमाणकांना अनुरूप असणारे वर्तन हे समाजातील व्यापक प्रमाणकांच्या संदर्भात विचलनात्मक वर्तन असते. अशा समूहांची एक वेगळीच 'उपसंस्कृती' असते आणि ही उपसंस्कृती सामान्य समाज पातळीवरील संस्कृतीशी अनेक गोष्टींबाबत विसंगत असते. यावरून असे लक्षात येते की, उपसंस्कृतीमधील प्रमाणकानुसार केलेले वर्तन हे व्यापक सांस्कृतिक प्रमाणकांशी विसंगत असते.

## <u>विचलित वर्तन आणि सामाजिक नियंत्रण</u> (17)

⇒ अधिकांश सामाजिक नियंत्रण इतक्या कडी प्रमाणात ठेवले जाते की, लोक त्याकडे दुर्लक्ष करतात. आणि त्यामुळे लोक प्रमाणकानुसार वर्तन न करता विचलन करतात. <u>पारसन्स</u> यांनी सामाजिक नियंत्रणाच्या संदर्भात केलेले विश्लेषण अतिशय महत्त्वाचे आहे. <u>पारसन्स</u> म्हणतात की, 'विचलनात्मक प्रवृत्तींचे एक जननापूर्वीच ते नष्ट केले पाहिजे.' त्यामुळे विचलनात्मक वर्तन घडणार नाही.

⇒ <u>पारसन्स</u> यांनी व्यक्तीस प्रमाणकानुसार वर्तन शिकविण्याच्या आणि वर्तन नियंत्रित करण्याच्या दोन यंत्रणा असल्याचे स्पष्ट केले आहे. या दोन यंत्रणा पुढील प्रमाणे आहेत.

(१) व्यक्तीचे सामाजीकरण करणाऱ्या यंत्रणा

(२) व्यक्तीच्या विचलित वर्तनाला नियंत्रित करणाऱ्या यंत्रणा

⇒ या दोन यंत्रणांपैकी पहिली यंत्रणा सामाजीकरणाशी संबंधित आहे. सामाजीकरणाचे स्वरूप प्रतिबंधात्मक असते. कारण लहानपणापासूनच प्रमाणकानुसार वर्तन करण्यास शिकविले जाते. त्यामुळे व्यक्ती प्रमाणकानुसार वर्तन करते आणि स्वतः चे आपले वर्तन नियंत्रित ठेवते. तर दुसरी यंत्रणा असलेल्या समाजनियंत्रणाचे स्वरूप उपचारात्मक असते. जर कुणी प्रमाणकानुसार वर्तन केले नाही [illegible] प्रमाणकांचा भंग केला तर, सामाजिक नियमांच्या आधारे त्यांचे वर्तन नियंत्रित केले जाते.

⇒ विचलनात्मक वर्तनाच्या संदर्भात सामान्यपणे असे म्हटले जाते की, विचलनात्मक वर्तन हे कोणत्या तरी प्रकारच्या तणावाची एक प्रतिक्रिया आहे. आत्मंदर्भात अनेक उदाहरणे देता येतील. भूमिका विरोध हा देखील एक प्रकारचा तणाव आहे. अशा प्रकारच्या शोषणास कारणे सांगता येतील, जी नीट कळू शकत नाही; त्यामुळे त्यांच्यात तणाव निर्माण होतो. जर विचलनात्मक वर्तन करणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनाला कारणे शोधायच्या असतील तर व्यक्तीच्या तणावाची कारणे आणि त्याविषयी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया लक्षात घ्याव्या लागतात.

⇒ पारसन्स यांनी तणावाच्या प्रती चार प्रतिक्रिया स्पष्ट केल्या आहेत. त्यामध्ये एक सामान्य लक्षण आहे ते म्हणजे ते [illegible] प्रयत्न करतात. आणि ते अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात की, ज्यामध्ये कोणत्याही प्रकारचा तणाव नसेल किंवा कमीत कमी असेल परिस्थिती अधिक वाईट होण्यापासून थांबवतो. प्रत्येक व्यक्तीमध्ये या चार प्रकारच्या प्रतिक्रिया असतात.

जेव्हा तणावाचे कारण स्पष्टपणे धारणा करते आणि त्यामुळे अंगात त्या सोबत समायोजन केले तर दिवास्वप्न (काल्पनिक) ही एक प्रतिक्रिया होऊ शकते. जेव्हा तणावाचे कारण वाढते की नाही किंवा आपल्या वाईट परिस्थिती होईल, तेव्हा दिवास्वप्नाच्याऐवजी चिंता देखील निर्माण होईल. चिंता ही संवेदनाला त्रास होते, चुकीचे अर्थ लावल्या जाते. आणि आत्मसंरक्षणाच्या आवश्यकतेला फार मोठ्या प्रमाणात वाढविले जाते. तणावाच्या प्रती एक दुसरी प्रचलित प्रतिक्रिया आक्रमकता होय. ही आक्रमकता जास्त नसे, असते. या प्रतिक्रियेत अधिक अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याकरिता अडथळे रोखण्याचे नेते. आक्रमक आचरणाकरिता उत्पन्न होऊ शकते की, ते संबंध आणखी बिघडल्या जाऊन त्यामुळे तणाव निर्माण झाले. सामान्यतः तणावाप्रती चौथी प्रतिक्रिया म्हणजे संरक्षणात्मकता ही आहे. जी अविशिष्ट आहे होते.

⇒ ज्या विद्यार्थी व्यक्तीचा उपचार केला जातो. ती शिक्षणाच्या स्थितीत असते, जी सामाजीकरणात सहभागी असलेल्या व्यक्तीसारखी असते हे लक्षात ठेवले पाहिजे की सामाजीकरणाच्या मध्यस्थाला तणावाच्या परिस्थितीत असलेल्या शिक्षणाच्या व्यक्तीसोबत सहाय्य आहे, ज्याच्या काही विशिष्ट प्रतिक्रिया आहेत. उपचाराच्या सामाजिक नियंत्रणाकरिता सामाजीकरणा प्रमाणेच नियंत्रक मध्यस्थाला पुढील चार नियमांचे पालन करावे लागते. पेज नं. (18) B.A. I

(1) विद्यार्थी व्यक्तीला आवश्यक आधार दिला पाहिजे. शिक्षणाच्या व्यक्तीला हा विश्वास दिला पाहिजे की जरी त्याचे वर्तन पूर्णपणे स्वीकारणीय नाही, तरी देखील त्याला वाळीत टाकले नाही. त्यामुळे शिक्षणाच्या व्यक्तीची चिंता दूर होते.

(2) शिक्षणाच्या व्यक्तीचा विरोध आणि तणावाच्या काही मोठ्या मध्यस्थाला सहन करावा लागतो. तणावात असलेल्या व्यक्तीशी आवश्यकतेपेक्षा अधिक कठोर स्वरूपात व्यवहार करू नये.

(3) विद्यार्थी व्यक्तीवर उपचार करतांना मध्यस्थाने स्वतंत्रता आणि विरोध यात संतुलन ठेवावे. जास्त स्वतंत्रता दिल्यास ती अधिक निरर्थक वर्तन करील आणि त्याच्या वर्तनाला विरोध केल्यास ती तीव्र प्रतिक्रिया देईल.

(4) शिक्षणाची विद्यार्थी व्यक्ती जर योग्य वर्तन करीत असेल तर त्यास योग्य पारितोषिक द्यावे. त्यामुळे योग्य वर्तन करणाऱ्या व्यक्तीला आपण वाटेल आणि त्यास चांगले वर्तन करण्यास प्रोत्साहन मिळेल.

## सामाजीकरण आणि सामाजिक नियंत्रण

सामाजीकरण आणि सामाजिक नियंत्रण या दोन्ही प्रक्रिया वेगवेगळ्या असल्या तरी या दोन्ही प्रक्रिया एकमेकांशी जुळलेल्या आहेत. पारसन्स यांच्या मते, व्यक्तीस प्रमाणकानुसार वर्तन शिकविणाऱ्या व वर्तन नियंत्रित करणाऱ्या दोन यंत्रणा असतात. [अ] व्यक्तीचे सामाजीकरण करणाऱ्या यंत्रणा [ब] व्यक्तीच्या विचलित वर्तनास नियंत्रित करणाऱ्या यंत्रणा.

पहिल्या यंत्रणा म्हणजेच सामाजीकरणाचे स्वरूप प्रतिबंधात्मक असते आणि दुसरी यंत्रणा असलेल्या सामाजिक नियंत्रणाचे स्वरूप हे उपचारात्मक असते. सामाजिक नियंत्रणाचे स्वरूप हे उपचारात्मक असल्यामुळे प्रमाणकांचा भंग करणाऱ्या व्यक्तीमध्ये अनुपालन प्रवृत्ती निर्माण करणे आवश्यक असते कारण त्यामुळे सामाजिक नियंत्रणाचे उद्दिष्ट साध्य होते.

सामाजीकरणाच्या प्रक्रियेवर सामाजिक नियंत्रणाचे यशापयश अवलंबून आहे. सामाजिक नियमनांची व्याख्या करताना फ्रेडर चाइल्ड यांनी म्हटले आहे की, "सामाजिक नियंत्रण प्रक्रिया असा प्रक्रियांचा समुच्चय असतो की, ज्यात समाजातील घटक असलेल्या व्यक्ती आणि समूहाने अपेक्षित वर्तन करण्याची इच्छा केली जाते."

मॅक आयव्हर यांनी, सामाजिक नियंत्रणाचा [illegible] ऐक्य निर्माण करणारी आणि व्यवस्था टिकवून ठेवणारी पद्धत मानले आहे. यावरून हे स्पष्ट होते की, सामाजिक नियंत्रणाच्या प्रक्रियेतून सामाजिक अनुरूपता घडवून आणते, समाजात ऐक्य निर्माण करते आणि समाजाचे सातत्य टिकविणे या गोष्टी अपेक्षित असतात.

सामाजीकरणाद्वारे व्यक्तीला समाजातील प्रमाणके, मूल्ये, विश्वास, प्रथा, परंपरा इत्यादींचे शिक्षण दिले जाते. व्यक्तीच्या नव्हे तर समाजातील प्रमाणकांचे आंतरीकरण करून त्यानुसार वर्तन करण्याचे शिक्षण सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून केले जाते. जर मुलगा अयोग्य वर्तन करत असेल तर वडील सामाजिक प्रमाणके, मूल्ये आणि परंपरेनुसार वर्तन करण्याचे शिक्षण देतात. प्रमाणकानुसार व्यक्तीने वर्तन करण्याच्या दृष्टीने सामाजीकरणाची [illegible] केली जाते. जर समाजात असंमत कोणत्या व्यक्तीकडून घडली असेल तर त्याची त्याला जाणीव करून दिली जाते. म्हणजेच सामाजिक प्रमाणके आणि सामाजीकरणाच्या [illegible] अनुसार वर्तन करते. खरे तर सामाजिक नियंत्रणाचे घडे सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून दिले जातात. त्यामुळे समाजातील व्यक्तींच्या वर्तनात अनुरूपता निर्माण होते. समाजातील व्यक्तीमध्ये [illegible] सामाजीकरणातून निर्माण केली जाते. समाजातील व्यक्ती मूल्ये, प्रमाणके, विश्वास, परंपरा, संकेत इत्यादी गोष्टी आत्मसात करते. या गोष्टींचे [illegible] करण्याच्या प्रक्रियेतून आत्मसात करते. या गोष्टी पिढ्यानपिढ्या संक्रमण केल्या जातात त्यामुळे समाजाचे सातत्य टिकविले जाते.

सामाजीकरणाची प्रक्रिया ही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या सामाजिक नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने व्यक्तीची जडण-घडण करीत असते. सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीने सामाजीकरणाची प्रक्रिया ही अत्यंत महत्त्वाची आहे.

## सामाजिक नियंत्रणाची संकल्पना

सामाजिक नियंत्रणाबाबतचा विचार हा फार प्राचीन आहे. प्रत्येक समाज आपल्या सदस्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांतून सामाजिक नियंत्रणाचे महत्त्व प्राचीन काळातही [illegible]. ऑगस्ट कॉम्टेने 'Positive Philosophy' या ग्रंथात 'सामाजिक नियंत्रण' ही संकल्पना उपयोगात आणली नाही परंतु त्यांनी सामाजिक व्यवस्था टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने [illegible] आणि नैतिकतेची भूमिका स्पष्ट केली. एमिल दुर्खीम यांनी सामाजिक [illegible] करीता संकेत, मूल्ये, विश्वास आणि धर्माचे महत्त्व स्पष्ट केले. लेस्टर वार्ड यांनी 1883 मध्ये लिहिलेल्या ['Dynamic Sociology'] या ग्रंथात या संकल्पनेचे वर्णन केले आहे.

मानवी समाजात नियंत्रणाचे महत्त्व हे प्राचीन काळापासून आहे. 'सामाजिक नियंत्रण' या संकल्पनेचा सर्वात प्रथम उपयोग स्मॉल व विन्सेंट यांनी 1894 मध्ये 'Introduction to the Study of Society' या ग्रंथात केला. त्यांनी या ग्रंथात स्पष्ट केले की, व्यक्तीवरील लोकमताची प्रतिक्रिया ही सामाजिक नियंत्रणास अधिक नाजूक आणि कठीण कार्य बनविते? सामाजिक नियंत्रणाच्या संदर्भात सविस्तर अध्ययन करण्याचे श्रेय एडवर्ड रॉस यांना जाते. रॉस यांनी 1901 मध्ये 'Social Control' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथात त्यांनी सामाजिक नियंत्रणाच्या संकल्पनेचे सविस्तर विवेचन केले. सहानुभूती, सामाजिकता, न्यायाची भावना या सामाजिक वृत्ती आणि

ज्या साधनाद्वारे समूह व्यक्तींच्या व्यवहारांवर लोकरूढी, लोकनीतीचे पालन करण्याच्या दृष्टीने दबाव टाकला जातो. या ओळखीवर रॉस यांनी विशेष भर दिला आहे. [illegible] आपल्या सदस्यांना ज्या साधनाद्वारा नियंत्रित करतो अशा रूप साधनांचा उल्लेख रॉस यांनी केला आहे. चार्ल्स कूले यांनी 'Human Nature and the Social order' (1902) या ग्रंथात व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर समूहाच्या दबावाचा प्रभाव आणि त्यांच्या व्यवहारांना लक्षात घेण्याच्या दृष्टीने व्यक्तींच्या जीवन इतिहासाचे अध्ययन करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. विलीयम सम्नर, हेमले, मर्टन आणि पारसन्स यांनी सुद्धा सामाजिक नियंत्रणाचा विविध दृष्टीकोणातून अभ्यास केला.

कोणत्याही वस्तूच्या असीमित स्वातंत्र्यावर प्रतिबंध लावणे किंवा त्याच्या कार्य आणि व्यवहारांना नियमित करणे म्हणजे नियंत्रण होय. सुरुवातीच्या काळात सामाजिक नियंत्रणाचा अर्थ केवळ [illegible] समूहाद्वारे आपल्या समूहाचे रक्षण करणे आणि आदेशाचे पालन करणे इतकाच मर्यादित होता परंतु आधुनिक काळात सामाजिक नियंत्रणाचा व्यापक अर्थ लक्षात घेतला जातो. समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून सामाजिक नियंत्रणाची संकल्पना अधिक [illegible] दृष्टीकोणातून [illegible] महत्त्वाच्या आहेत. B.A.I

"व्याख्या"

(1) फेअर चाइल्ड :- "ज्या प्रक्रियामुळे समाज किंवा समाजातील कोणताही समूह आपल्या घटकांकडून, मग ते घटक समूह असोत किंवा व्यक्ती असोत, आपल्या अपेक्षांना अनुकूल असे वर्तन घडवून आणतो. त्या प्रक्रियांचा समुच्चय म्हणजे सामाजिक नियंत्रण होय."

(2) किम्बाल यंग :- "निर्धारित किंवा अपेक्षित नियम अथवा क्रियांना कार्यान्वित करण्यासाठी ज्या प्रतिकात्मक साधनांच्या भौतिक बळाचा उपयोग करण्यात येतो, त्या प्रक्रियेला सामाजिक नियंत्रण असे म्हणतात."

(3) एडवर्ड रॉस :- "सामाजिक नियंत्रण म्हणजे असे साधने की, ज्यांच्या माध्यमातून समाज आपल्या सभासदांना स्वीकृत वर्तन प्रतिमानांचे अनुसरण करण्यास शिकवितो."

(4) मॅकआयव्हर आणि पेज :- "सामाजिक नियंत्रण म्हणजे समाज व्यवस्था निर्माण करणारी आणि व्यवस्था टिकवून ठेवणारी पद्धती होय."

(5) ऑगबर्न आणि निमकॉफ :- "ज्या प्रक्रियेत समाजाद्वारा दबाव प्रति[illegible] आणि अपेक्षित नियमानुरूप वर्तन [illegible] माणूस कार्यान्वित करून व्यवस्था [illegible] ठेवते त्या प्रक्रियेस सामाजिक नियंत्रण म्हणतात."

## सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता

(1) व्यक्तिगत व्यवहारांना नियमित करणे :- व्यक्तीगत व्यवहारांना नियंत्रित करण्याच्या संदर्भात सामाजिक नियंत्रणाची विशेष आवश्यकता आहे. व्यक्ती आणि समूहामध्ये शारीरीक स्वभाव, अभिरुची, प्रथा, धर्म, विश्वास इत्यादीमध्ये भिन्नता आढळून येते. या भिन्नतेमुळे व्यक्तींच्या व्यवहारामध्ये देखील भिन्नता असते त्यामुळे व्यक्ती-व्यक्तीमध्ये, व्यक्ती आणि समूहामध्ये, समूह-समूहामध्ये सतत संघर्षाची शक्यता ही अधिक वाढली आहे. जर समाजात नियंत्रण नसेल तर लोकांच्या [illegible] हितांचे रक्षण करणे शक्य नाही म्हणून व्यक्तीगत व्यवहारांना नियंत्रित करण्यासाठी सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता आहे.

(2) सामाजिक एकता निर्माण करणे :- समाजात एकता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने सामाजिक नियंत्रणाची विशेष आवश्यकता आहे. सामाजिक नियंत्रणामुळे व्यक्ती समाजातील प्रमाणके आणि मूल्यानुरूप वर्तन करतात. आणि त्यामुळे समाजात सामाजिक एकता निर्माण करणे शक्य होते.

(3) सामाजिक स्वीकृती प्रदान करणे :- विविध प्रकारच्या व्यवहारांना आणि आचरणांना सामाजिक स्वीकृती प्रदान करण्याच्या दृष्टीने सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता आहे. प्रत्येक समाजात विविध प्रकारच्या प्रथा, परंपरा, लोकरूढी इत्यादी असतात. समाजाच्या सदस्यांना या गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे. सामाजिक नियंत्रणाद्वारे या गोष्टींचे पालन करण्यास भाग पाडले जाते.

④ दोषपूर्ण सांस्कृतिक समायोजन टाळविणे :- समाज हा परिवर्तनशील आहे. नव-नवीन शोध तसेच नवीन विचारसरणीमुळे समाजात परिवर्तन होत असते. समाजात झालेल्या परिवर्तनानुसार व्यक्तींना आपल्या व्यवहाराचे समायोजन करावे लागते. म्हणून समाजात काही व्यक्ती प्रगतिशील विचारांच्या असतात, तर काही व्यक्ती परंपरावादी असतात. नवीन परिस्थितीशी समायोजन करणे सर्वच व्यक्तींना शक्य होत नाही. त्यामुळे समाजात दोषपूर्ण सांस्कृतिक समायोजन निर्माण होते. व्यक्तीचे दोषपूर्ण [illegible] सांस्कृतिक समायोजन टाळण्याकरीता सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता असते. (20) B.A.I

⑤ सामाजिक शिस्त :- समाज जीवनात शिस्तीची गरज असते. जर व्यक्ती शिस्तीने वागत नसतील तर त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. सामाजिक नियंत्रणामुळे व्यक्तीला शिस्त लागते आणि व्यक्तीकडून अपेक्षित वर्तन घडून येते.

⑥ सहकार्याची जाणीव :- सामाजिक नियंत्रणामुळे व्यक्ती-व्यक्तींमध्ये सहकार्याची भावना निर्माण होते. व्यक्तींवर नियंत्रण नसेल तर स्वतःच्या स्वार्थासाठी [illegible] व्यक्ती समाजमान्य नसलेल्या मार्गाचा अवलंब करण्याची शक्यता असते. नियंत्रणामुळे व्यक्तीमध्ये सहकार्याची जाणीव निर्माण केली जाते.

⑦ कर्तव्याची जाणीव निर्माण करणे :- समाजाच्या विविध गरजांची पूर्ती करण्यासाठी व्यक्तींना अनेक प्रकारची कार्ये करावी लागतात. व्यक्तींना आपल्या दर्जानुसार कार्य करण्यास प्रवृत्त करणे [illegible] नियंत्रणाचा उद्देश असतो. त्यामुळे व्यक्तीमध्ये सामाजिक कर्तव्याची जाणीव निर्माण होते.

## सामाजिक नियंत्रणाचे प्रकार

① सकारात्मक आणि नकारात्मक नियंत्रण :- किम्बाल यंग यांनी सामाजिक नियंत्रणाचे सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन प्रकार पाडले आहेत. समाजातील लोकांनी समाजमान्यतेनुसार वर्तन केले पाहिजे अशी [illegible] अपेक्षा असते. लोकांनी समाजमान्य असे वर्तन करावे यासाठी प्रोत्साहन मिळावे तसेच वर्तनाचे [illegible] आदर्श [illegible] उद्देशाने स्तुती, प्रशंसा, सत्कार इत्यादी साधनांचा अवलंब केला जातो. [illegible] सकारात्मक नियंत्रण म्हटले आहे.

लोकांनी प्रमाणांचे उल्लंघन करू नये [illegible] प्रमाणांच्या [illegible] करणाऱ्या व्यक्तींना दंड दिला जातो. या पध्दतीला नकारात्मक नियंत्रण असे म्हणतात. नकारात्मक नियंत्रणामध्ये निंदा, उपहास, बहिष्कार, शारीरिक दंड इत्यादी साधनांचा अवलंब केला जातो.

② प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नियंत्रण :- प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नियंत्रण असे दोन प्रकार कार्ल मॅनहिम यांनी सांगितले आहेत. प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्यासाठी समूहाच्या आकार लहान, मर्यादित [illegible] आणि घनिष्ठ संबंध असणे आवश्यक असते. प्राथमिक समूहात प्रत्यक्ष नियंत्रण ठेवले जाते. [illegible] लोक या नियंत्रणाचा स्वीकार [illegible] प्रत्यक्ष नियंत्रण हे स्थायी स्वरूपाचे असते. [illegible] अप्रत्यक्ष नियंत्रण हे दुय्यम किंवा विशाल समूह आणि औपचारिक संघटनांमध्ये [illegible] प्रत्यक्ष संबंध ठेवणे शक्य नसते. त्यामुळे अप्रत्यक्ष [illegible], औपचारिक संबंध इत्यादी [illegible] नियंत्रण [illegible] अप्रत्यक्ष नियंत्रणात [illegible] उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस शिक्षा केली जाते.

③ चेतन आणि अचेतन नियंत्रण :- चार्ल्स कुले आणि [illegible] यांनी सामाजिक नियंत्रणाचे चेतन आणि अचेतन नियंत्रण असे दोन प्रकार सांगितले आहेत. जे नियंत्रण जाणीवपूर्वक केले जाते त्यास चेतन नियंत्रण असे म्हणतात. चेतन नियंत्रणामध्ये नियंत्रक आणि नियंत्रित या दोहोंना नियंत्रणाची जाणीव असते. कायद्याद्वारे [illegible] नियंत्रण हे [illegible] चेतन नियंत्रण हे चेतन असते. त्याचप्रमाणे औपचारिक संघटना मधील नियंत्रण हे [illegible] [illegible] अचेतन नियंत्रण हे सहजपणे [illegible] नियंत्रित या दोहोंना नियंत्रणाची जाणीव नसते. विश्वास आणि [illegible] होणारे नियंत्रण हे अचेतन नियंत्रण होय.

④ औपचारिक नियंत्रण :- आधुनिक काळातील समाजरचना ही गुंतागुंतीची आहे. त्यामुळे औपचारिक नियंत्रणाची विशेष आवश्यकता आहे. राज्यसंस्थेने कायदा आणि [illegible] तसेच धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि प्रशासन विषयक उपाय [illegible] केलेले नियंत्रण म्हणजेच औपचारिक नियंत्रण होय. [illegible] औपचारिक नियंत्रण हे जाणीवपूर्वक केले जाते. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस शिक्षा केली जाते. त्याकरिता पोलीस, न्यायालये, कारागृह इत्यादी संस्था असतात.

## औपचारिक नियंत्रणाची वैशिष्टे :-

① जाणीवपूर्वक नियंत्रण :- औपचारिक नियंत्रण हे जाणीवपूर्वक केले जाते. [illegible] वर्तन करणे अपेक्षित आहे हे [illegible] जाते. त्यामुळे कोणते वर्तन हे नियमानुसार आहे आणि कोणते वर्तन हे नियमांच्या विरुद्ध आहे [illegible] लोकांना असते.

② अंमलबजावणीसाठी यंत्रणा :- औपचारिक नियंत्रणाची अंमलबजावणी करण्यासाठी विशिष्ट यंत्रणा निर्माण केली जाते. संबंधित व्यक्तीने औपचारिक नियंत्रणाचे पालन केले पाहिजे [illegible] संबंधितांद्वारे [illegible] औपचारिक नियंत्रणाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस शिक्षा केली जाते.

③ तात्पुरते नियंत्रण :- औपचारिक नियंत्रण हे तात्पुरत्या स्वरूपाचे असते. आवश्यकतेनुसार [illegible] नियम आणि कायदे तयार केले जातात. औपचारिक नियंत्रण ठेवणारे कायदे हे स्थिर स्वरूपाचे नसतात. त्यात बदल होतो. म्हणून औपचारिक नियंत्रण हे तात्पुरते असते.

④ संमिश्र समाजावर नियंत्रण :- आधुनिक समाजात विविधता वाढली औद्योगिकरण, श्रमविभाजन, प्रगत तंत्रज्ञान, विशेषीकरण इत्यादी गोष्टींमुळे वेगवेगळ्या व्यक्तींमध्ये सामाजिक संबंधांचे स्वरूप दुय्यम झाले आहे. समाजामध्ये व्यक्तींच्या वर्तनामध्ये समानता टिकविण्यासाठी औपचारिक नियंत्रणाची आवश्यकता असते.

⑤ व्यक्ती निरपेक्षता किंवा व्यक्ती व्याप्त :- औपचारिक नियंत्रणे [illegible] संस्थांचे स्वरूप व्यक्तिनिरपेक्ष असल्यामुळे व्यक्तिगत भावनांचा विचार केला जात नाही. म्हणून औपचारिक नियंत्रण हे व्यक्तिनिरपेक्ष असते. आधुनिक काळात औपचारिक नियंत्रणाला विशेष महत्त्व आहे. केवळ औपचारिक नियंत्रणाद्वारेच आधुनिक [illegible] अस्तित्व आणि स्थैर्य टिकवून ठेवणे शक्य झाले आहे.

(21) B.A.I

## अनौपचारिक नियंत्रण

* ज्यावेळी व्यक्ती किंवा समूह वर्तनाचे नियंत्रण, प्रथा, परंपरा, संकेत, लोकरूढी, विश्वास या माध्यमातून स्वाभाविकरित्या करण्यात येते तेव्हा त्यास अनौपचारिक नियंत्रण असे म्हणतात. विजातीय समाजापेक्षा सजातीय समाजामध्ये अनौपचारिक नियंत्रण विशेष प्रभावी असते. अनौपचारिक नियंत्रणाची विश्वास, सामाजिक सूचना, विचारधारा, लोकरूढी, लोकाचार, प्रथा, धर्म, कला व साहित्य, लोकमत, उपहास इत्यादी महत्त्वाची साधने आहेत.

## अनौपचारिक नियंत्रणाची वैशिष्ट्ये

① जाणीवपूर्वक नसलेले नियंत्रण :- अनौपचारिक नियंत्रण हे जाणीवपूर्वक अथवा विचारपूर्वक केले जात नाही. समाजाच्या गरजेतून प्रथा, लोकरूढी, लोकाचार, लोकनीती इत्यादी निर्माण होतात. समाजाच्या गरजेनुसार आणि परिस्थितीनुसार त्यात परिवर्तन घडून येते.

② अंमलबजावणीसाठी वेगळी यंत्रणा नाही :- अनौपचारिक नियंत्रणाची अंमलबजावणी करणारी वेगळी यंत्रणा नाही. समाजातील कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, धर्मसंस्था इत्यादींद्वारे अनौपचारिक नियंत्रणाची अंमलबजावणी केली जाते.

③ प्रत्यक्ष नियंत्रण :- अनौपचारिक नियंत्रण हे प्रत्यक्ष स्वरूपाचे असते. व्यक्ती-व्यक्तींमधील घनिष्ठ स्वरूपामुळे व्यक्तींना परस्परांवर नियंत्रण ठेवणे शक्य होते.

④ दूरगामी स्वरूपाचे परिवर्तन :- व्यक्तींच्या वर्तनामध्ये दूरगामी स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणण्याची शक्ती अनौपचारिक नियंत्रणामध्ये आहे. फार अनौपचारिक नियंत्रणाची साधने ही स्थायी स्वरूपाची असतात.

⑤ व्यक्तीसापेक्षता :- व्यक्तिसापेक्षता हे अनौपचारिक नियंत्रणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. प्रथा, परंपरा, लोकरूढी इत्यादींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना सारखी शिक्षा दिली जात नाही, तर उल्लंघन करणारी व्यक्ती आणि परिस्थितीचा विचार करून शिक्षा देण्यात येते.

## सामाजिक नियंत्रणाची साधने

* सामाजिक नियंत्रणाच्या उद्देशांची पूर्ती करण्यासाठी विविध साधनांचा वेगवेगळ्या प्रमाणात उपयोग केला जातो. विशेष स्वरूपाच्या साधनांचा किती प्रमाणात उपयोग करायचा हे त्या समूहाच्या किंवा समाजाच्या धारणेवर अवलंबून असते. उदा. इ. लमर्ट यांनी सामाजिक नियंत्रणाच्या दोन प्रकारच्या साधनांचा उल्लेख केला आहे.

① प्रकट शक्तींचा उपयोग करणारी साधने ② प्रतीकांचा उपयोग करणारी साधने.

① प्रकट शक्तींचा उपयोग करणारी साधने :- प्रकट शक्तींचा उपयोग करणारी साधने ही [illegible] स्वरूपाची असतात. या पद्धतीमध्ये लोकांवर दबाव आणला जातो. अथवा लोक शिक्षेच्या भीतीने प्रमाणानुसार वर्तन करतात. ही साधने निषेधात्मक अथवा नकारात्मक स्वरूपाची असतात. निषिद्ध वर्तनप्रकार लोकांनी करू नये त्यासाठी प्रकट शक्तींचा उपयोग केला जातो. दंड करणे, नुकसान भरपाई, हद्दपार करणे इत्यादी गोष्टींचा अवलंब प्रकट शक्तींच्या साधनांमध्ये केला जातो.

② प्रतीकांचा उपयोग करणारी साधने :- प्रत्येक वेळी प्रकट शक्तींचा उपयोग करणे आवश्यक नसते. बऱ्याचवेळी प्रतीकांचा उपयोग करणाऱ्या साधनांचा अवलंब केला जातो. स्तुती अथवा प्रशंसा करून, त्यांचे मन वळवून, सत्कार करून, शिक्षण देऊन, पुरस्कार देऊन अपेक्षित आणि प्रमाणांनुसार वर्तन करण्याच्या दृष्टीने लोकांना प्रेरित केले जाते. या साधनांना निषेधात्मक किंवा होकारात्मक असे संबोधले जाते.

* प्रत्येक समाजात प्रकाश [illegible] साधनांचा अवलंब करून सामाजिक नियंत्रण ठेवले जाते. आदिवासी समाजात जादूटोणा, आधिभौतिक शक्ती, परंपरा इत्यादी गोष्टींद्वारे सामाजिक नियंत्रण ठेवले जाते. प्रगत समाजात कायदा, वर्तमानपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, पोलीस यंत्रणा इत्यादी गोष्टींचा उपयोग करून सामाजिक नियंत्रण ठेवले जाते. ग्रामीण समाजात पंचायत, परंपरा, लोकरूढी, लोकनीती इत्यादी गोष्टींचा विशेष प्रभाव असतो. [illegible] त्या आधारावर नियंत्रण ठेवले जाते. मडर्ड बैंगल यांनी सामाजिक नियंत्रणाच्या एकूण [illegible] साधनांचा उल्लेख केला आहे. या साधनांमध्ये प्रथा, परंपरा, लोकाचार, धर्म, लोकमत [illegible] निर्देश केला आहे. इ. रॉस यांच्या मते "शिक्षण हे सामाजिक नियंत्रणाचे सर्वात अधिक प्रभावी साधन आहे." [illegible] कुटुंब हे सामाजिक नियंत्रणाचे [illegible] आहे. सामाजिक नियंत्रणाचे प्रथा, लोकाचार, लोकनीती, कायदा, धर्म ही महत्त्वपूर्ण साधने आहेत.

# युनिट क्र.१ समाजशास्त्राचे स्वरुप — B.A. I 1st sem (01)

**समाजशास्त्राचा अर्थ** :- मानव हा मूलत: जिज्ञासू वृत्तीचा आहे. त्यामुळे प्राचीन काळापासून मानवाने विविध विषयांचे व्यवस्थितरीत्या ज्ञान संपादन केल्याचे आढळून येते. आधुनिक काळात वैज्ञानिक अध्ययनाला विशेष महत्व आहे. आज जगात अनेक प्रकारची विज्ञाने आहेत. सर्व विज्ञाने अध्ययन विषयाच्या अनुषंगाने प्रामुख्याने दोन प्रकारात वर्गीकृत करण्यात आली आहेत ① नैसर्गिक किंवा भौतिक विज्ञाने आणि ② सामाजिक विज्ञाने.

* नैसर्गिक किंवा भौतिक विज्ञानाच्या अभ्यासविषय हा नैसर्गिक घटनांशी किंवा भौतिक गोष्टींशी संबंधित असतो. वनस्पतीशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र ही सर्व विज्ञाने नैसर्गिक किंवा भौतिक गोष्टींशी संबंधीत असल्यामुळे या विज्ञानांना नैसर्गिक किंवा भौतिक विज्ञान असे म्हणतात तर समाजाच्या वेगवेगळ्या अंगाचा अभ्यास करणारी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानवशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, इत्यादी विज्ञाने आहेत. म्हणूनच या विज्ञानांना सामाजिक विज्ञान असे संबोधले जाते.

* समाजशास्त्र हे एक आधुनिक विज्ञान आहे. कारण १९ व्या शतकात समाजशास्त्राच्या वस्तुनिष्ठ अध्ययनाला सुरुवात झाली. मानवी समाज हा फार प्राचीन आहे. पूर्व आणि उत्तर पाषाण युगापासूनच मानवी समाजाचे अस्तित्व आहे. सामाजिक घटना, समस्या इत्यादीबाबत मानव त्याही वेळी जागृत होता म्हणून समाजाविषयक्या संदर्भात अनेक विचारवंतानी आपले विचार मांडलेत.

* समाजशास्त्राचा जनक फ्रेंच समाजशास्त्रज्ञ ऑगस्ट कॉम्ट यांनी समाजशास्त्र (Sociology) हा शब्द सर्वप्रथम उपयोगात आणला 'मानवाच्या सहयोगाच्या' अभ्यास करणाऱ्या विज्ञानाला कॉम्ट यांनी Sociology हे नाव दिले. समाजाचे अध्ययन करणारे विज्ञान हे भौतिक विज्ञान असावे या उद्देशाने 'सामाजिक भौतिकी' हे नाव त्यांनी सुरुवातीला दिले होते परंतु सामाजिक घटनांचे अध्ययन करणाऱ्या विज्ञानाला 'सामाजिक भौतिकी' हे नाव देण्याबाबत बरेच प्रश्न निर्माण झाल्यामुळे कॉम्टने 1839 मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'पॉझिटिव्ह फिलॉसॉफी' या ग्रंथाच्या चौथ्या खंडात 'Sociology' या शब्दाचा सर्वप्रथम उल्लेख केला. त्यानंतर समाजाचे अध्ययन करणाऱ्या विज्ञानाला समाजशास्त्र 'Sociology' हे नाव रुढ झाले.

* Sociology ही संज्ञा लॅटीन भाषेतील 'Socious' आणि ग्रीक भाषेतील 'Logos' हे दोन शब्द मिळून बनली आहे. 'सोशियस' म्हणजे सहचर किंवा सवंगडी व 'लोगॉस' म्हणजे विज्ञान किंवा सिद्धांत (Theory) म्हणून 'सोशिओलॉजी' या शब्दाचा अर्थ 'समाजाचे विज्ञान किंवा शास्त्र' असा आहे. याचा अर्थ समाजशास्त्र हे असे विज्ञान आहे की, ज्यामध्ये समाजाच्या संदर्भात अध्ययन केले जाते.

* रॉबर्ट बिरस्टीड यांनी लिहिले आहे की, आमच्या विज्ञानाचे (समाजशास्त्र) नाव हे दोन भाषांचे अवैध रूप आहे. 'जॉन स्टुअर्ट मिल' हे देखील या विज्ञानाला 'Ethology' या नावाने परिचित असायला पाहिजे. या मताचे होते. परंतु इतर विचारवंतांनी मात्र या सूचनेचा स्विकार केला नाही. पुढे हर्बर्ट स्पेन्सर यांनी समाजाच्या क्रमबद्ध अध्ययनाला विकसित केले हे अध्ययन विकसित करतांना त्यांनी 'समाजशास्त्र' या शब्दाला अंतिम आणि स्पष्ट रूपात स्वीकृत केले. 'समाजशास्त्र' या शब्दाचा स्विकार कोणत्या आधारावर केला हे स्पष्ट करतांना हर्बर्ट स्पेन्सर यांनी म्हटले आहे की, 'आमच्या प्रतिकांची सोय आणि अचूकता ही या शब्दाच्या उत्पत्तीबाबत त्या वैधतेपेक्षा अधिक महत्वाची आहे. 'समाजशास्त्र' या शब्दामध्ये सुविधा (सोय) आणि सूचकता या दोन्ही गोष्टी आहेत. 'समाजशास्त्र' या शब्दावरून सहजपणे आपल्या लक्षात येते की, हे विज्ञान आहे आणि त्याचा संबंध समाजाशी आहे. समाजामध्ये कोणा-कोणत्या बाबींचे अध्ययन करावे याबाबत विचारवंतामध्ये मतभेद असू शकतील परंतु समाजशास्त्राचा संबंध हा समाज किंवा सामाजिक जीवनाशी नाही असे कोणीही म्हणू शकत नाही. 'समाजशास्त्र' या नावामध्ये सूचकता आणि सुविधा या दोन्ही गोष्टी आहेत. अशा प्रकारे शाब्दिक दृष्टीकोनातून असा बोध होतो की समाजशास्त्र हे एक असे विज्ञान आहे की, जे समाजाचे क्रमबद्ध आणि संघटित अध्ययन करते.

* समाज हा शब्द मानव समाजाकरीता वापरला आहे, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. पूर्ण विकास मानवामध्येच झालेला आढळतो. इतर कोणत्याही पशुपक्षामध्ये समाजाचा विकास

शकत नाही. मानवाने आपल्या सृजनशक्तितेतून समाजाच्या विकास घडवून आणला आणि प्रत्येक मानवी समाजाने स्वत:ची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती निर्माण केली. त्यामुळे समाजशास्त्रात समाजाचे अध्ययन केले जाते. याच्याच अर्थ, मानवी समाजाचे अध्ययन समाजशास्त्रात केले जाते.

## समाजशास्त्राची व्याख्या

## [Definition of Sociology] (02)

① मॅकआयव्हर आणि पेज → "सामाजिक संबंध हाच समाजशास्त्राचा अभ्यास विषय आहे."

② ऑगबर्न आणि निमकॉफ → "सामाजिक जीवनाच्या वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणाऱ्या विज्ञानास समाजशास्त्र असे म्हणतात."

③ लेस्टर वॉर्ड → "समाजशास्त्र हे समाजाचे विज्ञान आहे."

④ गिडिंग्ज → "समाजशास्त्रात संपूर्ण समाजाचे व्यवस्थितरीत्या वर्णन आणि स्पष्टीकरण करण्यात येते."

⑤ हेन्री फेअरचाईल्ड → "समाजशास्त्र म्हणजे मानव व मानवी पर्यावरण यांच्या परस्पर संबंधाच्या अभ्यास होय."

⑥ हॅरी जॉन्सन → "समाजशास्त्र हे सामाजिक समुहासंबंधीचे शास्त्र आहे."

⑦ मॉरीस गिन्सबर्ग → "मुख्यमानाने मानवाच्या आंतरक्रिया व आंतरसंबंध आणि त्यांची कारणे व परिणाम यांचा अभ्यास करणे म्हणजे समाजशास्त्र होय."

⑧ मेरिल व एल्डरेज → "समाजशास्त्र हे मानवांच्या समाजाचे विज्ञान आहे."

⑨ मॅक्स वेबर → "समाजशास्त्र हे एक असे विज्ञान आहे की, ज्यात सामाजिक क्रियेच्या निर्वचनात्मक आकलनाचा प्रयत्न करण्यात येतो."

⑩ मार्शल जोन्स → "समाजशास्त्रात मानवाच्या अनेक मानवांशी असलेला संबंध अभ्यासण्यात येतो."

## समाजशास्त्राच्या वैज्ञानिक स्वरुपाची प्रमुख वैशिष्ट्ये

⇒ समाजशास्त्राच्या वैज्ञानिक स्वरुपाबाबत रॉबर्ट बिरस्टीड यांनी 'The Social Order' [1957] या ग्रंथात समाजशास्त्राच्या स्वरुपाची खालील वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

① समाजशास्त्र हे सामाजिक विज्ञान आहे; मात्र ते नैसर्गिक विज्ञान नाही.
② समाजशास्त्र शुद्ध किंवा सैद्धांतिक विज्ञान आहे; पण ते व्यावहारिक विज्ञान नाही.
③ समाजशास्त्र अमूर्त विज्ञान आहे.
④ समाजशास्त्र हे सामान्यीकरण विज्ञान आहे; ते विशेषीकरण विज्ञान नाही.
⑤ समाजशास्त्र हे एक निरपेक्ष, प्रत्यक्ष वा वास्तविक विज्ञान आहे; हे एक आदर्शात्मक विज्ञान नाही.
⑥ समाजशास्त्र हे एक तार्किक आणि अनुभवजन्य विज्ञान आहे.
⑦ समाजशास्त्र हे एक सामान्यविज्ञान आहे; ते विशेष असे विज्ञान नाही.

* रॉबर्ट बिरस्टीड यांच्या प्रमाणेच, हॅरी जॉन्सन यांनी देखील समाजशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करणारी वैशिष्ट्ये प्रतिपादन केली आहेत.

① समाजशास्त्र अनुभव प्रामाण्यवादी विज्ञान आहे.
② समाजशास्त्र सैद्धांतिक विज्ञान आहे.
③ समाजशास्त्र हे संचयी विज्ञान आहे.
④ समाजशास्त्र हे नैतिकदृष्ट्या तटस्थ विज्ञान आहे.

* ① **समाजशास्त्र अनुभवप्रमाणवादी विज्ञान आहे** ⇒ समाजशास्त्र ज्ञान प्राप्त करीत असतांना अनुभव प्रामाण्याला विशेष महत्व दिले जाते. केवळ कल्पनेच्या आधारावर ज्ञानाला समाजशास्त्रात कोणतेच महत्व नाही. सामाजिक क्रिया या संदर्भात केवळ तर्क आणि अंदाजाच्या आधारावर माहिती संकलीत केली जात नाही. प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारावर माहिती संपादित केली जाते जर हे ज्ञान प्रमाणित आणि अनुभव सिद्ध नसेल तर अशा ज्ञानाला समाजशास्त्रात कोणत्याच प्रकारचे महत्व नसते.

* सामाजिक संबंध, सामाजिक समूह, सामाजिक क्रिया इत्यादी बाबत निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली, व्यक्ती अध्ययन आणि इतर पद्धतीचा अवलंब करून वस्तुनिष्ठ माहितीचे (तथ्यांचे) संकलन केले जाते. म्हणून समाजशास्त्र हे अनुभवप्रमाणवादी विज्ञान आहे.

② **समाजशास्त्र सैद्धांतिक विज्ञान आहे** ⇒ विज्ञानात अनुभवाधिष्ठीत ज्ञानाला साररूप देण्याचा प्रयत्न केला जातो. अनुभवाधिष्ठीत निरीक्षणावरून ज्या गोष्टीचे आकलन झाले असेल, ती गोष्ट सारांश रुपाने मांडली जाते. समाजशास्त्रात देखील सामाजिक घटनांबाबतचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन केल्यानंतर ज्ञान होणाऱ्या तथ्यांना सारांश रुपाने मांडले जाते.

अध्ययनावरून सारांश रूपात जे अमूर्त सिद्धांत मांडले जातात. त्याला सिद्धांत असे म्हणतात (पण नाहीत)
* मॅक्सवेबर यांनी भांडवलशाही आणि प्रोटेस्टंट धर्माच्या वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करून प्रोटेस्टंट धर्माची आचार प्रणाली ही भांडवलशाहीच्या विकासाकरिता कारणीभूत ठरली आहे असा सिद्धांत मांडला आहे. तर एमिल दुर्खिम यांनी आत्महत्येसंबंधीचे अध्ययन करून आपला सिद्धांत मांडला आहे. त्यामुळे इतर विज्ञानाप्रमाणेच समाजशास्त्र हे देखील एक सैद्धांतिक विज्ञान आहे. थोडक्यात समाजशास्त्रात सामाजिक घटनांबाबतचे अनुभवजन्य तथ्यांचे संकलन करून सिद्धांताची मांडणी केली जाते, म्हणून समाजशास्त्र हे सैद्धांतिक विज्ञान आहे.

③ **समाजशास्त्र संचयी विज्ञान आहे** :→ प्रत्येक विज्ञानात ज्ञानाची प्रक्रिया सतत सुरू असते. समाजशास्त्र हे एक विज्ञान असल्यामुळे या विज्ञानात देखील ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू असते. वेगवेगळ्या विषयांच्या संदर्भात वैज्ञानिक अध्ययन करून नव-नवीन ज्ञानाची भर समाजशास्त्रात टाकली जाते. समाजशास्त्रात अनेक सिद्धांत मांडण्यात आले आहेत परंतु कोणताही सिद्धांत हा अंतिम सत्य नसतो. त्या सिद्धांताचे पुनर्परिक्षण केले जाते. पुनर्परिक्षण केल्यानंतर अस्तित्वात असलेले सिद्धांत नवीन ज्ञानाच्या आधारावर कालबाह्य ठरण्याची शक्यता असते. जे नवीन ज्ञान प्राप्त होत असते त्या ज्ञानाचा समन्वय जुन्या ज्ञानाशी साधला जातो. त्यामुळे प्रमाणित आणि अनुभवजन्य ज्ञान हे समृद्ध होत असते. त्यामुळे विज्ञानात ज्ञानाचा संचय केला जातो. थोडक्यात जुन्या ज्ञानाची तपासणी आणि पुनर्मांडणी यामुळे समाजशास्त्रात ज्ञानाचा संचय केला जातो.

④ **समाजशास्त्र हे नैतिक दृष्ट्या तटस्थ विज्ञान आहे** :→ विज्ञानामध्ये कोणताही अध्ययन विषय चांगला किंवा वाईट असा विचार केला जात नाही तर त्या विषयाचे तटस्थ वृत्तीने अध्ययन केले जाते. नैसर्गिक विज्ञानाप्रमाणेच या विज्ञानात ही नैतिक तटस्थता राखली जाते. समाजाच्या दृष्टीने 'वेश्यावृत्ती' वाईट आहे. म्हणून वेश्यावृत्ती 'अध्ययनाचा विषय होऊ शकत नाही' अशा प्रकारचा विचार विज्ञानात केला जात नाही. म्हणूनच समाजशास्त्रज्ञ वेश्यावृत्ती संबंधीचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करतात. मात्र कोणत्याही विषयाचा अभ्यास हा तटस्थपणे केला पाहिजे. त्यात कोणत्याही प्रकारचा पक्षपात करता कामा नये. म्हणून समाजशास्त्र हे नैतिक दृष्ट्या तटस्थ विज्ञान आहे. (03)

⑤ **समाजशास्त्र हे सामाजिक विज्ञान आहे** :→ समाजशास्त्राच्या स्वरूपाबाबत विचार करित असताना हे लक्षात घेतले पाहिजे की समाजशास्त्र हे एक सामाजिक विज्ञान आहे ते नैसर्गिक विज्ञान नाही. वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून सामाजिक घटनांचे अध्ययन केले जाते. हे विज्ञान रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र या विज्ञानापासून वेगळे आहे. ओडम यांनी म्हटले आहे की, 'समाजशास्त्र हे केवळ शास्त्र नाही, तर ते सामाजिक शास्त्र आहे.'
* समाजशास्त्र हे सामाजिक संबंध आणि प्रक्रियांचे विज्ञान आहे. समाजशास्त्राचा अध्ययन विषय हा मुळातच सामाजिक आहे. समाजशास्त्र हे एक सामाजिक विज्ञान आहे. कोणत्याही भौतिक किंवा नैसर्गिक घटनांशी समाजशास्त्राचा प्रत्यक्ष संबंध नाही. सामाजिक आणि गैर-सामाजिक घटनांच्या पारस्परिक संबंधाचे अध्ययन हे प्रामुख्याने सामाजिक दृष्टीकोनातूनच केले जाते. म्हणून समाजशास्त्र हे नैसर्गिक विज्ञान नसून ते एक सामाजिक विज्ञान आहे हे स्पष्ट होते.

⑥ **समाजशास्त्र हे एक अमूर्त विज्ञान आहे** :→ समाजशास्त्र हे समाजाचे विज्ञान आहे. समाज ही एक अमूर्त संकल्पना आहे. या अमूर्त विषयाचे म्हणजेच समाजाचे अध्ययन समाजशास्त्रात केले जाते. व्यक्ती-व्यक्तीमधील सामाजिक संबंध, पारस्परिक क्रिया, सामाजिक घटना इत्यादींचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. उदा :→ पती-पत्नी, आई-मुलगा, वडिल-मुलगा, प्राध्यापक-विद्यार्थी. यांच्यामधील सामाजिक संबंधाचे स्वरूप निरीक्षणावरून आणि त्यांच्या सहाय्याने समजून घ्यावे लागते. म्हणून या अभ्यासविषयाशी संबंधित असणाऱ्या संकल्पना सुद्धा अमूर्त असणे स्वाभाविक आहे.

⑦ **समाजशास्त्र हे एक निरपेक्ष वा प्रत्यक्ष किंवा वास्तविक विज्ञान आहे** :→
समाजशास्त्रात सामाजिक घटनांचे वास्तविक दृष्टीकोनातून अध्ययन केले जाते. सामाजिक घटनांना त्यांच्या वास्तविक रूपात मांडत असतांना समाजशास्त्रज्ञ कोणत्याही प्रकारचा पक्षपात करीत नाही. कोणत्या एका विशिष्ट घटना, व्यक्ती किंवा समूहाचे समर्थन करीत नाही. एका निरपेक्ष किंवा प्रत्यक्षात्मक विज्ञानाच्या रूपात समाजशास्त्र काय आहे? याचे वर्णन व विश्लेषण समाजशास्त्रज्ञ करतात, आपल्या अध्ययन आणि विश्लेषणात कोणत्याही प्रकारचा आदर्श मांडण्याचा प्रयत्न करीत नाही. कोणताही पक्षपाती दृष्टीकोन न ठेवता वास्तविक तथ्यांच्या आधारावर घटनांचे वास्तविक अध्ययन विश्लेषण केले जाते. योग्य-अयोग्य, चांगले वाईट अशा प्रकारचे आदर्श प्रस्तुत केले जात नाही. समाजशास्त्र हे नैतिकदृष्ट्या तटस्थ असते. म्हणून समाजशास्त्र हे एक निरपेक्ष किंवा वास्तविक विज्ञान आहे. ते आदर्श सांगणारे विज्ञान नाही.

⑧ **समाजशास्त्र हे एक सामान्य विज्ञान आहे** :→ स्वरूपात्मक किंवा विशेषात्मक संप्रदायानुसार समाजशास्त्र हे एक विशेष विज्ञान आहे. परंतु बहुतांश समाजशास्त्रज्ञ समाजशास्त्राला एक सामान्य विज्ञान मानतात. त्यांच्या मते समाजशास्त्र अशा घटनांचे अध्ययन करते की, जे संपूर्ण मानवी आंतरक्रियांमध्ये सामान्य आहे. समाजशास्त्र सामाजिक जीवनाच्या सामान्य घटनांचे अध्ययन करते या दृष्टीकोनातून समाजशास्त्र हे एक विशेष विज्ञान नसून सामान्य विज्ञान आहे.

# समाजशास्त्राचा इतर सामाजिक विज्ञानांशी संबंध (04)

## (1) समाजशास्त्र आणि मानवशास्त्र [Sociology and Anthropology] :-

* मानवाविषयीचे विज्ञान म्हणजे मानवशास्त्र होय. तर मानव समाजाचे विज्ञान म्हणजे समाजशास्त्र होय. प्राचीन काळापासून तर आधुनिक काळापर्यंत अस्तित्वात असलेल्या मानवाचा अभ्यास या विज्ञानात केला जातो. प्राचीन काळातील मानव, त्यांची संस्कृती, राहणीमान आचार विचार आणि परंपरा इत्यादी बाबत अध्ययन करणे हे या विज्ञानाचे मुख्य प्रयोजन आहे. मानवशास्त्राच्या दोन प्रमुख शाखा आहेत. (1) सांस्कृतिक किंवा सामाजिक मानवशास्त्र (2) शारीरिक मानवशास्त्र. सांस्कृतिक किंवा सामाजिक मानवशास्त्राचा समाजशास्त्राशी अतिशय घनिष्ट असा संबंध आहे. सामाजिक मानवशास्त्रात मानवाने निर्माण केलेल्या संस्कृतीचा अभ्यास केला जातो. त्यामध्ये आर्थिक परिस्थिती भाषा कलाकौशल्य, तंत्रज्ञान, राज्यव्यवस्था, समाजरचना, धर्मकल्पना, इत्यादी संस्कृतीच्या विविध अंगांचा अभ्यास करण्यात येतो. सुरूवातीला सामाजिक मानवशास्त्राचा अभ्यास विषय हा प्राचीन काळातील मानवापर्यंत मर्यादित होता. परंतु अलीकडे या विज्ञानात आधुनिक काळातील मानवांचा सुध्दा अभ्यास केला जातो. ग्रामीण समुदाय, श्रमिकांचे प्रश्न, नागरिकरणाचा प्रश्न, आणि इतर काही सामाजिक समस्यांचे अध्ययन मानवशास्त्रात केले जाते.

* सांस्कृतिक किंवा सामाजिक मानवशास्त्राचा समाजशास्त्रीशी संबंध असलेला आढळून येतो. समाजशास्त्रात देखील संस्कृती, राज्यसंस्था, धर्मसंस्था, समाजरचना इत्यादीचे अध्ययन केले जाते. मॅलिनोव्हस्की, रॅडक्लिफ ब्राऊन, इवान्स प्रिटचार्ड, फ्रेजर इत्यादी मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी समाजाचे केलेले अध्ययन समाजशास्त्राच्या दृष्टीने उपयुक्त आहे. सामाजिक मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी समाजाचे व्यक्तिमत्व विकास, सामाजीकरण, धर्म, कुटुंबसंस्था विवाहसंस्था इत्यादी संबंधी जे अध्ययन केले ते अध्ययन समाजशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

* समाजशास्त्राचे देखील सामाजिक मानवशास्त्राच्या दृष्टीने विशेष योगदान आहे. समाजशास्त्रीय संकल्पनांचा मानवशास्त्राच्या अध्ययनात उपयोग केला जातो. समाजशास्त्रीय ज्ञानाचा वापर अनेक मानवशास्त्रज्ञांनी केला आहे. सामाजिक मानवशास्त्रातील नवीन विषय हे समाजशास्त्राशी निगडीत आहेत. त्यामुळे मानवशास्त्रज्ञांना समाजशास्त्राची मदत घ्यावी लागते.

* समाजशास्त्र आणि मानवशास्त्र ही दोन विज्ञाने परस्परांशी संबंधीत असली तरी या दोन्ही विज्ञानाचे अध्ययन विषय हे वेगवेगळे आहेत. समाजशास्त्रात आधुनिक समाजाचे तर मानवशास्त्रात प्राचीन समाजाचे अध्ययन केले जाते. समाजशास्त्राचा दृष्टीकोन हा विश्लेषणात्मक आहे, तर मानवशास्त्रात वर्णनात्मक दृष्टीकोनाचा अवलंब केला जातो.

## (2) समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र [Sociology and Economics]

* अर्थशास्त्रात मानवी जीवनाच्या आर्थिक पैलूंचे अध्ययन केले जाते. मानवाच्या विविध गरजांच्या पूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन, वितरण, विनिमय, उपभोग यांच्याशी संबंधीत असणाऱ्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास अर्थशास्त्रामध्ये केला जातो. म्हणजेच वस्तूंचे उत्पादन, वितरण, विनिमय आणि उपभोग या गोष्टींशी संबंधीत असणाऱ्या मानवी क्रियांचे अर्थात वर्तनाचे अध्ययन हा अर्थशास्त्राचा प्रमुख अभ्यास विषय आहे. तर समाजशास्त्राचा अभ्यास विषय हा समाज आहे.

* आर्थिक क्रिया किंवा वर्तन हा केवळ आर्थिक व्यवहार नसतो तर तो दोन व्यक्ती किंवा समूहातील सामूहिक व्यवहार असतो. कारखान्यातील उत्पादन व्यवस्थेतील मालक आणि मजूर यांचे संबंध आर्थिक क्रियेमुळे निर्माण झाले असले तरी ते सामाजिक संबंध होत. आर्थिक व्यवहारावर त्या समाजातील प्रथा, परंपरा, मूल्ये, धार्मिक गोष्टी इत्यादिंचा परिणाम होतो. मॅक्स वेबर ने भांडवलशाहीचा उदय हा प्रोटेस्टंट पंथ असलेल्या समाजात झाला असे स्पष्ट केले इतर समाजात भांडवलशाहीचा विकास झाला नाही कारण त्या समाजातील धार्मिक, नैतीक तत्वे भांडवलशाहीच्या विकासाला अनुकूल नव्हती मॅकआयव्हर यांनी म्हटले आहे की. 'आर्थिक घटना या नेहमी सामाजिक आवश्यकता आणि क्रिया यांच्या एकून स्वरूपावरून निश्चित होतात.' अर्थशास्त्रातील अनेक सिध्दांत हे सामाजिक परिस्थितीशी निगडीत आहेत. बेकारी, दारीद्र्य, लोकसंख्या, श्रमिकांच्या समस्या इत्यादी अर्थशास्त्रातील आर्थिक समस्या सामाजिक परिस्थितीशी संबंधित आहेत. आर्थिक क्रियांचे किंवा वर्तनाचे निर्धारण हे सामाजिक परिस्थितीनुसार होते.

* आर्थिक घटकांचा सामाजिक परिस्थितीवर परिणाम होतो. त्याचप्रमाणे आर्थिक घटकांचा समाज जिवनावर फार मोठा प्रभाव पडतो. कार्ल मार्क्सने भांडवलशाही आणि वर्गसंघर्ष याबाबतचे सविस्तर विश्लेषण करून सिध्दांत मांडले. मार्क्सच्या मते 'आर्थिक परिस्थितीनुसार समाजाची जडण होते.' त्यांनी आर्थिक घटकांना विशेष महत्व दिले उत्पादन व्यवस्थेत परिवर्तन झाल्यास सामाजिक जीवनात बदल घडून येतो. आर्थिक परिस्थितीनुसार सामाजिक स्तरीकरण घडे. समाजाचा आर्थिक विकास झाल्यास समाजदेखील प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू लागतो. आर्थिक नियमाप्रमाणेच सामाजिक करून समाजाचा विकास घडवून आणला जातो असे कार्ल मार्क्सने म्हटले आहे.

*समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र हे दोन्ही विज्ञान एक दुसऱ्यास पुरक आहेत. म्हणून थॉमस (Thomas) यांनी 'Elements of Economics' या ग्रंथात लिहिले आहे की, 'वास्तविक दृष्टीने अर्थशास्त्र हे समाजशास्त्र या व्यापक विज्ञानाची केवळ एक शाखा आहे.

## ③ समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र [Sociology and Political Science]

*राज्यशास्त्र हे एक प्राचिन विज्ञान आहे प्राचीन काळात प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी राज्यशास्त्राच्या संदर्भात अनुक्रमे 'रिपब्लीक' आणि 'पोलिटिक्स' हे दोन ग्रंथ लिहीले राज्यशास्त्रात समाजाच्या राजकीय अंगाचे अध्ययन केले जाते. तसेच शासन, लोकप्रशासन, राजकीय वर्तन, नोकरशाही, कायदा, राजकीय आंदोलने, आंतरराष्ट्रीय संबंध इत्यादींचे वैज्ञानिक दृष्टीकोनातून अध्ययन केले जाते.

*राज्यशास्त्रात समाजाच्या राजकीय अंगाचे अध्ययन करीत असतांना सामाजिक पैलूचा देखील राज्यशास्त्रज्ञांना विचार करावा लागतो. देशातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केल्याशिवाय शासन, राजकीय वर्तन, कायदे, राजकीय आंदोलने इत्यादी बाबतचे वस्तुनिष्ठ आकलन करणे कठीण आहे. त्यामुळे राज्यशास्त्रज्ञाला समाजशास्त्राची मदत घ्यावी लागते. अलीकडे तर राज्यशास्त्रातील बरेच विषय हे समाजशास्त्राशी संबंधित आहेत. त्यामुळे राजकीय समाजशास्त्र ही एक समाजशास्त्राची शाखा उदयास आली राजकीय वर्तनावर समाजजिवनाचा विशेष प्रभाव पडतो. समाजातील लोकसंख्या, सामाजिक प्रमाणके आणि मूल्ये, सामाजिक स्तरीकरण, सामाजिक नियंत्रण, धार्मिक मान्यता इत्यादी घटकांचा परिणाम राजकीय वर्तनावर पडतो. त्यामुळे राज्यशास्त्रज्ञांना समाजशास्त्राची मदत घेणे आवश्यक आहे.

*समाजशास्त्रास राज्यशास्त्राची मदत घ्यावी लागते कारण ही दोन्ही विज्ञाने एकमेकांशी निगडीत आहेत. राज्यशास्त्र हे प्राचीन विज्ञान असल्यामुळे समाजशास्त्राचे अध्ययन करतांना राज्यशास्त्राची विशेष मदत होते. मॉरिस गिन्सबर्ग यांच्या मते, "ऐतिहासिक दृष्टीने समाजशास्त्राची मुळे ही राज्यशास्त्र आणि इतिहासामध्ये आढळून येतात." राजकीय परिस्थितीचा समाजव्यवस्थेवर विशेष प्रभाव पडतो इतकेच नाही, तर राजकीय परिस्थिती नुसार सामाजिक जिवनाचे निर्धारण केले जाते. राजकीय जिवनात परिवर्तन घडून आल्यास त्याचे पडसाद सामाजिक जिवनावर देखील पडतात. आणि समाजात परिवर्तन घडून येते. रशिया आणि चिन येथे 'साम्यवाद' प्रस्थापित झाल्यानंतर त्या देशातील सामाजिक संरचना, मुल्ये, सामाजिक संस्था इत्यादीमध्ये आमूलाग्र बदल घडून आला

*प्रा. गिलख्रीस्ट यांनी राज्यशास्त्र आणि समाजशास्त्राच्या पारस्परीक संबंधाचे अध्ययन करतांना म्हटले आहे की, 'राज्यशास्त्राच्या अध्ययनामध्ये मानवी संबंधाच्या ज्या सिद्धांत आणि तथ्यांचा स्विकार केला पाहिजे की, ज्या सिद्धांत आणि तथ्यांचे अध्ययन करणे समाजशास्त्राचे कर्तव्य मानले आहे. कॉम्ट आणि स्पेन्सर यांच्या मते, या दोन्ही विज्ञानात कोणताच फरक नाही असे म्हटले आहे.

*राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र ही दोन्ही विज्ञाने परस्परांशी संबंधित आहेत. परंतु ही दोन्ही स्वतंत्र विज्ञाने आहेत. हे विसरता येत नाही. या दोन्ही विज्ञानामध्ये मूलभूत फरक आहे. समाजशास्त्र हे समाजाचे तर राज्यशास्त्र हे राज्याचे विज्ञान आहे. राज्यशास्त्रापेक्षा समाजशास्त्र हे अधिक व्यापक असे विज्ञान आहे. समाजशास्त्र हे एक सामान्य विज्ञान आहे. राज्यशास्त्र मात्र विशिष्ट विज्ञान आहे.

## ④ समाजशास्त्र आणि इतिहास [Sociology and History]

*समाजशास्त्र आणि इतिहास या दोन्ही विज्ञानांचा अतिशय घनिष्ठ संबंध आहे. म्हणून वान फुले या सारख्या लेखकांनी समाजशास्त्रास इतिहासापासून वेगळे मानण्यास नकार दिला. विविध मानवी समाजाचे जिवन, त्यामध्ये परिवर्तन आणि घडामोडी या संबंधीचे तसेच त्यांच्या विकासामध्ये सहाय्यक ठरलेल्या आणि बाधक असणाऱ्या भौतीक अवस्थांचे वर्णन म्हणजे इतिहास होय. अशी इतिहासाची व्याख्या केली जाते. समाजशास्त्राची विभीन्न समाजाच्या ऐतिहासिक विकासात रुची आहे. कारण जीवनाच्या विभिन्न अवस्था, राहणीमानाच्या पद्धती, चालीरीती, शिष्टाचार आणि सामाजिक संस्थांच्या रुपात त्यांच्या अभिव्यक्तीचे अध्ययन केले जाते म्हणून समाजशास्त्रास अध्ययन सामुग्रीकरीता इतिहासावर अवलंबून रहावे लागते. अर्नोल्ड टॉयन्बी यांचे 'A study of History' हे पुस्तक समाजशास्त्राकरिता अतिशय महत्वपूर्ण असल्याचे सिद्ध झाले आहे. टॉयन्बी यांनी उत्थान व पतनाच्या मांडलेला सिद्धांत समाजशास्त्राकरिता अतिशय उपयुक्त आहे. इतिहास समाजशास्त्राला माहिती तथ्ये देतो आणि अध्ययनाकरीता सामाजिक पार्श्वभूमी देतो. सामाजिक महत्व लक्षात घेतल्याशिवाय इतिहासाचे अध्ययन करणे व्यर्थ आहे. वर्तमानास समजून घेण्याकरीता आणि भविष्यात मार्गदर्शनासाठी इतिहासाला उपयुक्त बनवायचे असेल तर ऐतिहासीक तथ्यांची समाजशास्त्रीय आधारावर व्याख्या करणे आवश्यक आहे. भूतकालीन समाजातील मानवीय संबंध, संघटना, समूह, युद्ध, प्रथा, परंपरा, शासनप्रणाली, आर्थिक जीवन, धार्मिक मान्यता इत्यादी बाबतची इतिहासकारांनी मिळविलेली माहिती समाजशास्त्रज्ञांना विशेष उपयोगी आहे. कारण वर्तमान काळातील समाज जीवनामधील घटनांचे आकलन करण्यासाठी भूतकालीन समाजाची माहिती ही अतिशय महत्वाची असते.

* अशाप्रकारच्या परस्पर संबंध इतिहास आणि समाजशास्त्राचा आहे म्हणून इतिहासाला ऐतिहासिक समाज जिवनातील भूतकालीन घटनांचे अध्ययन करणारे विज्ञान असे संबोधले जाते. तर समाजशास्त्राचा वर्तमानकालीन समाजाच्या अभ्यास करणारे विज्ञान असा उल्लेख केला जातो. त्यामुळेच इतिहास आणि समाजशास्त्र ही एकदुसऱ्यांवर निर्भर असलेली विज्ञाने होत. जी.ई. हॉवर्ड यांनी म्हटले की "इतिहास हे भूतकाळचे समाजशास्त्र आहे. आणि समाजशास्त्र हा वर्तमानाचा इतिहास आहे." समाजशास्त्र आणि इतिहास ही दोन्ही विज्ञाने परस्पर संबंधित आहेत. परंतु या दोन्ही विज्ञानात फरक आहे. इतिहासाचा संबंध भूतकाळातील घटनांशी आहे. तर समाजशास्त्र हे प्रामुख्याने वर्तमानाशी संबंधीत आहे. इतिहास हे एक विशिष्ट विज्ञान असून समाजशास्त्र सामान्य विज्ञान आहे.

## युनिट क्र. 2 मूलभूत समाजशास्त्रीय संकल्पना (06)

## [Basic Sociological Concepts]

* **संकल्पनांचा अर्थ** :- प्रत्येक विज्ञानात अध्ययन विषयाच्या संदर्भात अनेक संकल्पना असतात. त्या संकल्पनांच्या आधारावर विज्ञानाचा विकास होत असतो. जवळजवळ सर्वच भौतिक आणि सामाजिक विज्ञानात अशा विविध संकल्पना आढळून येतात. परंतु प्रत्येक विज्ञानातील संकल्पना या दुसऱ्या विज्ञानातील संकल्पनापेक्षा वेगळ्या असतात. संकल्पनांचा एक विशिष्ट अर्थ असतो. आणि त्या विविध अर्थाने ती संकल्पना विज्ञानात वापरली जाते.

* समाजशास्त्र हे सुद्धा एक विज्ञान असल्यामुळे यांत देखील काही महत्वाच्या संकल्पना आहेत. आणि या संकल्पनांचा एक विशिष्ट अर्थ आहे. समाजशास्त्र हे एक अमूर्त विज्ञान आहे. यातील संकल्पना देखील अमूर्त असतात. कारण सामाजिक संबंध हा जो समाजशास्त्राचा अध्ययन विषय आहे. तोच मूळात अमूर्त आहे. समाजशास्त्रात समाज, समुदाय, संस्था, मंडळ, सामाजिक संरचना, समूह, प्रमाणके, सामाजिक व्यवस्था, दर्जा आणि भूमिका इत्यादी अनेक संकल्पना आहेत. अशाच काही मूलभूत संकल्पनांचा अभ्यास या प्रकरणात आपणास करावयाचा आहे.

* **व्याख्या** :- ① मॅकाडेलँडच्या मते, "विविध प्रकारच्या तथ्यांचे सारस्वरूपात वर्णन ज्या ज्या शब्दांद्वारे होते, त्यास संकल्पना असे म्हणतात."

② पी. यंग यांनी "तथ्यांचे वर्गीकरण करून त्यातील गुणवैशिष्ट्ये लक्षात घेऊन जेव्हा एक नाव किंवा शीर्षक देण्यात येते तेव्हा त्यास संकल्पना म्हणतात" अशी संकल्पनेची व्याख्या केली आहे."

* या व्याख्यावरून स्पष्ट होते की अनुभवजन्य ज्ञानाच्या आधारावर संकल्पना विकसित होत असतात. म्हणजेच अनुभवजन्य संशोधनातून प्राप्त झालेल्या तथ्यांना संक्षेपाने मांडले जाते. संकल्पना अमूर्त असतात. तसेच त्यांच्यात स्पष्टता, पृथकता आणि निश्चितता ही वैशिष्ट्ये आढळतात. संकल्पना या परिवर्तनक्षम असतात. म्हणजेच उपलब्ध तथ्यांच्या आधारावर संकल्पनांचे परिक्षण आणि पुर्नपरिक्षण सतत सुरू असते. त्यामुळे ज्ञानात वृद्धी होते शोधकार्यात, अनुभवलेल्या किंवा पाहिलेल्या घटना आणि प्रसंगाच्या अमूर्त प्रतीकृतीस शास्त्रीयदृष्ट्या विशिष्ट अर्थ असतो. अशा विशिष्ट अर्थ प्राप्त शब्दांना त्या त्या विज्ञानातील वैज्ञानिक संकल्पना असे म्हणतात.

## समाज [Society]

* **समाजाचा अर्थ** :- समाजशास्त्रात समाजाचे अध्ययन केले जाते त्यामुळे 'समाज' ही समाजशास्त्रातील एक अत्यंत महत्वाची संकल्पना आहे. आपल्या दैनदिन व्यवहारात 'समाज' हा शब्द नेहमीच वापरला जातो. उदा. :- हिंदु समाज, बौद्ध समाज, भारतीय समाज, अमेरिकन समाज, महिला समाज इत्यादी. व्यवहारात समाज हा शब्द एका विशिष्ट अर्थाने उपयोगात आणल्या जात नाही. तर वेगवेगळ्या अर्थाने वापरल्या जातो. हिंदु समाज किंवा बौद्ध समाज म्हटल्यानंतर येथे समाज हा शब्द धर्मवाचक, तर भारतीय किंवा अमेरिकन समाज असा शब्द प्रयोग केल्यानंतर समाज हा शब्द देशवाचक होतो. आणि महिला समाज म्हणजे केवळ महिलांचा वाट येथे समाज हा शब्द लिंगवाचक या अर्थाने वापरला जातो. अशाप्रकारे 'समाज' हा शब्द विविध अर्थाने आपण दैनदिन जिवनात वापरतो. परंतु समाजशास्त्रात या संकल्पनेचा एक विशिष्ट अर्थ आहे.

* समाजामध्ये अनेक लोक असतात. परंतु या लोकांच्या समुच्चयास समाज म्हटल्या जात नाही. तर मानव-मानवामधील संबंधाची व्यवस्था म्हणजे समाज होय. सामान्य अर्थ समाजामध्ये मानवी किंवा सामाजिक संबंध महत्वाचे असतात. मॅकआयव्हर आणि पेज यांनी "सामाजिक संबंधाचे जाळे म्हणजे समाज होय." अशी समाजाची व्याख्या केली आहे.

* **सामाजिक संबंध [Social Relationship]** :- व्यक्तींच्या परस्परांविषयीच्या असलेल्याच्या जाणिवेतून निर्माण होणाऱ्या संबंधाना सामाजिक संबंध म्हणतात. त्यामुळे या संबंधामध्ये परस्पर असलेल्याच्या जाणिवेला विशेष महत्व आहे. सामाजिक संबंध हे मानसिक स्थितीवर अवलंबून असतात. म्हणून सामाजिक संबंध आणि भौतिक संबंध यामध्ये फरक केला जातो.

* भौतिक संबंध म्हणजे वस्तू-वस्तूंमध्ये असणारे संबंध होय उदा. टेबलावर ठेवलेली पुस्तके आणि पेन यामध्ये एका वस्तूला दुसऱ्या वस्तूविषयीची जाणिव नसते. इतकेच नव्हे तर, अस्तित्वाबद्दलची कल्पना देखील नसते. अशा भौतिक संबंधामध्ये समाविष्ट असणाऱ्या वस्तूंमध्ये पारस्पारीक आंतरक्रिया असतात. त्यांच्यात आदान-प्रदान, एकमेकांवर प्रभाव किंवा भावनात्मक परिणाम आढळून येत नाही. आणि म्हणूनच भौतिक संबंधापेक्षा सामाजिक संबंध हे वेगळे असतात.

* व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह-समूहात पारस्पारिक क्रिया होत असतात. या पारस्पारिक क्रियांनाच आंतरक्रिया असे म्हणतात. आणि या क्रियामुळेच सामाजिक संबंध निर्माण होतात. हे संबंध विशिष्ट हेतू किंवा उद्देशामुळे निर्माण होतात उदा. पती-पत्नी, मालक-नोकर, शत्रू-शत्रू, मित्र-मित्र यांच्यातील संबंध ही सामाजिक संबंधाची उदाहरणे होत. सामाजिक संबंध हे स्थिर असतात. व्यक्ती-व्यक्तींमध्ये जो तात्कालीक स्वरूपाचे संबंध निर्माण होतात त्याला सामाजिक संबंध म्हणता येत नाही. उदा. रेल्वेत प्रवास करणाऱ्या व्यक्ती थोड्या वेळाकरिता एकमेकांच्या सहवासात येतात. काही तास सोबत घालवितात किंवा एखादा अपघात झाला आणि अनेक व्यक्ती एकत्रित झाल्या, तर त्यांच्यामध्ये जो संबंध प्रस्थापित होतो त्यास सामाजिक संबंध म्हणत नाही. कारण हा संबंध अस्थायी स्वरूपाचा असतो. अशा संबंधातून कोणत्याही प्रकारची व्यवस्था निर्माण होत नाही त्यात (07) काहीच उद्देश नसतो.

* सामाजिक संबंध निर्माण होण्याकरिता दीर्घकालीन स्वरूपाचे संबंध आवश्यक असतात. व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह, किंवा समूह-समूहातील सुनिश्चित आणि स्थायी संबंधांनाच सामाजिक संबंध म्हणतात. उदा. पती-पत्नीचा संबंध हा सामाजिक संबंध होय. कारण हा संबंध स्थायी स्वरूपाचा असतो. अशा सामाजिक संबंधातून एक व्यवस्था निर्माण होते. या व्यवस्थेलाच समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून समाज असे म्हणतात.

## समाजाची व्याख्या [Definition of society]

* ① राईट :-> "समाज म्हणजे व्यक्तींचा केवळ समूह नव्हे, तर समूहातील सदस्यांमध्ये विद्यमान असलेली ती संबंधाची व्यवस्था असते."

* ② मॉरिस गिन्सबर्ग :-> "विशिष्ट संबंध व वर्तनाचे प्रकार यांनी एकत्र बांधल्या गेलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे समाज होय. अशा तऱ्हेने संबंध न ठेवणाऱ्या किंवा दुसरे वर्तनाचे प्रकार आचरणात आणणाऱ्या व्यक्तींपासून त्या समाजातील व्यक्ती वेगळ्या दिसतात."

* ③ जॉ. एल. गिलिन :-> "सापेक्षत: समाज हा एक विशाल असा स्थायी समूह असून, त्यात सामान्य हित, सामान्य भूभाग, सामान्य जिवनपद्धती आणि पारस्पारिक सहकार्य किंवा आपले-पणाची भावना असते. तसेच या सर्व आधारानुसार त्यास इतर समूहापासून पृथक दर्शविले जाते."

* ④ डॉ. किम्बाल यंग :-> "समान संवयी, कल्पना व अभिवृत्ती असणाऱ्या म्हणजेच समान सामाजिक सांस्कृतिक आशय असणाऱ्या आणि विवक्षित प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या जास्तीत जास्त स्थूल स्वरूपाच्या समूहाला समाज म्हणतात. आणि असा समाज उदासीनपणा किंवा विरोध यावर आधारलेल्या अभिवृत्ती व कृती यामुळे इतर समाजापासून नेहमी वेगळा ठरतो कोणत्याही एका समाजात विशिष्ट सामुहिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लोकांचे एकमेकांशी संलग्न असे विविध प्रकारचे समूह असतात."

* ⑤ एलिस आणि बिघेट्स :-> "समाज म्हणजे लोकांचा असा समूह कि ज्यात निश्चित भूभाग, सापेक्ष स्वयंपूर्णता, सामाजिक आंतरक्रिया आणि संस्कृती ही वैशिष्टे असतात."

## * समाजाची वैशिष्ट्ये [Characteristics of Society]

(07)

* ① सामान्य भूभाग [Common Territory] :->
② विशाल समूह [Largest Group] :->
③ लोकांचा समूह [Aggregation of People] :->
④ सामाजिक आंतरक्रिया [Social Interaction] :->
⑤ स्थायित्व [Permanent] :->
⑥ आत्मनिर्भरता [Self Sufficiences] :->
⑦ सामान्य जिवन पद्धती [Common Mode of life] :->
⑧ राजकीय स्वातंत्र्य [Political Independence] :->

* हॅरी जॉन्सन [Harry Johnson] यांनी समाजाच्या चार वैशिष्ट्यांचा उल्लेख केला आहे ① निश्चित भूप्रदेश [Definite Territory] :->
② प्रजनन [Reproduction] :->
③ सर्वसमावेशक संस्कृती [Comprehensive Culture] :->
④ स्वतंत्रता [Independence] :->

(08)

*** निश्चित भूप्रदेश** :- व्यक्ती-व्यक्तीमध्ये आंतरक्रिया सतत सुरु असतात. या आंतरक्रियेतून निर्माण होणारे सामाजिक संबंध स्थिर असतात. त्यामुळे समाजातील सदस्यांचे एका निश्चित भूभागावर वास्तव्य असते. म्हणूनच समाज हा प्रादेशिक असतो. असे देखील म्हटले जाते. काही भटके समाज ज्या मोठ्या प्रदेशात फिरत असतात. त्या प्रदेशालाच ते आपला प्रदेश मानतात.

* भूभागाच्या मर्यादा इतिहासाच्या आधारे राजकिय संस्थेने ठरविलेल्या असतात. विशिष्ट भूप्रदेशामध्ये राहणाऱ्या व्यक्ती-व्यक्तीमध्ये स्थिर, स्थायी आणि सातत्यपूर्ण सामाजिक संबंध निर्माण होतात. म्हणूनच निश्चित भूभाग हे समाजाचे एक महत्वाचे वैशिष्ट आहे. भूभाग हे प्रत्येक समाजाचे बाह्य वातावरण होय. विशेष म्हणजे समाजाच्या संस्कृतीच्या जडण-घडणीमध्ये या वातावरणाचा महत्वाचा वाटा असतो प्रत्येक समाज हा त्या भूभागाच्या नावावरुन ओळखला जातो उदा :- भारतीय समाज, जपानी समाज.

*** प्रजोत्पादन** :- लोकांमधील म्हणजेच व्यक्ती-व्यक्तीमधील सामाजिक संबंधाची व्यवस्था म्हणजे समाज होय. प्रजोत्पादनाद्वारे या समाजात सतत नवीन सदस्यांची भर पडत असते. कोणत्याही समाजातील व्यक्तीची संतती त्याच समाजात राहाते. गुलाम म्हणून आणलेल्या लोकांना, जिंकून आणलेल्या लोकांना, स्थायीक होऊ इच्छिणाऱ्या लोकांना, परदेशीयांना किंवा स्वेच्छेने येणाऱ्या इतर लोकांना समाजात सामावून घेतले जाते. परंतु या मार्गाने समाजाची संख्या अल्प प्रमाणात वाढते आणि सर्वच समाजात हे मार्ग उपलब्ध नसतात. प्रजोत्पादनाद्वारेच समाजातील सदस्यसंख्या वाढते. प्रजोत्पादनामुळे जुन्या पिढीची जागा नवीन पिढी घेते आणि समाजाचे सातत्य टिकून ठेवले जाते.

(08)

*** सर्वसमावेशक संस्कृती** :- संस्कृती म्हणजे जीवन जगण्याची पद्धत होय. संस्कृती ही मानव निर्मित आहे. समाजाच्या एक सदस्य या नात्याने व्यक्ती ज्ञान, विज्ञान, कला, कायदे, प्रथा इत्यादी संपादित करीत असतो. अशा या संस्कृतीची निर्मिती ही एका माणसाची निर्मिती नाही तर समाज हा आपल्या संस्कृतीची निर्मिती करतो. समाजातील व्यक्तींच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता संस्कृतीमध्ये असते. म्हणूनच संस्कृती ही व्यापक आणि सर्वसमावेशक असते. एका समाजाची संस्कृती ही दुसऱ्या समाजाच्या संस्कृतीपेक्षा वेगळी असते. त्यामुळेच एक समाज दुसऱ्या समाजापेक्षा भिन्न असतो. प्रत्येक समाजाच्या प्रथा, परंपरा, मूल्ये, प्रमाणके इत्यादी वेगवेगळी आढळतात.

*** स्वतंत्रता** :- स्वतंत्रता हे समाजाचे महत्वाचे वैशिष्ट्य होय. समाज हा एका स्वतंत्र आणि विशाल भूभागावर असतो. बऱ्याचकाळी स्वतंत्रता याचा अर्थ राजकीय दृष्ट्या स्वतंत्र नसला तरी समाज मात्र स्वतंत्र असतो. तो समाज स्वतःला विजेत्या समाजाचा भाग मानीत नाही. उदा :- भारतावर ब्रिटिशांची जवळपास दीडशे वर्ष सत्ता होती. म्हणजे भारत देश दीडशे वर्ष ब्रिटिशांच्या पारतंत्र्यात होता. तरी त्यावेळी भारतीय समाज स्वतंत्र होता. कारण भारतीय समाज रुढी, परंपरा, भाषा, धर्म इत्यादी बाबतीत स्वतंत्र होता. त्यामुळे भारतीय समाजाची संस्कृती टिकून राहिली. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरीकेने जपानला पराभूत केले. परंतु जपानी समाज मात्र स्वतंत्र होता. हॅरी जॉन्सन यांनी स्वतंत्रता हा शब्द एवढ्या व्यापक अर्थाने समाजाच्या संदर्भात वापरला आहे.

## समाजाच्या मूलभूत गरजा [Basic Needs of Society]

- ① लोकसंख्येचे जतन
  - (अ) जीव पोषण
  - (ब) जीव संरक्षण
  - (क) जीवोत्पादन
- ② समाजाच्या कार्य विभाजना संबंधीच्या गरजा
- ③ समाजाचे दृढ ऐक्य राखण्याच्या गरजा
- ④ समाजाचे सातत्य टिकविण्याच्या गरजा

*** ① लोकसंख्येचे जतन** :- मानवी समाज हा लोकांनी मिळून बनलेला आहे. म्हणून लोकांचे अस्तित्व टिकविणे ही समाजाची आवश्यक गरज आहे. लोकांचे अस्तित्व टिकविण्याच्या दृष्टीने पुढील तीन गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक असते.

*** (अ) जीव पोषण** :- समाजाला लोकांच्या आहाराची आणि पोषणाची व्यवस्था करावी लागते कारण, जिवंत राहण्याकरीता अन्न, हवा, पाणी इत्यादी गोष्टी मानवाच्या दृष्टीने आवश्यक आहेत. त्याकरिता लोक सभोवतालच्या निसर्गापासून खाण्या पिण्याच्या वस्तू मिळवितात. आणि त्यावर आपला निर्वाह करतात.

*** (ब) जीव-संरक्षण** :- लोकांच्या संरक्षणाची तरतूद देखील समाजाला करावी लागते. थंडी, उन्हाळा, वादळ, पाऊस या नैसर्गिक संकटापासून संरक्षण करणे आवश्यक असते. तसेच जंगलातील हिंस्त्र पशू-पक्षी, सरपटणारे प्राणी इत्यादीपासून लोकांचे संरक्षण होणे महत्वाचे असते. या सर्व गोष्टींपासून लोकांच्या जीवनाचे संरक्षण समाजाला करणे आवश्यक आहे.

*(1) **जावोत्पादक** :- मृत्यूमुळे समाजातील लोकसंख्या कमी होते. त्या रिकाम्या जागा नवीन सदस्यांद्वारे भरून काढणे आवश्यक असते. या नवीन जीवांचे संगोपन आणि संवर्धन केले जाते. विशेष म्हणजे लोकसंख्येचे जतन करण्यासाठी जीवपोषण, जीवसंरक्षण आणि शिक्षण या गोष्टी केवळ मानवी समाजातच आढळून येत नाही तर सर्व प्राणि-पशु पक्षांच्या वर्गामध्ये सुद्धा या सर्व गोष्टींची पूर्तता केली जाते. परंतु मानव सामूहिक सहकार्याद्वारे या सर्व गरजांची पूर्तता करते.

*(2) **समाजाच्या कार्य विभाजना विषयीच्या गरजा** :- सामाजिक जिवन जगण्यासाठी सहकार्याची आवश्यकता असते. त्यांच्यामधील सहकार्य वाढविण्यासाठी त्यांच्यामध्ये कामाची विभागणी केली जाते. काम अथवा कामाचे विभाजन झाल्यामुळे समाजाच्या अस्तित्वासाठी लागणाऱ्या गोष्टींची तरतूद करणे सोपे होते. लोकांच्या अनेक गरजा असतात. या गरजा भागविण्यासाठी व्यक्तीचे ज्या विशिष्ट कामात विशेष कौशल्य असेल, त्यानुसार कार्याची विभागणी करून सहकार्याच्या आधारावर सदस्यांच्या गरजा भागविणे आवश्यक असते. प्रत्येक समाजात सारख्या प्रकारचे विशेषीकरण झालेले नसते. त्या त्या समाजातील सदस्यांच्या गरजा, भौगोलिक परिस्थिती इत्यादी सर्व गोष्टींचा विचार करून कार्याचे विभाजन केले जाते.

*(3) **समाजाचे दृढ ऐक्य वाढविण्याच्या गरजा** :- प्रत्येक समाजाच्या अस्तित्वासाठी आणि समाजविकासासाठी दृढ ऐक्य वाढविण्याच्या गरजांची पूर्ती करणे आवश्यक आहे. त्याकरिता समाजातील सदस्यांमध्ये संपर्क स्थापन होणे आवश्यक असते. ज्या ठिकाणी या गोष्टींचा अभाव असेल त्या ठिकाणी समाजामध्ये योग्य मिलाप होणार नाही. म्हणजेच ऐक्यभाव वाढणार नाही.

*(4) **समाजाचे सातत्य टिकविण्याच्या गरजा** :- समाजाचे सातत्य टिकविणारी गरज महत्त्वाची आहे. समाजाची निरंतरता राखण्यासाठी समाजाने काही यंत्रणा विकसित केल्या पाहिजे. ज्यामुळे परस्पर-संबंधाची व्यवस्था टिकून राहील. म्हणजेच समाजाचे सातत्य टिकविण्याच्या दृष्टीने त्या संबंधित गरजा भागविणे आवश्यक आहे. (09)

## * व्यक्ती आणि समाज [Individual and Society]

* व्यक्ती आणि समाज हे परस्पर संबंधीत आहे. व्यक्तीशिवाय समाजाचे अस्तित्व नाही. आणि समाजाशिवाय व्यक्तीला अर्थ नाही. व्यक्ती समाजात राहूनच स्वतःचा विकास करते. मॅकलसेच व्यक्तीच्या सातत्यपूर्ण आंतरक्रियांवर समाजाची उत्पत्ती आणि विकास अवलंबून आहे. मॅकआयव्हर आणि पेज यांच्यामते, 'मानवामध्ये मानवी प्रवृत्तीचा विकास केवळ तेव्हाच होऊ शकतो. जेव्हा ती सामाजिक व्यक्ती असते! समाजाशिवाय मानवाचा विकास होऊ शकत नाही. म्हणूनच म्हटले आहे की मानव हा एक सामाजिक प्राणी आहे. किंग्जले डेव्हिस यांनी म्हटले की, 'जेव्हा व्यक्ती ही सहकार्य, संघर्ष, अपेक्षा, आदर्श, उद्दिष्टे आणि साधना सहित समाजाच्या सोबत असते तेव्हाच समाजाचा विकास होतो!

* यावरून हे स्पष्ट होते की, व्यक्ती आणि समाज हे एक दुसऱ्याचे पूरक आहेत. - व्यक्तींनी समाजाचा विकास केला. आणि विकसित समाजाने सामाजिकरणाच्या माध्यमातून जन्मतः एक प्राणी असणाऱ्या मानवास सामाजिक प्राण्यामध्ये परिवर्तीत केले. म्हणजेच व्यक्ती शिवाय समाज अस्तित्वात येत नाही. आणि समाजाशिवाय व्यक्तीचे जीवन निरर्थक ठरते. अशा प्रकारचे व्यक्ती आणि समाजाचा संबंध कसा आहे? या परस्पर संबंधाचे स्वरूप कोणते? हे शोधण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. या संदर्भात विचारवंतांनी काही सिद्धांत मांडले आहेत. या सिद्धांतांपैकी समाजाच्या उत्पत्तीचे सिद्धांत असे म्हणतात. यावावत सामाजिक कराराचा सिद्धांत आणि सेंद्रिय सिद्धांत हे महत्त्वाचे आहेत.

## * समाज उत्पत्तीचे सिद्धांत [Theory of Origin of Society]

(09)

① सामाजिक कराराचा सिद्धांत
समर्थक - हॉब्ज, लॉक, रूसो

② सेंद्रिय सिद्धांत
समर्थक - प्लेटो, ॲरिस्टॉटल, स्पेन्सर

*① **सामाजिक कराराचा सिद्धांत** :- हॉब्ज, लॉक, रूसो हे सामाजिक कराराच्या सिद्धांताचे प्रमुख समर्थक आहेत. या विचारवंतांनी मानवी इतिहासाचे प्रदीर्घ दोन कालात विभाजन केले आहे.

*(अ) **प्रथम काळ** :- प्रथम काळास नैसर्गिक अवस्थेचा काळ मानले आहे. या विचारवंतांच्या मते, नैसर्गिक अवस्थेमध्ये, व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारचे सामाजिक नियम नव्हते. तसेच कोणत्याही प्रकारचे राजकीय कायदे नव्हते सर्वत्र अराजकता होती. या अवस्थेत व्यक्ती आपल्या इच्छेनुसार कार्य करीत होती. कोणत्याही व्यक्तीच्या वर्तनावर मानवाद्वारा बनविलेल्या नियमांचे नियंत्रण नव्हते. प्रत्येक व्यक्ती मनाला येईल त्यानुसार वागत होती. अशा परिस्थितीमध्ये सर्व व्यक्तींच्या आवश्यक गरजा पूर्ण होणे शक्य नव्हते. जी व्यक्ती शारीरिकदृष्ट्या समर्थ होती ती इतरांना धाक दाखवून जबरदस्तीने आपल्या गरजा पूर्ण करायची म्हणजे 'बळी तो कान पिळी' अशा प्रकारची परिस्थिती होती. सर्वत्र अराजकता होती ही परिस्थिती मानवाच्या दृष्टीने अयोग्य आणि असह्य होती.

*(ब) **द्वितीय काळ** ⇒ या काळास करारानंतरचा काळ मानतात. ज्या काळात नागरिक समाज (10)
आणि राज्याची निर्मिती झाली. विचारवंतांच्या मते, पहिला काळ हा अराजकतेचा आणि संघर्षाचा होता. सर्व व्यक्तींना आपल्या गरजांची पूर्ती करणे आवश्यक होते म्हणून या परिस्थितीतून सुटका करण्यासाठी लोकांनी 'सामाजिक करार' करून समाजाची निर्मिती केली सामाजिक करारामुळे व्यक्तीचे जीवन नियंत्रित झाले. व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी समाज आणि राज्य या संस्था कार्य करू लागल्यात. अशाप्रकारे नैसर्गिक नियमांचे स्थान मानव निर्मित कायदे आणि सामाजिक नियमांनी घेतले. त्यामुळे या काळात व्यक्तीवर नैसर्गिक नियंत्रणाऐवजी समाजाचे नियंत्रण प्रस्थापित झाले.

*अशाप्रकारे सामाजिक कराराच्या आधारावर लोकांनी समाजाची निर्मिती केली. समाज आणि व्यक्ती या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. यांमध्ये जो संबंध आहे, तो केवळ कराराच्या आधारावर करण्यात आलेली एक व्यवस्था मात्र आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, समाजापासून पृथक होऊन देखील व्यक्तीचे अस्तित्व शक्य आहे. कारण, सामाजिक करारापूर्वी अशी परिस्थिती होती. या सिद्धांतानुसार व्यक्ती ही महत्त्वाची असून समाज गौण आहे. कारण समाजाची निर्मिती ही व्यक्तींनी केली म्हणून हा सिद्धांत समाजापेक्षा व्यक्तीला अधिक महत्त्व देतो.

② *सेंद्रिय सिद्धांत [The Organic Theory] ⇒ सेंद्रिय सिद्धांत हा सामाजिक सिद्धांताच्या अगदी विरुद्ध आहे. 'कराराच्या सिद्धांतात व्यक्तीला विशेष महत्त्व दिले आहे. तर सेंद्रिय सिद्धांतात समाजाला विशेष महत्त्व आहे'. या सिद्धांतानुसार समाज हा एका मानवी शरीरासारखा आहे. शरीराची रचना ही हात, पाय, नाक, कान, डोळे, पोट, तोंड इत्यादी ~~अनेक अवयव मिळून होते या प्रत्येक अवयवाचे शरीरापासून वेगळे अस्तित्व नाही हे~~ सर्व अवयव शरीरांशी संबंधित आहेत. ही गोष्ट समाजाच्या संदर्भात लागू होते. अनेक व्यक्ती मिळून समाज बनतो. एक-एक व्यक्ती समाजरूपी शरीराचा एक-एक अवयव आहे. त्यामुळे व्यक्तीचे समाजापासून वेगळे अस्तित्व शक्य नाही. (10)

* हर्बर्ट स्पेन्सर ने सेंद्रिय सिद्धांताचे सविस्तर विवेचन केले आहे. त्यांनी शरीर आणि समाज यांच्यातील अनेक सादृश्यांचा उल्लेख केला आहे. ज्याप्रमाणे शरीराच्या विभिन्न अवयवांच्या कार्याचे विभाजन झाल्यानंतर देखील ते सर्व अवयव एक दुसऱ्यावर अवलंबून आहेत. ज्याप्रकारे तोंड, पोट, आतडीद्वारा संपूर्ण शरीराचे पालन-पोषण होते. त्याप्रमाणे समाजाचे पालन पोषण कृषी आणि उद्योगाद्वारे केले जाते. रक्तपेशी आणि रक्तवाहिन्या द्वारे संपूर्ण शरीरात रक्ताचे संचालन होते. त्याचप्रकारे समाजात रेल्वे, सडका, पोस्ट आणि तार यंत्रणा इत्यादी दळणवळण आणि संचाराच्या साधनाद्वारे समाजात वितरण व्यवस्था कार्यरत आहे. मेंदूद्वारे शरीराच्या संपूर्ण क्रियांना नियंत्रित केले जाते. तसेच नियंत्रण शासनाद्वारे समाजावर ठेवले जाते. अशाप्रकारे रचनेच्या दृष्टीने शरीर आणि समाजात सादृश्यता आहे. शरीराच्या अंतर्गत अवयवांची जशी स्थिती असते. अगदी तशीच स्थिती समाजात व्यक्तीची असते म्हणून व्यक्तीचे समाजापासून वेगळे अस्तित्व नाही.

## * समुदाय [Community] (10)

* **समुदायाचा अर्थ** ⇒ कोणत्याही समाजाचा अभ्यास करीत असतांना त्या समाजातील समुदायाचा देखील अभ्यास करणे महत्त्वाचे असते. 'समाज' या संकल्पनेप्रमाणेच 'समुदाय' ही संकल्पना देखील अत्यंत महत्त्वाची आहे. समुदायास इंग्रजीमध्ये 'कम्युनिटी' — [Community] असे म्हणतात. लॅटीन भाषेतील 'Com' आणि ग्रीक भाषेतील 'Munis' या दोन शब्दांमिळून Community हा शब्द बनला आहे. 'Com' चा अर्थ एकत्रित तर 'Munis' चा अर्थ सेवा करणे हा आहे. म्हणजेच कम्युनिटी अर्थात समुदायाचा अर्थ सर्वांनी मिळून सेवा करणे असा होतो. परंतु समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून समुदायाचा हा अर्थ पर्याप्त नाही.

* समुदाय ही समाजशास्त्रीय संकल्पना आहे. त्यामुळे या संकल्पनेचा समाजशास्त्रीय दृष्ट्या एक निश्चित अर्थ आहे. ज्या समूहामध्ये लोकांचे सामाजिक जीवन पूर्णपणे व्यतीत होऊ शकते त्या समूहाला 'समुदाय' असे म्हणतात. जेव्हा काही व्यक्तींचे समूह आपल्या सामान्य उद्देशांच्या पूर्तीकरिता एका निश्चित भूभागावर वास्तव्य करतात तेव्हा अशा समूहाला समुदाय म्हणतात. समुदाय या संकल्पनेच्या समाजशास्त्रीय अर्थ अधिक स्पष्ट करण्याकरिता समाजशास्त्रज्ञांनी दिलेल्या व्याख्या महत्त्वपूर्ण ठरतात.

* **व्याख्या** ⇒ ① **रॉबर्ट मॅकायव्हर आणि पेज** :- "जेव्हा कोणत्याही, लहान किंवा मोठ्या समूहाचे सदस्य अशा रितीने एकत्र राहतात. की त्यांच्यामध्ये — ~~एखादाच विशिष्ट हितसंबंध समान असत नाही तर सामान्य जीवनाला लागणारे~~ मुलभूत हितसंबंध समान असतात, तेव्हा त्या समूहाला समुदाय असे म्हणतात."

②* गिन्सबर्ग ⇒ "स्वनियमाने सामाजिक जीवन नियमित करणांना निश्चित भूभागावर राहणाऱ्या मानवाच्या समूहास समुदाय म्हणतात."

* ③ बोगार्डस ⇒ "एका विशिष्ट भूभागावर आपलेपणाच्या भावनेने राहणाऱ्या सामाजिक समूहास समुदाय असे म्हणतात." (11)

* ④ मेन्जर ⇒ "एक समाज जो एका निश्चित भूभागावर वास्तव्य करतो, त्यास समुदाय असे म्हणतात."

* वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की, समुदायातील सर्व सदस्य एका निश्चित भूभागावर समूह करून राहतात तसेच त्यांच्यात आपलेपणाची भावना असते आणि सर्व सदस्य सामान्य जीवन जगतात. समुदाय हा लहान किंवा मोठा देखील असतो जसे हा लहान समुदाय तर शहर किंवा प्रांत हे मोठे समुदाय होत ग्रामीण, शहरी, आदिवासी इत्यादी अनेक समुदायाचे प्रकार आहेत. भारतीय समाजात ग्रामीण शहरी, आदिवासी हे समुदाय आढळतात

## * समुदायांची वैशिष्ट्ये [Characteristics of Community]

* ① निश्चित भूप्रदेश ⇒ समाजाप्रमाणेच निश्चित भूप्रदेश हे समुदायाचे देखील महत्वाचे वैशिष्ट्य आहे. समुदायातील लोक हे एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करतात. त्या विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांमध्ये एकमेकांविषयी आपलेपणाची भावना असते. समुदाय ज्या भूप्रदेशात वास्तव्य करतो त्या भूप्रदेशाचा त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर परिणाम होतो

* ② समुदाय भावना ⇒ एका विशिष्ट भूप्रदेशात लोक वास्तव्य करतात त्यामुळे त्यांचे एकमेकांशी अतिशय जवळचे संबंध निर्माण होतात. त्यांना एकमेकांविषयी आत्मीयता वाटते आणि या आत्मीयतेच्या भावनेतूनच समुदाय भावना निर्माण होते. समुदाय भावनेत पुढील तीन भावनांचा समावेश असतो.

*[अ] आत्मीय भावना ⇒ समुदायातील सदस्यांना एकमेकांविषयी प्रेम, सहानुभूती किंवा आपलेपणा वाटतो, यालाच आत्मीय भावना असे म्हणतात.

*[ब] कार्यभावना ⇒ समुदायाविषयी आपुलकी वाटत असल्यामुळे समुदायाबद्दल आपले काही कर्तव्य आहे असे समुदायातील व्यक्तींना वाटते. त्यालाच कार्यभावना असे म्हणतात.

*[क] अवलंबन भावना ⇒ व्यक्तींच्या गरजांची पूर्ती ही समुदायाद्वारे होत असते. त्यामुळे व्यक्तीला आपल्या आवश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी समुदायावर अवलंबून राहावे लागते.

* ③ सामान्य जीवन ⇒ समुदायातील सर्व सदस्यांची जीवन जगण्याची पद्धत ही एकसारखी असते. कारण हे सर्व सदस्य एका विशिष्ट भूप्रदेशात राहत असल्यामुळे त्यांच्या चालीरीती, परंपरा, जीवन जगण्याची पद्धत इत्यादीमध्ये समानता आढळते.

* ④ स्थायित्व ⇒ समुदायातील लोक विशिष्ट भूप्रदेशात राहत असल्यामुळे त्या भूप्रदेशाविषयी त्यांच्यात आपलेपणाची भावना निर्माण होते सर्व सदस्य तिथे स्थायी स्वरूपात राहतात. बहुधा समुदायातील लोक आपला भूप्रदेश सोडून जात नाहीत. त्यामुळे स्थायीत्व एक वैशिष्ट्य आहे.

* ⑤ सामान्य नियम ⇒ प्रत्येक समुदायाचे काही निश्चित नियम असतात याचाच अर्थ प्रत्येक समुदायात नियमांची एक सामान्य व्यवस्था असते समुदायातील लोक त्या नियमांचे पालन करतात. म्हणून सामान्य नियम हे समुदायाचे एक वैशिष्ट्य आहे.

* ⑥ विशिष्ट नाव ⇒ प्रत्येक समुदायाचे एक विशिष्ट नाव असते. त्या नावानेच तो समुदाय ओळखला जातो. समुदायाच्या नावामागे भौगोलिक, सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भ असतात.

## समुदाय आणि समाज यामधील फरक [Distinction between Community and Society]

| समुदाय [Community] | समाज [Society] (11) |
|---|---|
| ① समुदाय हा व्यक्तींचा एक समूह आहे | ① समाज सामाजिक संबंधाचे जाळे आहे |
| ② समुदाय एक मूर्त धारणा आहे. | ② समाज एक अमूर्त धारणा आहे |
| ③ समुदायाकरिता निश्चित भूप्रदेश ही एक आवश्यक अट आहे. | ③ समाजाकरिता निश्चित भूप्रदेशाची आवश्यकता नाही |
| ④ समुदायामध्ये 'सामुदायिक भावना' किंवा 'आपलेपणाचीभावना' असणे आवश्यक आहे | ④ समाजाकरिता 'सामुदायिक भावना' किंवा 'आपलेपणाची भावना' आवश्यक नाही. |
| ⑤ एका समुदायात एकापेक्षा अधिक समाज असू शकत नाही | ⑤ एका समाजात अनेक समुदाय असू शकतात. |

युनिट क्र. (1) डॉ. जी. एस. घुर्ये [Dr. G. S. Ghurye; 1893-1983] B.A.II (01) युनिट क्र. 1

* **जीवन परिचय** :- डॉ. जी. एस. घुर्ये या थोर भारतीय समाजशास्त्रज्ञाचा जन्म 12 डिसेंबर 1893 मध्ये मालवण येथे एका व्यापारी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मालवण-पुन्हा व देवगड येथे झाले. त्यांचे थोरले बंधू वासुदेव यांच्या संपूर्ण कुटुंबियांना घेऊन मुंबईत वास्तव्याला आलेत. त्यामुळे घुर्ये यांचे संपूर्ण शिक्षण मुंबई येथे झाले. 1918 मध्ये संस्कृत व इंग्रजी विषय घेऊन ते मुंबई विद्यापीठातून एम.ए. झालेत. या परीक्षेत उत्तम यश मिळविल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे 'कुलपती' हे सुवर्ण पदक त्यांना मिळाले. 1919 मध्ये सर पॅट्रिक गीडीस यांच्या नेतृत्वाखाली मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विषय सुरू झाला होता. यांच्या प्रेरणेमुळे घुर्ये हे समाजशास्त्राकडे वळले.

* घुर्ये यांना शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमधील केंब्रीज विद्यापीठात पाठविण्याची शिफारस प्रा. गीडीस यांनी मुंबई विद्यापीठाला केली. त्यामुळे घुर्येंना 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' व केंब्रीज विद्यापीठात प्रवेश मिळाला. डॉ. रिव्हर्स व हॅडन यांच्या मार्गदर्शनाखाली 1923 मध्ये 'जातीच्या मानववंशशास्त्रीय सिद्धांत' या प्रबंधाबद्दल त्यांना पीएच.डी मिळाली.

* डॉ. घुर्ये 1924 मध्ये भारतात परत आले. आणि त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये समाजशास्त्र विषय शिकविण्यास सुरुवात केली. जून 1924 मध्ये मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात प्रपाठक आणि विभागप्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली. 1924 ते 1959 पर्यंत जवळ पास 35 वर्ष ते मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. 1960 मध्ये मुंबई विद्यापीठात 'गुणश्री प्राध्यापक' म्हणून नियुक्ती झाली. 1936 ते 1968 पर्यंतच्या काळात जवळपास 55 विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. करणारे डॉ. एम. एन. श्रीनिवास, डॉ. के. एम. कापडीया, डॉ. विलास संगवे, डॉ. वाय. बी. दामले, डॉ. एम. जी. कुलकर्णी, हे काही प्रमुख संशोधक होत.

* भारतात समाजशास्त्राच्या अध्ययनास चालना मिळावी म्हणून डॉ. जी. एस. घुर्ये यांनी 1951 मध्ये 'Indian Sociological Society' या संस्थेची स्थापना करण्यात विशेष पुढाकार घेतला. संपूर्ण भारतात मुंबई समाजशास्त्रीय अध्ययनाचे प्रमुख केंद्र म्हणून विकसित करण्यामध्ये त्यांचे मोठ्याचे योगदान आहे. इतिहास, मानवशास्त्र, पुरातत्वशास्त्र, वास्तुशास्त्र, साहित्य, कला, धर्म या विषयाशी त्यांनी समाजशास्त्राशी सांगड घातली. भारतातील जाती आणि वंश, आदिवासी, कुटुंब संस्था, वैवाहिक संबंध, सामाजिक तणाव, भारतीय परंपरा, धर्मविषयक जाणीव इत्यादी विषयावर त्यांनी ग्रंथ लिहिलेत.

* पुण्याजवळील 'लोणीकंद' या खेड्याचा इ.स. 1819 मध्ये इंग्रज लेखक कोट्स यांनी अभ्यास केला होता. डॉ. घुर्ये यांनी पुन्हा त्याच गावाचा अभ्यास करून आपले निष्कर्ष 'After a Century and Quarter' 1960 या ग्रंथात नमूद केले. या गावातील सामाजिक परिवर्तनाचा शोध त्यांनी घेतला. 'Caste and Race in India (1932) या आपल्या पहिल्याच ग्रंथात समाज मनात खोलवर रुजलेल्या जातीचे व त्यांचे उच्चाटन करण्याच्या उपायांचे विश्लेषण त्यांनी केले. जोतीराव फुले यांच्या जातीविषयक उच्चाटनाच्या कार्यावर ग्रंथ लिहिणारे डॉ. घुर्ये हे पहिलेच समाजशास्त्रज्ञ होत. आदिम समाजव्यवस्थेचे सूक्ष्मपणे अध्ययन करून 1943 मध्ये 'The Aborigins, so called Their Future' या नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. आदिवासी लोक भारतीय रहिवासी होत हे स्पष्ट करून त्यांच्या समस्यांबद्दलचे वस्तुनिष्ठ विश्लेषण डॉ. घुर्येंनी यांग्रंथात केले आहे.

* भारतीय समाजव्यवस्थेतील स्तरीकरणाचे विवेचन हे जात वर्ग आणि व्यवसाय यांच्या आधारे घेऊन डॉ. घुर्येंनी केले आहे. त्यांनी या संदर्भात 'Caste, Class and Occupation' (1961) हा ग्रंथ लिहिला. ग्रामीण व शहरी समाजाच्या तुलनात्मक दृष्टया अभ्यास करणारा 'Anatomy of a Rural and Urban Community' (1963) हा ग्रंथ लिहिला. धार्मिक स्वरूपाच्या जाणीवांचे स्पष्टपणे विश्लेषण करणारा 'Religious Consciousness' (1965) हा ग्रंथ प्रसिद्ध केला. भारतीय विवाह संस्थेचा ऐतिहासिक व तुलनात्मक दृष्टया अनेक पाश्चात्य व भारतीय समाजशास्त्रज्ञांनी अभ्यास केला आहे. ब्राम्हण समाजात गोत्र व चरण तंत्राचा सखोल केला जातो असे घुर्येंना आढळून आले. त्या संदर्भात त्यांनी 'To Brammnical Institutions; Gotra and Charan' (1972) हा ग्रंथ लिहिला.

* भारतात स्वातंत्र्यापूर्वीपासूनच राष्ट्रीय एकतेची समस्या निर्माण झाली आहे. राष्ट्रीय एकतेची ही समस्या प्रामुख्याने सामाजिक तणावातून उद्भवली असल्याचे डॉ. घुर्ये यांनी प्रतिपादन केले आहे. या प्रश्नांच्या संदर्भात समाजशास्त्रीय अध्ययन करून डॉ. घुर्ये यांनी 'Social Tensions of India' (1968) हा ग्रंथ लिहिला. हिंदू-मुस्लिमांमधील कटु संबंध देशातील सामाजिक संघर्षाचा एक सर्वात महत्त्वाचा स्त्रोत आहे ज्यामुळे भारताची एकता धोक्यात आहे. असे स्पष्टपणे प्रतिपादन डॉ. घुर्ये यांनी केले.

* 1957 च्या सुमारास मुंबई सरकारच्या शिक्षण संचालनामार्फत पश्चिम महाराष्ट्रातील 'भिल्ल' आणि 'महादेव कोळी' या जमातींचे सर्वेक्षणात्मक कार्य त्यांनी हाती घेतले होते. त्यांच्या शिफारस मुंबई सरकारला त्यांनी सादर केल्या 1971 मध्ये फ्रांसमध्ये जागतिक समाजशास्त्र परिषद होण्याचे निमंत्रण त्यांना मिळाले. संयुक्त राष्ट्रांच्या निधीमधून त्यांना त्या आंतरराष्ट्रीय चर्चेत भाग घेण्याचे आमंत्रण होते. भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' ही बहुमानाची पदवी देण्याचे ठरविले होते. परंतु त्यांनी तो सन्मान देशातील नाकारला. संशोधन क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना अभिमान वाटावा असा सन्मान डॉ. घुर्ये मिळाला. मौलिक संशोधन, संशोधनाचा व्यापार - माहिती, वस्तुनिष्ठ दृष्टिकोन, अष्टपैलू विद्वत्ता इत्यादी गुणांमुळे डॉ. घुर्ये यांचे समाजशास्त्रीय लेखन अत्यंत मूलगामी व विचारपूर्वक ठरले आहे असा थोर भारतीय समाजशास्त्रज्ञाचे निधन 1983 मध्ये झाले. B.A. II (62)

डॉ. जी. एस. घुर्येंची ग्रंथसंपदा :- (1) Caste and Race in India -(1932)
(2) The Aborigins; So called Their Future -(1943)
(3) Family and Kinships in Indo Eurapian Culture -(1955)
(4) cities and civilization -(1955) (5) Bharatnatyam and Its Costom -(1958)
(6) After a Century and Quarter -(1960) (7) caste, class and occupation -(1961)
(8) Gods and Men -(1962) (9) Anotomy of a Rural and Urban Community -(1963)
(10) The Scheduled Tribes -(1963) (11) Religious Consciousness -(1965)
(12) Indian Custom -(1966) (13) Social Tensions of India -(1968)
(14) To Brammnical Institutions; Gotra and Charan -(1971)
(15) whither India -(1974) (16) India Recreates Democracy - 1978

इत्यादी विविध ग्रंथ डॉ. घुर्ये यांनी लिहिले. विविध विषयावरची ही ग्रंथसंपदा लक्षात घेता, त्यांच्या संशोधनाचे क्षेत्र हे फार मोठे असल्याचे स्पष्ट होते.

## // जातीच्या उत्पत्तीच्या वांशिक सिद्धांत

* डॉ. घुर्ये यांच्यापूर्वी अनेक विदेशी आणि काही भारतीय अभ्यासकांनी जातीव्यवस्थेचा अभ्यास केले. परंतु जातीव्यवस्थेचा संकीर्ण विचार त्यांच्यापूर्वी कोणीच केलेला होता. असे मत डॉ. उत्तम मोहिते यांनी व्यक्त केले. डॉ. घुर्ये यांनी जातीव्यवस्थेच्या उत्पत्तीसंबंधीचे अभ्यासपूर्ण विचार मांडलेले आहेत.

* जातीव्यवस्थेच्या निर्मितीबाबत प्रामुख्याने पुढील चार विचारप्रवाह आवश्यक असल्याचे डॉ. घुर्ये यांनी स्पष्ट केले आहे.

* (1) भारतात निरनिराळ्या वंशाचे लोक राहत होते. आणि निरनिराळ्या जाती या वांशिक भेदामुळे निर्माण झाल्यात.

* (2) निरनिराळ्या स्वरूपाचे व्यवसाय करणाऱ्या लोकांचे सुसंघटीत असे संघ निर्माण झाले. ते व्यवसाय त्या संघामध्ये वंशपरंपरेने केले जाऊ लागले. या व्यावसायिक संस्थांनी आपले सामाजिक जीवन आपल्या पुरते मर्यादित केले. या संघांना जातीचे स्वरूप प्राप्त झाले आणि त्यातून पुढे जातीव्यवस्था निर्माण झाली.

* (3) हिंदूमध्ये प्रथम वर्ण निर्माण झाले आणि त्यांच्या अंतर्गत विभाजनाच्या तसेच परस्परांशी झालेल्या संकराच्या प्रक्रियांमधून निरनिराळे गट निर्माण झाले. आणि त्यांची मिळून जातिव्यवस्था निर्माण झाली.

* (4) भारतात प्रथम निरनिराळे सांस्कृतिक-वांशिक गट-जनजाती होत्या. त्यांतूनच पुढे जातिव्यवस्था निर्माण झाली.

* जातीव्यवस्थेचे स्वरूप खूप गुंतागुंतीचे आहे. तसेच जातींच्या गटांमध्ये इतकी विविधता आढळते की, कोणत्याही एका सिद्धांताच्या आधारे जातीव्यवस्थेची उत्पत्ती शोधता येणार नाही. याची जाणीव घुर्येंना होती. म्हणून त्यांनी आपल्या 'Caste class and occupation' या ग्रंथातील जातीव्यवस्थेच्या उत्पत्तीबाबतचे विश्लेषण करणाऱ्या प्रकरणाला, 'Origins of the caste System' असे शीर्षक दिले आहे.

* डॉ. घुर्ये यांच्या मते, इ.स.पूर्व 2000 च्या सुमारास आर्य लोक भारतात आले तेव्हा त्यांच्या मध्ये ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे तीन वर्ण झालेले होते. या तीन वर्णांमध्येच आप आपसात विवाह करायचा हे बंधन नव्हते. तरी देखील त्यांच्यात अशा प्रकारचे विवाह हे क्वचित प्रसंगी होत असावे. ऋग्वेदातील शूद्र वर्णाचा उल्लेख तत्कालीन दास म्हणजे अनार्य लोक. घुर्येंनुसार आर्यांनी ज्यांच्यावर स्वामित्व मिळविलेले होते असा मूळच्या स्थानिक रहिवाशांचा शूद्र वर्ण बनलेला होता. हिंदू जातीव्यवस्था ही आर्यांनी निर्माण केली होती

यासंबंधी आपल्या विचारांशी घुर्ये सहमत होते. जातिव्यवस्था ही स्थानिक लोकांनी निर्माण केलेली एक संस्था होती. असे ओल्डनबर्ग व हटन यांनी मांडलेले मत ते अमान्य करतात.

* भारतात आलेले वेदकालीन आर्य स्वतःला आर्य म्हणून घेत असत. त्यांनी जिंकलेल्या स्थानिक लोकांना 'दास' म्हणून संबोधित असत. आर्यांनी स्वतःला दासांपासून वेगळे ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला डॉ. घुर्ये यांनी उदाहरणासह हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला की, तिथे तिथे त्यांनी स्वतःला स्थानिक लोकांपासून अलग ठेवण्याचा प्रयत्न केला. भारतात आलेल्या आर्यांनी येथील मूळच्या रहिवाशांना जिंकले पण त्यांना आपल्या धार्मिक सांस्कृतिक जीवनात सहभागी करून घेतले नाही. स्वतःला वांशिक व सांस्कृतिक दृष्ट्या श्रेष्ठ समजून इतरांना हीनतेने वागविले. परंतु ज्या स्थानिक लोकांनी आर्यांचे स्वामित्व मान्य केले त्यांना 'शूद्र' हा चौथा असा वर्ण निर्माण करून त्यांना आपल्या समाजरचनेच्या परिघांतर्गत एक अंग म्हणून स्विकार केला.

* डॉ. घुर्ये हे स्पष्टपणे असे प्रतिपादन करतात की, आर्यांमधील ब्राम्हण हे आर्यांचे नैतिक मार्गदर्शक व कायदे तयार करणारे होते. हे ब्राम्हण आर्य पुढे जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांनी अंतर्गत विवाहाचा नियम व जातिव्यवस्थेची इतर वैशिष्ट्ये नेली आणि तिथे त्यांनी वेगवेगळा व्यवसाय करणाऱ्यांमध्ये अलगता निर्माण केली. अंतर्गत विवाहाचा नियम त्यांनाही पाळावयाला भाग पाडले. डॉ. घुर्येंच्या मते, अंतर्गत विवाहाचा व निरनिराळ्या गटांमधील रोटी व्यवहारावरील निर्बंध हे ब्राम्हण आर्यांनी स्वतःची शुद्धता अबाधित राखण्यासाठी केले व ते इतरांनाही पाळावयाला उत्तेजन दिले. त्यामुळे जातिव्यवस्था प्रस्थापित होण्यास मदत झाली.

* प्रत्येक समाजात निरनिराळ्या व्यवसायाच्या श्रेष्ठ-कनिष्ठ असा दर्जा ठरविला जातो. आणि त्यावरून ते व्यवसाय करणाऱ्या लोकांचा सामाजिक दर्जा निश्चित करण्यात येतो. ब्राम्हण आर्यांनी धार्मिक शुचितेला विशेष महत्त्व दिले. आणि या शुचितेचा संबंध त्यांनी व्यवसायाशी जोडला. त्यामुळे स्वच्छ व्यवसाय करणाऱ्या जातींना अस्वच्छ-व्यवसाय करणाऱ्या जातीपेक्षा अधिक उच्च सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा मिळाली आणि व्यावसायिक जातीची एक श्रेष्ठ-कनिष्ठ अशी उतरंड निर्माण झाली. अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्यांना अस्पृश्य मानले गेले. आणि त्यांना समाजाच्या परिघाबाहेर ठेवण्यात आले असे मत डॉ. घुर्ये यांनी मांडले.

B.A.II (03)

## * जाती- उपजाती [Caste - Subcaste] :-

* डॉ. घुर्येंच्या मते, 'जातिव्यवस्थेचे अंतर्गत विवाह हे प्रमुख वैशिष्ट्य असून जाती याच केवळ अंतर्विवाही गट आहेत असे नाही तर उपजातीही अंतर्विवाहाचा नियम पाळतात म्हणून त्यांनाही जातीसमान मानले पाहिजे' डॉ. घुर्ये प्रमाणेच डॉ. इरावती कर्वे यांनी सुद्धा उपजाती याच जाती आहेत. आणि तथाकथित जाती म्हणजे एकच व्यवसाय करणाऱ्या जातींचा जातिपुंज म्हणजे आहे. उपजाती या कोणकोणत्या कारणामुळे निर्माण होतात याचे सविस्तर विश्लेषण डॉ. घुर्ये यांनी केले आहे. त्यांनी उपजातीच्या निर्मितीस कारणीभूत असणाऱ्या घटकांमध्ये पुढील घटक प्रमुख मानले आहेत.

* (1) एकाच जातीचे लोक निरनिराळ्या प्रदेशामध्ये राहत असतील तर वास्तव्य करणाऱ्या प्रदेशानुसार त्या जातीत उपजाती निर्माण होतात. उदा :- देशस्थ, कोकणस्थ, कनोजी

* (2) दोन जातींच्या संकरातून जन्मलेल्या काही उपजाती निर्माण झाल्या आहेत. उदा. भिलाला ही उपजात राजपूत पुरुष व भिल्ल स्त्री यांच्या संबंधातून निर्माण झालेल्या लोकांची आहे.

* (3) जातीच्या व्यवसायाच्या संदर्भात जसा डॉ. घुर्ये यांनी विचार केला तसाच त्यांनी उपजातीच्या संदर्भात देखील केला आहे. व्यवसाय भिन्नतेमुळे सुद्धा उपजाती कशा निर्माण होतात. हे त्यांनी उदाहरणासह स्पष्ट केले आहे. उदा :- उत्तर प्रदेशातील चिमार या जातीमध्ये सिंगारीया (शिंगाड्याची लागवड करणारे), टांकीवाले (टांकी लावणारे) अशा प्रकारच्या उपजाती आहेत. एकच व्यवसाय करणाऱ्या जातीमध्ये व्यवसायाच्या निरनिराळ्या तंत्रावरून व साधनावरून उपजाती निर्माण होतात. उदा :- महाराष्ट्रात कुंभारामध्ये लहान-चाके (लहान चाके वापरणारे) व थोर चाके (मोठे चाक वापरणारे) अशा उपजाती आहेत.

* (4) निरनिराळ्या धार्मिक चळवळीमधून सुद्धा काही उपजाती निर्माण झालेल्या आहेत. उदा :- उत्तर प्रदेशातील ब्राम्हणांची बिश्नोई ही उपजात.

* (5) काही वेळ विशिष्ट रूढी किंवा वर्तनप्रकार पाळण्यावरून सुद्धा उपजाती निर्माण झाल्या आहेत.

उदा :- कातकऱ्यांमध्येच गाईबैलांचे मांस खाणारी एक ढोर उपजात आहे. इतर लोक गाईबैलांचे मांस खात नाही.

* (6) काही धार्मिक पंथ-उपपंथांना उपजातीचे स्वरूप प्राप्त झाले आहेत. उदा :- ब्राम्हणांतील ऋग्वेदी, यजुर्वेदी या उपजाती.

## * जातीव्यवस्थेच्या इतिहासाचे कालखंड :- B.A.II (04)

* जाती व्यवस्थेची निर्मिती कशी झाली याबाबतच्या विश्लेषणाबरोबरच धार्मिक ग्रंथांच्या आधारावर इतिहासाच्या निरनिराळ्या कालखंडामध्ये जातीव्यवस्थेचे स्वरूप कसे होते आणि त्यामध्ये कसे बदल होत गेले याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न डॉ. घुर्ये यांनी केला आहे. जातीव्यवस्थेच्या २५०० वर्षांच्या प्रदीर्घ अशा इतिहासाबाबत घुर्ये यांनी जे निष्कर्ष काढले ते अनुमानात्मक आणि होवक स्वरूपाचे असणे स्वाभाविक आहे.

* ① **वैदिक कालखंड** :- इ.स. पूर्व १००० वर्षांपर्यंतचा हा कालखंड आहे म्हणजेच वैदिक संहिता व ब्राह्मण ग्रंथांचा हा कालखंड होय.

* ② **वैदिकोत्तर कालखंड** :- इ.स. ३०० वर्षांपर्यंतचा हा कालखंड मानला आहे. आर्यांचे पवित्र ग्रंथ, महाकाव्ये, बौद्धांचे वाङ्मय निर्माण झालेला हा कालखंड आहे.

* ③ **धर्मशास्त्राचा कालखंड** :- इ.स. १० ते १४ व्या शतकापर्यंतचा हा कालखंड होय. मनु, याज्ञ, वल्लभ, पाराशर, हेमाद्री इत्यादींच्या लिखाणाचा हा कालखंड होय.

* ④ **आधुनिक काळ** :- या कालखंडात १९ व्या शतकापासून तर २० व्या शतकापर्यंतच्या काळाचा समावेश करण्यात आला आहे.

* जातीव्यवस्थेच्या अभ्यासावरून डॉ. घुर्ये असा निष्कर्ष काढतात की, 'जातिव्यवस्था ही भारत आणि ... आर्यांनी, ब्राह्मण वर्गाने निर्माण व विकसित केली आणि तेथूनच ती देशाच्या इतर भागात प्रसार पावली. जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीबाबत विचार करतांना डॉ. घुर्ये म्हणतात. की उच्च वर्गांना विशेष हक्क आणि कनिष्ठ वर्गांसाठी अपमान' हे सर्व वर्ग-समाजाचे सार्वत्रिक स्वरूपाचे लक्षण आहे. त्यामुळे चार जातींचे अधिकार आणि अपमानाच्या ब्राह्मणी सिद्धांताचे विशेष विश्लेषण करण्याची आवश्यकता नाही. फक्त हिंदू व्यवस्थेत आढळणारी अस्पृश्यता ही मात्र एक वैशिष्ट्यपूर्ण आहे. धार्मिक कार्यापासून काही लोकांना वगळण्याची प्रथा ब्राह्मण ग्रंथाच्या काळापासूनच प्रचलित होती. स्पर्शाने विटाळ होतो. ही कल्पनाही त्याच कालखंडात ... काही लोकांना ते करीत असलेले व्यवसाय अस्वच्छ असल्यामुळे अस्पृश्य मानले जाते.

## जातीची वैशिष्ट्ये [Characteristics of Caste]

* ① **समाजाचे खंडात्मक विभाजन** :- डॉ. घुर्ये यांच्या मते, हिंदू समाज हा वेगवेगळ्या जातींच्या गटांमध्ये विभागला आहे. प्रत्येक जात ही सामाजिक दर्जावर आधारलेला गट आहे. जातीच्या वर्तुळात व्यक्तीला आपले सर्वांगीण जीवन जगावे लागते. हे जातीचे एक प्रमुख वैशिष्ट्य होय. तसेच प्रत्येक जातीची स्वतःची अशी सांस्कृतिक वैशिष्ट्ये असतात. त्यामुळे प्रत्येक जात हा एक सांस्कृतिक गट असतो. यामुळे हिंदू समाजाचे वेगवेगळ्या गटात विभाजन होते.

* ② **अधिक्रम व्यवस्था** :- भारतात प्रत्येक प्रदेशात ज्या जाती आढळतात. त्यांच्या सामाजिक दर्जाच्या दृष्टीने श्रेष्ठ-कनिष्ठ असा सर्वसामान्य क्रम ठरलेला आढळतो. ब्राह्मण जातीचा दर्जा मात्र सगळीकडे सर्वश्रेष्ठ समजला जातो. दक्षिणेत अशा काही कारागीर जाती आहेत. की ज्या श्रेष्ठत्वासाठी ब्राह्मणांबरोबर स्पर्धा करतांना आढळतात. असे डॉ. घुर्ये यांना नमूद केले आहे.

* ③ **सामाजिक व्यवहार आणि रोटी व्यवहारावरील निर्बंध** :- वेगवेगळ्या जातीच्या लोकांनी परस्परांबरोबर कोणत्या स्वरूपाचे संबंध ठेवावेत यासंबंधीचे हिंदू धर्मात निश्चित अशा प्रकारचे नियम तयार केलेले आढळतात. कोणत्या दुसऱ्या जातीने कोणत्या जातीकडून कच्चे किंवा पक्के अन्न घ्यावयाचे किंवा घ्यायचे नाही. हे ठरविणारे नियम भारतात व्यापक प्रमाणात आढळतात. खालच्या जातीसोबत उठणे-बसणे, हुक्का पिणे, प्रवास करणे, ... विहिरी किंवा तलावावरून पाणी आणणे, मंदीर प्रवेश इत्यादी सर्व व्यवहारांवर बंदी होती.

* ④ **नागरी व धार्मिक हक्कांची विषम वाटणी** :- जातिव्यवस्था ही विषमतेवर आधारीत असलेली व्यवस्था आहे. असे मत डॉ. घुर्ये यांनी मांडले 'काही जातींना विशेष अधिकार प्रदान करण्यात आलेत. याउलट काही जातींना ते हक्क नाकारण्यात आलेत. जातिव्यवस्थेच्या नियमानुसार अस्पृश्य जातीच्या लोकांवर सामाजिक, धार्मिक निर्बंध लादण्यात आलेत. अशाप्रकारे जाती-व्यवस्थेत उच्च जातींना विशेष नागरी आणि धार्मिक हक्क देण्यात आले होते तर खालच्या स्तरातील लोकांना नागरी आणि धार्मिक हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते.

* ⑤ **विवाहावरील निर्बंध** :- व्यक्तीने आपला विवाह आपल्या जातीतच केला पाहिजे अशा प्रकारचे बंधन होते. हा अंतर्विवाहाचा नियम, उपजातींना देखील पाळला जात होता. अंतर्विवाहाचा नियम हा जातीसंस्थेचा मूळ गाभा आहे. असे घुर्ये मानतात. तर काही भागात श्रेष्ठ जातीच्या पुरुषांनी कनिष्ठ जातीच्या स्त्रीसोबत विवाह करणे, मान्य ... अनुलोम विवाह असे म्हटले आहे.

* ⑥ **व्यवसाय निवडीवरील निर्बंध** :- डॉ. घुर्ये स्पष्ट करतात की प्रत्येक जातीचा एक स्वतंत्र व्यवसाय होता. आणि व्यक्तीला आपल्या जातीचाच व्यवसाय करावा लागत असे. याचा अर्थ व्यक्तीला व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते अनेक जातींना त्यांचा पारंपारिक व्यवसाय होता. आणि व्यक्तीने तोच पारंपारिक व्यवसाय केला पाहिजे असे बंधन होते.

# डॉ. बी. आर. आंबेडकर [1891–1956] जीवन परिचय ⇒

* डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 मध्ये मध्य प्रांतातील महू येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी सपकाळ असे होते. 1893 मध्ये सुभेदार रामजी हे कुटुंबियांसह रत्नागिरी जिल्ह्यातील 'दापोली' येथे वास्तव्यास आले. 1897 मध्ये त्यांची पत्नी भीमाबाई यांचे सातारा येथे निधन झाले. सातारा येथील सरकारी विद्यालयात भीमरावांचे इयत्ता चौथी पर्यंत प्राथमिक शिक्षण झाले.

* भिमरावांना शालेय जीवनात च अस्पृश्यता किती भयानक असते याची जाणीव झाली होती. त्यावेळच्या जातीव्यवस्थेचे विदारक चटके त्यांना लहानपणापासून सोसावे लागले. 1904 मध्ये डॉ. आंबेडकरांचे वडील मुंबईला आले. त्यावेळी एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये भिमरावांनी प्रवेश घेतला व 1907 मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्याच वर्षी त्यांचा विवाह रमा वलंगकर या मुलीशी झाला. भीमरावांचे कॉलेजचे शिक्षण, त्यांचे शिक्षक श्री. कृष्णाजी केळूसकर यांच्या मध्यस्थीने बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केले. एक हुशार विद्यार्थी म्हणून केळूसकर गुरुजींना भीमरावांचे खूप कौतुक होते. डॉ. आंबेडकरांनी बी. ए. ची पदवी प्राप्त केल्यावर ते बडोदा सरकारच्या नोकरीत लागले. पण या ठिकाणी त्यांना अस्पृश्यतेचे वाईट अनुभव आले. त्यामुळे नोकरी त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. याच सुमारास 2 फेब्रुवारी 1913 ला त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला.

* सयाजीराव गायकवाडांनी डॉ. आंबेडकरांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात पाठविले. या ठिकाणी डॉ. सेलिगमन हे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ त्यांचे प्राध्यापक होते. डॉ. आंबेडकरांना 1915 मध्ये 'भारतातील व्यापार' या प्रबंधावर अर्थशास्त्रातील एम. ए. ची पदवी मिळाली. 16 मे 1916 मध्ये कोलंबिया विद्यापीठात भरलेल्या मानववंशविज्ञान परिषदेत 'भारतातील जाती, त्यांची यंत्रणा उत्पत्ती आणि विकास' हा शोध प्रबंध त्यांनी वाचला. जून 1916 मध्ये 'भारताचा राष्ट्रीय लाभांश, ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावरील पीएच. डी च्या प्रबंध कोलंबिया विद्यापीठास सादर केला. त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स' मध्ये प्रवेश घेतला. 1917 मध्ये ते भारतात परत आले.

* डॉ. आंबेडकरांना भारतात परतल्यावर बडोदा संस्थानात लष्करी सचिवाची नोकरी मिळाली. विदेशात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांचा डॉ. आंबेडकरांवर प्रभाव पडला होता. तथापि भारतातील जाती द्वेषामुळे त्यांनी बडोदा संस्थानची नोकरी सोडली. नंतर मुंबई येथील सिडनहॅम कॉलेजमध्ये ते प्राध्यापक म्हणून 11 नोव्हेंबर 1917 ला रुजू झाले. 1920 पर्यंत ते या नोकरीत होते. पुढे छत्रपती शाहू महाराजांच्या मदतीने ते पुन्हा 1921 ला लंडनला गेले. लंडन विद्यापीठाने त्यांच्या 'ब्रिटिश हिंदुस्थानातील साम्राज्यवादी प्रांतिक विकेंद्रीकरण' या विषयावरील प्रबंधावर एम. एस्सी. (अर्थशास्त्र) ची पदवी प्रदान केली. 1923 मध्ये त्यांनी 'रुपयाची समस्या, त्याचे मूळ आणि त्यावर उपाय' हा प्रबंध अर्थशास्त्रातील 'D.Sc.' साठी सादर केला. लंडनच्या पी. एस. किंग आणि कंपनीने हा प्रबंध डिसेंबर 1923 मध्ये प्रसिद्ध केला.

* उच्च शिक्षणासोबतच डॉ. आंबेडकरांनी दलितांच्या विकासासाठी सामाजिक कार्य सुरू केलेले होते. दलितांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 31 जानेवारी 1920 मध्ये 'मूकनायक' हे साप्ताहिक त्यांनी सुरू केले. 21 मार्च 1920 ला कोल्हापूर संस्थानातील 'माणगाव' येथे छत्रपती शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली 'दलितांची परिषद' घेण्यात आली. या परिषदेत छत्रपती शाहू महाराज म्हणाले की, डॉ. आंबेडकर यांच्या रूपाने दलितांना त्यांचा नेता लाभला.

* 1924 मध्ये डॉ. आंबेडकरांनी सामाजिक कार्य करण्याच्या हेतूने 'बहिष्कृत हितकारिणी सभेची' स्थापना केली, पुढे 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र 3 एप्रिल 1927 मध्ये सुरू केले. त्यानंतर सामाजिक आंदोलने करण्यास त्यांनी सुरुवात केली. 20 मार्च 1927 मध्ये त्यांनी महाडचा सत्याग्रह केला. शूद्र आणि अस्पृश्यांना कोणताही सामाजिक, धार्मिक, राजकीय अधिकार नाही असे प्रतिपादन करणाऱ्या 'मनुस्मृती' या ग्रंथाचे 25 डिसेंबर 1927 मध्ये दहन करण्यात आले. 1930 मध्ये 'काळाराम मंदिर' सत्याग्रह करण्यात आला. 1930 आणि 1931 मध्ये लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकरांनी भाग घेतला. 24 सप्टेंबर 1932 मध्ये गांधीजी आणि आंबेडकरांमध्ये ऐतिहासिक पुणे करार झाला. 3 मार्च 1930 ला 'जनता' हे पाक्षिक सुरू केले. 27 मे 1935 डॉ. आंबेडकरांची पत्नी रमाबाईंचे निधन झाले. पत्नीच्या निधनामुळे ते फार दुःखी झाले. 2 जून 1935 मध्ये मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी त्यांची नियुक्ती झाली.

13 ऑक्टोबर 1935 मध्ये नाशिक जिल्ह्यातील 'येवले' येथील परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली आणि सांगितले की, "मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही!"



* 15 ऑगस्ट 1936 मध्ये डॉ. आंबेडकरांनी, स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. 1937 मध्ये डॉ. आंबेडकर मुंबईच्या विधीमंडळावर निवडून आले. त्यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे 17 आमदार निवडून आले होते. 20 जुलै 1942 मध्ये 'व्हाईसराय कार्यकारी कौन्सिल' मध्ये मजूरमंत्री म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली याच वर्षी त्यांनी 'ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची' स्थापना केली. 1942 मध्ये नागपूरला भरलेल्या 'अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेत' डॉ. आंबेडकरांनी शिक्षण घ्या! संघटीत व्हा! आणि संघर्ष करा. असा संदेश दिला.

* अस्पृश्य समाजात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात प्रसार व्हावा म्हणून डॉ. आंबेडकरांनी 8 जुलै 1945 रोजी 'पिपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. या सोसायटीतर्फे मुंबई, औरंगाबाद येथे अनुक्रमे 'सिद्धार्थ' आणि 'मिलींद' ही महाविद्यालये सुरू केलीत. 1946 मध्ये डॉ. आंबेडकर हे बंगाल मधून घटनासमितीवर निवडून आलेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची राज्यघटना लिहिण्याची कामगिरी डॉ. आंबेडकरांनी पार पाडली. स्वतंत्र भारताचे ते पहिले कायदेमंत्री बनले. पुढे 1951 मध्ये 'हिंदू कोड बिल' नामंजूर झाल्यामुळे त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. ते 1952 मध्ये राज्यसभेवर निवडून आलेत. भारताची राज्यघटना लिहिल्याबद्दल कोलंबिया विद्यापीठाने त्यांना 6 जून 1952 रोजी 'एल.एल.डी.' ही सन्माननीय पदवी दिली.

* 14 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ. आंबेडकरांनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि आपल्या लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. अशा या जगविख्यात विद्वान महापुरुषाचे महापरिनिर्वाण 6 डिसेंबर 1956 रोजी दिल्ली येथे झाले.

## डॉ. बी. आर. आंबेडकर यांची ग्रंथसंपदा

* (1) Castes in India, Their Mechanism Genesis and Development (1916) (2) Mr. Russel and Reconstruction of society, (1918) (3) The problem of Rupee; Its origin and Its Solution (1923) (4) The Evolution of Provincial Finance in British India (1925) (5) Annihilation of caste, (1936) (6) Federation Versus Freedom (1939) (7) Ranade, Gandhi and Jinnah (1943) (8) Mr. Gandhi and Emancipation of the Untouchables (1943) (9) Communal dead lock and a way to solve it, (1945) (10) What Congress and Gandhi have done to the Untouchable (1945) (11) Pakistan or the Partition of India (1946) (12) Who were the Shudras (1947) (13) State and minorities (1947) (14) The Untouchables, who are they and why they became Untouchables; (1948) (15) Thoughts on Linguistic States (1955) (16) Buddha and his Dhamma (1956) (17) Untouchables or the Children of India's Ghetto (18) Philosophy of Hinduism (19) India and Pre-requisites of Communism (20) Revolution and Counter - Revolution

## जातीची समीक्षा [Criticism of caste] [टीका]

* जातीची समीक्षा करतांना डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले की, जातिव्यवस्था ही केवळ सामाजिक व्यवस्था नाही. तर ती धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्था देखील आहे. जाति केवळ सामाजिकच नव्हे तर धार्मिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्था म्हणून पक्की कार्यरत आहे, याचे विश्लेषण केल्याशिवाय जातीचे खरे स्वरूप आणि सामाजिक दृष्टीकोनातून केलेली समीक्षा लक्षात येणार नाहीत.

* **जातीची आर्थिक समीक्षा** ⇒ डॉ. आंबेडकर हे एक थोर अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी आर्थिक दृष्टीकोनातून विश्लेषण करून 'जातीचे अर्थशास्त्र' स्पष्ट केले आहे. आतापर्यंत जाति-व्यवस्था म्हणजे एक सामाजिक व्यवस्था होय. असे मानले जात होते. परंतु जाती केवळ सामाजिक नाही तर त्या आर्थिक देखील आहे. यासंबंधीचे विश्लेषण डॉ. आंबेडकरांनी 'जातीचे निर्मूलन' या ग्रंथात केले आहे.

* (1) **श्रम-श्रमिकांचे विभाजन** ⇒ जातिव्यवस्था म्हणजे श्रमविभाजन होय असे मानले जात होते. प्रत्येक जातीचा एक निश्चित व्यवसाय असतो. लोक आपल्या जातीचा परंपरागत व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करतात. म्हणून काही संशोधकांनी श्रमविभाजनातून जाती निर्माण झाल्यात असे मत मांडले, परंतु डॉ. आंबेडकरांनी हे मत अमान्य केले. जातीव्यवस्था म्हणजे श्रमविभाजनाचे दुसरे नाव असून त्यामधील श्रमविभाजन हे प्रत्येक सभ्य समाजाचे आवश्यक अंग आहे त्यामधी जातीव्यवस्थेमध्ये वाईट काहीही

नाही असा युक्तिवाद करून तिचे समर्थन केले जाते. परंतु डॉ. आंबेडकरांच्या मते, हे चुक आहे.

* डॉ. आंबेडकरांच्या मते 'जातीव्यवस्था हे केवळ श्रमविभाजन नाही तर ते श्रमिकांचे विभाजन आहे' डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात की, 'जातिव्यवस्था श्रमविभाजनापेक्षा पूर्णतः वेगळी असलेली श्रमिकांचे गट निर्माण करणारी तर आहेच पण आणखी त्याच श्रमिकांच्या वाटाची एकाच्या वर दुसरा, दुसऱ्यांवर तिसरा या प्रमाणे जन्मजात प्रतवारी लावून देणारी व्यवस्था आहे. हे श्रमविभाजन उत्स्फूर्त किंवा मनुष्याच्या स्वभावाच्या प्रवृत्तीवर आधारलेले नाही. [B.A.II (67)]

② वर्ग-संघर्षातील अडथळा :- जातीव्यवस्थेत शुद्र आणि विशेषतः अतिशूद्र म्हणजेच अस्पृश्य जातीच्या लोकांचे प्रचंड आर्थिक शोषण केले जाते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रत्येक जातीच्या लोकांमध्ये असलेली 'जाती जाणीव' होय. डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'प्रत्येक हिंदु ज्या जातीचा असेल त्या जातीची जाणीव त्याच्यामध्ये असते.' त्यामुळे वर्ग जाणीव निर्माण होत नाही मार्क्सच्या मते, 'वर्ग संघर्षाकरिता वर्ग जाणीव आवश्यक आहे परंतु जाती व्यवस्था लोकांमध्ये वर्ग जाणीव निर्माण होऊ देत नाही. म्हणून भारतात वर्ग-संघर्ष निर्माण होऊ शकत नाही. जातीमुळे लोकांमध्ये जाती जाणीव निर्माण होते. म्हणून भारतात जाति-जातीमध्ये संघर्ष होतो. म्हणून या देशात शेकडो वर्षापासून शुद्र आणि अतिशूद्र जातीच्या लोकांचे शोषण होत आहे. तरी देखील त्याविरुद्ध संघटीत होऊन संघर्ष कधी त्यांनी केला नाही.

③ श्रमाच्या आनंदापासून पराङ्मुख :- डॉ. आंबेडकरांच्या मते, 'जातीपातीनी निर्माण केलेले श्रमविभाजन हे लोकांच्या आवडी निवडी लक्षात घेऊन केलेले विभाजन नाही. प्रत्येकाला आपल्या जातीचा व्यवसाय करणे अनिवार्य आहे. तो व्यवसाय किंवा काम लोकांवर लादण्यात आले आहे. त्यामुळे असे काम लोकांनी त्यांच्यात कंटाळा, घृणा निर्माण करीत असते. हिंदु समाजाने या धंद्यावर कलंकीत आणि घृणास्पद असल्याचा शिक्का मारला ठेवला आहे. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'ज्या पद्धतीत माणसाचे मन आणि मनही कार्यमग्न नाही. डॉ. आंबेडकरांच्या मते, 'एक आर्थिक संस्थेच्या रूपात जात ही एक हानिकारक संस्था आहे. कारण तिच्यामध्ये माणसाच्या नैसर्गिक शक्तीचे दमन होते. आणि सामाजिक नियमांच्या तत्कालीन आवश्यकतांचे प्रवृत्ती असते.' जातिव्यवस्थेत देखील लोक श्रमाच्या आनंदापासून पराङ्मुख झाले आहेत. असे डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात.

④ बेरोजगारीची समस्या :- जातीव्यवस्थेत व्यक्तीला आपल्या जातीतील परंपरागत व्यवसाय किंवा काम करावे लागते. आरे तर उद्योगधंदे कधीही स्थिर स्वरूपाचे नसतात. त्यामध्ये जलद आणि आकस्मिक बदल घडून येतात. अशा बदलाबरोबर आपला उद्योग निवडण्यासाठी व्यक्ती मोकळी असली पाहिजे. परंतु एखाद्या हिंदूला परिस्थितीनुरूप एखादा धंदा करणे आवश्यक असले तरी त्याचा तो वंशपरंपरागत धंदा नसल्यामुळे जातिव्यवस्था त्यास मान्यता देत नाही. असे स्पष्ट करून डॉ. आंबेडकर म्हणतात, की - जातीने निर्धारित उद्योगापैकी दुसरा नवीन उद्योग करण्यास एखादा हिंदू तयार झाला नाही तर त्यामुळे त्याच्यावर उपासमारीची परिस्थिती ओढवते. देशातील बेरोजगारीचे जात हे एक प्रत्यक्ष कारण बनले आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत आहे.

⑤ शुद्र-अतिशुद्रांचे निर्धनीकरण :- ग्रामीण भागात जातीव्यवस्थेवर आधारित बलुतेदारी पद्धत आहे. ते शेतक-यांना आवश्यक असलेल्या वस्तू आणि सेवा देतात. त्या मोबदल्यात शेतकरी त्यांना धान्य देतो. बलुतेदारी पद्धतीत बाजाराच्या अभाव असतो. त्यामुळे वस्तु तयार करणारा कारागीर आणि श्रम करणाऱ्या लोकांना त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळत नाही. यासंदर्भात डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात की, 'जातीचे विभाजन अशा प्रकारे करण्यात आले की, कोणत्याही विशेष लहान जाती ह्या प्रधान जातीपुढे नतमस्तक होतात. कारण प्रमुख जातीकडे बहुतांश जमीन असते. त्या तुलनेत लहान जाती संख्येने कमी असतात. आणि आर्थिकदृष्ट्या त्यांच्यावर अवलंबून असतात. त्यामुळे ग्रामीण भागात शुद्र आणि अतिशुद्र जातीच्या लोकांचे शोषण होते.

⑥ आर्थिक आणि व्यावसायिक निर्बंध :- हिंदुच्या धार्मिक ग्रंथात शुद्र आणि अतिशुद्र जातीवर अनेक आर्थिक आणि व्यावसायिक निर्बंध लादण्यात आले आहेत. मनुस्मृतीनुसार शुद्रांनी केवळ उच्च जातीची सेवा करावी. अतिशुद्रांनी घाणेरडे आणि अंगमेहनतीचे काम किंवा व्यवसाय केले पाहिजे. असे त्यांच्यावर निर्बंध टाकण्यात आले होते. आपल्या आवडी निवडीनुसार किंवा गुणवत्तेनुसार व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य जातीव्यवस्थेत नव्हते. जातीचा जो कोणता व्यवसाय असेल तोच व्यवसाय त्या जातीच्या लोकांना करावा लागत असे.

* धर्माने जातीव्यवस्थेच्या आधारावर आर्थिक आणि व्यवसायिक निर्बंध टाकले होते. त्यामुळे शुद्र आणि अतिशुद्रांच्या आर्थिक क्षमता आणि कौशल्याचा विकास होऊ शकला नाही. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की 'आर्थिक संस्था या दृष्टीने जात ही एक हानीकारक संस्था आहे.

# जातीची राजकीय समीक्षा (टीका) B.A. II (08)

* भारतीय समाज शेकडो जातीत विभागला आहे. त्यामुळे लोकात एकत्वाची भावना नाही म्हणून भारत हे एक राष्ट्र बनू शकले नाही. असे स्पष्ट मत डॉ. आंबेडकरांनी मांडले त्यांच्या मते, "जातीच्या आधारावर तुम्ही कोणतीही गोष्ट उभारू (निर्माण करू) शकत नाही. तुम्ही राष्ट्राची उभारणी करू शकत नाही. तुम्ही नितिमत्तेची उभारणी करू शकत नाही. जातीच्या पायावर तुम्ही जे काही बांधाल, ते कोसळून पडेल आणि ते एकसंध कधीच होऊ शकणार नाही." निर्मितीच्या मुद्दा निर्माण करणार येत नाही असे विचारवंतांचं डॉ. आंबेडकरांनी मांडले

* (1) जात - राष्ट्र आणि राष्ट्रवादाच्या निर्मितीमध्ये अडथळा :- डॉ. आंबेडकर जातीची समीक्षा करतांना असा निष्कर्ष मांडतात की, जात ही राष्ट्र आणि राष्ट्रवादाच्या निर्मितीमध्ये फार मोठा अडथळा आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, 'ज्यास समाजशास्त्रज्ञ संपूर्ण वर्गाची जाणीव म्हणतात तिचा हिंदूमध्ये नितांत अभाव आहे. प्रत्येक हिंदूमध्ये जी काही एकत्वाची जाणीव आहे ती स्वतःच्या जातीसंबंधी आहे. त्यामुळेच हिंदू हे एक समाज किंवा राष्ट्र निर्माण करू शकत नाही.' असे म्हटल्या जाते.

* देशातील सर्व लोकांमध्ये एकत्वाची भावना जातिव्यवस्थेने निर्माण होऊ दिली नाही. याउलट डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात की, समाज एकसंध लोकांना सामाजिक कार्यामध्ये सक्रिय करीत भाग घेता आला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला सामाजिक कार्यात सहभागी होता आले म्हणजे त्या कार्यातील यश म्हणजे आपले यश, त्यातील अपयश म्हणजे आपले अपयश त्याला वाटू लागते हि भावनाच लोकांना एका राष्ट्रीयत्वात बांधून ठेवण्यात जाती अपरिहार्यपणे [illegible] आहे. अशाप्रकारे जात ही राष्ट्र आणि राष्ट्रवादाच्या निर्मितीमध्ये अडथळा असल्याचे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात.

* (2) लोकशाहीच्या विकासास घातक :- जातिव्यवस्थेचा भारतीय राजकारणावर जो प्रभाव पडला तो स्पष्ट आहे. निवडणुकीवर जातिव्यवस्थेचा विशेष परिणाम आढळून येतो. याचे विश्लेषण डॉ. आंबेडकरांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

* (i) मतदान हे लोकशाही जातिव्यवस्थेच्या आधारावर केले जाते. मतदार हा श्रेष्ठ उमेदवारास मतदान न करता आपल्या जातीच्या उमेदवारास मतदान करतो.

* (ii) बहुसंख्याक समुदाय जातीयतेच्या आधारावर बहुमत प्राप्त करून निवडून देतो.

* (iii) अल्पसंख्याक समुदायास बहुसंख्यांक समुदायाच्या उमेदवारास मत देण्यास प्रवृत्त केले जाते.

* (iv) अल्पसंख्याक समुदायाचे कितीही मत असले तरी त्यांच्या उमेदवार बहुसंख्याक समुदायाद्वारे उभे केलेल्या उमेदवाराच्या विरोधात निवडून येवू शकलेत.

(v) उच्च समुदायाच्या मतदाना विभागल्याने सामाजिक व्यवस्थेने प्रभावित असल्यामुळे तो अल्पसंख्याक समुदायाच्या कोणत्याही उमेदवारास आपले मत देण्याची उदारता दाखवू शकत नाही.

* अशा प्रकारे जातिव्यवस्थेमुळे जातीनिहाय मतदान केले जाते. ज्या जातीचे लोक बहुसंख्याक आहे, त्याच जातीचा उमेदवार निवडून येतो. अशाप्रकारे राष्ट्रीय विकासासाठी अनुकूल असलेल्या योग्य नेतृत्वापासून देश वंचित राहतो. डॉ. आंबेडकर 1952 च्या लोकसभेच्या निवडणुकीत निवडून येऊ शकले नाही. 1954 च्या पोटनिवडणुकीत देखील डॉ. आंबेडकरांचा पराभव झाला.

* (3) शूद्र आणि अतिशूद्र राजकीय सत्तेपासून वंचित :- ब्राह्मण आणि क्षत्रिय यांना राजकीय सत्ता प्राप्त करण्याचा अधिकार होता. काही प्रमाणात वैश्यांना सुद्धा अधिकार देण्यात आला होता. मनुस्मृतीने ब्राह्मणांना राजकीय सत्ता प्राप्त करण्याचा अधिकार दिला. मनुस्मृतीनुसार, 'राज्यातील सेनापतीचे पद, शासनाच्या अध्यक्षाचे पद, सर्वांवर शासन करण्याचा अधिकार ब्राह्मणांना आहे. [illegible] डॉ. आंबेडकर म्हणतात की मनुस्मृतीमध्ये नियमात बदल करून नवीन नियम तयार करण्यात आले आणि या नियमानुसार ब्राह्मणास सेनापती बनणे, कोणते राज्य जिंकणे त्या राज्याचा शासक आणि त्याच्या राजा बनण्याचा अधिकार आहे. शूद्र आणि अतिशूद्र हे समाजात बहुसंख्याक होते. परंतु त्यांना राजकीय सत्तेपासून वंचित ठेवण्यात आले. त्यांना गुलाम बनविण्यात आले त्यामुळे शूद्र अतिशूद्र समाजात राजकीय क्षमतांचा विकास होऊ शकला नाही.

* (4) भारताच्या इतिहास हा पराभवाचा :- भारतीय इतिहासाचे अवलोकन केल्यास असे आढळून येते की, बौद्धकाळ आणि बौद्ध राजांच्या काळात भारत हा एकसंध आणि विशाल देश होता. सम्राट अशोकाच्या काळात भारताच्या सीमारेषा गांधार प्रांतापर्यंत होत्या बौद्ध राजाच्या काळ वगळता भारताचा इतिहास हा पराभवाच्या परकियांच्या गुलामीचा इतिहास होता. याचे प्रमुख कारण म्हणजे हिंदू धर्मशास्त्रांनी वैश्य, शूद्र यांना सैनिकी व्यवसायापासून वंचित ठेवले होते. शूद्र आणि अतिशूद्र जातीमध्ये लढवय्ये लोक होते. त्यांना शस्त्र वापरण्यास मनाई करण्यात आली होती. त्यामुळे भारतावर शक, हूण, मुस्लिम, इंग्रज लोकांनी आक्रमण करून आपली सत्ता प्रस्थापित केली. म्हणून डॉ. आंबेडकर स्पष्टपणे प्रतिपादन करतात की, भारताचा इतिहास हा पराभवाचा आणि परकियांच्या गुलामीचा इतिहास होय.

* (5) शूद्र - अतिशूद्र आणि आदिवासी नागरी व मानवी अधिकारांपासून वंचित :- देशातील शूद्र - अतिशूद्र आणि आदिवासी लोकांवर अनेक निर्बंध लादण्यात आले होते. डॉ. आंबेडकरांच्या मते, 'अस्पृश्यांना त्यांचे मानुसकीचे हक्क मिळ दिलेले नाहीत. त्याचे मानवतेचे त्यांचे हे लोकशाहीदृष्टीने कठीण देखा कायदेशीर आहे असा समज त्यांनी करून घेतला होता. देश स्वतंत्र झाल्यानंतर राज्यघटना तयार करण्यात आली. डॉ. आंबेडकरांनी जाती, धर्म आणि वंशाच्या आधारावर नागरी व मानवी हक्क नाकारलेल्या लोकांना समान अधिकार दिलेत. घटनेच्या 15 व्या कलमानुसार, राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यामुळे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही. अशी तरतूद राज्यघटनेत करून देशातील शूद्र - अतिशूद्र आणि आदिवासी या वंचित लोकांना

# जातीची सामाजिक समीक्षा [टीका] B.A.II (09)

* जातीव्यवस्थेमुळे भारतीय समाजातील शूद्र आणि अतिशूद्रांचा सामाजिक विकास होऊ शकला नाही. समाजात सतत एक-दुसऱ्या जातीच्या प्रती तिरस्कार आणि द्वेषाची भावना राहिली. परिणामत: विविध समस्या निर्माण झाल्या. डॉ. आंबेडकरांनी जातीची समीक्षा केली आहे.

* ① **शुद्र आणि अतिशुद्र शिक्षणापासून वंचित** ➾ जातीव्यवस्थेचा आधार हिंदू धर्म आहे. हिंदू धर्मात जातीनुसार वर्तन करणे हेच खरे धार्मिक वर्तन मानले आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'जो धर्म एका गटाने विद्या शिकावी, धनसंचय करावा असे सांगतो तो धर्म नसून मानसाच्या जिवनाचे विडंबन आहे.' हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेने शुद्र आणि अतिशुद्रांना शिक्षणापासून वंचित ठेवले त्यांचा शैक्षणिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिक विकास होऊ शकला नाही. त्यामुळे भारतीय समाजाचा विकास होऊ शकला नाही अशा प्रकारची टीका डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्म आणि जातीव्यवस्थेवर केली.

* ② **जातीव्यवस्था – शत्रुंच्या समुहांची व्यवस्था** ➾ देशात शेकडो जाती आहेत प्रत्येक जातीचे हितसंबंध हे दुसऱ्या जातीच्या हितसंबंधापेक्षा वेगळे आहे. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'ज्याप्रमाणे मागील महायुद्धात जर्मन लोक इंग्रजांच्या द्वेषाने भरलेले होते त्याचप्रमाणे आपल्याकडील एक जात दुसऱ्या जातीच्या द्वेषाने भरलेली आढळून येते. ब्राह्मणांचा मुख्य उद्देश म्हणजे अब्राह्मणांपासून आपल्या 'स्वहितांचे' रक्षण करणे आणि अब्राह्मणांचा प्राथमिक उद्देश आपल्या 'स्वहितांचे' इतर जातींच्या जातीपासून रक्षण करण्याचा असतो. असे स्पष्ट करून डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'अशा रितीने हिंदू समाज म्हणजे केवळ जातींची प्रतवारी लावलेला समाज नसून तर तो अनेक शत्रुगटांचा समूह आहे. प्रत्येक गट आपल्यासाठी जगतो आपल्या स्वार्थी आदर्शांसाठी जगतो.' जाती-जातीमधे शत्रुत्वाच्या भावनेमुळे एकमेकांविषयी तिरस्कार आणि द्वेष निर्माण होतो. असे डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात.

* ③ **समाजाच्या विकासामध्ये अडथळा** ➾ डॉ. आंबेडकरांच्या मते, हिंदू व्यक्ती आपली जात वाचविण्यासाठी जन्मभर चिंतातुर असतो. त्यामुळे हिंदू लोक आपल्या जातीचाच विचार करतात. एका जातीचे यश हे दुसऱ्या जातीच्या लोकांच्या दृष्टीने अपयश असते. त्यामुळे एक जात दुसऱ्या जातीच्या विकासामध्ये अडथळे निर्माण करते. आपल्या देशात आजही अनेक आदिवासी जमाती नग्न अवस्थेत आहेत. पारधी, उचल्या, भामटा-कारोडी इत्यादी अनेक भटक्या जमाती वंशपरंपरागत गुन्हेगारांचे जीवन जगत आहेत. अस्पृश्य लोकांची सामाजिक परिस्थिती अतिशय वाईट आहे. म्हणून भारतीय समाजाचा विकास होऊ शकला नाही. अशाप्रकारे जातिव्यवस्था समाजाच्या विकासामधील फार मोठा अडथळा असल्याचे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात.

* ④ **सामाजिक सुदृढतेमध्ये बाधा** ➾ जातीव्यवस्थेमुळे जाती-जातीमध्ये शत्रुत्वाची भावना आढळते. त्यांच्यात एकत्वाची भावना नाही. एक जात दुसऱ्या जातीविरुद्ध तिरस्कार आणि द्वेषाची भावना जोपासते. सामाजिक सुदृढता नसल्यामुळे समाजाचा विकास होऊ शकला नाही. लोक एकमेकांच्या जातीच्या विरुद्ध लढतात. जाती व्यवस्थेत विवेकबुद्धीचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य नाही. अशा परिस्थितीत समाजावरील बाह्य आक्रमणांस विरोध करीत नेत. परिणामत: समाजात अनेक समस्या निर्माण होतात. आणि समाजाचा योग्य प्रकारे विकास होऊ शकत नाही. म्हणून जातीव्यवस्था सामाजिक सुदृढतेमध्ये अडथळा निर्माण करते.

* ⑤ **हिंदू धर्म प्रसारक्षम नाही** ➾ हिंदू धर्म आज प्रसारक्षम का नाही? असा प्रश्न डॉ. आंबेडकर उपस्थित करतात. आणि त्या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणतात की 'जेव्हा हिंदूमध्ये जातीभेद निर्माण झाले तेव्हा त्याची प्रसारक्षमता नष्ट झाली.' हिंदूसमाज हा केवळ जातींचा संग्रह असल्यामुळे आणि जात ही दारेबंद असलेली संस्था असल्यामुळे हिंदू धर्मात धर्मांतरीत झालेल्यांना स्थान नाही. अशाप्रकारे हिंदू धर्मातील जातींनी अडथळा निर्माण केला आहे. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'जोपर्यंत जाती आहेत तोपर्यंत हिंदूधर्म प्रसारक्षम धर्म होऊ शकत नाही.'

* ⑥ जाती-व्यवस्थेतील ब्राह्मण जात सर्वात श्रेष्ठ सर्वच जातिवर अन्याय करणारी आहे परंतु कुणीही जातीच्या शोषणाविरुद्ध संघर्ष करण्याची तयारी ठेवत नाही. कारण आपल्या जातीचे ब्राह्मणांनी शोषण केले असले तरी आपल्या खालच्या जातिवर आपले वर्चस्व कायम असले पाहिजे. असे त्या जातीच्या लोकांना वाटते. आपले शोषण होऊ नये म्हणून सर्व कामगार एकत्रित येतात आणि भांडवलशाहीच्या शोषणाविरुद्ध संघर्ष करतात. मार्क्स म्हणतो की, कामगारांकडे गमावण्यासारखे काहीच नाही परंतु जातीव्यवस्थेत असे घडत नाही. जातीव्यवस्थेच्या शोषणाविरुद्ध सर्व जाती संघटीत होऊन संघर्ष करीत नाही. कारण कुणालाही जातीव्यवस्था नष्ट व्हावी असे वाटत नाही. डॉ. आंबेडकर स्पष्टपणे प्रतिपादन करतात की, एका जातीच्या खाली दुसरी याप्रमाणे प्रत्येक जातीचे सार्वभौम साम्राज्य आहे. त्यामुळे प्रत्येक जात दुसऱ्या जातीच्या दर्जाकडे लक्ष देते.

# जातीचे निर्मूलन [Annihilation of Caste] B.A.II (10)

* डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीचे सखोल चिंतन करून, विविध सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकिय समीक्षा मांडली जातीमुळे भारतीय समाजाचे प्रचंड नुकसान झाले. जातीमुळे राष्ट्राची अधोगती झाली म्हणून डॉ. आंबेडकर प्रश्न विचारतात की, आपल्या जातीच्या स्वार्थासाठी हिंदूनी देशद्रोह सुद्धा केला की नाही. जातीमुळे देशात कोणताही सुधारणा होऊ शकत नाही. हे स्पष्ट करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'तुमच्या आवडी-प्रमाणे कोणत्याही मार्गाने जा जातीच्या राक्षस तुमच्या मार्गात उभा आहे. म्हणून जातीचे निर्मूलन करणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते हे एक म्हणून जातीचे निर्मूलन करणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, जातीचे निर्मूलन करण्याच्या संदर्भात अतिशय महत्वाचे आणि क्रांतीकारक उपाय डॉ. आंबेडकरांनी सुचविले आहेत.

* (1) धर्मशास्त्राच्या गुलामीतून लोकांना मुक्त करणे :- जाती नष्ट करण्यासाठी पोट-जाती नष्ट करणे आणि आंतरजातीय सहभोजन हे दोन उपाय सांगितले जातात परंतु डॉ. आंबेडकर स्पष्टपणे नमूद करतात की, हे दोन्ही उपाय कुचकामी ठरतात. पोट-जाती नष्ट झाल्यास जातीभेद कमी होईल असे काही लोकांचे मत आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात की, पोटजाती नष्ट करण्याचा परिणाम जाति अधिक मजबूत करण्यामध्ये होईल. आणि जाती अधिक शक्तीशाली बनून त्या घातक ठरतील. जाती नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाह हाच त्यावरील उपाय असल्यामुळे डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात. सामाजिक जीवनात एकसूत्रीपणा आणण्यासाठी एक शक्ती या दृष्टीने हिंदूंच्या आंतरजातीय विवाहाची अत्यंत आवश्यकता आहे. म्हणून जातीचे निर्मूलन करण्याचा वास्तविक उपाय हा आंतरजातीय विवाह हाच आहे. परंतु लोक सहजपणे आंतरजातीय विवाह करण्यास तयार होणार नाहीत. उलट ते आंतरजातीय विवाहास विरोध करतील कारण, आंतरजातीय विवाह हिंदूंना पवित्र वाटणाऱ्या धर्ममतांच्या व धर्मशास्त्रांच्या विरोधी आहे. म्हणून जातीच्या विनाश भौतिक बंधनाचा विनाश करण्याइतके सोपे नाही. याचा अर्थ भावनेमध्ये परिवर्तन घडवून आणणे हा आहे असे डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात.

* डॉ. आंबेडकरांच्या मते, हिंदू लोक जातीचे पालन करतात, ती फक्त अमानवी किंवा विनडोक पध्दती म्हणून नव्हे तर त्या मूलतः धार्मिक आहेत. जातीचे पालन करण्यात लोकांची चूक नाही. माझ्या मते जर चूक कोणती असेल तर त्यांच्या धर्म कारण धर्मानेच जातीची कल्पना लोकांच्या मनात बिंबविली आहे. म्हणून जाति पाळणारे तुमचे शत्रू नाही, तर ज्या धर्मशास्त्राने लोकांना जाती धर्माची शिकवण दिली, ते धर्मशास्त्र तुमच्या शत्रू आहे.'

* धर्मशास्त्रानुसार लोक वर्तन करतात कारण धर्मशास्त्रे पवित्र असल्याची श्रद्धा त्यांच्या मनात आहे. म्हणून धर्मशास्त्र पवित्र असल्याबद्दलची श्रद्धा नष्ट करणे हा त्यावरील खरा उपाय आहे, असे विचार डॉ. आंबेडकर व्यक्त करतात. पुढे डॉ. आंबेडकर स्पष्टपणे प्रतिपादन करतात की, 'प्रत्येक स्त्री-पुरुषाला धर्मशास्त्राच्या गुलामीतून मुक्त करा. धर्मशास्त्राच्या पायावर आधारलेल्या अपायकारक कल्पनांपासून त्यांची मने स्वच्छ करा म्हणजे तुमच्या उपदेशाशिवाय ती किंवा तो स्वखुशीने सहभोजन आणि आंतरजातीय विवाहाला तयार होतील.'

* पुढे डॉ. आंबेडकर म्हणतात की, धर्मशास्त्रांना विरोध करून प्रश्न सुटणार नाही. तर त्यांचे अपवित्रही प्रमाण्य नाकारले पाहिजे. जो दोष आहे तो तुमच्या धर्माचा आहे. या धर्मानेच तुमच्यात जातीच्या पवित्रपणाची भावना निर्माण केली. म्हणूनच ज्या-ज्या आधारावर जाती पवित्र बनल्या, त्या वेदांचा आणि पवित्र्याचा नाश करावा लागेल म्हणजेच 'शास्त्राच्या अधिकार आणि वेदांच्या नामनाट करावा लागेल' जाती नष्ट करण्याच्या सुधारणा घडवून आणणे सोपे नाही. कारण या सुधारणास ब्राम्हण वर्ग कडाडून विरोध करील. कारण त्यामुळे ब्राम्हण जातीची शक्ती आणि प्रतिष्ठा नष्ट होईल. बुद्धिवादी ब्राम्हण आणि पुरोहित ब्राम्हण हे दोघेही एकाच माळेतील मणी आहेत असे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात.

* जातीपद्धतीत सुधारणा करून समाजात क्रांती करायची असेल तर वेद आणि शास्त्र यांना सुरुंग लावावा लागेल. श्रुती आणि स्मृतींनी सांगितलेल्या धर्माचा उच्छेद करावा लागेल. असे विचार डॉ. आंबेडकर मांडतात डॉ. आंबेडकरांच्या मते, 'साधारणतः धर्माची कल्पना आणि त्यात बदलाची कल्पना यांचे बहुधा मानले जाते. आपण ज्याला धर्म समजतो, तो धर्म नसून ते केवळ जुने व जाचक नियम आहेत. असे लोकांना पटवून दिले तर ते त्यात बदल करण्यास तयार होतील. अशाप्रकारे आंतरजातीय विवाह हाच जाती निर्मूलनाचा एक महत्वाचा उपाय आहे. कारण जातीची कल्पना ही धार्मिक आहे. धर्मशास्त्राने जातीला पवित्र मानले म्हणून ज्या धर्मग्रंथांनी जातीची कल्पना लोकांच्या मनात रुजविली, त्या धर्मग्रंथाच्या दास्यातून लोकांची मुक्तता करणे आवश्यक आहे. धर्मशास्त्राचे वर्चस्व झुगारल्याशिवाय जातीचे निर्मूलन होऊ शकणार नाही,' असे महत्वाचे विचार डॉ. आंबेडकरांनी जातीच्या निर्मूलनाबाबत मांडले आहेत.

* (2) धार्मिक सुधारणा :- जाती निर्मूलनासाठी धर्मशास्त्राचे वर्चस्व झुगारले पाहिजे असे मत डॉ. आंबेडकर मांडतात. तसेच हिंदू धर्माचे पुजारी हे फक्त ब्राह्मण असतात. त्यामुळे जातिव्यवस्थेत ब्राह्मणांचे वर्चस्व निर्माण झाले आहे. जाती म्हणजे दुसरे काही नसून केवळ ब्राह्मणशाहीचे प्रतिरूप होय. म्हणून जातिनिर्मूलन आणि धर्मसुधारणेसाठी डॉ. आंबेडकरांनी एक रूपरेषा मांडली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे. [B.A.II 11]

(i) :- सर्व हिंदूंना मान्य होईल असा एकच प्रमाण असा हिंदू धर्माचा ग्रंथ असावा. हिंदू धर्माचे इतर पवित्र मानलेले वेद, शास्त्रे आणि पुराणे इत्यादी ग्रंथ प्रमाण मानण्यास कायद्याने बंदी करावी. जर कुणी या ग्रंथांच्या आधार घेऊन त्यातील सामाजिक किंवा धार्मिक तत्त्वांचा उपदेश किंवा प्रचार केला तर त्याला शिक्षा करण्यात यावी.

(ii) :- हिंदू धर्मातील ब्राह्मणशाही नष्ट करून टाकली तर उत्तम होईल. परंतु हे जर अशक्य असेल तर कमीतकमी वंशपरंपरागत पुरोहितपणा संपुष्टात आणावा. हिंदू असल्याचा दावा करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला पुरोहित बनण्यास लायक समजण्यात यावे. राज्य शासनाने निर्धारित केलेली परीक्षा उत्तीर्ण केल्याशिवाय व तशी सनद मिळाल्याशिवाय कायद्याने पुरोहिताचा धंदा करण्यास कोणत्याही हिंदूला परवानगी देण्यात येऊ नये अशी व्यवस्था कायद्याद्वारे करण्यात यावी.

(iii) :- ज्या व्यक्तीजवळ अशी सनद नसेल, त्या व्यक्तीच्या हाताने केलेले कोणतेही धर्मकृत्य कायदेशीर समजण्यात येऊ नये. सनदेशिवाय ज्याने हे धर्मकृत्य केले असेल त्याला दंड देण्याची व्यवस्था करावी.

(iv) :- पुरोहित हा शासकीय नोकर असावा. आणि त्याच्यावर नियंत्रण, त्याच्या श्रद्धा व पूजास्थानांच्या संशय आल्यास त्याच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा सरकारला अधिकार असावा. याशिवाय इतर नागरिकांप्रमाणे त्याला सर्वसाधारणपणे कायद्याच्या अधीन असलेले वागविण्यात यावे.

(v) :- आय.सी.एस. [Indian Civil Service] प्रमाणेच शासनाच्या आवश्यकतेनुसार पुरोहितांची संख्या निश्चित ठरविण्यात यावी.

* अशा प्रकारे सर्व हिंदूंना मान्य होईल असा एक हिंदू ग्रंथ असावा आणि पुरोहित वर्गाचे लोकशाहीकरण केल्यास जाती निर्मूलनास अनुकूल वातावरण निर्माण होऊ शकेल असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

(3) धर्मांतर :- डॉ. आंबेडकरांच्या मते, 'धार्मिक नवीन तत्त्वांचा पायाभूत आधार दिला पाहिजे. हा पाया समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वावर आधारित म्हणजेच लोकशाहीशी अनुरूप असला पाहिजे. जीवनाच्या मूल्यात संपूर्ण बदल व्हायला पाहिजे. मानव आणि भौतिक वस्तूकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि वृत्तीमध्ये पूर्ण बदल व्हायला पाहिजे. म्हणजेच धर्मांतर (नवीन जीवन सुरू होण्यापूर्वी व त्याच्या हृदयाचे ठोके सुरू होण्यापूर्वी जुन्याचा अमल संपायला हवा. शास्त्रांचा अधिकार धुडकावून दिला पाहिजे आणि शास्त्रांनी सांगितलेला धर्म तुम्ही नष्ट केला पाहिजे. थोडक्यात लोकशाही मूल्यावर आधारित धर्म हवा असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यावर आधारित समाजरचना त्यांना अपेक्षित होती. त्यामुळे विषमतेवर आधारीत जाती व्यवस्था लोकमान्य करणार नाही म्हणून डॉ. आंबेडकरांनी जुन्या शास्त्रांचा अधिकार आणि शास्त्रांनी सांगितलेला धर्म नाकारून स्वातंत्र्य, समता न्याय, आणि बंधुता या मूल्यावर आधारीत असलेल्या बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

(4) :- राज्यसमाजवादाचा पुरस्कार :- जातिव्यवस्था ही विषमतेवर आधारित आहे. उच्च जातींना सर्व अधिकार आणि कनिष्ठ जातींना अधिकारविहीन आणि वंचित ठेवण्यात आले होते. देशातील नैसर्गिक स्रोतांवर (उदा. जमीन संपत्ती इत्यादी) उच्च जातींचा अधिकार होता. शूद्र आणि अतिशूद्रांकडे नैसर्गिक स्रोतांचा अभाव होता ही बाब लक्षात घेऊन डॉ. आंबेडकरांनी नैसर्गिक स्रोतांचे समान वितरण झाले पाहिजे यावर भर दिला. म्हणून त्यांनी जमीन, उद्योगधंदे आणि इतर साधने ही राष्ट्रांच्या मालकीची असावी. त्याकरिता राज्यघटनेत तशी तरतूद करण्यात यावी अशी डॉ. आंबेडकरांची मागणी होती. त्या संदर्भात 'राज्ये आणि अल्पसंख्याक' या ग्रंथात त्यांनी रूपरेषा मांडली होती. देशातील सर्व नैसर्गिक स्रोतांना राष्ट्रीय संपत्ती घोषित करून त्याचे सर्वांना पुनर्वितरण केले पाहिजे. जातीच्या आधारावर श्रेष्ठ-कनिष्ठ न मानता सर्वांना समान मानून त्या नैसर्गिक साधनांचे पुनर्वितरण व्हावे त्यामुळे देशातील उच्च जातींची नैसर्गिक साधनांवरील मक्तेदारी संपुष्टात येईल. सर्व लोक समान आहेत. अशी भावना निर्माण होईल असे डॉ. आंबेडकरांना स्पष्ट करावयाचे होते.

# युनिट क्र. २ डॉ. एम. एन. श्रीनिवास.
युनिट नं. 2

## डॉ. एम. एन. श्रीनिवास [M. N. Srinivas; 1916-1999] B.A.II (12)

* **जीवन परिचय** :- डॉ. एम. एन. श्रीनिवास हे भारतातील एक अग्रणी समाजशास्त्रज्ञ होते. त्यांचा जन्म कर्नाटक राज्यातील म्हैसूर येथे 1916 मध्ये झाला. म्हैसूर विद्यापीठातून बी. ए. ची पदवी घेतल्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठातून डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विषयात एम. ए. केले. त्यांच्या एम. ए. च्या लघुशोध प्रबंधाचा विषय 'म्हैसूर मध्ये विवाह आणि कुटुंब' हा होता. त्यांनी मुंबई विद्यापीठातून डॉ. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली 'पीएच. डी.' पदवी प्राप्त केली. त्यांच्या पीएच. डी. च्या शोधप्रबंध 'दक्षिण भारतातील कुर्ग लोकांमधील धर्म आणि समाज' या नावाने 1952 मध्ये प्रसिद्ध झाला. या संशोधनाच्या आधारावर त्यांना ब्रिटीश अकादमीची फेलोशिप मिळाली आणि पुढील अध्ययनाकरीता इंग्लंडला गेले. तेथे त्यांना रॅडक्लिफ ब्राऊन आणि ईवान्स प्रिचार्ड सारख्या सुप्रसिद्ध मानवशास्त्रज्ञांच्या सहवासात राहून शिकण्याची संधी मिळाली त्यामुळे डॉ. श्रीनिवास यांच्या संशोधन कार्य आणि लिखाणावर ब्राऊनच्या विचारांचा आणि क्षेत्रकार्य पद्धतीचा विशेष प्रभाव पडल्याचे आढळून येते.

* इंग्लंडमधील ऑक्सफोर्ड विद्यापीठातील 'डी. फिल.' चे संशोधन कार्य पूर्ण झाल्यानंतर तेथे डॉ. श्रीनिवास यांना ऑक्सफोर्ड विद्यापीठात नोकरी मिळाली ते न करता ते भारतात परत आले. त्यांच्या मनात आपल्या देशाविषयी प्रेम होते. म्हणून त्यांनी भारतामध्येच अध्यापनाचे काम करण्यास प्राधान्य दिले. भारतात आल्यानंतर त्यांनी बडोदा येथे एम. एस. विद्यापीठात समाजशास्त्र विभागाची स्थापना केली. त्यानंतर त्यांनी दिल्लीच्या 'स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' मध्ये समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्र या विभागांची स्थापना करून [illegible] कर्नाटक मधील 'रामपुरा' या गावाचे समाजशास्त्रीय अध्ययन केले. पुढे त्यांनी बंगलोर येथे 'सोशल ऍण्ड इकॉनॉमिक रिसर्च सेंटर' ची स्थापना करण्यात आली होती. या संस्थेत काम करण्यासाठी ते दिल्लीहून बंगलोरला आले [illegible] त्यांना आपल्या आवडीनुसार संशोधन करता आले.

* डॉ. श्रीनिवास यांची लेखनशैली अत्यंत सोपी स्पष्ट आणि सुबोध आहे. त्यांनी आपल्या महत्वपूर्ण निष्कर्षांना छोट्या-छोट्या उदाहरणांद्वारे अशाप्रकारे मांडले आहे की, सामान्य वाचकाला देखील ते निष्कर्ष सहजपणे समजू शकतील. त्यांच्या [illegible] त्यांनी सुरुवातीला 'कुर्ग' लोकांचा आणि नंतर दक्षिण भारतातील म्हैसूर जिल्ह्यातील 'रामपुरा' या गावाचा अध्ययन [illegible] या गावाचे खरे नाव 'कोडगहळ्ळी' असे आहे. या गावाच्या अध्ययनावर त्यांनी अनेक पुस्तके लिहिलीत.

* डॉ. श्रीनिवास यांनी आपल्या अध्ययनाद्वारा [illegible] प्रकाश टाकला. त्यांनी [illegible] संबंधाची यथार्थता [illegible] अध्ययन केले. संस्कृतीकरण, प्रभावी जाती, पाश्चिमात्यीकरण आणि लौकिकीकरण या सारख्या संकल्पनांना विकसित करून त्यांचा पद्धतीशास्त्रीय साधनाच्या रूपात उपयोग केला.

* डॉ. श्रीनिवास यांना त्यांच्या संशोधन कार्याबद्दल विविध सन्मान आणि पुरस्कार प्राप्त झाले होते. त्यांना इंग्लंडच्या 'रॉयल एन्थ्रॉपॉलॉजिकल इन्स्टिट्यूट' तर्फे रिव्हर्स मेमोरियल मेडल, ब्रिटीश अकादमीची फेलोशिप, अमेरिकन अकादमीची कला आणि विज्ञानाची विदेशी [illegible] आणि [illegible] शिकागो विद्यापीठ [illegible] समाजशास्त्र आणि मानवशास्त्र या विषयामधील डॉ. श्रीनिवास यांचे योगदान लक्षात घेऊन भारत सरकारने 'पद्मविभूषण' हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

* **ग्रंथसंपदा** :- (1) Marriage and Family in Mysore - (1942)
(2) Religion and Society Among Coorgs of South India (1952)
(3) India's Village (Ed) - (1955) (4) Caste in Modern India and other Essays (1962)
(5) Social Change in Modern India (1966) (6) India: Social Structure - (1969)
(7) Itinerise of an Indian Social Anthropologist (1973)
(8) The Remembered Village (1976) (9) Nation Building in Independent India - (1976) (10) Dimentions of Social Change in India - (1977)
(11) The Dominant Caste and other Essays - (1986)
(12) On Living in a Role of Sanskritisation - 1989 (13) Sociology in Delhi -
(14) Village, Caste Gender and Method (1996) (15) Caste: Its Twentieth Century Awatar (16) Indian Society Through Personal Writings - (1996)

# प्रभावी (सामर्थ्यशाली) जाती [Dominant Caste] B.A.II (13)

* प्रभावी (सामर्थ्यशाली) जातीची संकल्पना सर्वप्रथम डॉ. एम.एन. श्रीनिवास यांनी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मांडली. संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेमध्ये प्रभावी जातीच्या संकल्पनेचे विशेष महत्त्व आहे. कुर्ट डुमोन्ट आणि पोकॉक या समाजशास्त्रज्ञांच्या मते, "श्रीनिवास यांनी वर्चस्व किंवा हुकूमत ची कल्पना आफ्रिकन समाजातून भारतीय समाजात आणली" हे काही प्रमाणात सत्य आहे. कारण डॉ. श्रीनिवास यांनी याबाबत नमूद केले की "मी प्रभावी जातीची संकल्पना प्रथमच "म्हैसूर खेड्याची सामाजिक व्यवस्था" या माझ्या निबंधात वापरली.

* डॉ. श्रीनिवास यांच्या मते, "भारताच्या बहुतांश भागातील ग्रामीण सामाजिक जीवन समजून घेण्यासाठी प्रभावी जातीची संकल्पना विशेष महत्त्वाची आहे. खेड्याच्या किंवा जातीच्या स्तरावर त्यांचे वादविवाद सोडविणे किंवा विशिष्ट क्षेत्रातील जातीमधील संस्कृतीकरणाच्या आकृतीबंधाचे विश्लेषण करण्यासाठी स्थानिक प्रभावी जात भरणीत्या वर्चस्वाचे विश्लेषण आवश्यक आहे.

* व्याख्या :- डॉ. श्रीनिवास यांच्या मते, "एखाद्या जातीला प्रभावी जात म्हणता येईल, की जेव्हा त्या जातीची लोकसंख्या इतर जातींपेक्षा जास्त असते आणि आर्थिक वर्चस्व आणि राजकीय दृष्टीकोनातून असते. जर एखादी जाती आर्थिकमध्ये त्याचा क्रम किंवा दर्जा खूप खालचा नसेल तर त्या मोठा आणि शक्तीशाली जातसमूह हा सहजपणे अधिक प्रभावी बनतो."

* डॉ. श्रीनिवास यांनी म्हैसूर मधील 'रामपूर' या खेड्याचे क्षेत्रीय अध्ययन करून नमूद केले की, शेती करणारी 'ओक्कालिगा' जातीच्या लोकांची संख्या ही इतर जातीपेक्षा सर्वात जास्त आहे. त्यांच्यात मोठे जमीनदार आहेत. इतर सर्व जातींच्या शेतजमिनीपेक्षा सर्वात जास्त जमीन त्यांच्याकडे आहे. इतकेच नव्हे तर इतर जातीपेक्षा या शेतकरी जातीमध्ये साक्षरता आणि शिक्षणाचे लोकांची संख्या अधिक आहे. गावाच्या प्रमुखाचा याच जातीच्या आहे. तो सर्वात मोठा जमिनदार असून त्याच्याकडे स्वतःच्या दोन बसेस आहेत. त्याने भाड्याच्या शहरात किरायाने देण्यासाठी घरे बांधली आहेत. याच जातीतील लाडगौडा यांचे दोन दुकाने असून राईस मील आहे. तिसऱ्या मिळकतीच्या स्वतःची मोठी राईस मील आहे.

* या शेतकरी जातीचा दर्जा फार उच्च नाही. त्याचा दर्जा अस्पृश्य आणि इतर कनिष्ठ जातीच्या वरचा असला तरी ते ब्राम्हण आणि लिंगायत यांच्यापेक्षा खालचे आहेत. वर्णव्यवस्थेत त्यांना शूद्र वर्ण सुचविला आहे. या शेतकरी जातीचा दर्जा कर्मकांड आणि धार्मिकदृष्ट्या मोठा नाही. परंतु त्यांना ब्राम्हण आणि लिंगायत या पुरोहित जातीसह गावातील सर्वच जातीचे लोक मान-सन्मान देतात. याच 'ओक्कालिगा' शेतकरी जातीचा सरपंच किंवा आश्रयदाता यांच्या महत्त्वाच्या प्रसंगी इतर जातीचे लोक सल्ला घेतात. इतकेच नव्हे तर धार्मिक आणि इतर महत्त्वाच्या प्रसंगी ब्राम्हण आणि लिंगायत हे या शेतकरी जातीचा आदर करतात. 'रामपूरा' खेड्यातील प्रभावी दर्जा हा याच शेतकरी जातीचा आहे. ही लोक प्रत्येकाला मान देतात. अशाप्रकारे डॉ. श्रीनिवास यांनी 'रामपूरा' खेड्याचे क्षेत्रीय अध्ययन करून 'ओक्कालिगा' ही शेतकरी जात कशी प्रभावी आहे हे स्पष्ट केले.

## प्रभावी जातीचे घटक [Factors of Dominant Caste] :-

(1) संख्यात्मक शक्ती :- डॉ. श्रीनिवास यांच्या मते, "ज्या जातीच्या लोकांची संख्या सर्वात जास्त असते ती जात प्रभावी जात म्हणून पुढे येते. जास्त संख्या म्हणजे जास्त शक्ती होय. अनेक भौगोलिक क्षेत्रात क्षत्रियांची लोकसंख्या अधिक असल्यामुळे ते समाज जिवनाच्या सर्व क्षेत्रात आपले वर्चस्व प्रस्थापित करतात. डॉ. श्रीनिवास यांनी स्पष्ट केले की, रामपूरा गावातील 'ओक्कालिगा' ही शेतकरी जात समाज जीवनाच्या सर्वक्षेत्रात प्रभावी आहे. ब्राम्हण आणि लिंगायत जातीचे लोक देखील त्यांना मान-सन्मान देतात.

(2) जमिनीची मालकी :- ग्रामीण भागात जमिन हेच त्यांच्या मालकीची असणे ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. शेतजमिनीचे विषम वितरण हे भारतीय समाजाचे वास्तव आहे. गावातील शेतजमिनीचे फार मोठे क्षेत्र हे जमीनदाराच्या मालकीचे असते. हे जमीनदार उच्च जातीतील असतात. ते आपली शेती लोकांना भाड्याने देखील देतात. परिणामतः त्या क्षेत्र किंवा परिसरातील संपूर्ण लोक विशिष्ट जातीच्या काही जमिनदारावर अवलंबून असतात. विशिष्ट जातीचे जमीनदार आपल्या परीसरातील सर्व लोकांवर आपल्या सत्तेचा उपयोग करून आपले वर्चस्व प्रस्थापित करतात. त्या जमीनदाराची जात प्रभावी जात म्हणून सर्व लोकांवर वर्चस्व गाजविते. 'रामपूरा' खेड्यातील बहुतांश शेतजमिनीची मालकी 'ओक्कालिगा' या शेतकरी जातीची आहे.

या जातीचे मोठे जमीनदार आहेत. हे श्रीनिवास यांनी स्पष्ट केले.

* (3) **स्थानिक अधिक्रमात उच्च स्थान** :- भारतीय समाजाचे जातीच्या आधारावर विविध समूहात स्तरीकरण झाले आहे. विवाह आणि अस्पृश्यता आणि शुद्धतेच्या कल्पनेवर जातीची संकल्पना आधारलेली आहे. प्रत्येक कोणत्या विशिष्ट जातीत [illegible] तेव्हा आधारावर श्रेष्ठ असते. 'ओक्कालीगा' या शेतकरी जातीच्या जातीव्यवस्थेतील आणिक [illegible] आहे. परंतु अस्पृश्य आणि इतर जातींपेक्षा त्यांचा क्रम वरचा आहे.

* पारंपारीक समाजातील प्रभावी जातीचे संख्यात्मक शक्ती, आर्थिक शक्ती आणि स्थानिक अधिक्रम व्यवस्थेत उच्च स्थान हे तीन घटक आहे. अलीकडच्या काळात [illegible] परिवर्तन घडून आले. ग्रामीण भागातील लोकांना शिक्षण प्रशासकीय नोकरी आणि राजकीय सत्ता यांचे महत्त्व [illegible] आधुनिक समाजात प्रभावी जातीचे घटक ठरत आहेत.

* (4) **शिक्षण** :- डॉ. श्रीनिवास यांनी प्रभावी जातीची व्याख्या 1955 मध्ये केली होती. 1957 मध्ये शिकागो विद्यापीठातील मानवशास्त्र विभागाच्या वतीने आयोजीत परिषदेत 'रामपुरा' मधील प्रभावी जात हा पेपर त्यांनी वाचला होता. या पेपर मध्ये त्यांनी मूळ [illegible] प्रभावी जातीच्या व्याख्येमध्ये शिक्षण, व्यवसाय या घटकांचा समावेश केला नव्हता परंतु अलीकडे ग्रामीण भागात हे घटक अतिशय महत्त्वाचे ठरत आहे.

* ज्या जातीचे लोक उच्च शिक्षीत आहेत त्या जातीकडे इतर जातीचे लोक आदराने बघतात. उच्च शिक्षणामुळे त्या जातीला इतर जातीचे लोक आदराने [illegible] शिक्षणामुळे विविध क्षेत्रात हे लोक प्रभावी ठरतात म्हणून प्रभावी जातीच्या निकषात शिक्षण हा देखील महत्त्वाचा घटक आहे.

* (5) **प्रशासनात नोकरी आणि उत्पन्नाचे बाहरी स्त्रोत** :- ज्या जातीचे बहुतांश सदस्य हे प्रशासकीय नोकऱ्यांमध्ये असतात किंवा ज्यांची चांगली आर्थिक परिस्थिती आहे. त्यांच्या दर्जा हा वरचा असतो. हे अधिकारी आपल्या जातीच्या लोकांना आणि [illegible] इतर लोकांना मदत करतात. त्यांना विविध व्यवसाय [illegible] प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मदत करतात.

* अशाप्रकारे प्रशासनात नोकरी आणि बाहरी उत्पन्नाचे स्त्रोत यामुळे त्या जातीच्या लोकांच्या आर्थिक दर्जा वाढतो. राजकीय सत्ता, अधिकार आणि आर्थिक [illegible] यामुळे त्या जातीच्या लोकांचा दर्जा वाढतो. ती जात त्या क्षेत्रात आपले वर्चस्व प्रस्थापित करते. म्हणून प्रशासनात नोकरी आणि उत्पन्नाचे बाहरी स्त्रोत हे देखील प्रभावी जातीचे घटक आहेत.

* (6) **राजकीय सहभाग** :- आधुनिक भारतीय समाजातील राजकारणाचे महत्त्व नाकारता येत नाही. जी जात राज्य किंवा स्थानिक राजकारणात अधिक सहभागी असते [illegible] जातीचा दर्जा उंचावतो आणि [illegible] जीवनाच्या विविध क्षेत्रात त्या जातीचे वर्चस्व प्रस्थापित होते. त्या जातीच्या लोकांना ग्रामपंचायत, पंचायत, जिल्हा परिषद आणि इतर निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे केले जाते. ग्रामीण राजकारणात त्या जातीच्या लोकांचा दबदबा असतो म्हणून डॉ. श्रीनिवास यांनी प्रभावी जातीच्या राजकीय सहभाग हा घटक महत्त्वाचा मानला आहे.

* **संस्कृतीकरणाची कारणे** :-

* (1) **उच्च जातीची संस्कृती आदर्श** :- हिंदू धर्मातील जातीव्यवस्था ही विषमतेवर आधारीत आहे. वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था ही ईश्वराने निर्माण केली असे हिंदूंच्या धर्मग्रंथात नमूद करण्यात आलेले होते. उच्च जाती श्रेष्ठ आहेत म्हणून त्या जातीचे लोक [illegible] उच्च जातीच्या लोकांना विशेषाधिकार देण्यात आले आहेत. याउलट कनिष्ठ जातीचे लोक कनिष्ठ असतात. कारण त्यांचे आचार-विचार, खान-पान, कर्मकांड हे खालच्या स्तराचे असतात. अशी समजूत हिंदू धर्माने लोकांमध्ये पसरविली आहे. त्यामुळे कनिष्ठ जातीच्या लोकांना उच्च जातीची संस्कृती ही आदर्श वाटते म्हणून ते उच्च जातीच्या संस्कृतीचे अनुकरण करतात.

* (2) **उच्च जाती - संदर्भ समूह** :- हिंदू धर्माने उच्च जातीचे लोक श्रेष्ठ आहेत असा समज लोकांत निर्माण केला. त्यामुळे कनिष्ठ जातीचे लोक उच्च जातीला आदर्श मानून त्या जातीचे अनुकरण करतात. [illegible] संदर्भ समूहाची कल्पना [illegible] आपल्या वर्तनाचे मूल्यांकन करताना व्यक्ती दुसऱ्या व्यक्तींच्या किंवा समूहाच्या मूल्यांच्या आधारावर [illegible] आपल्या वर्तनाचे निर्धारण करतो. [illegible] संदर्भ आधार म्हणून [illegible] आणि त्यानुसार आपल्या वर्तनाचे निर्धारण करतो. [illegible] संदर्भ समूह [illegible] कनिष्ठ जातीच्या [illegible] संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत कनिष्ठ जातीच्या [illegible] उच्च जातीच्या सांस्कृतिक मूल्ये आणि जीवनशैलीचे अनुकरण करतात.

*③ कनिष्ठ जातींची आकांक्षा :- कनिष्ठ जातीचे लोक उच्च जातीच्या सांस्कृतिक मूल्ये आणि जीवनशैलीचे अनुकरण केवळ त्या जाती उच्च आहेत म्हणून करीत नाही ही गोष्ट येथे ठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे. कनिष्ठ जातीच्या लोकांना आपला सामाजिक दर्जा उन्नत करायचा असतो. समाजात आपल्याला मिळालेला कनिष्ठ दर्जा दूर करून आपला दर्जा उन्नत करण्याची महत्वाकांक्षा कनिष्ठ जातीच्या लोकांमध्ये असते. त्यामुळे कनिष्ठ जातीचे लोक उच्च जातीच्या सांस्कृतिक गोष्टी आणि जीवनशैलीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच ते संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होतात. कनिष्ठ जाती आपल्या आचार-विचार आणि सांस्कृतिक मूल्यात उच्च जातीच्या अनुषंगाने परिवर्तन घडवून आणून आपला सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करतात. यावरून हे स्पष्ट होते की, कनिष्ठ जातीचे लोक आपला सामाजिक दर्जा उन्नत करण्याची महत्वाकांक्षा ठेवून उच्च जातीचे अनुकरण करतात.

B.A.II (15)

## संस्कृतीकरणाचे परिणाम [Consequences of Sanskritization] :-

### *① ब्राम्हण आणि इतर वरिष्ठ जातीच्या संस्कृतीचे सार्वभौमीकरण :-

संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेद्वारे कनिष्ठ लोक हे ब्राम्हण आणि इतर वरिष्ठ जातीच्या संस्कृतीचे अनुकरण करतात. परंतु त्यामुळे ब्राम्हण आणि इतर वरिष्ठ लोकांची संस्कृती ही श्रेष्ठ आहे असा लोकांचा समज होतो आणि लोक उच्च जातीच्या संस्कृतीचे अनुकरण करतात. परिणामत: ब्राम्हण आणि उच्च जातीच्या संस्कृतीचे सार्वभौमीकरण होते. म्हणजेच ही संस्कृती सर्वोच्च आणि श्रेष्ठ आहे. कनिष्ठ जाती किंवा आदिवासींची संस्कृती कनिष्ठ आहे असा समज निर्माण होतो.

*② कनिष्ठ जातीच्या संस्कृतीचे विलुप्तीकरण :- कनिष्ठ जातींची देखील एक विशिष्ट संस्कृती असते. आपल्या सामाजिक दर्जात परिवर्तन व्हावे म्हणून कनिष्ठ जातीचे लोक आणि आदिवासी आपल्या संस्कृतीचा त्याग करून उच्च जातीच्या संस्कृतीचे अनुकरण करतात. त्यामुळे काही कालानंतर कनिष्ठ जातीची संस्कृती विलुप्त होते. आदिवासी समाजातील 'घोटुल' ही सामाजिक-सांस्कृतिक संस्था विलुप्त झाली आहे. थोडक्यात संस्कृतीकरणामुळे कनिष्ठ आणि आदिवासींची वैशिष्टपूर्ण संस्कृती नष्ट होत आहे.

*③ कनिष्ठ जातीत सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन :- कनिष्ठ जातींनी आपली पूर्वीची सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्ये सोडून दिलीत. आणि उच्च जातीच्या सामाजिक सांस्कृतिक मूल्यांचा स्विकार केला. त्यामुळे कनिष्ठ जातीत सामाजिक सांस्कृतिक परिवर्तन घडून आले. ही बाब नाकारता येत नाही. संस्कृतीकरण ही सामाजिक परिवर्तनाची एक प्रक्रिया आहे. त्यामुळे संस्कृतीकरणाच्या माध्यमातून कनिष्ठ जातींनी आपल्यामध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणले आहे.

*④ कनिष्ठ जातींचे दर्जात्मक उन्नयन :- आपला कनिष्ठ सामाजिक दर्जा उन्नत करण्याच्या उद्देशाने त्यांनी उच्च जातीचे अनुकरण केले. उच्च जातींची जीवनशैली त्यांची सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये यांचा स्वीकार करून कनिष्ठ जातीने आपल्या पूर्वीच्या कनिष्ठ दर्जामध्ये परिवर्तन घडवून आणले हे सिद्ध करण्यासाठी कनिष्ठ जातींनी स्वतःमध्ये अनेक सामाजिक सांस्कृतिक आर्थिक आणि शैक्षणिक परिवर्तन घडवून आणले. इतकेच नव्हे तर त्यांनी स्वतःचे उन्नयन घोषित केले. उदा. :- कलार, तेली या जातींनी स्वतःला वैश्य म्हणून घोषित केले.

*अस्पृश्य जातीच्या लोकांनी आपला परंपरागत धर्माचा आणि हिंदूच्या पारंपारिक सामाजिक, सांस्कृतिक मूल्यांचा त्याग केला. त्यांनी उदरनिर्वाहाकरीता इतर नवीन व्यवसायांचा स्विकार केला. त्यांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले. त्यामुळे त्यांच्यात परिवर्तन घडून आले. परंतु हा संस्कृतीकरणाचा परिणाम नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे. अस्पृश्य लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा स्वीकार करून पारंपारिक सामाजिक मूल्ये आणि परंपरागत व्यवसाय व धर्माचा त्याग केला. आणि आपल्यामध्ये परिवर्तन घडवून आणले.

*⑤ उच्च जातीच्या सांस्कृतिक वर्चस्वाची निर्मिती :- उच्च जातीची सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये श्रेष्ठ आहेत. त्याचा स्वीकार केल्याने आपल्या कनिष्ठ सामाजिक दर्जात परिवर्तन होईल ही बाब लक्षात ठेवून उच्च जातीच्या सामाजिक सांस्कृतिक मूल्यांचे अनुकरण केले. त्यामुळे परंपरागत जातीसंरचनेत कोणतेच परिवर्तन झाले नाही. कनिष्ठ जातींची संस्कृती विलुप्त झाली. आणि उच्च जातीचे सांस्कृतिक वर्चस्व निर्माण झाले. संस्कृतीकरणामुळे उच्च जातीच्या संस्कृतीचे श्रेष्ठत्व अबाधित राहिले आणि कनिष्ठ जातीवर उच्च जातीचे सांस्कृतिक वर्चस्व निर्माण झाले म्हणून संस्कृतीकरणा ऐवजी आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही व्यापक आणि वस्तुनिष्ठ असल्याचे आढळून येते.

* (3) कनिष्ठ जातीची आकांक्षा :- कनिष्ठ जातीचे लोक उच्च जातीच्या सांस्कृतिक मूल्ये आणि जीवनशैलीचे अनुकरण केवळ त्या जाती उच्च आहेत म्हणून करीत नाही ही गोष्ट या ठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे. कनिष्ठ जातीच्या लोकांना आपला सामाजिक दर्जा उन्नत करायचा असतो. सामान्यतः आपल्याला मिळालेला कनिष्ठ दर्जा दूर करून आपला दर्जा उन्नत करण्याची महत्त्वाकांक्षा कनिष्ठ जातीच्या लोकांमध्ये असते. त्यामुळे कनिष्ठ जातीचे लोक उच्च जातीच्या सांस्कृतिक गोष्टी आणि जीवनशैलीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. म्हणजेच ते संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होतात. कनिष्ठ जाती आपल्या आचार-विचार आणि सांस्कृतिक मूल्यात उच्च जातीच्या अनुषंगाने परिवर्तन घडवून आणून आपला सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करतात. यावरून हे स्पष्ट होते की, कनिष्ठ जातीचे लोक आपला सामाजिक दर्जा उन्नत करण्याची महत्त्वाकांक्षा ठेवून उच्च जातीचे अनुकरण करतात.

B.A. II (15)

## संस्कृतीकरणाचे परिणाम [Consequences of Sanskritization] :-

* (1) ब्राह्मण आणि इतर वरिष्ठ जातीच्या संस्कृतीचे सार्वभौमीकरण :- संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेद्वारे कनिष्ठ लोक हे ब्राह्मण आणि इतर वरिष्ठ जातीच्या संस्कृतीचे अनुकरण करतात. परंतु त्यामुळे ब्राह्मण आणि इतर वरिष्ठ लोकांची संस्कृती ही श्रेष्ठ आहे असा लोकांचा समज होतो आणि लोक उच्च जातीच्या संस्कृतीचे अनुकरण करतात. परिणामतः ब्राह्मण आणि उच्च जातीच्या संस्कृतीचे सार्वभौमीकरण होते. म्हणजेच ही संस्कृती सर्वोच्च आणि श्रेष्ठ आहे. कनिष्ठ जाती किंवा आदिवासींची संस्कृती कनिष्ठ आहे असा समज निर्माण होतो.

* (2) कनिष्ठ जातीच्या संस्कृतीचे विलुप्तीकरण :- कनिष्ठ जातीची देखील एक विशिष्ट संस्कृती असते. आपल्या सामाजिक दर्जात परिवर्तन व्हावे म्हणून कनिष्ठ जातीचे लोक आणि आदिवासी आपल्या संस्कृतीचा त्याग करून उच्च जातीच्या संस्कृतीचे अनुकरण करतात. त्यामुळे काही कालानंतर कनिष्ठ जातीची संस्कृती विलुप्त होते. आदिवासी समाजातील 'घोटूल' ही सामाजिक-सांस्कृतिक संस्था विलुप्त झाली आहे. थोडक्यात संस्कृतीकरणामुळे कनिष्ठ आणि आदिवासींची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती नष्ट होत आहे.

* (3) कनिष्ठ जातीत सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन :- कनिष्ठ जातींनी आपली पूर्वीची सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्ये सोडून दिलीत. आणि उच्च जातीच्या सामाजिक सांस्कृतिक मूल्यांचा स्विकार केला. त्यामुळे कनिष्ठ जातीत सामाजिक सांस्कृतिक परिवर्तन घडून आले. ही बाब नाकारता येत नाही. संस्कृतीकरण ही सामाजिक परिवर्तनाची एक प्रक्रिया आहे. त्यामुळे संस्कृतीकरणाच्या माध्यमातून कनिष्ठ जातींनी आपल्यामध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणले आहे.

* (4) कनिष्ठ जातीचे दर्जात्मक उन्नयन :- आपला कनिष्ठ सामाजिक दर्जा उन्नत करण्याच्या उद्देशाने त्यांनी उच्च जातीचे अनुकरण केले. उच्च जातीची जीवनशैली त्यांची सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये यांचा स्वीकार करून कनिष्ठ जातीने आपल्या पूर्वीच्या कनिष्ठ दर्जामध्ये परिवर्तन घडवून आणले हे सिद्ध करण्यासाठी कनिष्ठ जातींनी स्वतःमध्ये बरेच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिवर्तन घडवून आणले. इतकेच नव्हे तर त्यांनी स्वतःचे उन्नयन घोषित केले. उदा. :- कलार, तेली या जातींनी स्वतःला वैश्य म्हणून घोषित केले.

* अस्पृश्य जातीच्या लोकांनी आपला परंपरागत कामाचा आणि हिंदूंच्या पारंपारीक सामाजिक, सांस्कृतिक मूल्यांचा त्याग केला. त्यांनी उदरनिर्वाहाकरीता इतर नवीन व्यवसायांचा स्विकार केला. त्यांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले. त्यामुळे त्यांच्यात परिवर्तन घडून आले. परंतु हा संस्कृतीकरणाचा परिणाम नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे. अस्पृश्य लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा स्वीकार करून पारंपारिक सामाजिक मूल्ये आणि परंपरागत व्यवसाय व कामाचा त्याग केला. आणि आपल्यामध्ये परिवर्तन घडवून आणले.

* (5) उच्च जातीच्या सांस्कृतिक वर्चस्वाची निर्मिती :- उच्च जातीची सामाजिक-सांस्कृतिक मूल्ये श्रेष्ठ आहेत. त्याचा स्वीकार केल्यास आपल्या कनिष्ठ सामाजिक दर्जात परिवर्तन होईल ही बाब लक्षात घेऊन उच्च जातीच्या सामाजिक सांस्कृतिक मूल्यांचे अनुकरण केले. त्यामुळे परंपरागत जातीसंरचनेत कोणतेच परिवर्तन झाले नाही. कनिष्ठ जातीची संस्कृती विलुप्त झाली आणि उच्च जातीचे सांस्कृतिक वर्चस्व निर्माण झाले. संस्कृतीकरणामुळे उच्च जातींच्या संस्कृतीचे श्रेष्ठत्व अबाधित राहिले आणि कनिष्ठ जातीवर उच्च जातीचे सांस्कृतिक वर्चस्व निर्माण झाले म्हणून संस्कृतीकरणापेक्षा आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही व्यापक आणि वस्तुनिष्ठ असल्याचे आढळून येते.

# १. भारतीय समाज : संरचना आणि विषमता
## (Indian Society : Structure and Inequality)

- सामाजिक विषमता, सामाजिक विषमतेचे प्रकार.
- जातिव्यवस्था, जातीचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये.
- जाती : विषमतेची संरचना आणि भेदभाव, जातिव्यवस्थेचा परिणाम, जातिभेद नष्ट करण्यासाठी झालेले प्रयत्न.

भारतीय समाजव्यवस्थेचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केल्यास असे आढळून येते की, भारतीय समाज हा जातिव्यवस्थेवर आधारीत आहे. जातिव्यवस्थेशिवाय भारतीय समाजाचा विचार करता येत नाही. जातिव्यवस्था हा भारतीय समाजाचा मुलभूत आधार आहे. म्हणून जातिव्यवस्था म्हणजे भारतीय समाजव्यवस्था होय असे म्हटले जाते.

भारतीय समाजात लोकांचा दर्जा समान नाही. जातिव्यवस्थेत असंख्य जाती आहेत. विशेष म्हणजे प्रत्येक जातीचा दर्जा समान नाही. व्यक्तीचा दर्जा हा त्याच्या जातीनुसार निश्चित होतो. म्हणून भारतीय समाजाची संरचना ही विषमताधिष्ठीत जातिव्यवस्थेवर आधारीत आहे. महत्वाची बाब म्हणजे विषमताधिष्ठीत जातिव्यवस्थेला हिंदू धर्माची मान्यता आहे. म्हणून भारताशिवाय इतर कोणत्याही देशात जातिव्यवस्था आढळून येत नाही. विषमताधिष्ठीत जातिव्यवस्थेचा विचार करण्यापूर्वी सामाजिक विषमता म्हणजे काय? सामाजिक विषमतेचे प्रकार कोणते? याचा थोडक्यात अभ्यास करणे आवश्यक आहे.

### सामाजिक विषमता
### (Social Inequality)

विषमता म्हणजे भेद किंवा फरक होय. दोन व्यक्तीमध्ये शारीरिक विषमता असते. एक व्यक्ती उंच आणि गोरा तर दुसरा व्यक्ती ठेंगणा आणि सावळा असतो. याला देखील विषमता म्हटले जाते. परंतु यास सामाजिक विषमता म्हणता येणार नाही. कारण ही जन्मतः असलेली शारीरिक विषमता आहे. या विषमतेचा आणि सामाजिक विषमतेचा कोणताही संबंध नाही. उलट शारीरिक विषमता असलेल्या व्यक्तींना समाजात समान मानले जाते आणि त्यांच्याशी समतेचा व्यवहार केला जातो. यावरून स्पष्ट होते की, शारीरिक विषमता आणि सामाजिक

विषमता यात फरक आहे. निसर्गतः असलेल्या भिन्नतेला विषमता मानले जात नाही. सामाजिक विषमता ही समाजोद्भवित असते. म्हणजे ही विषमता मानव निर्मित आहे. समाजाने कोणत्या का कारणाने होईना, निर्माण केलेली विषमता ही सामाजिक विषमता होय. या विषमतेला त्या समाजातील मूल्य आणि प्रमाणकांची मान्यता असते. भारतात जातीच्या आधारावर सामाजिक विषमता पाळली जाते. हिंदू धर्मातील मूल्ये आणि प्रमाणकांनुसार प्रत्येक जातीचा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ दर्जा ठरविण्यात आला होता. म्हणून भारतीय समाजात जातीच्या आधारावर सामाजिक विषमता आहे; तर अमेरिका किंवा इतर पाश्चात्य देशात वंशाच्या आधारावर सामाजिक विषमता पाळली जाते. थोडक्यात, सामाजिक विषमता म्हणजे समाज आणि समाजातील परंपरा, मूल्ये आणि प्रमाणकाद्वारा मान्य केलेली विषमता होय.

**सामाजिक विषमतेचे प्रकार** (Types of Social Inequality) :

प्रत्येक देशात सामाजिक विषमतेचे स्वरूप एकसारखे नाही. सामाजिक विषमतेचे आधार देखील वेगवेगळे आहेत. सामाजिक विषमतेच्या संदर्भात अनेक समाजशास्त्रज्ञांनी विचार मांडले आहेत. **मार्क्स** आणि **वेबर** यांनी देखील सामाजिक विषमतेबद्दल आपले विचार मांडले आहेत. आर्थिक विषमतेमुळे सामाजिक विषमता निर्माण होते, असे **मार्क्सने** प्रतिपादन केले आहे. तर **मॅक्स वेबरच्या** मते, वर्ग, दर्जा आणि सत्ता या आधारावर समाजात विषमता निर्माण झाली आहे. सामाजिक विषमता वेगवेगळ्या स्वरूपाची आणि दुर्बोध आहे तसेच सामाजिक विषमतेच्या प्रवर्गीकरणाचे विविध प्रकार आहेत.[1] हे लक्षात घेऊन **डब्ल्यू. जी. रन्सीमन** (W. G. Runciman) यांनी वर्ग, दर्जा आणि सत्ता या आधारावर सामाजिक विषमतेच्या प्रकाराचे विश्लेषण केले आहे. समाजात वर्ग , दर्जा आणि सत्ता असते. सर्व लोकांचा वर्ग एकसमान नसतो. त्यांच्यात वर्गांच्या आधारावर भिन्नता आढळून येते. त्याचप्रमाणे सर्वांचा दर्जा समान नसतो. दर्जानुसार समाजात विषमता दिसून येते. समाजातील सर्वच लोक सत्ताधारी नसतात. सत्तेच्या आधारावर विषमता आढळून येते. वर्ग, दर्जा आणि सत्ता या आधारावर रन्सीमन यांनी सामाजिक विषमतेचे पुढील तीन प्रकार पाडले आहेत.[2]

१) **वर्गांची विषमता** (Inequality of Class)

२) **दर्जाची विषमता** (Inequality of Status)

३) **सत्तेची विषमता** (Inequality of Power)

या तीन प्रकारच्या विषमतेपैकी दर्जाची विषमता जातीच्या विषमतेशी संबंधित आहे. रन्सीमनच्या मते, '**सामाजिक गुणविशेषातील फरक आणि जीवनशैली ज्यामुळे श्रेष्ठ किंवा कनिष्ठ प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त होते त्या सर्वांचा समावेश दर्जाच्या विषमतेमध्ये** केला जातो.'[3] दर्जा हा समाजाद्वारे निर्धारित केला जातो. म्हणून सामाजिक दर्जाच्या आधारावर जी विषमता निर्माण होते त्यास सामाजिक विषमता म्हणतात. या विषमतेलाच रन्सीमन यांनी दर्जाची विषमता म्हटले आहे.

## जातिव्यवस्था

### (Caste System)

भारतीय समाजव्यवस्था ही प्रामुख्याने वर्णव्यवस्था आणि जातिसंस्थेवर आधारीत आहे. जातिसंस्था, भारतीय समाजाचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे. म्हणूनच भारतीय समाजाचे वस्तुनिष्ठ अध्ययन करण्यासाठी चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि जातिसंस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय समाजाचे शेकडो जातींमध्ये विभाजन झालेले आहे. त्यामुळे भारतीय समाज एकसंध नाही. जातिव्यवस्था ही एक सामाजिक संस्था असून त्यास हिंदू धर्माची मान्यता असल्यामुळे जातिव्यवस्था शेकडो वर्षांपासून टिकून आहे. हिंदू धर्माची प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या जातीची सदस्य आहे. विशेष महत्वाची बाब म्हणजे भारतीय समाजात व्यक्तीचा दर्जा हा त्याच्या जातीवरून निश्चित होतो. व्यक्तीची ओळख त्याच्या गुण किंवा कर्तृत्वावरून केली जात नाही. तर जातीच्या आधारावर व्यक्तींची ओळख करण्याची परंपरा आपल्या देशात आहे. भारतीय समाज जीवनावर जातिव्यवस्थेचा फार मोठा प्रभाव पडला आहे.

वर्ण आणि जाती या वेगवेगळ्या संकल्पना आहेत. वर्णव्यवस्थेमुळे भारतीय समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णात विभाजन झाले होते. तर जातिसंस्थेमुळे भारतीय समाजाचे शेकडो जाती आणि उपजातीत विभाजन झालेले आढळून येते. प्राचीन काळी भारतीय समाजात प्रथम वर्णव्यवस्था अस्तित्वात आली. त्यानंतर जातिव्यवस्था निर्माण झाली. वर्ण व जातीचे महत्वाचे साम्य म्हणजे प्रत्येक वर्ण आणि जातीचा दर्जा हा समान नाही. वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्थेमुळे भारतीय समाजात विषमता निर्माण झाली. वर्ण आणि जाती या जन्मावर आधारीत असल्यामुळे व्यक्तीचा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ दर्जा हा जन्मतःच निश्चित होतो.

सुप्रसिद्ध भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ.जी.एस.धुर्ये यांनी 'Caste and Race in India' (1969) या ग्रंथात स्पष्ट केले आहे की, "आर्य जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांच्यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे तीन सुस्पष्ट वर्ण, वर्ग निर्माण झाले होते. या तीन वर्णांमध्ये आपसातच विवाह करायला हवेत असे बंधन नव्हते. तरी देखील त्यांच्यात अशा प्रकारचे विवाह क्वचित प्रसंगी होत असावे."[4] चौथ्या शुद्र वर्णाचा उल्लेख तत्कालीन वाङ्मयात उशिरा येतो. प्राचीन वैदिक वाङ्मयात प्रामुख्याने ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णांचाच उल्लेख मिळतो, पण ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तात मात्र ब्राह्मण, वैश्य आणि शुद्र या चारही वर्णांचा उल्लेख आहे.

ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् बाहू राजन्य कृत: ।।
उरूस्तदस्य यद्वैश्य: पदभ्यां शूद्रोऽजायत: ।। (ऋग्वेद १० : ९०)

ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तातील वरील उल्लेखानुसार ब्राह्मण हे मुखातून, क्षत्रिय बाहूतून, वैश्य मांड्यातून आणि शुद्र पायातून जन्माला आले आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, वैदिक काळातच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे चार वर्ण अस्तित्वात आले होते.

आर्यांनी भारतातील ज्या मूळ रहिवाशांवर आपले स्वामित्व प्रस्थापित केले होते, अशा मुळच्या स्थानिक रहिवाशांचा शुद्र वर्ण निर्माण करण्यात आला होता असे मत सेनार्ट या पाश्चात्य विचारवंताने मांडलेत. सेनार्टच्या या मतांशी डॉ. धुर्ये सहमत होते.

भारतात आलेले वेदकालीन आर्य स्वतःला 'आर्य' म्हणून घेत असत. ते जिंकलेल्या स्थानिक लोकांना 'दास' म्हणून संबोधत असत. डॉ. राम आहूजा यांनी 'Indian Social System' (१९९३) या ग्रंथात, ऋग्वेदात आर्य वर्ण आणि दास वर्ण अशा दोन वर्णांचा उल्लेख आढळतो[4], असे प्रतिपादन केले आहे. आर्यांनी स्वतःला दासांपासून वेगळे ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला हे डॉ. धुर्ये यांनी अनेक उदाहरणासह स्पष्ट केले आहे. आर्य लोक (केल्टस, अँग्लो सॅक्सन, ट्यूटन, रोमन, इटालियन) जिथे, जिथे गेले तिथे, तिथे त्यांनी स्वतःला स्थानिक लोकांपासून वेगळे ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या स्वतःला वेगळे ठेवण्याच्या वृत्तीतून धार्मिक कार्यातील शुचितेची कल्पना निर्माण झाली. वेगळेपणाची वृत्ती आणि धार्मिक शुचितेची संकल्पना ही सर्व टोळ्यांची दोन वैशिष्ट्ये होती. पुढे धुर्ये म्हणतात की, "भारतात आलेल्या आर्यांनी येथील मुळच्या रहिवाशांना जिंकले. पण त्यांना आपल्या धार्मिक, सांस्कृतिक जीवनात सहभागी करून घेतले नाही. स्वतःला वांशिक व सांस्कृतिकदृष्ट्या श्रेष्ठ समजून इतरांना हिनतेने वागविले. परंतु ज्या मुळनिवासी लोकांनी आर्यांचे स्वामित्व मान्य केले त्यांचा 'शुद्र' हा वेगळा वर्ण निर्माण करून त्यांचा आपल्या समाजव्यवस्थेचा एक भाग म्हणून स्वीकार केला."(That Shudra class was largely formed by these aborigines who has accepted the over-leadership of the Indo-Aryans and had entered into their service is more than probable.[5])

वर्णव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णांचा समावेश करण्यात आला होता. म्हणून वर्णव्यवस्थेला चातुर्वर्ण्य व्यवस्था असे म्हटले जाते. चातुर्वर्ण्यव्यवस्थेत ब्राह्मण वर्णाचा दर्जा श्रेष्ठ, तर शुद्र वर्णाचा दर्जा सर्वात खालचा अर्थात कनिष्ठ होता. ब्राह्मणांचे वर्चस्व आणि श्रेष्ठत्व टिकून रहावे, याकरिता वर्णव्यवस्थेची निर्मिती करण्यात आली. इतकेच नव्हे तर वर्णव्यवस्थेस धार्मिक अधिष्ठान दिले गेले. ब्राह्मण ग्रंथकारांनी धर्माच्या आधारावर चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे उदात्तीकरण आणि गौरवीकरण केल्याचे अनेक पुराव्यासह सिद्ध करता येते.

चातुर्वर्ण्यव्यवस्थेत शुद्र वर्ण हा बहुसंख्यांक होता. कारण शुद्र वर्णात येथील मुळ रहिवासीयांचा समावेश करण्यात आला होता. शुद्र वर्ण बहुसंख्यांक असल्यामुळे या वर्णाचे लोक वर्णव्यवस्थेला विरोध करतच. ही गोष्ट लक्षात घेऊन शुद्र वर्णाचे शेकडो जातीत विभाजन करण्यात आले. वर्णव्यवस्थेप्रमाणेच जातिव्यवस्थेची निर्मिती सुद्धा ब्राह्मणांनी केली, असे मत समाजशास्त्रज्ञ डॉ. धुर्ये यांनी मांडले. या संदर्भात डॉ. धुर्ये यांनी असा निष्कर्ष काढला की, 'भारतातील जाती गंगा आणि यमुनेच्या खोऱ्यात स्थिरावलेल्या इन्डो-आर्यन संस्कृतीच्या ब्राह्मणांच्या मुलाचा पाळणा आहे. आणि तेथूनच ती देशाच्या इतर भागात प्रसार पावली.' (I may conclude that caste in India is a Brahiminic child of Indo-Aryans culture, cradled in the land of the Ganga and the Yamuna



and the transfered to other parts of the country.[7]) जातिव्यवस्था ही ब्राह्मणांनी निर्माण केली असे डॉ. धुर्ये यांनी स्पष्ट केले. पुढे ते नमूद करतात की, 'उच्च वर्गांकरिता विशेष हक्क आणि कनिष्ठ वर्गांसाठी अपात्रता हे सर्वच वर्ग समाजाचे सार्वत्रिक स्वरूपाचे लक्षण आहे. त्यामुळे जातीचे अधिकार आणि अपात्रता या चार जातींच्या ब्राह्मणी सिद्धांताचे विशेष विश्लेषण करण्याची आवश्यकता नाही.' (Special rights for the higher classes and disabilities on the lower ones was almost a universal feature of class society, and a Brahminical theory of four caste with their rihgts and disability does not call as special explanations.[8])

इ. स. पूर्व ८ व्या शतकात लिहिलेल्या 'ब्राह्मणके' मध्ये चार वर्णांनी कोणते कर्मकांड करावे आणि कोणते कार्य करावे यासंबंधीचे स्पष्ट उल्लेख आहेत.[9] इ. स. पूर्व ८ व्या शतकात जातींचा उल्लेख आढळत नाही. गौतम बुद्धाने (इ. स. पूर्व ५६३-४८३) वर्णव्यवस्थेला विरोध केला होता. सर्व मानव समान आहेत हा विचार त्यांनी मांडला. बौद्ध धम्माच्या प्रभावामुळे वर्णव्यवस्था मोडकळीस आली होती. इ. स. पूर्व १८५ मध्ये बौद्ध सम्राट अशोकाचा नातू बृहद्रथ हा सैन्याचे निरीक्षण करीत असतांना, ब्राह्मण सेनापती पुष्यमित्र शुंग याने कपटाने त्याचा खून केला. आणि पुष्यमित्र शुंग स्वतः राजा बनला. त्यामुळे इ. स. पूर्व १८५ मध्ये मौर्य साम्राज्याचा अंत झाला. शुंग घराण्याची सत्ता इ. स. पूर्व १८५ ते इ. स. पूर्व ७२ पर्यंत होती. या काळात लिहिलेल्या स्मृतींमध्ये प्रत्येक जातीचे नियम आणि रितीरिवाज निश्चित करण्यात आले होते.[10] शुंग काळात जातिसंस्था ही अधिक मजबूत झाली. पूर्वी जातिव्यवस्था ही जन्मावर आधारित नव्हती. परंतु या काळात जाती जन्मानुसार निश्चित करण्यात आल्यात. त्यामुळे जन्मावर आधारित जातिव्यवस्था ही प्रामुख्याने इ. स. पूर्व १८५ नंतर उदयास आली असे निश्चितपणे सांगता येईल.

भारतातील जातिव्यवस्थेचे अध्ययन प्रामुख्याने प्राच्यविद्याशास्त्रीय (Indological) सामाजिक-मानववंशशास्त्रीय (Socio-Anthropological) आणि समाजशास्त्रीय (Sociological) या तीन दृष्टिकोनातून करण्यात आले असे डॉ. आहुजा यांनी 'Indian Social System' या ग्रंथात नमूद केले आहे.[11]

प्राच्यविद्याशास्त्रीय दृष्टिकोन हा धार्मिक स्वरूपाचा आहे. या दृष्टिकोनानुसार धर्मग्रंथामध्ये जातीच्या उत्पत्ती आणि उद्देशाचे वर्णन केले आहे. त्यांच्या मते, ब्रह्म या विराट पुरुषापासून वर्णाची निर्मिती झाली आणि या चार वर्णाचे विविध जातीमध्ये विभाजन झाले.

सामाजिक मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनानुसार संघटनात्मक, संरचनात्मक-संस्थात्मक आणि संबंधात्मक आधारावर जातीची उत्पत्ती आणि विकास झाला. हा दृष्टिकोन हटन (Hutton), रिस्ले (Risley), हॉबेल (Hobel), क्रोबर (Kroeber) यांनी मांडला.

तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समाजातील सामाजिक स्तरीकरण या अर्थाने जातीचे विश्लेषण करण्यात आले. सामाजिक विषमतेची व्यवस्था म्हणून जातिव्यवस्थेचा विचार करण्यात आला आहे. या दृष्टिकोनानुसार समाजाचे काही संरचनात्मक पैलू आहेत आणि त्याचे

विभाजन समाजाच्या सदस्यांच्या सामाजिक दर्जामध्ये केले जाते.

जातिसंस्थेच्या अध्ययनाशिवाय भारतीय समाजव्यवस्थेचे वस्तुनिष्ठ आकलन होऊ शकत नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून समाजशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञांचे लक्ष जातीच्या अध्ययनाकडे केंद्रीत झाले होते.[१२] ज्या विदेशी आणि भारतीय संशोधकांनी जातीचे अध्ययन केले, त्यात नेसफील्ड (१८८१), अॅबे डुबॉइस (१९०६), डॉ. एस. व्ही. केतकर (१९०९), सर हर्बर्ट रिस्ले (१९१५), डॉ. बी. आर. आंबेडकर (१९१६), सेनार्ट (१९३०), एन. के. दत्त (१९३१), डॉ. जी. एस. घुर्ये (१९३२), हटन (१९४६), ब्रेयर (१९६०), पी. एन. प्रभू (१९६३), डॉ. इरावती कर्वे (१९६४), एम. एन. श्रीनिवासन (१९६२) यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. या संशोधकांनी आपल्या अध्ययनामधून जातींची उत्पत्ती, जातीचा इतिहास, जातींची अनेकता, जाती-जातींमधील संबंध, जातीच्या परिवर्तनाचे स्वरूप इत्यादी पैलूंचे स्पष्टीकरण केले आहे.

डॉ. एस. व्ही. केतकर या भारतीय समाजशास्त्रज्ञाने जातिव्यवस्थेचा अभ्यास करून 'भारतातील जातीचा इतिहास' (History of Caste in India) हा ग्रंथ न्यूयॉर्क येथून १९०९ मध्ये प्रसिद्ध केला. त्यानंतर जातिसंस्थेचे अध्ययन करणाऱ्या भारतीय संशोधकात डॉ. बी. आर. आंबेडकरांचा क्रमांक लागतो. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात शिक्षत असतांना डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्थेचे अध्ययन करून ९ मे १९१६ रोजी 'Caste in India : It's Mechanism, Genesis and Development' या विषयावरील संशोधन पेपर मानववंशशास्त्र परिषदेत सादर केला होता.

जातिसंस्थेचे अध्ययन करीत असतांना जातीचा अर्थ, जातीची वैशिष्ट्ये, जातीचे गुण-दोष इत्यादींचा विचार करणे आवश्यक आहे. त्याशिवाय जातिसंस्थेचे वस्तुनिष्ठ आकलन होऊ शकणार नाही.

**जातीचा अर्थ (Meaning of Caste) :**

'जात' हा मराठी शब्द 'जन' या धातूपासून बनला आहे. त्याचा अर्थ जन्म असा आहे. एकप्रकारे जन्माने प्राप्त होणारा समूह म्हणजे जात होय. जातीला इंग्रजीमध्ये 'Caste' म्हणतात. 'Caste' हा इंग्रजी शब्द पोर्तुगीज 'Casta' या शब्दावरून बनला आहे. 'Casta' या पोर्तुगीज शब्दाची व्युत्पत्ती 'Castus' या लॅटीन भाषेतील शब्दातून झाली. 'Castus' या शब्दाचा अर्थ वंशाची शुद्धता असा आहे. 'Caste' हा शब्द पोर्तुगीजांनी वंश शुद्धतेला उद्देशून १५६७ मध्ये गोवा मंडळाच्या हुकूमनाम्यात प्रथम वापरला होता. परंतु जाती हे वंश शुद्धतेचे निदर्शक नाही. जातीचा आणि वांशिक समूहाचा कोणताच संबंध नाही. तरी देखील जातीला इंग्रजीमध्ये पर्यायी शब्द म्हणून हा शब्द रूढ झाला आहे.

जातिव्यवस्थेचे समाजशास्त्रीय विश्लेषण करतांना, समाजशास्त्रज्ञ डॉ. बी. आर. आंबेडकर नमूद करतात की, "जाती या दर्जाबाबत समान नाहीत. जातीचा क्रम विषमतेवर आधारित आहे. एक जात दुसऱ्या जातीच्या तुलनेत उच्च किंवा कनिष्ठ आहे. जातीने श्रेणीरचना निर्माण केली, ज्यामध्ये एक जात सर्वात वर असून ती सर्वोच्च आहे आणि इतर खालच्या असून कनिष्ठ



आहेत. मधल्या जाती उच्च जातीपेक्षा कनिष्ठ आणि कनिष्ठ जातीपेक्षा उच्च आहेत. जाती पद्धत ही श्रेणी पद्धत असून त्यात उच्च जातीला अग्रक्रम आणि कनिष्ठ जातीला इतरांपेक्षा न्यूनक्रम मिळतो."[१३]

अशाप्रकारे भारतीय समाजाचे वेगवेगळ्या जातीत विभाजन झाले आहे. समाजाचे वेगवेगळ्या जातीत झालेले हे विभाजन म्हणजे एक प्रकारचे सामाजिक स्तरीकरण होय. परंतु हे स्तरीकरण व्यक्तीच्या गुण आणि कर्तृत्वाच्या आधारावर नसून ते व्यक्तीच्या जातीवर आधारलेले आहे. व्यक्तीचा जन्म ज्या जातीत झाला, त्या जातीचा दर्जा व्यक्तीला प्राप्त होतो. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे व्यक्तीला जात बदलविता येत नाही. त्यामुळे व्यक्तीचा दर्जा सुद्धा बदलत नाही. म्हणून जातीवर आधारित असलेले हे स्तरीकरण बंदिस्त स्वरूपाचे आहे.

**व्याख्या (Definition) :**

**१) डॉ. बी. आर आंबेडकर** (Dr. B. R. Ambedkar) : "बहिर्गट विवाह बंधनावर अंतर्गत विवाह बंधनाचे वर्चस्व प्रस्थापित होणे म्हणजे जात होय. जात हा एक बंद झालेला वर्ग होय."

(The superposition of endogamy on exogamy means the creation of caste. Caste is an enclosed class. - Dr. B. R. Ambedkar[१४])

**२) चार्लस कुले** (Charles Cooley) : "जेव्हा वर्ग आनुवंशिकतेच्या तत्वावर आधारलेला असतो तेव्हा आपण त्याला जात म्हणू शकतो."

(When a class is somewhat strictly hereditary, we may call it a caste. - Charles H. Cooley[१५])

**३) डॉ. एस. व्ही. केतकर** (Dr. S. V. Ketkar) : "जात हा एक सामाजिक समूह असून त्याची दोन वैशिष्ट्ये आहेत. १. जात विशिष्ट जातीतील सदस्यांच्या पोटी जन्मास आलेल्यांनाच त्या जातीचे सदस्यत्व प्राप्त होते. २. या सदस्यांना कठोर सामाजिक नियमांद्वारे आपल्या (जाती) समुहाबाहेर विवाह करण्यास बंदी आहे."

(A caste is a social group having two characteristics, 1. Membership is confined to these who are born of members and includes all persons so born. 2. The members are forbidden by an inexorable social law to marry outside the group" - Dr. S. V. Ketkar[१६])

**डॉ. बी. आर. आंबेडकर, चार्लस कुले, डॉ. मजुमदार आणि डॉ. मदन, डॉ. इरावती कर्वे, डॉ. एस. व्ही. केतकर** यांच्या व्याख्यांवरून जातीचा अर्थ स्पष्ट होतो. **थोडक्यात,** जात हा एक अंतर्गत विवाही समूह असून त्याचे सदस्यत्व हे केवळ जन्माच्या आधारावरच प्राप्त होते. प्रत्येक जातीचा दर्जा हा एकसारखा नाही.

**जातीची वैशिष्ट्ये (Characteristics of Caste) :**

डॉ. जी. एस. घुर्ये यांनी जातीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.[१७]

१) समाजाचे खंडात्मक विभाजन (Segmental Division of Society)

२) श्रेष्ठ- कनिष्ठता (Hierarchy)

३) रोटी व्यवहार आणि सामाजिक संबंधावर निर्बंध (Restrictions on Feeding and Social Intercourse)

४) सामाजिक व धार्मिक अयोग्यता आणि विशेषाधिकार (Social and Religious Disabilites and Privileges)

५) व्यवसाय निवडीवर निर्बंध (Restrictions on Selection of Occupation)

६) विवाहावरील निर्बंध (Restrictions on Marriage)

७) धार्मिक आधारावर (Based on Religion)

**जाती : विषमतेची संरचना आणि भेदभाव** (Caste : Structure of Inequality and Discrimination) :

भारतीय समाज वेगवेगळ्या जातीच्या समूहामध्ये विभागला आहे. म्हणून **डॉ. जी. एस. घुर्ये** म्हणतात की, 'हिंदू समाज हा वेगवेगळ्या जातीच्या समूह किंवा खंडामध्ये विभागला आहे.' प्रत्येक जात ही सामाजिक दर्जावर आधारलेला समूह आहे. प्रत्येक जातीचा सामाजिक दर्जा विषम आहे. प्रत्येक जातीचा दर्जा हा रूढी, परंपरा आणि धार्मिक नियमांद्वारे वेगवेगळा आहे. व्यक्तीचा सामाजिक दर्जा हा त्या व्यक्तीच्या जातीच्या दर्जावरून निश्चित होतो. प्रत्येक जातीची एक स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण जीवनपद्धती आहे. व्यक्तीचा ज्या जातीत जन्म झाला असेल त्याच जातीच्या नियमांनुसार व्यक्तीला जीवन जगणे अनिवार्य आहे. विशेष म्हणजे व्यक्तीला आपली जात बदलण्याची संधी नाही. म्हणून जातीच्या आधारावर मिळालेला व्यक्तीचा दर्जा आयुष्यभर कायम असतो. उदा. अस्पृश्य जातीतील व्यक्ती कितीही कर्तृत्ववान असली तरी तिचा सामाजिक दर्जा बदलत नाही.

श्रेष्ठ-कनिष्ठता हे जातीचे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. जातिव्यवस्थेत सर्व जातींचा दर्जा समान नसतो. ब्राह्मण जात ही सर्व जातींपेक्षा श्रेष्ठ मानण्यात आली, तर अस्पृश्य जातींचा दर्जा सर्वांत खालचा आहे. ब्राह्मण जातीचा अपवाद वगळल्यास प्रत्येक जात ही कोणत्यातरी जातीपेक्षा श्रेष्ठ आणि इतर जातीपेक्षा कनिष्ठ असते. जातिव्यवस्थेचे एक अभ्यासक आणि थोर समाजशास्त्रज्ञ **डॉ. बी. आर. आंबेडकर** स्पष्टपणे प्रतिपादन करतात की, "जाती या दर्जाबाबत समान नाहीत. त्यांचा क्रम हा विषमतेवर आधारित आहे." (Castes are not equal in status. Their order is based on inequality.[१०])

यावरून हे स्पष्ट होते की जातीची संरचना ही विषमतेवर आधारीत आहे. म्हणून जातीची संरचना ही विषमताधिष्ठीत आहे. विषमता हाच जातिव्यवस्थेचा मूळ आधार आहे.

सामाजिक व्यवहार आणि रोटी व्यवहार हे देखील विषमतेवर आधारीत आहेत. सामाजिक संबंधाबाबत जातिव्यवस्थेचे कडक निर्बंध होते. उच्च जातीचे लोक कनिष्ठ जातीशी सामाजिक संबंध ठेवत नाही. इतकेच नाही तर अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींचा स्पर्श सुद्धा विटाळ मानल्या जात होता. खालच्या जातीसोबत म्हणजेच अस्पृश्यांबरोबर उठणे, बसणे, हुक्का



पिणे, प्रवास करणे, वस्तूंची खरेदी-विक्री करणे, विहीर किंवा तलावावरून पाणी आणणे, मंदिर प्रवेश, सण-उत्सवांमधील सहभाग इत्यादी सर्व व्यवहारांवर बंदी होती. वरच्या जातीचे लोक खालच्या जातीच्या लोकांकडील शिजलेले अन्न घेत नाहीत.

जातिव्यवस्थेत जातींच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या आधारावरून त्या जातीच्या लोकांचा सामाजिक दर्जा निश्चित व्हायचा. या श्रेष्ठ-कनिष्ठतेनुसार जातीचे समाजामधील स्थान, विशेषाधिकार आणि योग्यता निश्चित ठरविण्यात आले. कनिष्ठ जातीतील व्यक्तींना सामाजिक आणि धार्मिक अधिकारांपासून वंचित ठेवले होते. वरिष्ठ जातींना विशेष सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक अधिकार होते तर कनिष्ठ जातींवर सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक अपात्रता लादण्यात आल्या होत्या.

प्रत्येक जातीचा एक विशिष्ट व्यवसाय होता. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीचा परंपरागत व्यवसायच करावा लागत होता. आपल्या आवडी-निवडीनुसार किंवा गुणवत्तेनुसार व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य जातिव्यवस्थेत नव्हते. विशेष म्हणजे व्यवसायाचा दर्जा हा जातीच्या आधारावर निश्चित व्हायचा. कनिष्ठ जातीचे व्यवसाय हे अतिपरिश्रमाचे, घाणेरडे आणि अल्प मोबदल्याचे असायचे, तर उच्च जातीचे व्यवसाय हे श्रेष्ठ आणि अधिक आर्थिक लाभ मिळवून देणारे असत.

एका जातीचे लोक दुसऱ्या जातीशी वैवाहिक संबंध ठेवू शकत नव्हते. प्रत्येक जात ही अंतर्विवाही होती. म्हणजे व्यक्तीचे विवाहसंबंध हे आपल्या जातीमध्येच व्हायचे. दुसऱ्या जातीशी विवाहसंबंध ठेवणे जातीच्या आणि धर्माच्या विरुद्ध होते.

जातीच्या विषमताधिष्ठित संरचनेस प्रत्यक्ष हिंदू धर्माची मान्यता आहे. व्यक्तीने आपल्या जातीच्या नियमांचे पालन करणे म्हणजेच धर्माचे पालन करणे होय, असे मानले जायचे. जातीच्या विषम संरचनेस प्रत्यक्ष धर्माचा आधार होता. म्हणून जातिव्यवस्था ही टिकून राहिली. जातीच्या नियमांचे उल्लंघन करणे हे अधार्मिक कृत्य मानले जाते. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जातीनुसारच वर्तन केले पाहिजे असे अनेक उल्लेख हिंदू धर्मग्रंथात आढळतात. जातीच्या विषम संरचनेस हिंदू धर्माची मान्यता असल्यामुळे जातिव्यवस्थेच्या विषम संरचनेविरुद्ध सामाजिक आंदोलने उग्र स्वरूपात होऊ शकली नाही.

भेदभाव (Discrimination) :

जातिव्यवस्थेची संरचना ही विषमतेवर आधारीत आहे. हे आपण लक्षात घेतले आहे. प्रत्येक जातीचे लोक इतर जातींच्या लोकांपेक्षा वेगळे आहेत असे मानले जाते. म्हणजेच सर्व जातीचे लोक समान आहेत असे मानले जात नाही. कारण सर्व जातींचा दर्जा समान नाही. त्यामुळे विविध जातीच्या लोकांमध्ये विषमता आहे असा विश्वास जातिव्यवस्थेने समाजात रूढ केला. म्हणून जातीभेद पाळला जातो. जातीभेदाच्या आधारावर माणसा-माणसांमध्ये भेद किंवा फरक केला जातो. उच्च जातीचे लोक कनिष्ठ जातीच्या लोकांशी भेदभाव करतात. ते कनिष्ठ जातीच्या लोकांना आपल्यापेक्षा निम्न मानतात. त्यामुळे भारतात जातीच्या आधारावर माणसा-माणसांत भेदभाव पाळला जातो. जातिव्यवस्थेमुळे भेदभावाची समस्या निर्माण झाली.

सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी सर्वच क्षेत्रात भेदभाव पाळला जातो. विशेषतः देशातील पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य लोकांशी मोठ्या प्रमाणात भेदभाव पाळला जातो. महत्वाची बाब म्हणजे जातिव्यवस्थेच्या आधारावर भेदभाव पाळणे वाईट मानले जात नाही. उलट भेदभाव पाळणे धार्मिक कर्तव्य मानले जाते. ही अत्यंत वाईट बाब आहे. अस्पृश्य लोक शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या प्रगत असले तरी देखील त्यांच्याशी भेदभाव पाळला जातो.

पूर्वी अस्पृश्य लोकांना स्पर्श करणे, त्यांच्यासोबत जेवण करणे निषिद्ध मानले जायचे. परंतु अलीकडे अस्पृश्य लोकांची प्रगती झाली. त्यांना स्पर्श केला जातो किंवा त्यांच्याशी रोटीव्यवहार केला जातो. परंतु त्यांच्यासोबत आजही भेदभाव केला जातो. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात त्यांच्यासोबत भेदभाव केला जातो. हा भेदभाव दृश्य स्वरूपात कुणी पाळत नाही. कारण अस्पृश्यता पाळणे किंवा जातीच्या आधारावर भेदभाव करणे हा कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला आहे. असे असले तर अदृश्य स्वरूपात भेदभाव पाळला जातो. उदा. नोकरीकरिता काही उमेदवार पात्र आहेत. त्यापैकी पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातीचा किंवा अनुसूचित जातीचा उमेदवार हा इतर जातीच्या उमेदवारापेक्षा अधिक पात्र आणि हुशार असला तरी त्या उमेदवाराची निवड केली जात नाही. अनुसूचित जातीच्या उमेदवाराची मुलाखत चांगली झाली असताना देखील त्यास मुलाखतीचे मार्क कमी देणे हा देखील भेदभावाचा परिणाम आहे. म्हणून आधुनिक काळात देखील भेदभावाची अत्यंत ज्वलंत समस्या आहे.

पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य किंवा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जातींच्या लोकांसोबतच भेदभाव केला जातो. त्याचप्रमाणे उच्च जातीचे लोक त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या जातीच्या लोकांसोबत देखील भेदभाव करतात. उच्च जातीचे लोक **ओबीसी** जातीच्या लोकांशी भेदभाव करतात. ओबीसी प्रवर्गातील जातीचे लोक त्याच प्रवर्गातील इतर जातीच्या लोकांसोबत भेदभाव करतात.

अशाप्रकारे भेदभाव करण्याची समस्या सर्व जातीच्या लोकांमध्ये आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जातिव्यवस्था होय. जातिव्यवस्थेनुसार सर्व जातीचे लोक समान नाहीत. जातिव्यवस्थेने जातीच्या आधारावर लोकांमध्ये विषमता निर्माण केली. या विषमतेमुळे समाजात भेदभाव करण्याची फार मोठी समस्या निर्माण झाली.

वरील विश्लेषणावरून हे स्पष्ट होते की, जातीची संरचना ही मुळात विषमतेवर आधारीत आहे. अशी ही जातिव्यवस्था भारतीय समाजव्यवस्थेचा आधार आहे. म्हणून भारतीय समाजव्यवस्थेची संरचना विषमताधिष्ठीत आहे. त्यामुळे भारतीय समाजात भेदभाव पाळला जातो. भेदभावाची समस्या राष्ट्राच्या एकतेकरिता अतिशय घातक आहे. भारतीय समाजातील सामाजिक विषमता आणि त्याआधारावरील भेदभाव नष्ट करायचा असेल तर जातिव्यवस्था समूळ नष्ट करणे आवश्यक आहे. भारतातील जातिव्यवस्थेचा आधार हिंदू धर्मग्रंथ आहेत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्टपणे प्रतिपादन करतात की, **"जातीची विषम समाजरचना नष्ट करण्यासाठी** धर्मग्रंथाच्या गुलामीतून प्रत्येक स्त्री–पुरुषास मुक्त करावे लागेल."



जातिव्यवस्थेचा परिणाम :

जातिव्यवस्था ही विषमतेवर आधारित आहे. त्यामुळे जातीच्या गुणांपेक्षा जातीचे दो
अधिक आहेत. भारतीय समाजात जाती विषमता किंवा जातिभेद ही एक फार मोठी सामा
समस्या आहे. जातीविषमतेमुळे भारतीय समाजात विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. स्वात
समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांचा अभाव जातिव्यवस्थेत असल्यामुळे शुद्र अ
अस्पृश्य लोकांच्या मानवी अधिकारांचे हनन झाले. जातिवाद, अस्पृश्यता, सामाजिक शो
इत्यादी अनेक समस्या जातिभेदामुळे निर्माण झाल्यात. जातिभेदामुळे एकसंघ असा भार
समाज निर्माण होऊ शकला नाही. व्यक्ती आणि सामाजिक विकासामध्ये जातिभेद हा
मोठा अडथळा बनला आहे. भारतीय समाजाचा सर्वांगिण विकास केवळ जातिभेदामुळे
शकला नाही, ही वास्तविकता आहे. शुद्र आणि अस्पृश्य जातीच्या लोकांना मा
अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. म्हणून शुद्र आणि अस्पृश्य जातीच्या ल
लोकांनी हिंदू धर्माचा त्याग करून मुस्लीम, ख्रिश्चन आणि बौद्ध धर्माचा स्वीकार केला. जा
दोष लक्षात घेऊनच **सर हर्बर्ट रिस्ले** (Sir H. H. Risley) यांनी जातिव्यवस्थेला एक
स्तराचे सामाजिक संघटन म्हटले आहे. जातिभेदाचा भारतीय समाजावर अतिशय
परिणाम पडला आहे. त्यामुळे काही महत्वाचे प्रश्न निर्माण झालेत.

**१) मानवी मूल्यांचा अभाव** (Lack of Human Values) :

व्यक्तीचा सर्वांगिण विकास होण्याकरिता मुलभूत मानवी अधिकारांची आवश्य
असते. व्यक्तीला विकास करण्यासाठी स्वातंत्र्य, समान संधी, न्याय या मानवी मूल्यांची
असते. जेव्हा समाजात ही मानवी मूल्ये असतात, तेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्तीला वि
करण्याची संधी मिळते आणि व्यक्तिगत विकासासोबतच सामाजिक विकास देखील
येतो. परंतु जातिव्यवस्थेत या मानवी मूल्यांचा पूर्णतः अभाव आहे. आज संपूर्ण ज
मानवतावादाची जोपासना केली आहे. परंतु जातिभेदामुळे भारतात मानवतावाद रूज श
नाही. मानवी मूल्यांचा अभाव असणे हा जातीचा सर्वात मोठा दोष असून जातिभेदामुळे म
मूल्यांच्या अभावाची समस्या निर्माण झाली आहे.

**२) समान सामाजिक आणि धार्मिक हक्कांचा अभाव** (Lack of Equal Social
Religious Rights) :

जातिव्यवस्थेने उच्च जातींना सामाजिक आणि धार्मिक हक्क प्रदान केलेत.
जातीला काही विशेष धार्मिक अधिकार सुद्धा आहेत. परंतु बहुसंख्यांक असलेल्या
जातीच्या लोकांना मात्र सामाजिक आणि धार्मिक हक्कांपासून वंचित ठेवले आहे. इ
नव्हे तर कनिष्ठ जातीवर अनेक सामाजिक आणि धार्मिक अपात्रता लादण्यात आल्यात
जातीचा एकच धर्म असतांना देखील कनिष्ठ जातीच्या लोकांना धार्मिक विधी वैदिक प
करण्याचा सुद्धा अधिकार नाकारण्यात आला आहे. आपल्याच धर्माच्या लोकांना
सामाजिक आणि धार्मिक अधिकार नाकारणारा धर्म जगात कुठेही अस्तित्वात नाही.
हिंदू धर्माने मात्र जातीच्या आधारावर आपल्या अनुयायांना सामाजिक आणि धार्मिक अ

नाकारले आहेत. जातिभेदामुळे सामाजिक आणि धार्मिक हक्क कनिष्ठ जाती आणि अस्पृश्यांना नाकारण्यात आले.

**३) सामाजिक विकासाला बाधक** (Hindrance to Social Progress) :

जातिभेद हा व्यक्तिगत विकासासाठी बाधक आहे. त्याचप्रमाणे सामाजिक विकासासाठी देखील बाधक आहे. जातिनियमांचा व्यक्तींवर विशेष प्रभाव असतो. त्यामुळे ते परंपरा, रूढी, विश्वास आणि संकेताचे निमूटपणे पालन करतात. जातिनियमांच्या वेगळी गोष्ट करायला ते तयार नसतात. एकतर जातीचे संस्कार आणि दुसरी गोष्ट म्हणजे जातीतून बहिष्कृत करण्याची भीती, यामुळे नवी कोणती गोष्ट करण्यास ते तयार नसतात. भारतात शक, हूण, मुस्लीम आणि इंग्रज आलेत, त्यांनी येथे सत्ता गाजविली. परंतु जातिव्यवस्थेमुळे येथील समाज जीवनात विशेष परिवर्तन घडून आले नाही. आपल्या देशात नवीन संशोधन झाले नाही याचे कारण म्हणजे जातिव्यवस्था होय. थोडक्यात, जातिव्यवस्था ही सामाजिक विकासास बाधक आहे. विशेषतः कनिष्ठ जाती आणि अस्पृश्यांचा सामाजिक विकास जातिभेदामुळे होऊ शकला नाही.

**४) सामाजिक गतिशीलतेचा अभाव** (Lack of Social Mobility) :

जातिव्यवस्थेत सामाजिक गतिशीलतेचा पूर्णपणे अभाव आढळतो. व्यक्तीला जन्माच्या आधारावर जातीचे सदस्यत्व मिळते. आणि जातीनुसार सामाजिक दर्जा मिळतो. कोणत्याही परिस्थितीत व्यक्तीला जात बदलविता येत नाही. त्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा हा स्थिर असतो. आपला विकास व्हावा, दर्जा बदलावा असे व्यक्तीला कितीही वाटले तरी जातीच्या कडक निर्बंधामुळे हे शक्य होत नाही. व्यक्तीच्या आवडी-निवडी, विचार, व्यवसाय, स्वातंत्र्य याला जातिव्यवस्थेत कोणतेच महत्त्व नाही. त्यामुळे व्यक्तीला आपला व्यवसाय बदलविता येत नाही. त्यांना कोणतीही प्रगती करता येत नाही. जातिभेदामुळे कनिष्ठ जातीतील बुद्धिमान लोकांना सुद्धा उच्च जातीचा सामाजिक दर्जा प्राप्त होत नाही. जातिभेदामुळे कनिष्ठ जातीच्या लोकांच्या विकासाचे आणि गतिशीलतेचे सर्व मार्ग बंद केले आहेत. जात ही बंद स्तरीकरणाची व्यवस्था आहे. म्हणून भारतीय समाजात सामाजिक गतिशीलता आढळून येत नाही.

**५) आर्थिक विकासाला बाधक** (Hindrance to Economic Development):

जातीमुळे समाजात श्रमविभाजन घडून आले असे सांगितले जाते. परंतु हे श्रमविभाजन पारंपारिक आहे. कारण हे श्रमविभाजन व्यक्तीच्या गुण आणि कौशल्याच्या आधारावर झालेले नाही. काही महत्वाचे व्यवसाय श्रेष्ठ जातींना देण्यात आले. तर कनिष्ठ व्यवसाय कनिष्ठ जातींवर लादण्यात आलेत. जातिभेदामुळे कनिष्ठ जातीतील बुद्धिमान व्यक्तींना उच्च जातीचे चांगले व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य नाकारण्यात आले. व्यवसायाची निश्चिती जातीच्या आधारावर करण्यात आल्यामुळे समाजात आर्थिक स्पर्धेचा पूर्णतः अभाव आहे. आर्थिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने कोणतीही अनुकूल परिस्थिती जातिव्यवस्थेने निर्माण होऊ दिली नाही. म्हणून भारतीय समाजाचा आणि विशेषतः मागास जातींचा आर्थिक विकास होऊ शकला नाही.



**६) अस्पृश्यता** (Untouchability) :

'अस्पृश्यता' ही जातिव्यवस्थेची निर्मिती आहे. जातिव्यवस्थेत काही अस्पृश्य जाती आहेत. या जातीच्या लोकांचा स्पर्श होणे अधर्म मानला जातो. अस्पृश्य जातींच्या लोकांवर अनेक अपात्रता लादण्यात आल्या होत्या. आजही भारतातील काही ग्रामीण भागात या अपात्रता कायम आहेत. अस्पृश्यांना पशुपेक्षाही हीन मानले गेले होते. अस्पृश्य लोकांना मुलभूत मानवी अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या मते, **'अस्पृश्यता ही गुलामगिरीच्या तुलनेत अतिशय रानटी व क्रूर आहे.'**[१७] आजही देशातील अस्पृश्यांची परिस्थिती अतिशय विदारक आहे. केवळ जातिभेदामुळे अस्पृश्यतेची समस्या निर्माण झाली.

**७) जातिवाद** (Casteism) :

प्रत्येक व्यक्तीचे सामाजिकरण हे त्यांच्या जातीनुसार होत असते. उच्च जातीचे लोक स्वतःला श्रेष्ठ समजतात आणि कनिष्ठ जातीच्या लोकांना तुच्छ मानतात. व्यक्तीच्या निष्ठा या त्यांच्या जातीपुरत्याच मर्यादित असतात. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीचा अभिमान वाटतो. व्यक्ती आपल्या जातीच्या हितांचाच विचार करते. यातूनच जातिवाद निर्माण होतो. आज भारतातील शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी सर्वच क्षेत्रात जातिवाद बोकाळला आहे. जातिभेदामुळे जातिवादाची एक ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे.

**८) राष्ट्रीय एकतेस बाधक** (Hindrance to National Integration) :

जातिव्यवस्थेमुळे देशातील लोकांचे शेकडो जातींमध्ये विभाजन झाले आहे. जातीमुळे व्यक्ती आपल्या जातीपुरती मर्यादित होते. व्यक्तीला आपल्या जातीचा समूह हाच महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे जाती-जातीचे स्वतंत्र समूह निर्माण झालेत. त्यांच्या निष्ठा ह्या जातीपुरत्याच मर्यादित राहिल्यात. जातिभेदामुळे त्यांच्यात राष्ट्रीय भावनेचा विकास होऊ शकला नाही. म्हणून आपल्या देशात राष्ट्रीय एकतेचा अभाव आहे.

**९) उच्च जातीची हुकूमशाही** (Dictatorship of Upper Castes) :

जातिव्यवस्थेची निर्मिती ही प्रामुख्याने उच्च जातीच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी झाली आहे. जातिव्यवस्था ही उच्च जातीच्या सुरक्षिततेची ढाल आहे. म्हणूनच उच्च जातीच्या हिताचे अनेक नियम आहेत. तर कनिष्ठ जातीच्या लोकांनी कधीच प्रगती करू नये, त्यांनी उच्च जातीचे गुलाम बनून रहावे, म्हणून त्यांच्यावर अनेक निर्बंध केवळ जातिभेदामुळे लादण्यात आलेत. उच्च जातीच्या लोकांचे गुलाम बनून रहावेत, अशा प्रकारची कायम व्यवस्था जातिव्यवस्थेद्वारे निर्माण करण्यात आली आहे.

**१०) जाती संघर्ष** (Caste Conflict) :

सर्व जातींचा दर्जा समान नाही. ज्या जाती उच्च आहेत त्या जातींच्या लोकांना आपल्या उच्च जातीचा अभिमान असतो. आणि कनिष्ठ जातींच्या लोकांविषयी घृणेची भावना असते. कनिष्ठ जातीच्या लोकांवर ते सतत अन्याय करतात. त्यांची वारंवार अवहेलना केली जाते. उच्च जातीचे लोक आपल्यावर अन्याय करतात ही भावना कनिष्ठ जातीच्या लोकांमध्ये असंतोष निर्माण करते. भारतात जाती संघर्षाची शेकडो उदाहरणे आढळून येतात.

अशाप्रकारे विषमतेवर आधारित असलेल्या जातिव्यवस्थेमुळे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि राष्ट्रीय समस्या निर्माण झाल्या आहेत. जातिव्यवस्था आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेला जातिभेद हा अनेक सामाजिक समस्यांची जननी आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. शेकडो वर्षांपासून जातिभेद टिकून आहे, याचे प्रमुख कारण म्हणजे हिंदू धर्माची जातिव्यवस्थेला असलेली मान्यता होय.

**जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी झालेले प्रयत्न :**

विषमता हाच जातिव्यवस्थेचा पाया आहे. विषमतेवर आधारित असणारी ही व्यवस्था बदलविण्यासाठी प्राचीन काळापासून अनेक प्रयत्न करण्यात आलेत. जातिव्यवस्था आणि जातिभेदाला सर्वप्रथम विरोध अडीच हजार वर्षांपूर्वी **भगवान गौतम बुद्ध** यांनी केला होता. **गौतम बुद्धाने** जातिव्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. त्यांनी ब्राह्मणांचे वर्चस्व नाकारले आणि यज्ञयाग पद्धतीचा विरोध केला. जगातील सर्व माणसे समान आहेत. समाजात समता असल्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकणार नाही, हा विचार समाजात रूजविण्याचा प्रयत्न केला. **गौतम बुद्धाचा** धम्म हा समानतेवर आधारलेला आहे. बौद्ध धम्मामध्ये सर्वांना प्रवेश दिला जातो. म्हणूनच बौद्ध धम्मात जातिव्यवस्था नाही. **कबीर, नानक, चैतन्य, तुकाराम, चोखामेळा, रविदास** इत्यादी संतांनी जातिप्रथेला विरोध केला. सर्व जातीतील लोक सारखे आहेत असा प्रचार संतांनी केला.

इंग्रजांची सत्ता भारतात प्रस्थापित झाल्यानंतर जातिभेद नष्ट करण्याच्या संदर्भात विशेष महत्वाच्या घटना घडल्यात. इंग्रजी शिक्षणामुळे सुशिक्षित लोकांना पाश्चात्य समाजातील विचारांचा परिचय झाला. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या पाश्चात्य विचारसरणीचा भारतीय लोकांवर फार मोठा प्रभाव पडला. **राजा राममोहन रॉय, केशवचंद्रसेन** इत्यादी सुधारकांनी जातिव्यवस्थेला विरोध केला. सामाजिक क्रांतीचे अग्रदूत **जोतीराव फुले** यांनी जातिप्रथेला हादरा देण्याचे ऐतिहासिक कार्य केले. १ जानेवारी १८४८ मध्ये त्यांनी शुद्रातिशुद्रांच्या मुलींची पहिली शाळा, पुणे येथे सुरू केली. शुद्रातिशुद्रांची प्रगती होण्यासाठी शिक्षण महत्वाचे असल्याचे फुलेंनी स्पष्ट केले. २४ सप्टेंबर १८७३ मध्ये फुले यांनी **'सत्यशोधक समाजाची'** स्थापना करून अस्पृश्यता, जातिप्रथा नष्ट करणे, धार्मिक अंधश्रद्धा दूर करणे इत्यादी कार्य केले. **स्वामी दयानंद सरस्वती** यांनी १० एप्रिल १८७५ ला **आर्य समाजाची** स्थापना करून जातिभेद दूर करण्याचा प्रयत्न केला. १८६५ मध्ये **शशिपद बंदोपाध्याय** यांनी बंगालमधील अनुसूचित जातीमधील श्रमिकांच्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न केला. १८५० मध्ये ब्रिटिश शासनाने विवाहातील जातीबंधन निर्मूलनाचा कायदा केला. त्यामुळे आंतरजातीय विवाह करण्यास परवानगी मिळाली. शासनाने १८५८ मध्ये काढलेल्या एका पत्रकात नमूद केले होते की, **'ज्या शाळेत अस्पृश्य जातीतील मुलांना प्रवेश नाकारण्यात येईल त्यांना शासनाकडून मदत दिली जाणार नाही.'** १८७२ मध्ये शासनाने **'विवाह नोंदणी कायदा'** पास केला. १९२५ मध्ये **मद्रास** शासनाने एक कायदा करून धर्मशाळा, विहीरी, तलाव, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्य जातीच्या लोकांसाठी खुली केलीत. कोल्हापूरचे **शाहू छत्रपती महाराज**



यांनी अस्पृश्यता आणि जातिभेदाच्या निमूर्लनाबाबत अत्यंत महत्वाचे कार्य केले. शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ मध्ये एक वटहूकूम काढून मागासलेल्या जातीसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याची क्रांतीकारक घोषणा केली. १९१७ मध्ये काँग्रेसने अस्पृश्यता नष्ट करण्याबाबतचा ठराव पास केला. **म. गांधींनी** अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यक्रमाला अग्रक्रम दिला होता. **महर्षी शिंदे** यांनी **'दलित वर्ग मिशन'** ची स्थापना करून अस्पृश्यता आणि जातिभेद निवारण्याचे कार्य केले.

विषमतेवर आधारित जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करण्याच्या संदर्भात **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. जोपर्यंत भारतातील जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट होत नाही तोपर्यंत भारतीय समाजाची प्रगती होऊ शकत नाही. ही गोष्ट लक्षात घेऊन **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी** जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या विरूद्ध आपली सामाजिक, राजकीय चळवळ उभी केली. दलितांना त्यांचे हक्क भीक मागून मिळणार नाही ते लढूनच मिळवावे लागतील, या उद्देशाने त्यांनी १९ आणि २० मार्च १९२७ ला **महाड** येथील चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा हक्क मिळावा म्हणून सत्याग्रह केला. **डॉ. आंबेडकरांच्या** मते, 'ज्या धर्मग्रंथांनी जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता लोकांच्या मनात रूजविली अशा धार्मिक ग्रंथांना विरोध करणे आवश्यक आहे.' त्यामुळे जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता या अमानवी आणि अनिष्ट प्रथांचे समर्थन करणाऱ्या **'मनुस्मृती'** सारख्या धार्मिक ग्रंथांना **डॉ. आंबेडकरांनी** विरोध केला होता. १९३० आणि १९३१ मध्ये लंडन येथील गोलमेज परिषदेत **डॉ. आंबेडकरांनी** भारतातील अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व करून अस्पृश्यांच्या दु:खाची कैफियत ब्रिटिश जनतेसमोर मांडली. १९३२ मध्ये ब्रिटिश शासनाने **डॉ. आंबेडकरांची** अस्पृश्यांसाठी विभक्त मतदार संघ असावा ही मागणी मंजूर केली होती. हिंदूधर्मातील जातिभेद दूर करणे अशक्य आहे ही गोष्ट लक्षात घेऊनच **डॉ. आंबेडकरांनी** मानवतावादी मूल्यावर आधारलेल्या **बौद्ध धम्माचा** १४ ऑक्टोबर १९५६ मध्ये स्वीकार केला. आणि लाखो दलितांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली.

संदर्भ


1) W. G. Runciman - The Three Dimentions of Social Inequality (Artical) in Gender Equality, Edited by Andre Beteile, Penguin Books, England 1969, p. 45.
2) Ibid, p. 46.
3) Ibid, p. 4.
4) Dr. G. S. Ghurye - Caste and Race in India, Popular Book Depot Bombay, 1969, p. 172.
5) Dr. Ram Ahuja - Indian Social System, Rawat Publications, Jaipur 1993, p. 232.
6) Dr. G. S. Ghurye - op; cit; pp. 172-173
7) Ibid - p. 176.
8) Ibid - pp. 179-180.
9) Dr. Ahuja - op; cit; p. - 228.
10) Ibid - p. 228.

युनिट क्र. 1



# १. समाजशास्त्राचा उदय

## (The Emergence of Sociology)

■ प्रबोधनपूर्व युरोपातील परिस्थिती ■ बौद्धिक परिस्थिती – प्रबोधनाची कारणे, प्रबोधनाचा विचार आणि विवेकवाद ■ फ्रेंच राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम ■ औद्योगिक क्रांती ■ समाजशास्त्राच्या उदयातील शक्ती-बले – १) आर्थिक शक्ती २) राजकीय शक्ती ३) सामाजिक शक्ती ■ समाजशास्त्राचा उदय.

प्राचीन काळापासून अनेक विचारवंतांनी मानवी समाजजीवनाचा अभ्यास केला. म्हणून सामाजिक विचारांचा इतिहास प्राचीन आहे. असे असले तरीही समाजशास्त्र हे एक आधुनिक विज्ञान आहे. कारण समाजाचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करण्याची सुरुवात १९ व्या शतकात झाली. फ्रान्समधील **ऑगस्ट कॉम्टचा** (August Comte; 1798-1857) **'The Course of Positive Philosophy'** या ग्रंथाचा चौथा खंड १८३८ मध्ये प्रकाशित झाला. या चौथ्या खंडात **'समाजशास्त्र'** (Sociology) या शब्दाचा सर्वप्रथम उल्लेख करण्यात आला. त्यानंतर समाजाचे वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करणाऱ्या विज्ञानाचे **'Sociology'** हे नाव रूढ झाले. यावरून हे स्पष्ट होते की, समाजशास्त्राचा उदय १९ व्या शतकात झाला. समाजशास्त्रज्ञांच्या सामाजिक विचार आणि सिद्धांताचा अभ्यास करण्यापूर्वी समाजशास्त्राच्या उदयाची पार्श्वभूमी स्पष्ट करणे आवश्यक आहे.

समाजशास्त्राचा उदय सर्वप्रथम युरोप खंडात झाला. समाजशास्त्राचा उदय अचानक झाला नाही. समाजशास्त्राच्या उदय आणि विकासाची एक विशिष्ट पार्श्वभूमी आहे. युरोपातील परंपरागत सरंजामशाही व्यवस्था, प्रबोधनाचा काळ आणि त्याचा प्रभाव, वैज्ञानिक शोध, धार्मिक सुधारणा, फ्रेंच क्रांती, औद्योगिक क्रांती, भांडवलशाहीचा उदय आणि नागरीकरण या सर्व घटनांमुळे समाजशास्त्राचा उदय झाला. तसेच या सर्व घटना समाजशास्त्राच्या विकासासाठी कारणीभूत ठरल्यात.

## ✓ प्रबोधनपूर्व युरोपातील परिस्थिती

मध्ययुगीन काळात युरोपात अराजकता निर्माण झाली होती. त्या काळात युरोपात अस्थिर आणि असुरक्षित राजकीय परिस्थिती होती. क्रूर रानटी टोळ्यांच्या टोळधाडीमुळे आणि सरदारांच्या लुटमारीमुळे सर्वसामान्य जनता, गरीब शेतकरी, शेतमजूर आणि लहान व्यवसाय करणारे कारागीर त्रस्त झाले होते. त्यामुळे वैतागलेल्या आणि त्रस्त झालेल्या सर्वसामान्य जनतेला आणि शेतकऱ्यांना शांततेची, स्थिर जीवनाची, जिविताच्या आणि पिकांच्या संरक्षणाची नितांत गरज भासत होती. राजकीय अराजकतेमुळे स्वतःचे संरक्षण करण्यास असमर्थ असलेल्या शेतकऱ्यांनी केवळ जगण्याच्या मोबदल्यात प्रबळ सरंजामदारांची (सरदारांची) बिनाअट शरणागती पत्करली. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी सरंजामदारांच्या स्वाधीन केल्यात. त्या जमिनीवरील शेतकऱ्यांचे मालकी हक्क

नष्ट होऊन त्यांच्यावर सरंजामदारांचे मालकी हक्क प्रस्थापित झाल्यानंतर सरंजामदारांकडून शेतकऱ्यांना त्यांच्या संरक्षणाची हमी मिळत असे. सरंजामदार आपल्या अधिपत्याखालील जमिनी आपल्या इच्छेनुसार कुळांना खंडाने कसण्याकरीता देत असे. वंशपरंपरेने सरंजामदार हा त्याच्या अधिपत्याखालील सर्व जमिनींचा मालक असे आणि त्याच्या कुळांवर त्याची सत्ता असायची. सर्वसामान्य जनता, गरीब शेतकरी आणि शेतमजूर यांचे संरक्षण करण्यासाठी सरंजामदार बनलेले सरंजामदार आपले कर्तव्य विसरून गेले. उलट सरंजामदाराचा कुळांच्या जिवित वित्तावर हक्क कायम झाला. गरीब कुळे शेतात रात्रंदिवस राबून शेती पिकवित आणि त्यांच्याकडून सरंजामदार प्रचंड खंडणी वसूल करायचे. सरंजामशाहीमध्ये कुळांची अतिशय दयनीय अवस्था होती.

सरंजामशाहीमधील सामाजिक संरचना : सरंजामशाहीमध्ये एक विशिष्ट प्रकारची समाजरचना अस्तित्वात होती. सरंजामशाहीमध्ये संपूर्ण समाजाची विभागणी ही १) अमीर-उमरावांचा वर्ग, २) धर्मगुरूंचा वर्ग आणि ३) सर्व सामान्य जनतेचा वर्ग अशा तीन वर्गांमध्ये (इस्टेट) झाली होती.

सरंजामशाही समाजरचनेमध्ये सर्वत्र तीव्र स्वरूपाची विषमता होती. एका बाजूला सर्वशक्तिमान धनाढ्य सरंजामदार तर दुसऱ्या बाजूला दारिद्र्यात खितपत पडलेले शेतकरी कुळे, शेतमजूर आणि भूदास होते. भूदासांना तर अत्यंत वाईट वागणूक दिली जायची. त्यांना भारवाहक पशू म्हणून राबवून घेतले जायचे. पशूवत जीवन जगणारे भूदास जमिनीशी कन्यानेच कायमचे निगडीत असायचे. त्यांना शेती सोडून जाण्याची किंवा इतर कोणता व्यवसाय करण्याची परवानगी नसे. सरंजामशाहीमध्ये भूदास हे सर्वात खालचे होते. राजा, मोठे सरंजामदार, लहान सरंजामदार, जमीनदार, स्वतंत्र नागरिक-कारागिर, व्यावसायिक व्यापारी, शेतकरी कुळे, शेतमजूर आणि त्यानंतर सर्वात खालचा स्तर हा भूदासांचा होता. सरंजामशाही समाजरचनेत भूदासांचा वर्ग अगदी रसातळाला जाऊन पोहोचला होता.

अशाप्रकारे प्रबोधनपूर्व युरोपातील परिस्थिती सरंजामशाहीमुळे अतिशय वाईट होती. अमीर-उमराव आणि धर्मगुरूंचे सर्वसामान्य जनतेवर वर्चस्व होते. सरंजामदार वर्ग सर्वसामान्य जनतेचे सामाजिक आणि आर्थिक शोषण करायचा. किंबहुना जनतेचे शोषण करणे हा ते आपला अधिकार समजत होते. सरंजामशाहीमधील सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीला सर्वसामान्य जनता अगदी कंटाळून गेली होती. सर्वसामान्य लोकांच्या मनात सरंजामदारांविषयी प्रचंड रोष निर्माण झाला होता.

## ✓ बौद्धिक परिस्थिती–प्रबोधन

(The Intellectual Context - Enlightenment)

युरोपात १३, १४ आणि १५ व्या शतकामध्ये लोकांच्या बौद्धिकतेमध्ये आमुलाग्र परिवर्तन घडून आले. या बौद्धिक परिवर्तनाचे स्वरूप व्यापक होते. या कालखंडात लोकांच्या स्वतःकडे, समाजाकडे, धर्माकडे, कला आणि विज्ञानाकडे बघण्याच्या



दृष्टीकोनामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले. म्हणून या परिवर्तनास 'प्रबोधन' किंवा बौद्धिक पुनरूज्जीवन (Renaissance) असे म्हटले जाते. युरोपात मध्ययुगाच्या शेवटी आणि आधुनिक युगाच्या सुरूवातीला बौद्धिक प्रगती झाली. त्यामुळे प्रचंड वैचारिक परिवर्तन घडून आले. मानवाचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन संपूर्णतः बदलला. जीवनातील प्रत्येक गोष्टीकडे माणूस वस्तुनिष्ठ व तर्कशुद्ध दृष्टीकोनातून बघू लागला. त्यामुळे त्याने मध्ययुगीन काळातील अंधश्रद्धा आणि परंपरेचा त्याग केला. माणूस वैज्ञानिक दृष्टीने विचार करू लागला, इतके मोठे बौद्धिक या वैचारिक परिवर्तन घडून आले.

सर्वप्रथम बौद्धिक परिवर्तन पश्चिम युरोपात झाले. पश्चिम युरोपातील इटली, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड या देशात प्रथम वैचारिक परिवर्तन घडून आले आणि त्यानंतर इतर युरोपियन देशात परिवर्तन झाले. म्हणून पश्चिम युरोप हा वैचारिक परिवर्तनाचा म्हणजेच प्रबोधनाचा जनक आहे. प्रबोधन ही एक घटना नसून प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया ३ शतके चालू होती. सुरूवातीला प्रबोधनाचे क्षेत्र मर्यादित होते. १५ व्या शतकापर्यंत ही प्रक्रिया संपूर्ण युरोपभर सुरू होती. युरोपातील प्रबोधनाची घटना जागतिक दृष्टीने अतिशय महत्वाची आहे. प्रबोधनामुळेच युरोप जगावर आपला प्रभाव टाकू शकला. या प्रबोधन कालखंडापासून जगाच्या आधुनिक इतिहासाला प्रारंभ झाला.

प्रबोधन ही एक प्रक्रिया आहे, हे आपण स्पष्ट केले आहे. प्रबोधनाच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) "मध्ययुगीन स्थितीप्रिय अवस्थेचा त्याग करून मानवाने ज्या प्रेरणेमुळे गतिमानता धारण केली ती प्रेरणा म्हणजे प्रबोधन होय."

२) "युरोपला मध्ययुगीन निद्रेतून जागृत करणाऱ्या आणि नव्या प्रेरणा देणाऱ्या कालखंडाला प्रबोधनाचे युग असे म्हणतात."

३) "१५ व्या शतकाच्या मध्यानंतर विद्या- कला- विज्ञान व संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची जी लाट आली त्यास प्रबोधनाचे किंवा पुनरुज्जीवनाचे युग असे म्हणतात."

प्रबोधन काळात मानवाचा विकास घडून आला म्हणून प्रबोधनास 'विकासाचे युग' असे देखील म्हणतात. प्रसिद्ध विचारवंत एम. एन. रॉय यांनी प्रबोधनाच्या काळास 'मानवांचे बंड' म्हटले आहे. प्रबोधनाच्या वरील व्याख्यावरून हे सिद्ध होते की, प्रबोधनामुळे माणूस चिकित्सक दृष्टीने विचार करू लागला. प्रत्येक गोष्ट तर्क आणि बुद्धीच्या कसोटीवर घासून तो तिचा स्वीकार करू लागला. याचाच अर्थ मानव प्रबुद्ध झाला. मानवाने प्राप्त केलेली ही अवस्था म्हणजे प्रबोधन होय. प्रबोधनाच्या प्रक्रियेचा मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर प्रभाव पडला.

प्रबोधनाची कारणे (Causes of the Enlightenment) :

युरोपात प्रबोधनाची ऐतिहासिक घटना आपोआप घडून आली नाही. ही ऐतिहासिक घटना घडून येण्याची निश्चित अशी कारणे आहेत. प्रबोधनाची कारणे ही पुढीलप्रमाणे आहेत.

१) विचारवंतांचे कार्य : मध्ययुगीन काळात युरोपातील लोकांवर ख्रिश्चन

धर्माचा पगडा होता. धर्मसंस्थेचे लोकांवर वर्चस्व होते. त्यामुळे सर्वसामान्य माणूस धर्माचे आंधळेपणाने पालन करायचा. धर्मसंस्था सांगेल तेच योग्य आणि खरे आहे असा लोकांचा विश्वास होता. धर्मामुळे लोकांची विचार करण्याची शक्ती कुंठीत झाली होती. अशा परिस्थितीत **अॅबेलॉर्ड** आणि **रॉजर बेकन** या दोन प्रमुख लेखकांनी ख्रिश्चन धर्मातील चमत्कार आणि ढोंगबाजीवर टीका केली. या विचारवंतांच्या विचारांमुळे लोक धर्मसंस्थेच्या शोषणाबद्दल बोलू लागले.

२) **धर्मयुद्धे** : मध्ययुगात झालेली युरोपातील धर्मयुद्धे हे देखील प्रबोधनाचे एक कारण आहे. इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म यांच्यातील धर्मयुद्धात युरोपियन ख्रिश्चनांचा पराभव झाला. या युद्धानंतर पौर्वात्य आणि पाश्चिमात्य या दोन संस्कृती एकत्र आल्यात आणि त्यांची वैचारिक देवाण-घेवाण सुरू झाली. त्यामुळे ख्रिश्चन धर्म हा श्रेष्ठ आहे या युरोपियन लोकांच्या कल्पनेला तडा गेला. युरोपियन लोकांची संकुचित वृत्ती नष्ट झाली आणि त्यांचा ज्ञानविषयक दृष्टीकोन विशाल झाला. युरोपियन लोकांचा हा विशाल दृष्टीकोन प्रबोधन घडवून आणण्यास सहाय्यभूत ठरला.

३) **मुद्रणकलेचा शोध** : मुद्रणकलेच्या शोधामुळे प्रबोधनाचा प्रसार होण्यास विशेष मदत झाली. इंग्लंड, इटली, हंगेरी, जर्मनी या देशात छापखाने सुरू झालेत. छापखान्यामुळे ग्रंथनिर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ लागली. त्यामुळे प्रबोधनाची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत झाली.

४) **नविन भौगोलिक प्रदेशांचा शोध** : तुर्कांनी रोमन साम्राज्याची राजधानी असलेले कॉन्स्टॅन्टिनोपल हे शहर ताब्यात घेतले. युरोपातून येणारा खुष्कीचा व्यापारी मार्गही तुर्कांच्या ताब्यात गेला. त्यामुळे युरोप देशांचा पश्चिमेशी असलेला व्यापार बंद पडला. म्हणून युरोपियन लोकांना नवे भौगोलिक मार्ग शोधणे अनिवार्य झाले होते. युरोपातील नाविक नवे-नवे भौगोलिक मार्ग शोधण्याच्या कार्यात लागले. **बार्थोलोम्यू डायस** यांनी आफ्रिकेचे दक्षिण टोक १४८६ मध्ये शोधून काढले. **कोलंबसने** १४९२ मध्ये अमेरिकेचा शोध लावला. **वास्को-द-गामा** याने आफ्रिकेला वळसा घालून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील **कालिकत** हे बंदर शोधून काढले. **अमेरिगो व्हेस्पूशी** याने १४९७-१५०३ या काळात चार वेळा अमेरिकेस भेट देऊन हा भारत देश नसून नवीन भूभाग असल्याचे सिद्ध केले. **मॅगलेन** या पोर्तुगीज प्रवाशाने १५१९-२० मध्ये पृथ्वीला पहिली प्रदक्षिणा घातली. या नव्या भौगोलिक प्रदेशांच्या शोधामुळे युरोपला आर्थिक फायदा झाला. वसाहतीकरिता त्यांना नवे भूप्रदेश मिळाले. भौगोलिक शोधामुळे प्रबोधनाच्या प्रक्रियेस विशेष मदत झाली.

५) **राजाश्रय** : प्रबोधनाची चळवळ यशस्वी करण्यामध्ये तत्कालीन सत्ताधारी आणि धनिक वर्गाचा देखील विशेष सहभाग होता. फ्रान्सचा राजा पहिला **फ्रान्सीस** याने इटलीतील अनेक विद्वानांना फ्रान्समध्ये आणले आणि फ्रान्समध्ये प्राचीन विद्यांच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले. फ्लोरेन्सच्या मेडिसी घराण्याने **फ्लॉरेन्स** येथे विद्यापीठ स्थापन केले आणि या विद्यापीठात प्लेटोच्या तत्वज्ञानाची खास सोय केली. फ्लोरेन्सच्या



मेडीसी घराण्याच्या आश्रयामुळे प्रबोधन काळात अनेक कलावंत आणि साहित्यिक उदयास आले.

**प्रबोधनाचा विचार आणि विवेकवाद :**

प्रबोधनाचा फार मोठा प्रभाव युरोपातील लोकांच्या विचारांवर पडला. पूर्वी लोकांचा धर्मग्रंथ आणि धर्मसंस्थावर प्रचंड विश्वास होता. धर्मग्रंथात असलेली गोष्ट सत्य आहे. जी गोष्ट धर्मग्रंथात नाही, ती गोष्ट असत्य आहे. असा लोकांचा विश्वास होता. प्रबोधनकाळात विचारवंतांनी ख्रिश्चन धर्मातील अंधश्रद्धा आणि चमत्कारांवर प्रचंड टीका केली. **रॉजर बेकन** या विचारवंताने घोषणा केली होती की, **'अमुक एका ग्रंथात लिहिली आहे म्हणून एखाद्या गोष्टींवर विश्वास ठेवण्यापेक्षा प्रयोगांती ती गोष्ट आपल्या बुद्धीस पटली तरच आपण तिचा स्वीकार करावा.'** रॉजर बेकनची ही घोषणा म्हणजे युरोपातील बौद्धिक जागृतीचा प्रारंभ होय. बेकनने पदार्थविज्ञान, गणितविज्ञान, तत्वज्ञान इत्यादी विषयांचा सखोल अभ्यास केला होता. त्याने ख्रिश्चन धर्मसंस्थेतील भ्रष्टाचारांवर जोरदार टीका केली. त्यामुळे त्याला तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागली. त्याकाळात बेकनने युरोपियन समाजात फार मोठी जागृती घडवून आणली होती. त्याचे हे कार्य **डान्टे, पेट्रार्क** आणि **बोकॅशिओ** या विचारवंतांनी चालू ठेवले.

मध्ययुगीन काळात युरोपातील लोकांवर धर्माचा विशेष प्रभाव होता. त्यामुळे जर कुणी नवीन संशोधन करून एखादा नवा सिद्धांत मांडला तर त्यास धर्मसंस्थेचा रोष पत्कारावा लागत असे. विश्वाची रचना, पृथ्वीचा आकार, पृथ्वी, सूर्य व तारे इत्यादीबाबत धर्माचे जुने सिद्धांत होते. परंतु विद्येच्या पुनरूज्जीवनाच्या चळवळीमुळे मध्ययुगीन काळातले हे चित्र बदलू लागले. विद्येचे पुनरूज्जीवन **इटली** या देशात झाले आणि हळूहळू युरोपातील सर्व देशांमध्ये त्याचा प्रसार झाला. विचार स्वातंत्र्याला महत्व देण्यात येऊ लागले. १३ व्या शतकात **रॉजर बेकन** आणि **टॅमिस अॅक्वायनस** या विचारवंतांनी लोकांमध्ये चिकित्सक वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. **फ्रान्सीस बेकन** आणि **डेकार्ट** या वैज्ञानिकांनी लोकांमध्ये नवीन वैज्ञानिक संशोधनाविषयी आस्था निर्माण केली. त्यामुळे लोकांवरील धर्मसंस्थेचा प्रभाव नष्ट होऊ लागला. विज्ञानाविषयीच्या जुन्या, धुरकट कल्पना मागे पडू लागल्या. लोकांमध्ये चिकित्सक प्रवृत्ती निर्माण झाली. सामान्य लोक देखील अधिक बुद्धिवादी आणि चिकित्सक बनले. विज्ञानाने नवे शोध लावले पाहिजे, **नव्या शोधामुळे नवशक्ती निर्माण व्हावी आणि या नव्या शक्तीमुळे मानवी जीवन समृद्ध व संपन्न झाले पाहिजे** असा विचार प्रबोधन काळाच्या सुरुवातीला पुढे आला. त्यामुळे युरोपातील लोकांना संशोधन करण्यास प्रोत्साहन मिळाले. परिणामतः विज्ञानाच्या विविध शाखेत नवेनवे शोध लागले.

**कोपरनिकस** (१४७३-१५४३) हा वैज्ञानिक संशोधनाचा आद्य प्रवर्तक आहे. कोपरनिकसने पृथ्वी हे विश्वाचे केंद्र नाही तर सूर्य हे विश्वाचे केंद्र आहे हे सप्रमाण सिद्ध केले. केप्लर (१५७१-१६३०) या जर्मन वैज्ञानिकाने कोपरनिकसच्या सिद्धां

रचनाविषयक सिद्धांतास गणितविज्ञानाचा आधार दिला. पृथ्वी व इतर ग्रह सूर्याभोवती लंबगोलाकार कक्षेने फिरतात हे सिद्ध केले. **गॅलिलिओ** (१५६४-१६४२) या संशोधकाने दुर्बिणीचा शोध लावून अंतरिक्षातील ग्रहांचे निरीक्षण केले. **ऐझॅक न्यूटन** (१६४२-१७२७) याने पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत मांडला. पदार्थविज्ञानात **गिल्बर्ट** (१५४०-१६०३), **टॉरिसेली** (१६०७-१६४७), **पास्कल** (१६२३-१६६४), **ऑटो फा गुरिक** (१६०२-१६८६) यांनी विविध शोध लावलेत. तर वैद्यक आणि शरीरविज्ञानाच्या संदर्भात **व्हॅसालियस** (१५१४-१५६४), **विल्यम हार्वे** (१५७८-१६५७), **पॅरासेल्सस** (१४९३-१५४१) इत्यादी संशोधकांनी नवनवीन शोध लावलेत.

प्रबोधनामुळे युरोपातील लोकांच्या विचार आणि विवेकावर विशेष प्रभाव पडला. लोक प्रत्येक गोष्टीचा वस्तुनिष्ठ पद्धतीने विचार करू लागले. सामान्य माणूस देखील स्वतंत्रपणे विचार करू लागला. बुद्धीला जे पटेल त्याचा स्वीकार करायला पाहिजे ही वृत्ती त्यांच्यात निर्माण झाली. त्यामुळे त्यांच्यातील अज्ञान आणि अंधश्रद्धा नष्ट झाल्यात. धर्म आणि धर्मसंस्थांचा प्रभाव कमी झाला. युरोपातील माणूस बुद्धिवादी बनला. या बौद्धिक या वैचारिक परिवर्तनामुळे प्रबोधनाच्या काळात वैज्ञानिकांनी विविध प्रयोग आणि सतत संशोधन करून खगोलविज्ञान, पदार्थविज्ञान, रसायनविज्ञान, वैद्यकविज्ञान इत्यादी क्षेत्रात अनेक नवीन आणि मूलभूत शोध लावले. या शोधामुळे लोकांना वस्तुनिष्ठ अशा वैज्ञानिक अभ्यासाचे विशेष महत्व वाटू लागले. प्रबोधनपूर्व काळात कला ही धार्मिक बंधनात अडकून होती. परंतु प्रबोधन काळात कला धर्मबंधनातून मुक्त झाली. त्यामुळे चित्रकला, स्थापत्यकला, शिल्पकला इत्यादी कलांचा फार मोठा विकास प्रबोधन काळात झालेला आढळून येतो. प्रबोधन काळातच युरोपात जागतिक किर्तीचे साहित्य निर्माण झाले.

यावरून हे स्पष्ट होते की, प्रबोधनाचा व्यक्तीच्या विचारांवर विशेष प्रभाव पडला. लोक तार्किक पद्धतीने विचार करू लागले. प्रत्येक गोष्टीचा चिकित्सक अभ्यास करू लागले. माणसांच्या वैचारिकतेत परिवर्तन घडवून आणण्यास प्रबोधनाचे विशेष योगदान आहे. माणसाच्या वैचारिकतेत परिवर्तन झाल्यामुळे लोक चिकित्सक परीक्षण करू लागले. म्हणून प्रबोधन काळापासून युरोपात वैज्ञानिक संशोधनाचा प्रारंभ झाला. जर कदाचित युरोपात प्रबोधन घडून आले नसते, तर युरोपाची वैज्ञानिक क्षेत्रात प्रगती होऊ शकली नसती. म्हणून वैचारिक प्रबोधन वैज्ञानिक संशोधनाच्या दृष्टीने विशेष महत्वाचे आहे.

## ✓ फ्रेंच राज्यक्रांती
## (French Revolution)

युरोपात प्रबोधनामुळे आमुलाग्र परिवर्तन घडून आले. युरोपातील प्रबोधनाचा परिणाम युरोपियन देशावरच नव्हे तर संपूर्ण जगावर पडला. प्रबोधनामुळे समाजजीवनात जे परिवर्तन घडून आले त्याच्याच परिणामस्वरूप पुढे **अमेरिकेची क्रांती** (१७८३),



फ्रेंच क्रांती (१७८९) आणि **औद्योगिक क्रांती** घडून आली. या क्रांत्या केवळ विशिष्ट देशापुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत तर या क्रांत्यांचा परिणाम संपूर्ण जगावर पडला.

**फ्रेंच राज्यक्रांती ही जागतिक इतिहासातील युगप्रवर्तक घटना होय.** फ्रेंच राज्यक्रांतीने **'स्वातंत्र्य, समता आणि बंधूत्व'** ही वैश्विक मूल्ये संपूर्ण मानवी समाजाला दिली. म्हणून फ्रेंच राज्यक्रांती ही केवळ फ्रान्स किंवा युरोपपुरती मर्यादित राहिली नाही. फ्रेंच राज्यक्रांतीने आधुनिक काळातील लोकशाही मूल्यांचा पाया घातला. त्यामुळे फ्रेंच राज्यक्रांतीला विशेष महत्त्व आहे.

१८ व्या शतकात फ्रान्समध्ये अनियंत्रित राजेशाही होती. १७७४ मध्ये बुर्बोन घराण्यातील **१६वा लुई** हा अवघ्या २० व्या वर्षी सम्राट बनला होता. १६वा लुई हा भित्रा, लाजाळू, एकलकोंडा, चैनी व विलासी होता. तो देखील आपल्या पुर्वजांप्रमाणे अनियंत्रित आणि सार्वभौम होता. शासनयंत्रणा अकार्यक्षम, भ्रष्ट आणि जुलूमी होती. त्यावेळी फ्रान्समध्ये लोकशाही संस्थांचा अभाव होता. युरोपियन देशांप्रमाणेच फ्रान्समध्ये देखील सरंजामशाही होती. सरंजामदार, धर्मगुरू आणि सर्वसामान्य जनता अशा तीन प्रमुख वर्गात समाजाचे विभाजन झाले होते. सरंजामदार आणि धर्मगुरू या दोन्ही वर्गाची संख्या एकूण लोकसंख्येच्या केवळ १ टक्का होती. परंतु समाजातील सर्व हक्क, अधिकार आणि मानसन्मान या दोन वर्गांकडेच होते. सर्वसामान्य जनतेची परिस्थिती वाईट होती. सर्वसामान्य जनतेमधील शेतकरी, शेतमजूर आणि कुळांची परिस्थिती अतिशय दयनीय होती. या लोकांची सतत उपासमार व्हायची.

फ्रान्समध्ये क्रांतीपूर्व काळात डॉक्टर, वकील, लेखक, विचारवंत आणि कलावंताचा एक बुद्धिजीवी वर्ग उदयास आला. याच वर्गाने सामान्य जनतेला आपल्या लिखाणाच्या माध्यमातून जागे केले आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. **मॉंटेस्क्यू, व्हॉल्टेअर, रूसो, डिड्रो, कॉने** इत्यादी विचारवंतांनी फ्रेंच राज्यक्रांतीची वैचारिक पार्श्वभूमी तयार करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजाविली. फ्रेंच जनतेची मने क्रांतीप्रवण बनविण्यात या विचारवंतांचे विशेष योगदान आहे. या विचारवंतांनी फ्रान्समधील राजकीय, आर्थिक, सामाजिक जीवनातील दोष आणि उणिवा मांडल्या व जनतेला जागृत केले. जनतेचे प्रश्न, दुःख, समस्या मांडल्या. जनतेचा स्वाभिमान जागृत करून त्यांना त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव करून देऊन त्याविरुद्ध उठाव करण्याची प्रेरणा दिली.

५ मे **१७८९** ला व्हर्साय येथे लोकसभेचे अधिवेशन घेण्यात आले होते. या लोकसभेत उमराव, धर्मगुरू आणि सामान्य जनता यांचे प्रतिनिधी हजर होते. सर्वसामान्य जनतेच्या प्रतिनिधींनी पुढील मागण्या केल्या होत्या.

१) राजाने आपल्या जुलूमी व अनियंत्रित सत्तेवर नियंत्रण घालावे.
२) व्यक्तिस्वातंत्र्य प्रत्येकाला मिळाले पाहिजे आणि अशी राज्यघटना तयार करण्यात यावी.

३) सर्वसामान्य जनतेची (States General) सभा नियमितपणे घेण्यात यावी.

४) सर्वसामान्य जनतेच्या सभेला कायदा संमत करण्याचे अधिकार मिळावे.

५) कर बसवितांना सर्वसामान्य जनतेच्या सभेची संमती घ्यावी.

६) समाजातील सर्व वर्गांवर समान कर आकारण्यात यावा.

१७ जून १७८९ मध्ये सर्वसामान्य जनतेच्या सभेने आपली सभा ही 'राष्ट्रीय सभा' असल्याचे जाहीर केले. २३ जून १७८९ ला राजाने उमराव, धर्मगुरू आणि सामान्य जनता या तिनही सभागृहांची संयुक्त बैठक बोलाविली. त्या सभेत राजाने सर्वसामान्य जनतेच्या सभागृहाने केलेली कार्यवाही ही अवैध असल्याचे जाहीर केले. राजाने सर्वसामान्य जनतेच्या राष्ट्रीय सभेला चिरडून टाकण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यामुळे लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला. १४ जुलै १७८९ रोजी अनियंत्रित राजसत्तेचे प्रतिक असलेल्या बॅस्टिल या किल्लेवजा तुरुंगावर लोकांनी हल्ला केला. या हल्ल्यात २०० लोक मरण पावले आणि अनेक लोक जखमी झाले. तुरुंगात खितपत पडलेल्या शेकडो कैद्यांची सुटका करण्यात आली. बुर्बोन राजघराण्याच्या झेंड्याऐवजी लोकांनी लाल, पांढरा व निळा या तीन रंगाचा तिरंगी ध्वज राष्ट्रीय ध्वज म्हणून स्वीकारला. १४ जुलै १७८९ ला जनतेच्या स्वातंत्र्याचा विजय झाला म्हणून १४ जुलै हा दिवस 'राष्ट्रीय दिवस' म्हणून लोकांनी साजरा केला.

४ ऑगस्ट १७८९ च्या एका रात्रीत राष्ट्रीय सभेने सरंजामशाही नष्ट करणारे वेगवेगळे तीस कायदे संमत करून एका रात्रीतून फ्रान्सची जुनी समाजरचना बदलून टाकली. सरंजामी हक्क संपुष्टात आले. सरंजामी कर आणि इतर देणी रद्द करण्यात आलीत. धर्मगुरूंचे तनखे बंद करण्यात आले. फ्रान्समधील श्रेणीरचना नष्ट करण्यात येऊन अधिकाराच्या जागा सर्वांना खुल्या करण्यात आल्यात. धार्मिक कर रद्द करण्यात आले. सरंजामदारांची न्यायालये रद्द करण्यात आली. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधूत्व या तत्वावर आधारलेली नवी समाजव्यवस्था निर्माण करण्यात आली.

फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम :

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक जीवनावर विशेष परिणाम झाला. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे फ्रान्समधील अनियंत्रित राजेशाही पद्धत नष्ट झाली. आणि त्याऐवजी लोकशाही व्यवस्था स्थापन करण्यात आली. फ्रेंच राज्यक्रांतीचा संपूर्ण जगावर प्रभाव पडला त्यामुळे संपूर्ण जगात लोकशाही विचारांचा प्रसार होऊन सर्वत्र लोकशाही शासन निर्माण करण्यात आले.

फ्रेंच राज्यक्रांतीने सरंजामशाही व्यवस्था नष्ट केली. सरंजामदारांच्या जुलमाने सर्वसामान्य जनता त्रस्त झाली होती. सरंजामदार वर्गाचे सर्व विशेषाधिकार काढून घेण्यात आले. विशेष म्हणजे जमिनीची मालकी सरंजामदारांकडे होती. त्यांच्याकडून जमिनीची मालकी काढून घेऊन कुळे, शेतकरी आणि शेतमजूरांना देण्यात आली.

फ्रेंच राज्यक्रांतीने खिश्चन धर्मसंस्थेचे विशेष अधिकार रद्द केले. चर्चची मालमत्ता, जमीनजुमला काढून घेण्यात आले. त्यामुळे चर्चची आर्थिक परिस्थिती कमजोर झाली.



धर्मगुरूंचे विशेष अधिकार नष्ट झाले. धर्मसंस्थेला सरकारी नियमांचे पालन करावे लागले. फ्रान्समध्ये धर्मनिरपेक्ष शासन अस्तित्वात झाले. त्यामुळे '**धर्मनिरपेक्ष शासनाची**' एक आदर्श संकल्पना जगापुढे झाली. फ्रेंच क्रांतीमुळे फ्रान्समध्ये शैक्षणिक परिवर्तन मोठ्या प्रमाणात घडून आले. शैक्षणिक स्तरावरील धर्माचे प्राबल्य कमी झाले.

फ्रेंच क्रांतीच्या काळात मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला होता. या जाहीरनाम्यात **स्वातंत्र्य, समता व बंधुत्व** या तत्वाचा उद्घोष करण्यात आला. सर्व माणसे जन्मत: स्वतंत्र व समान आहेत हे फ्रेंच राज्यक्रांतीचे सुत्र होते. कायद्यापुढे प्रत्येक व्यक्ती समान आहे. जन्मावरून किंवा संपत्तीमुळे कोणतीही व्यक्ती श्रेष्ठ ठरत नाही, हे या क्रांतीने सांगितले. स्वातंत्र्य हा व्यक्तीचा, समाजाचा व देशाचा नैसर्गिक हक्क आहे हा संदेश फ्रेंच क्रांतीने दिला. फ्रेंच क्रांतीमुळे अनेकांना मानवतावादी कार्य करण्यास प्रेरणा मिळाली.

अशाप्रकारे फ्रेंच राज्यक्रांतीचा परिणाम फ्रान्समधील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनावर झाला. फ्रेंच राज्यक्रांतीतून उद्घोषित झालेली स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही मूल्ये आज संपूर्ण जगाने स्विकारली आहेत. व्यक्तिस्वातंत्र्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे नवीन वाङ्मयाची निर्मिती झाली. नवनवीन संशोधनास या क्रांतीने प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष प्रेरणा दिली.

## ✓ औद्योगिक क्रांती
## (Industrial Revolution)

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शताब्दीमध्ये उत्पादन पद्धती आणि उत्पादन साधनात झालेल्या आमुलाग्र बदलास 'औद्योगिक क्रांती' असे म्हटले जाते. "उत्पादनाचे पारंपारिक तंत्र आणि साधनांचा त्याग करून नवीन तंत्र व साधनांचा वापर करून उत्पादनाच्या क्षेत्रात घडवून आणलेली प्रचंड प्रगती म्हणजे औद्योगिक क्रांती होय." अशी औद्योगिक क्रांतीची व्याख्या करण्यात आली. 'औद्योगिक क्रांती' हा शब्द प्रयोग सर्वप्रथम जेरोम ए. ब्लॅन्की या फ्रेंच अर्थशास्त्रज्ञाने उपयोगात आणला. त्यानंतर ब्रिटिश इतिहासकार ऑरनॉल्ड टॉयन्बी यांनी १७६० ते १८४० या काळात इंग्लंडमध्ये जो औद्योगिक विकास झाला त्याला उद्देशून '**औद्योगिक क्रांती**' हा शब्द वापरला.

औद्योगिक क्रांती निश्चितपणे कोणत्या वर्षी सुरु झाली हे सांगता येत नाही. या क्रांतीच्या स्वरूप व विकासावरून क्रांतीचे पुढील तीन टप्पे सांगता येतात.

**१) १७५०-१८५०** : हा औद्योगिक क्रांतीचा पहिला टप्पा होय. या टप्प्यात औद्योगिक क्रांतीचा उदय प्रथम इंग्लंडमध्ये झाला आणि तिचा प्रसार युरोपातील फ्रान्स, जर्मनी आणि अमेरिका या देशात झाला. या देशात औद्योगिक क्रांतीचा उदय वेगवेगळ्या वेळी झाला.

**२) १८५०-१९५०** : या दुसऱ्या टप्प्यात औद्योगिक क्रांतीचा प्रसार पूर्व

युरोपियन देश, सोव्हिएत रशिया, भारत, चीन व जपान या देशांमध्ये झाला.

**३) १९५० ते आजपर्यंत :** या तिसऱ्या टप्प्यात आशिया, आफ्रिका, आस्ट्रेलिया या देशातील अविकसित देशांमध्ये या क्रांतीचा प्रसार सुरू आहे.

१७५० च्या सुमारास इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ झाला. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती होण्यापूर्वी तेथे घरगुती लघुउद्योग आणि कुटीरोद्योग होते. घरगुती लघुउद्योग आणि कुटीरोद्योगाच्या माध्यमातून तयार होणाऱ्या वस्तू तत्कालीन समाजाच्या गरजा भागवत. उत्पादनाच्या साधनात कोणतीच सुधारणा झाली नव्हती. अनेक शतकांपासून सूत काढणे आणि कापड विणण्याचे काम कारागीर स्वतः हातानेच करायचे.

लोकांना लागणाऱ्या सर्वच वस्तू कारागीर आपआपल्या गावातच तयार करीत. लोकांच्या गरजा गावातच भागविल्या जायच्या. अठराव्या शतकापासून लोकांच्या गरजा वाढल्या. स्थानिक पातळीवर जो माल तयार होत होता तो समाजाच्या गरजा भागवू शकत नव्हता. लोकांची वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी इंग्लंडमधील कापड उद्योगात नवीन मशीनींचा शोध लावण्यात आला. १७३३ मध्ये जॉन के या विणकराने धावत्या धोट्याचा शोध लावला त्यामुळे विणकरांची वस्त्र विणण्याची क्षमता वाढली. पाल आणि व्हाइट यांनी १७४८ मध्ये रोलर स्पिनिंग मशीन तयार केली. त्यामुळे सुताच्या दर्जात सुधारणा झाली. जेम्स हरग्रीव्हजने सूतकातण (स्पिनिंग जेनी) या यंत्राचा शोध लावला. या यंत्रामुळे एकाच वेळी अकरा चरखे फिरविले जाऊ लागले. त्यामुळे एकाच वेळी अकरा चरख्यांवर सूत काढणे शक्य झाले. रिचर्ड आर्कराइट यांनी स्पिनिंग वॉटर फ्रेम हे नवे सुत कताई यंत्र तयार केले. त्यामुळे पूर्वीपेक्षा पिळदार आणि मजबूत धागा काढणे सोपे झाले. क्रॉम्प्टन यांनी १७७९ मध्ये सूतकताई यंत्रात सुधारणा केली. या यंत्रामुळे अधिक चांगले सूत काढणे शक्य झाले. कापड उद्योगातील एक महत्वाचा शोध म्हणजे पॉवर लूम होय. १७८५ मध्ये एडमंड कार्टराईट यांनी पॉवरलूमचा शोध लावला. पॉवरलुममुळे विणकाम अधिक गतीने होऊ लागले. एक मूल सुद्धा दहा कारागीरांच्या बरोबरीचे उत्पादन करू शकत होते. १७९३ मध्ये व्हिटने यांनी कॉटन जीन यंत्र तयार केले. या यंत्राद्वारे कापसापासून सरकी वेगळी करून तिचे गठ्ठे बांधण्याचे काम केले जायचे. १७६५ मध्ये जेम्स वॅट यांनी पाण्याच्या वाफेच्या शक्तीवर चालणारे एक स्टीम इंजीन तयार केले. बाष्पशक्तीवर चालणाऱ्या यंत्राचा उपयोग सुरूवातीला खाणीतून कोळसा आणि कच्चे लोखंड बाहेर काढण्यासाठी करण्यात आला. १८ व्या शताब्दीपूर्वी घोडे किंवा बैलांद्वारे मशीनी चालविल्या जायच्या. जेम्स वॅट ने स्टीम इंजीन तयार केल्यानंतर या इंजीनच्या सहाय्याने मोठ्या मशीनी चालविणे शक्य झाले. नंतर कापड उद्योगात या यंत्राचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात आला.

१८ व्या शतकात नव-नवीन यंत्राचा शोध लावण्यात आला. या यंत्राचा आणि नवीन ज्ञानाचा उपयोग करून उत्पादन वाढविण्यात आले. लोखंडाच्या खाणी, कापड उद्योग आणि इतर उद्योगात नवीन यंत्र आणि तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यामुळे या उद्योगांचा विकास झाला. औद्योगिक विकासाबरोबरच दळणवळणाच्या साधनाचा विकास करण्यात आला. इंग्लंडने अनेक कालवे खोदून आणि रस्ते बांधून देशांतर्गत दळणवळणाच्या



साधनात सुधारणा केल्या. दळणवळणाच्या साधनामुळे वाहतूक वाढून देशातील कारखान्यात तयार झालेला माल समुद्र किनाऱ्यावर पोहचविणे आणि तेथून इतरत्र पाठविणे सुलभ झाले. १९ व्या शतकात रेल्वे आणि आगबोटीमुळे मालाची वाहतूक शीघ्र गतीने होऊ लागली.

अशाप्रकारे १८ व्या आणि १९ व्या शतकातील नवीन यंत्राचा शोध, दळणवळणाच्या साधनांचा विकास इत्यादी कारणांमुळे इंग्लंडमध्ये उत्पादन पद्धती आणि उत्पादन साधनात वेगाने बदल झाला. कारखान्यात वस्तूंचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्यात येऊ लागले. कारखान्यातील वस्तू टिकाऊ आणि स्वस्त असल्यामुळे या वस्तूंची सर्वत्र मागणी वाढली. पूर्वीचे गृहउद्योग आणि लघुउद्योग बंद पडले. त्यामुळे कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तूंच्या मागणीत अधिक वाढ झाली. परिणामतः उत्तरोत्तर कारखानदारीमध्ये वाढ होत गेली. अशाप्रकारे प्रथम इंग्लंडच्या उद्योगक्षेत्रात क्रांती झाली. आणि त्यानंतर फ्रान्स, अमेरिका आणि जर्मनी या देशात औद्योगिक क्रांतीचा प्रसार झाला.

औद्योगिक क्रांती ही प्रदीर्घ काळापर्यंत चाललेली एक प्रक्रिया आहे. १७५० पासून इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती सुरू झाली. तेव्हापासून तर आजपर्यंत औद्योगिक क्रांतीची प्रक्रिया सुरू आहे. जे देश औद्योगिकदृष्ट्या मागासलेले आहेत ते देश देखील औद्योगिक प्रगती घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहेत. औद्योगिक क्रांतीचा मानवी जीवनावर विशेष परिणाम झाला. औद्योगिक क्रांतीमुळे पारंपारिक आर्थिक आणि सामाजिक जीवन पूर्णतः बदलून गेले.

## समाजशास्त्राच्या उदयातील शक्ती/बले
## (The Forces in Emergence of Sociology)

युरोपातील प्रबोधनाचा काळ, फ्रान्सची राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झालेल्या युरोपातील सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि बौद्धिक किंवा वैचारिक परिस्थितींचे समाजशास्त्राच्या उदयामध्ये विशेष योगदान आहे. प्रबोधन काळातील बौद्धिक वा वैचारिक परिवर्तनामुळे प्रत्येक घटनांचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची आवश्यकता जाणवू लागली. परिणामतः नव-नवीन वैज्ञानिक शोध लागलेत. औद्योगिक क्रांतीमुळे नवीन आर्थिक व्यवस्था निर्माण झाली आणि फ्रान्सच्या क्रांतीमुळे राजेशाही नष्ट होऊन लोकशाही मूल्यांवर आधारीत नवी राजकीय व्यवस्था आकारास आली. या सर्व गोष्टींमुळे समाजात परिवर्तन घडून आले. समाजाची नवीन संरचना अस्तित्वात आली. सामाजिक परिवर्तनामुळे विविध सामाजिक समस्या निर्माण झाल्यात. परिणामतः समाजाचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अध्ययन करण्यास चालना मिळाली. समाजशास्त्राच्या उदयातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय शक्तीचे थोडक्यात विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) आर्थिक शक्ती/बले (Economic Forces) :** वैचारिक प्रबोधन, फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांतीमुळे युरोपातील जुनी सरंजामशाही व्यवस्था

नष्ट झाली. संशोधकांनी नव-नवीन यंत्रांचा शोध लावला. यंत्राचा उपयोग करून मोठ्या प्रमाणात वस्तूंचे उत्पादन केले जाऊ लागले. उद्योगात अशा प्रकारचा उपयोग केल्यामुळे कारखाना पद्धतीचा उदय झाला. मोठमोठ्या मशिनींचा उपयोग करण्यावर विशेष भर देण्यात आला. त्यामुळे औद्योगिकरण वाढले. परिणामतः भांडवलदारांचा नवा वर्ग उदयास आला. औद्योगिकरणामुळे पारंपारिक ग्रामीण अर्थव्यवस्था नष्ट झाली. औद्योगिकरणामुळे नागरीकरणास प्रोत्साहन मिळाले. ग्रामीण भागातील शेतमजूर रोजगारासाठी शहरात येऊ लागले. भांडवलदार वर्ग मजूरांना अल्प मजूरी देऊन त्यांच्याकडून जास्तीत जास्त काम घेऊ लागला. अशाप्रकारे भांडवलदार वर्ग मजूरांचे शोषण करू लागला. दळणवळण आणि प्रसार साधनांचा विकास झाला. त्याचबरोबर या काळात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढली. समाजाचे भांडवलदार आणि मजूर वर्ग या दोन वर्गात विभाजन झाले. आर्थिक विषमता आणि मजूरांचे शोषण यामुळे समाजात आर्थिक असंतुलन निर्माण झाले.

एकीकडे भांडवलशाही व्यवस्थेमुळे युरोपातील देशांचा आर्थिक विकास झाला. परंतु त्याचबरोबर भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा समाजावर वाईट परिणाम पडला. भांडवलशाहीत मजूरांचे प्रचंड शोषण होऊ लागले. त्यामुळे भांडवलशाही व्यवस्था ही बहुसंख्यांक लोकांच्या दृष्टीने हानीकारक ठरली. भांडवलशाहीतून अनेक समस्यांची आव्हाने विचारवंतासमोर उभी राहिलीत. भांडवलशाही व्यवस्थेच्या विरोधात अनेक विचारवंतांनी आपले विचार मांडलेत. पाश्चात्य देशात भांडवलशाही व्यवस्थेच्या विरोधात समाजवादी विचारसरणीचा उदय झाला. कार्ल मार्क्स यांनी भांडवलशाहीच्या विरोधात स्वतंत्र तत्त्वज्ञान मांडले. मार्क्सने 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' **(The Communist Manifesto)** आणि 'दास कॅपिटल' **(Das Capital)** हे ग्रंथ लिहिलेत. मार्क्सच्या समाजशास्त्रीय सिद्धांतामध्ये 'वर्ग संघर्ष' सिद्धांत महत्त्वाचा आहे. मार्क्सच्या मते, 'भांडवलशाहीत वर्ग-संघर्ष अटळ आहे.' इमाईल दूर्खीम यांनी 'समाजातील श्रमविभाजन' (The Division of Labour in Social) या ग्रंथात श्रमविभाजनाच्या सामाजिक परिणामांचे विश्लेषण केले आहे.

२) <u>राजकीय शक्ती/बले</u> (Political Forces) : फ्रान्स देशात १७८९ मध्ये राज्यक्रांती घडून आली. फ्रान्सच्या राज्यक्रांतीचा प्रभाव केवळ फ्रान्सपुरताच मर्यादित राहिली नाही. या राज्यक्रांतीचा प्रभाव संपूर्ण जगावर पडला. फ्रान्सच्या राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये जगाला दिलीत. फ्रान्सच्या राज्यक्रांतीमुळे राजेशाही पद्धतीऐवजी लोकशाही राज्यपद्धती स्थापन झाली. इंग्लंडमधील राजाचे अधिकार कमी होऊन संसदेचे अधिकार वाढले. फ्रान्सच्या राज्यक्रांतीमुळे सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान झाली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मानवी मूल्ये समाजात रुजू लागली. या मूल्यावर आधारीत लोकशाही राज्याची निर्मिती होऊ लागली. हा काळ राजेशाहीकडून लोकशाहीकडे जाणारा संक्रमणाचा काळ होता. राजेशाही नष्ट होऊन गणराज्याचा विचार प्रबळ ठरला. राजकीय क्षेत्रातील धर्माचे महत्त्व कमी झाले



होते. धर्माचे स्थान, सामाजिक नियंत्रण, नवीन शिक्षण व्यवस्था इत्यादी अनेक नवी आव्हाने येऊ लागल्यात. परिणामतः प्रशासकीय आणि राजकीय संघर्ष देखील निर्माण होऊ लागले. या संघर्षांवर उपाय शोधण्यासाठी विचारवंत चिंतन करू लागलेत. या काळातील विचारवंतांच्या बौद्धिक चिंतनातून समाजशास्त्राच्या विकासाकरिता आवश्यक पार्श्वभूमी निर्माण झाली. **हॉब्स, लॉक आणि रुसो** यांनी **'सामाजिक कराराचा'** (Theory of Social Contact) सिद्धांत मांडला. सर थॉमस मूर यांनी **"युटोपिया"** या ग्रंथात इंग्लंडमधील सामाजिक व्यवस्था आणि तत्कालीन सामाजिक समस्यांचे विवेचन केले.

फ्रान्सच्या राज्यक्रांतीचे परिणाम समाजाच्या विविध घटकांवर सकारात्मक स्वरूपात आढळून येत होते. असे असले तरी या राज्यक्रांतीमुळे फ्रान्समध्ये सामाजिक अराजकता आणि अव्यवस्था निर्माण झाली. या सामाजिक अव्यवस्थेचा विचारवंतावर विशेष परिणाम झाला. फ्रान्समधील विचारवंताचे लक्ष सकारात्मक परिवर्तनापेक्षा नकारात्मक परिवर्तनाकडे अधिक आकर्षित झाले. फ्रान्स राज्यक्रांतीनंतर अस्तित्वात आलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारीत नवीन समाजव्यवस्थेच्या दृष्टीने विचारवंत विचार करू लागले. फ्रान्समधील सामाजिक अव्यवस्थेचा सेंट सायमन आणि **ऑगस्ट कॉम्ट** यांच्यावर विशेष प्रभाव पडला. त्यामुळे या दोन विचारवंतांनी व्यवस्था, पुनर्संघटन आणि समाजाची वैज्ञानिक व्याख्या करण्याच्या उद्देशाने एका नवीन समाज विज्ञानाच्या आवश्यकतेवर भर दिला.

३) <u>सामाजिक शक्ती/बले</u> (Social Forces) : युरोपातील प्रबोधन, फ्रान्सची राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांतीमुळे प्रचंड आर्थिक आणि राजकीय परिवर्तन होऊ लागले. त्याचा परिणाम समाजावर पडणे साहजिकच होते. औद्योगिक क्रांतीमुळे युरोपातील सरंजामशाही, भांडवलशाही नष्ट होऊन भांडवलशाही व्यवस्था उदयास आली. समाजात आर्थिक आधारावर नवीन वर्ग व्यवस्था निर्माण झाली. पूर्वी युरोपात धर्माचा प्रचंड प्रभाव होता. परंतु प्रबोधनामुळे धर्माचे महत्त्व कमी झाले. फ्रान्स राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता, बंधुता ही नवीन मूल्ये समाजासमोर ठेवलीत. बदललेल्या आर्थिक आणि राजकीय परिस्थितीमुळे नवीन समस्या निर्माण झाल्यात. औद्योगिकरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मोडकळीस आली. ग्रामीण भागातील लोक रोजगाराकरीता शहरात येऊ लागले. नागरीकरणाच्या प्रक्रियेबरोबरच झोपडपट्ट्या, बेरोजगारी, गुन्हेगारी इत्यादी समस्या निर्माण झाल्यात. व्यक्तिस्वातंत्र्यास महत्त्व प्राप्त होऊन त्यातून कौटुंबिक विघटन घडून येऊ लागले. बदललेल्या राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेमुळे सामाजिक व्यवस्थेत देखील परिवर्तन होऊ लागले. हा काळ सामाजिक व्यवस्थेच्या संक्रमणाचा काळ होता. त्यामुळे लोकांना सामाजिक अस्थिरता प्रकर्षाने जाणवू लागली. या सर्व परिस्थितीमुळे विचारवंतासमोर अनेक आव्हाने निर्माण झालीत. निर्माण झालेल्या विविध सामाजिक समस्या सोडविण्यासाठी आदर्श समाज व्यवस्थेच्या दृष्टीने विचारवंतांचे चिंतन सुरू झाले.

## समाजशास्त्राचा उदय

(Emergence of Sociology)

युरोपात १३, १४ आणि १५ व्या शतकात प्रबोधन घडून आले. त्यामुळे युरोपात प्रचंड बौद्धिक (वैचारिक) परिवर्तन झाले. लोकांचा धार्मिक रूढी, परंपरा आणि श्रद्धा यावरील विश्वास कमी झाला. लोक वस्तुनिष्ठ पद्धतीने विचार करू लागले. नवनवीन भूप्रदेशांचा शोध लावण्यात आला. लोक वैज्ञानिक पद्धतीने विचार करू लागले. त्यामुळे युरोपातील वैज्ञानिकांनी अनेक शोध लावले. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विशेष प्रगती झाली. अनेक नवीन यंत्रे तयार करण्यात आलीत. वैज्ञानिकांनी केलेल्या संशोधनाचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठी करण्यात येऊ लागला. अमेरिकन क्रांती, फ्रेंच क्रांती आणि औद्योगिक क्रांती यामुळे जगातील विशेषतः युरोपातील राजकीय, आर्थिक आणि समाजव्यवस्थेत फार मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले. युरोपात भांडवलशाही आणि साम्राज्यवादाचा उदय झाला. भांडवलशाहीचा समाजावर पडलेला प्रतिकूल प्रभाव लक्षात घेऊन समाजवाद आणि लोकशाहीच्या विचारांचा पुरस्कार करण्यात आला. महाविद्यालये आणि विद्यापीठातून लोक शिक्षण घेऊ लागले. वैज्ञानिक संशोधनाचे महत्त्व लोकांना कळले. त्यामुळे वैज्ञानिक ज्ञानाचा सर्वत्र प्रसार आणि प्रचार करण्यात आला. आता लोक प्रत्येक विषयाचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करू लागले. ही समाजशास्त्राच्या उदयाची पार्श्वभूमी आहे. या पार्श्वभूमीमुळे समाजाचा अभ्यास करणाऱ्या विचारवंतांना सामाजिक घटकाचे अध्ययन वैज्ञानिक पद्धतीने करण्याची प्रेरणा मिळाली.

१९ व्या शतकात **ऑगस्ट कॉम्टने** समाजाचे अध्ययन वैज्ञानिक पद्धतीने करून या अध्ययनास विज्ञानाचा दर्जा प्राप्त करून दिला. **कॉम्टनंतर हर्बर्ट स्पेन्सर, कार्ल मार्क्स, इमाईल दुर्खीम, मॅक्स वेबर, विल्फ्रेडो पॅरेतो, जॉर्ज सिमेल, चार्ल्स कुले** इत्यादी समाजशास्त्रज्ञांनी समाजाचे वैज्ञानिक दृष्टीकोनातून अध्ययन करून अनेक समाजशास्त्रीय विचार आणि सिद्धांत मांडले. या समाजशास्त्रज्ञांनी मांडलेल्या विचार आणि सिद्धांतामुळे समाजशास्त्राचा विकास घडून आला. या समाजशास्त्रज्ञांपूर्वी अनेक विचारवंतांनी समाजाच्या संदर्भात विचार मांडले होते. परंतु त्यांच्या या विचारांना वैज्ञानिक आधार नव्हता.

यावरून हे स्पष्ट होते की, समाजशास्त्राच्या उदयाची एक विशिष्ट पार्श्वभूमी आहे. युरोपात प्रबोधन घडून आले नसते. वैज्ञानिक पद्धतीने विचार करण्याची दृष्टी त्यांना मिळाली नसती तर कदाचित १९ व्या शतकात समाजशास्त्राचा उदय झाला नसता. एक विशिष्ट पार्श्वभूमी लाभल्यामुळे युरोपातच समाजशास्त्राचा उदय झाला. भारतासारख्या देशात प्रबोधन आणि वैज्ञानिक विचारांची पार्श्वभूमी लाभली नसल्यामुळे तेथे समाजशास्त्राचा उदय होऊ शकला नाही. ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

◆◆◆

युनिट क्र० २

# २. ऑगस्ट कॉम्ट

(Auguste Comte 1798-1857)

▪ जीवन परिचय ▪ ग्रंथसंपदा ▪ प्रत्यक्षवाद किंवा वैज्ञानिक पद्धती - प्रत्यक्षवादाचा अर्थ, प्रत्यक्षवादाची वैशिष्ट्ये, प्रत्यक्षवादाचे विभाजन ▪ विज्ञानाचे सोपान (संस्तरण) विज्ञानाच्या सोपानाचे सिद्धांत किंवा आधार, विज्ञानाचे सोपान - १) गणित विज्ञान २) खगोल विज्ञान ३) भौतिक किंवा पदार्थ विज्ञान ४) रसायन विज्ञान ५) जीव विज्ञान ६) समाज विज्ञान किंवा समाजशास्त्र.

## जीवन परिचय

ऑगस्ट कॉम्टचा जन्म दक्षिण फ्रान्समधील मॉण्टपेलियर (Montpillier) या शहरात १९ जानेवारी १७९८ मध्ये झाला. त्याचे वडील फ्रेंच शासनात कर विभागामध्ये एका मोठ्या पदावर होते. लहानपणापासूनच कॉम्टच्या व्यक्तिमत्त्वामध्ये, बौद्धिक क्षमता आणि प्रस्थापित सत्तेला विरोध करणे हे दोन विलक्षण गुण होते. त्याचे आई-वडील हे राजभक्त होते; तर कॉम्ट हा लोकशाहीवादी होता. त्याचे आई-वडील कॅथॉलिक पंथाचे होते, परंतु तो मात्र कॅथॉलिक पंथाचा कट्टर विरोधक होता.

कॉम्टचे प्राथमिक शिक्षण हे त्याच्या जन्मगावीच झाले. १८१४ मध्ये कॉम्टने पॅरिस शहरातील एका प्रसिद्ध **'इकॉल पॉलिटेक्निक'** (Ecole Polytechnic) या शिक्षणसंस्थेत प्रवेश घेतला. त्या शिक्षणसंस्थेतील एका प्राध्यापकाला काढून टाकण्याबाबत झालेल्या आंदोलनात कॉम्टने सक्रीय भाग घेतला होता. या काळातच तो 'बेंजामिन फ्रेंकलीन' (Benjamin Franklin) या विचारवंताच्या विचारामुळे खूप प्रभावित झाला. तो त्यांना आदर्श पुरुष मानायचा आणि त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करायचा. तेरा वर्षांचा असतांनाच आपल्या कुटुंबाच्या राजकीय आणि धार्मिक विचारांचा कॉम्टने त्याग केला. वयाच्या चौदाव्या वर्षी समाजाचे पुनर्निर्माण करण्याचा विचार त्याच्या मनात येऊ लागला. त्याने सोळाव्या वर्षी गणितविज्ञानावर व्याख्यान दिले.

१८१६ **'इकॉल पॉलिटेक्निक'** ही शिक्षण संस्था बंद पडल्यामुळे निराश होऊन कॉम्ट आपल्या जन्मगावी वापस गेला. परंतु तेथे त्याचे मन रमले नाही. लगेच तो जुलै १८१६ मध्ये पॅरीसला आला. तेथे तो गणिताच्या शिकवण्या करून आपला चरितार्थ चालवू लागला. पॅरीसला राहत असतांना कॉम्टच्या जीवनात एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना घडली. ती घटना म्हणजे १८१७ मध्ये प्रसिद्ध फ्रेंच विचारवंत सेंट सायमन (Saint Simon) आणि उमराव घराण्यातील विचारवंतांशी कॉम्टचा परिचय झाला. सेंट सायमन आणि कॉम्ट यांचा १८१८ ते १८२४ पर्यंत खूप घनिष्ठ संबंध होता. त्यांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव कॉम्टवर पडला. काही काळ पर्यंत

सेंट सायमनचा सचिव म्हणून कॉम्टने काम केले. सायमनने चालविलेल्या 'Industrie' या नियतकालिकामधून कॉम्टने १८१९ ते १८२४ च्या दरम्यान अनेक लेख व निबंध लिहिलेत. पुढे १८२४ मध्ये कॉम्टचा एक लेख कोणत्या स्वरूपात प्रसिद्ध करावा या लहानशा कारणावरून कॉम्ट आणि सायमन यांच्यात वाद होऊन कॉम्ट सायमन पासून वेगळा झाला.

१८२६ मध्ये आपल्या प्रत्यक्षवादाच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी कॉम्टने पॅरिस शहरात आपल्या भाषणाची एक मालिका आयोजित केली होती. या भाषणामधून त्याने प्रत्यक्षवादाच्या स्वरूपाची रूपरेषा मांडली. अधिक चिंतन, मनन आणि परिश्रम केल्यामुळे १८२७ मध्ये कॉम्टला मानसिक विकृतीचा तीव्र झटका आला. १८२८ मध्ये रोगमुक्त झाल्यानंतर त्याने पुन्हा व्याख्यान देण्याचे काम सुरू केले. १८३० मध्ये **'The Course of Positive Philosophy'** या त्यांच्या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा पहिला खंड प्रसिद्ध झाला. विशेष म्हणजे हा ग्रंथ सहा खंडात लिहिण्यात आला.

१८२५ मध्ये **कॅरोलीन मॅसीन** या स्त्री सोबत कॉम्टचा विवाह झाला. परंतु त्याचे वैवाहिक जीवन सुखी नव्हते. १८४२ मध्ये कॉम्टने आपल्या पत्नीपासून घटस्फोट घेतला. १८४५ मध्ये **श्रीमती क्लोटाइल्ड डी. वॉक्स (Clotilde de Vaux)** या स्त्रीशी कॉम्टचा संबंध आला. श्रीमती वॉक्सचा कॉम्टच्या राहणीमान आणि विचारांवर देखील बराच प्रभाव पडला. मात्र त्या दोघांचे प्रेम संबंध निर्माण झाल्यावर एका वर्षातच श्रीमती वॉक्सचा मृत्यू झाला.

कॉम्टची आर्थिक परिस्थिती नेहमीच वाईट राहिली. गणिताच्या शिकवण्यावरच तो आपला उदर-निर्वाह चालवायचा. १८३२ मध्ये **'इकॉल पॉलिटेक्निक'** या संस्थेत त्यांना सुरूवातीला ट्यूटर आणि नंतर परीक्षक म्हणून काम मिळाले. याच दरम्यान त्यांच्या विचारांमुळे त्यांना काही अनुयायी मिळाले. इंग्लंडचा प्रसिद्ध विचारवंत जॉन स्टूअर्ट मिल यांनी १८४५ मध्ये इंग्लंडमध्ये १२०० डॉलरची रक्कम वर्गणीच्या स्वरूपात गोळा करून कॉम्टला पाठविली होती.

ऑगस्ट कॉम्ट उदास मनोवृत्तीचा आणि स्वकेंद्रीत विचारांचा होता. परंतु त्यांनी सामाजिक घटनांच्या अध्ययनासंदर्भात **'समाजशास्त्र'** या नवीन विषयाची स्थापना करण्याबाबत दिलेले योगदान हे महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी प्रत्यक्षवादासंबंधी (वैज्ञानिक पद्धत) मांडलेले विचार चिंतनीय आहेत. अशा या महान सामाजिक विचारवंताचे ५ सप्टेंबर १८५७ मध्ये दुःखद निधन झाले.

**कॉम्टची ग्रंथसंपदा :**

ऑगस्ट कॉम्टने अनेक विचार प्रवर्तक ग्रंथांचे लिखाण केले. तसेच समाजशास्त्र या संकल्पनेचा सर्वात प्रथम वापर केला. या विषयातील मूलभूत सिद्धांत प्रस्थापित केले. कॉम्टच्या नावे पुढील ग्रंथसंपदा पहावयास मिळते.

१) 'A Prospectus of the Scientific Works for the Reorganization of Society' हे कॉम्ट यांचे पहिले पुस्तक १८२२ मध्ये प्रकाशित झाले. या पुस्तकाला सुप्रसिद्ध विचारवंत सेंट सायमन यांची प्रस्तावना होती.



२) 'Considerations on Spiritual Power' हे पुस्तक १८२६ मध्ये प्रसिद्ध झाले.

३) 'विज्ञानवादी दर्शन मार्ग' (The Course of Positive Philosophy) हा ग्रंथ सहा खंडामध्ये १८३० ते १८४२ च्या दरम्यान प्रसिद्ध झाला. या ग्रंथाच्या लिखाणामध्ये कॉम्टने १२ वर्ष घालविले. याचा पहिला खंड १८३० मध्ये तर शेवटचा खंड १८४२ मध्ये प्रकाशित झाला.

४) 'विज्ञानवादी राजकीय नीतिचे सिद्धांत' (Systemde Politique Positive) हा ग्रंथ चार खंडात १९५१ ते १९५४ च्या दरम्यान प्रसिद्ध झाला.

वरील ग्रंथाबरोबरच, Discourse of Positive Spirit (१८४४), Positivist Calender (१८४९), Positivist Library (१८५२), Appeal to Conservatives (१८५५), System of Positive Logic (१८५६) इत्यादी ग्रंथ सुद्धा ऑगस्ट कॉम्टने लिहिलेत. या सर्व ग्रंथापैकी 'Course of Positive Philosophy' आणि 'System of Positive Polity' या दोन ग्रंथामुळे कॉम्टला विशेष प्रसिद्धी मिळाली.

## प्रत्यक्षवाद किंवा वैज्ञानिक पद्धती
## (Positivism or Scientific Method)

**ऑगस्ट कॉम्ट** यांना प्रत्यक्षवादाचा जनक मानला जातो. कॉम्टने आपल्या 'Positive Philosophy' आणि 'Positive Polity' या दोन ग्रंथात 'प्रत्यक्षवाद' या संकल्पनेचा उल्लेख केला आहे. 'पॉझिटिव्ह फिलॉसॉफी' 'Positive Philosophy' या पहिल्या ग्रंथात कॉम्टने प्रत्यक्षवादाची सैद्धांतिक व्याख्या दिली तर 'पॉझिटिव्ह पोलीटी' 'Positive Polity' या दुसऱ्या ग्रंथात व्यावहारिक व्याख्या दिली.

प्रत्यक्षवादाचा अर्थ (Meaning of Positivism)

ऑगस्ट कॉम्ट यांनी 'पॉझिटीविझम' (Positivism) या शब्दाची रचना फ्रेंच भाषेतील 'Positif' या शब्दाच्या आधारावर केली आहे. ज्याचा अर्थ 'तथ्ये किंवा अनुभवावर' आधारीत असा आहे. कॉम्ट यांनी प्रत्यक्षवादाचा अर्थ वैज्ञानिक (Scientific) असा सांगितला आहे. वैज्ञानिक आणि प्रत्यक्षवाद यांचा अर्थ एकच आहे. म्हणून जो वैज्ञानिक आहे तो प्रत्यक्षवादी देखील आहे. यावरून हे स्पष्ट होते की, प्रत्यक्षवाद हा वैज्ञानिक या शब्दाचा पर्यायी शब्द आहे.

कॉम्टच्या मते, संपूर्ण विश्व हे अपरिवर्तनीय नैसर्गिक नियमांद्वारा व्यवस्थित व निर्देशित होत असते. निसर्ग आणि ब्रह्मांडाच्या नियमांना धार्मिक, तात्त्विक आणि अलौकिक आधारावर स्पष्ट करणे शक्य नाही. त्याकरीता वैज्ञानिक पद्धतीद्वारेच हे नियम स्पष्ट करता येतात. वैज्ञानिक पद्धतीमध्ये कल्पनांना कोणतेच स्थान नाही. कोणत्याही घटनेचे अध्ययन हे निरीक्षण, परीक्षण, प्रयोग आणि वर्गीकरणाच्या आधारे योग्य प्रकारे केले जाऊ शकते. निरीक्षण, परीक्षण, प्रयोग आणि वर्गीकरणाची एक

व्यवस्थित अध्ययन पद्धती म्हणजेच विज्ञान होय.

कॉम्टचा प्रत्यक्षवाद स्पष्ट करतांना रेमंड ॲरॉन (Raymond Aron) नमूद करतो की, 'प्रत्यक्षवादाचा संबंध घटनांचे निरीक्षण, त्याचे विश्लेषण आणि त्यांच्या पारस्पारिक संबंधांना नियमित करणाऱ्या नियमांचा शोध घेणे याच्याशी आहे.' (Positivism consists in observing phenomena, in analysing them, in discovering the laws governing the relations among them.)

कॉम्टच्या प्रत्यक्षवादास अधिक स्पष्ट करतांना रोलीन चॅम्बलिस (Rollin Chambliss) म्हणतो की, "प्रत्यक्षवादाचा संबंध कृत्रिमतेशी नसून वास्तविक गोष्टींशी आहे, संपूर्ण ज्ञानाएवजी उपयोगी ज्ञानाशी आहे. याचा संबंध तथ्यांशी आहे, ज्याचे काही निश्चित अंतापर्यंत निरीक्षण करणे शक्य आहे. हा विस्तृत अस्पष्ट भावापेक्षा सतत परिवर्तित घेणारा सत्य, निरपेक्षापेक्षा सापेक्षाशी संबंधित आहे. शेवटी प्रत्यक्षवाद हा सहानुभूतीपूर्ण आहे. ज्यामध्ये हा त्या सर्वांना सहसंबंधामध्ये एकत्रित करतो, जे याची भावना आणि पद्धतीचा प्रयोग करतात. थोडक्यात, प्रत्यक्षवाद विचाराची अशी एक प्रणाली आहे की जी सार्वत्रिक स्वरूपात स्वीकारली जाऊ शकते."

अशाप्रकारे निरीक्षण, परीक्षण, प्रयोग आणि वर्गीकरणावर आधारीत वैज्ञानिक पद्धतीद्वारा सर्व काही समजणे आणि त्यापासून ज्ञान प्राप्त करणे म्हणजेच कॉम्टचा प्रत्यक्षवाद होय. म्हणून **कॉम्टचा प्रत्यक्षवाद म्हणजेच अध्ययनाची वैज्ञानिक पद्धत होय.**

प्रत्यक्षवादाद्वारे समाजाचे अध्ययन

अनुभव, निरीक्षण, प्रयोग आणि वर्गीकरणाच्या व्यवस्थित कार्य-पद्धतीद्वारा नैसर्गिक घटनांचे अध्ययन केले जाते. त्याचप्रमाणे समाजाचे देखील या वैज्ञानिक पद्धतीद्वारे अध्ययन करता येते. कारण समाज हा देखील निसर्गाचे एक अंग आहे असे कॉम्ट प्रतिपादन करतो. ज्याप्रकारे नैसर्गिक घटना काही निश्चित नियमांच्या आधारावर घडतात, त्याचप्रकारे निसर्गाच्या एका अंगाच्या रूपात सामाजिक घटना देखील काही निश्चित नियमांच्या आधारावर घडतात. ज्याप्रमाणे पृथ्वीची गती, ऋतू-परिवर्तन, चंद्र आणि सूर्याचे आवागमन, दिवस आणि रात्र होणे इत्यादी नैसर्गिक घटना आकस्मिक नाही, तर काही निश्चित नियमांच्या आधारावर या सर्व नैसर्गिक घटनांचे संचालन होत असते. त्याचप्रमाणे मानवी किंवा सामाजिक घटना या देखील आकस्मिक नसून त्या सामाजिक नियमांच्या अंतर्गत घडत असतात, त्यामुळे सामाजिक घटना कशा प्रकारे घडून येतात किंवा त्यांचा कोणता क्रम व गती आहे, याचे अध्ययन यथार्थपणे करणे शक्य आहे. हाच कॉम्टच्या प्रत्यक्षवादाचा आधारभूत सिद्धांत आहे.

कॉम्टच्या प्रत्यक्षवादाची आणखी महत्वाची विशेषता म्हणजे, धार्मिक किंवा तात्त्विक विचारांना यात कोणतेच महत्व देण्यात आले नाही. जर धार्मिक किंवा



तात्त्विक विचारांचे अध्ययन केले तर ते वैज्ञानिक राहणार नाही. प्रत्यक्षवाद हा कल्पना किंवा दैवी गोष्टींवर आधारीत नाही. या सर्व धार्मिक आणि तात्त्विक गोष्टींना कॉम्टने आपल्या प्रत्यक्षवादापासून बाजूला ठेवले आहे. कॉम्टच्या मते, निरीक्षण, परीक्षण, प्रयोग आणि वर्गीकरणाच्या व्यवस्थित अध्ययन प्रणालीच्या आधारावर सामाजिक घटनांचे अध्ययन करता येते.

कॉम्टच्या अनुसार प्रत्यक्षवादाच्या अंतर्गत सर्वप्रथम विषयाची निवड केली जाते. त्यानंतर निरीक्षणाद्वारे त्या विषयासंबंधीची सर्व तथ्ये एकत्रित केली जातात. एकत्रित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करून सामान्य वैशिष्ट्यांच्या आधारावर सर्व तथ्यांचे वर्गीकरण केले जाते. त्यानंतर त्या विषयांच्या संदर्भात निश्चित निष्कर्ष मांडला जातो. अशाप्रकारे निरीक्षण परीक्षण आणि वर्गीकरण करण्याची वैज्ञानिक पद्धत ही प्रत्यक्षवादाचा आधार आहे.

कॉम्टचा एक इंग्रज अनुयायी डॉ. ब्रिज (Dr. Bridges) यांनी प्रत्यक्षवादाचे स्पष्टीकरण एका उदाहरणाद्वारे केले आहे.

एक व्यक्ती विष खाऊन मरतो. तेव्हा या घटनेचे विश्लेषण धर्मवादी, तत्ववेत्ते आणि वैज्ञानिक किंवा प्रत्यक्षवादी हे वेगवेगळ्या पद्धतीने करतात.

१) धर्मवादी लोक त्या व्यक्तीचे मरणे, हा दैवी संकेत होता असे मानतात. ते म्हणतील की, देवाचीच तशी इच्छा होती.

२) तत्ववेत्ता याबाबत म्हणेल की, मिलन आणि विरह हा एक स्वाभाविक नियम आहे. मृत्यू हा असा नियम आहे की, त्यानंतर मिलन होणे शक्य नाही. त्यामुळे व्यक्तीचा मृत्यू होणे स्वाभाविक आहे.

३) वैज्ञानिक पद्धतीने विचार करणारा प्रत्यक्षवादी प्रथम त्या व्यक्तीच्या शवाचे निरीक्षण करील. तो व्यक्ती कोणत्या कारणामुळे मरण पावला याचा शोध घेईल. त्यानंतर त्या व्यक्तीच्या संदर्भात आपले मत मांडेल.

डॉ. ब्रिज यांनी दिलेल्या उदाहरणावरून कॉम्टचा प्रत्यक्षवाद लक्षात येतो. कॉम्टचा प्रत्यक्षवाद हा वैज्ञानिक पद्धतीवर आधारलेला आहे हे स्पष्ट होते.

**प्रत्यक्षवादाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Positivism) :

ऑगस्ट कॉम्टच्या प्रत्यक्षवादाची पुढील वैशिष्ट्ये आहे.

**१) समाजात देखील काही निश्चित नियम असतात :** कॉम्टच्या मते, प्रत्यक्षवादी पद्धती अर्थात घटनांचे अनुभव, निरीक्षण, परीक्षण, प्रयोग आणि वर्गीकरणाद्वारे केवळ नैसर्गिक घटनांचेच नाही तर सामाजिक घटनांचे देखील अध्ययन केले जाऊ शकते. कारण नैसर्गिक घटनांप्रमाणेच सामाजिक घटना देखील काही निश्चित नियमांच्या आधारावर घडत असतात. म्हणून ज्याप्रमाणे रसायन विज्ञान, भौतिक विज्ञान आणि इतर नैसर्गिक विज्ञानाचे प्रत्यक्षवादी पद्धतीद्वारे अध्ययन केले जाते, त्याचप्रमाणे समाजशास्त्रात देखील

प्रत्यक्षवादी पद्धतीद्वारे अध्ययन केले जाऊ शकते. प्रत्यक्षवादी पद्धतीचा अवलंब समाजशास्त्रात करून त्यास विज्ञानाचा दर्जा प्राप्त करून देणे हा कॉम्टचा उद्देश होता.

**२) अध्ययनाची वैज्ञानिक पद्धत :** प्रत्यक्षवादात घटनांची व्याख्या संयोग आणि अनुमानावर केली जात नाही. तसेच त्यास धार्मिक, तात्त्विक आणि अलौकिक आधारावर देखील स्पष्ट केले जात नाही. तर प्रत्यक्षवादात सर्वप्रथम घटनांचे निरीक्षण आणि परीक्षण केले जाते. नंतर त्याचे वर्गीकरण करून यथार्थ ज्ञान प्राप्त केले जाते.

कॉम्टच्या मते, सामाजिक घटना निश्चित नियमांद्वारे निर्देशित आणि संचालीत होतात. सामाजिक जीवनात देखील निसर्गाप्रमाणेच परिवर्तन होत असते. या नैसर्गिक नियमांची कारणे शोधणे व्यर्थ आहे. कारण कुणाच्या इच्छेने ते संचालीत होत नसतात. म्हणून कॉम्ट घटनांच्या कारणांना शोधण्यापेक्षा त्यांच्या निरीक्षण आणि वर्गीकरणावर अधिक भर देतो. हीच गोष्ट सामाजिक घटनांना देखील लागू होते.

**३) तार्किक व्याख्येवर भर :** प्रत्यक्षवादात बौद्धिक क्रियांना कॉम्टने अधिक महत्त्व दिले आहे. यामध्ये मानवी मेंदू आणि तर्काची विस्तृत व्याख्या केली गेली आहे. प्रत्यक्षवादाची पद्धत मुळात तर्कावर आधारीत आहे. कॉम्ट असे मानतो की, प्रत्यक्षवादी समाजात प्रत्येक व्यक्तीचा बौद्धिक स्तर अत्यंत प्रगत असेल. कॉम्ट बौद्धिक क्रियांनाच धर्म आणि धार्मिक विश्वासाचा आधार मानतो. मानवाच्या विकासासाठी बौद्धिक प्रगती आवश्यक आहे असे कॉम्टचे मत आहे. ज्याची पूर्ती केवळ प्रत्यक्षवादाद्वारेच शक्य आहे. म्हणून समाजशास्त्रास विज्ञानाच्या स्तरावर नेण्यासाठी सामाजिक अध्ययनाच्या क्षेत्रात धार्मिक आणि तात्त्विक व्याख्यांचा त्याग करून प्रत्यक्षवादी वैज्ञानिक पद्धतीचा प्रयोग करणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे प्रत्यक्षवादाचे सर्वांत अधिक महत्त्वाचे कार्य म्हणजे मानवाच्या मेंदूस अलौकिक, काल्पनिक, तत्त्वज्ञान आणि अमूर्त विचारांपासून मुक्त करणे आणि सामाजिक घटनांचे वैज्ञानिक अध्ययन व संशोधन करणे हे आहे.

**४) सामाजिक पुनर्निर्माणाचे एक साधन :** कॉम्ट यांनी प्रत्यक्षवादी सिद्धांताच्या आधारावर सामाजिक पुनर्निर्माणाची एक योजना सादर केली. त्यांनी १८४८ मध्ये एका प्रत्यक्षवादी समाजाचे संघटन देखील केले होते. प्रत्यक्षवादी समाजाच्या अनुसार, प्रत्यक्षवाद ही एक अशी वैज्ञानिक विधी आहे की, ज्याचा उद्देश संपूर्ण मानव समाजास, विशेषत: युरोपियन समाजाची भौतिक, बौद्धिक आणि नैतिक रूपात प्रगती करणे हा होता. या उद्देशाच्या पूर्तीकरीता विशेष निर्देश आणि शिक्षण यावर भर दिला होता. प्रत्यक्षवादी समाजात भय, सुरक्षा आणि स्वार्थास कोणतेच स्थान नसेल. त्याऐवजी प्रेम, सद्भावना आणि सहयोग यांचे साम्राज्य असेल. समाजाचे पुर्ननिर्माण करण्यासाठी कोणत्याही हिंसात्मक साधनांचा उपयोग केला जाणार नाही.

**५) प्रत्यक्षवाद एक मानवतावादी धर्म :** कॉम्टचा प्रत्यक्षवाद केवळ एक विज्ञानच नाही तर तो मानवतावादी धर्म देखील आहे. प्रत्यक्षवाद मानव धर्माच्या



[illegible] आधारीत नवीन समाजाची रचना करणे हा आपला उद्देश मानतो. कॉम्ट म्हणत असे, 'प्रत्यक्षवादाद्वारे वास्तविक ज्ञान प्राप्त करणे शक्य आहे आणि वास्तविक [illegible] बौद्धिक आणि नैतिक एकता निर्माण करण्यास सहाय्यक ठरेल. ज्यामुळे मानव कल्याण शक्य आहे. धर्माचा अंतिम उद्देश देखील मानव कल्याण हाच आहे आणि विज्ञानास देखील हेच हवे आहे. म्हणून विज्ञान आणि धर्म परस्पर विरोधी नसून एक-दुसऱ्यांचे सहयोगी आहेत. विज्ञान आणि धर्म यांच्यात समन्वय व्हावा, असे कॉम्टचे मत होते.

कॉम्ट धर्माचा संबंध अलौकिक व्यक्तीशी तितका मानत नाही जितका बौद्धिक आणि नैतिक एकतेच्या आधारावर सामाजिक संघटन आणि प्रगतीशी मानतो. प्रत्यक्षवादी धर्मात जे नैतिक नियम असतील त्यामध्ये दुसऱ्यांची सेवा करण्यासाठी हे आवश्यक आहे की, स्वत: देखील शारीरिक, बौद्धिक आणि नैतिक दृष्टीने प्रगत असणे, हा नियम प्रमुख असेल. युरोपातील सर्व राष्ट्रांनी मिळून मित्र राष्ट्रांची स्थापना करावी आणि युद्धास दाबून टाकावे, असे कॉम्टचे मत होते. कॉम्ट हिंसेऐवजी प्रेमावर भर देतो. आणि त्याचा धर्म 'दुसऱ्याकरिता जगा!' यास महत्त्व देतो.

**६) ज्ञानाशी संबंधित :** प्रत्यक्षवादाचा संबंध अज्ञान आणि अप्रत्यक्ष यांच्याशी नसून तो ज्ञानाशी आहे. म्हणून प्रत्यक्षवादात अशा कोणत्याही घटनेचे अध्ययन केले जात नाही की ज्या आपण प्रत्यक्ष रूपात पाहू शकत नाही. अप्रत्यक्ष आणि अज्ञात गोष्टींचा शोध घेणे हा प्रत्यक्षवादाचा उद्देश नाही. प्रत्यक्षवाद हा वास्तवात निरीक्षण योग्य घटनांच्या अध्ययनांशी संबंधित आहे. अशाप्रकारे प्रत्यक्षवादात अशा नियमांचा शोध घेतला जातो की, जे घटनांच्या संचालनाशी संबंधित आहेत.

**७) धर्म आणि विज्ञानाचा समन्वय :** कॉम्टच्या प्रत्यक्षवादात धर्म आणि विज्ञान यांचा समन्वय आहे. कॉम्टने विज्ञानास साध्य न मानता अध्ययन आणि प्रगतीचे एक साधन मानले आहे. त्याच्या मते, प्रत्यक्षवाद हा एक वैज्ञानिक सिद्धांत आहे. ज्याचा उद्देश संपूर्ण मानव समाजाचे भौतिक, बौद्धिक आणि नैतिक उत्थान आणि जनकल्याणामध्ये वृद्धी करणे हा आहे. एका धर्माच्या स्वरूपात मानवतावाद देखील जनकल्याणामध्ये वृद्धी करू इच्छितो. अशाप्रकारे कॉम्टच्या प्रत्यक्षवादात धर्म आणि विज्ञानामध्ये संघर्ष नाही तर दोन्हींमध्ये समन्वय आढळून येतो.

**रोलीन चेम्बलिस** यांनी **'सामाजिक विचार'** (Social Thought) या ग्रंथात कॉम्टच्या प्रत्यक्षवादाच्या काही वैशिष्ट्यांचा उल्लेख पुढीलप्रमाणे केला आहे.

१) कॉम्टचा प्रत्यक्षवाद हा अलौकिक शक्तीशी संबंधित नाही. म्हणून तो ईश्वरवादी नाही.

२) प्रत्यक्षवाद हा वास्तविक तथ्यांवर आधारीत आहे. तो कोणत्याही प्रकारच्या काल्पनिक तथ्यांवर आधारीत नाही.

३) प्रत्यक्षवाद भाग्यवादी नाही.

४) प्रत्यक्षवाद आशावादी नाही.

५) प्रत्यक्षवाद भौतिकवादी देखील नाही. कारण हा भौतिक शक्तींना बौद्धिक शक्तीच्या नियंत्रणात ठेवतो.

६) प्रत्यक्षवाद संपूर्ण ज्ञानाऐवजी उपयुक्त ज्ञानाशी संबंधित आहे.

७) प्रत्यक्षवादाचा संबंध यथार्थ ज्ञानाशी आहे. हा शाश्वत सत्याशी संबंधित नसून सतत परिवर्तनशील सैद्धीय सत्याशी (तथ्यांशी) संबंधित आहे.

८) प्रत्यक्षवादाचा संबंध सापेक्ष तथ्यांशी आहे. हा निरपेक्ष तथ्यांशी संबंधित नाही.

९) प्रत्यक्षवाद सहानुभूतीपूर्ण आहे. कारण हा त्या सर्वांना एकत्रित बांधून ठेवतो जे याच्या मूळ भावना आणि पद्धतींचा स्वीकार करतात.

**प्रत्यक्षवादाचे विभाजन (Division of Positivism) :**

कॉम्टने प्रत्यक्षवादाचे विज्ञानाचे तत्त्वज्ञान, वैज्ञानिक धर्म आणि प्रत्यक्षवादी राजकारण या तीन भागात विभाजन केले आहे.

**१) विज्ञानांचे तत्त्वज्ञान (Philosophy of the Sciences) :** आपले भाग्य किंवा परिस्थिती यामध्ये सुधारणा किंवा प्रगती करण्यासाठी व्यक्तीला आपल्या परिश्रमावर आणि प्रयत्नावर विश्वास ठेवला पाहिजे. कारण मानव हा स्वतः आपल्या भाग्याचा निर्माता आहे. या तत्त्वज्ञानाच्या अंतर्गत गणित, खगोल, भौतिक किंवा पदार्थ, रसायन, जीवविज्ञान, समाजशास्त्र आणि नैतिक विज्ञान या विज्ञानांचा समावेश केला जातो.

**२) वैज्ञानिक धर्म आणि नैतिक विज्ञान (Scientific Religion and Ethics):** प्रत्यक्षवादी धर्माचा संबंध हा कोणत्याही अलौकिक शक्ती किंवा दैवी सत्तेशी नाही. हा तर संपूर्ण मानवाचा धर्म आहे. दुसऱ्यांच्या सेवेसाठी अधिक उपयुक्त होण्यासाठी शारीरिक, बौद्धिक आणि नैतिक प्रगती करणे हीच प्रत्यक्षवादाची संक्षिप्त नैतिक संहिता होय.

**३) प्रत्यक्षवादी राजकारण (Positivistic Politics) :** प्रत्यक्षवादी राजकारणाचा उद्देश हा युद्धाचे दमन करणे आणि युरोपियन राज्यांनी मिळून मित्र राष्ट्रांची स्थापना करणे हा आहे.

थोडक्यात, कॉम्टने प्रत्यक्षवादास एक विज्ञान, एक धर्म आणि एका राजकारणाच्या रूपात स्विकारले आहे. एका विज्ञानाच्या रूपात प्रत्यक्षवाद अनुभव, निरीक्षण, परीक्षण आणि वर्गीकरणावर भर देतो. एका धर्माच्या रूपात प्रत्यक्षवाद समाजाची भौतिक, बौद्धिक आणि नैतिक प्रगती इच्छितो आणि दुसऱ्याची सेवा करू इच्छितो. तर एका राजकारणाच्या रूपात प्रत्यक्षवादाचा उद्देश युद्धाची समाप्ती करून विश्व आणि विशेषतः युरोपातील राज्यांचे एक राष्ट्रमंडळ बनविणे हा आहे.

अशाप्रकारे कॉम्टने प्रत्यक्षवादी विचारांमध्ये धार्मिक आणि नैतिक गोष्टींना विज्ञानापेक्षा अधिक महत्त्व दिले. कॉम्टच्या प्रत्यक्षवादामध्ये झालेल्या विचार परिवर्तनामुळे त्याचे शिष्य त्याला सोडून गेले. **'कॉम्टच्या प्रत्यक्षवादामध्ये झालेले परिवर्तन म्हणजे,**



कॉम्टचे पतन होय' अशाप्रकारची टीका करण्यात आली. जॉन स्टूअर्ट मिलने म्हटले की, **'कॉम्टच्या या दयनीय पतनाबद्दल मला रडू येते.'**

कॉम्टने सुरुवातीला विज्ञानवादाला विशुद्ध वैज्ञानिक संकल्पनेने आरंभ केला. परंतु नंतर धार्मिक आणि नैतिक सिद्धांताचा देखील विज्ञानवादात समावेश केला. कॉम्ट हा धर्म आणि विज्ञानवादाला एक-दुसऱ्यांपासून वेगळे मानीत नाही. **कॉम्टचा प्रत्यक्षवाद एका बाजूला विज्ञान आहे तर दुसऱ्या बाजूला धर्म सुद्धा आहे;** अशाप्रकारची टीका कॉम्टच्या प्रत्यक्षवादावर करण्यात आली.

## विज्ञानाचे सोपान (संसारण)
## (Hierarchy of Sciences)

**'पॉझिटिव्ह फिलॉसाफी'** (Positve Philosophy) या ग्रंथात कॉम्टने ज्ञान आणि विज्ञानांचे एक व्यवस्थित वर्गीकरण आणि सोपान (संस्तरण) प्रस्तुत केले आहे. विज्ञानांच्या वर्गीकरणाचा विचार कॉम्टने सेंट सायमन यांच्यापासून घेतला आहे असे असले तरी कॉम्टचे वर्गीकरण हे सायमन यांच्यापेक्षा अधिक वैज्ञानिक आणि वेगळ्या प्रकारचे आहे. विज्ञानाच्या वर्गीकरणामागील कॉम्टचा उद्देश हा समाजशास्त्राला एका नवीन विज्ञानाच्या रूपात व्यवस्थित आधार मिळवून देणे हा होता. ज्यामुळे समाजशास्त्र हे विशिष्ट विज्ञानाच्या रूपात विकसित होऊ शकेल आणि इतर सामाजिक विज्ञानांमध्ये आपले एक महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करू शकेल.

कॉम्टने सर्व विज्ञानाच्या विकासक्रमाचा एक निश्चित सिद्धांत देखील प्रतिपादन केला आणि विज्ञानांचे उच्च किंवा खालच्या क्रमामध्ये सोपान (संसारण) प्रस्तुत केले. प्रत्येक विज्ञानाच्या विकासाच्या स्थितीस स्पष्ट करून समाजशास्त्राचा इतर विज्ञानाच्या शाखेशी संबंध प्रस्थापित करण्याचा कॉम्टचा हेतू होता. समाजशास्त्र हे एक नवीन आणि जटिल विज्ञान आहे. ज्याचे विषयक्षेत्र हे इतर विज्ञानाच्या तुलनेत अधिक व्यापक आहे. हे सिद्ध करणे हा कॉम्टचा उद्देश होता. या वर्गीकरण किंवा सोपानचा प्रमुख उद्देश समाजशास्त्रास सामाजिक विज्ञानाच्या रूपात प्रस्थापित करणे हा होता. या संदर्भात बोगार्डस म्हणतो की, 'विज्ञानाच्या वर्गीकरणाच्या आधारे कॉम्टने समाजशास्त्रास नवीन परंतु सर्वश्रेष्ठ विज्ञानाच्या स्वरूपात प्रस्तुत केले आहे.'

**विज्ञानाच्या सोपानाचे सिद्धांत किंवा आधार :**

कॉम्ट यांनी विज्ञानांचे सोपान परावलंबित्व किंवा निर्भरतेच्या (Dependence) वृद्धिक्रमाचा सिद्धांत आणि घटत असलेली सामान्यतः व वाढत जाणाऱ्या जटिलतेचा सिद्धांत या दोन सिद्धांताच्या आधारे स्पष्ट केले आहे.

**१) निर्भरतेच्या (परावलंबित्व) वृद्धिक्रमाचा सिद्धांत (Principles of Order of Increasing Dependence) :** कॉम्टद्वारे प्रतिपादीत या सिद्धांतानुसार ज्ञान किंवा विज्ञानाची प्रत्येक शाखा ही पूर्वीच्या विज्ञानावर अवलंबून असते. जे ज्ञान

किंवा विज्ञान प्रथम अस्तित्वात आले, ते मात्र कोणत्याही विज्ञानावर आधारीत नव्हते. त्यानंतर जे दुसरे विज्ञान विकसित होईल ते पहिल्या विज्ञानावर आधारीत असेल. त्यानंतर तिसरे विज्ञान हे पहिल्या आणि दुसऱ्यावर आणि चौथे विज्ञान दुसऱ्या आणि तिसऱ्या विज्ञानावर अवलंबून असेल. अशाप्रकारे प्रत्येक नवीन विज्ञान हे त्यापूर्वी विकसित झालेल्या विज्ञानावर अवलंबून राहील. आणि याच क्रमाने विज्ञानाच्या प्रत्येक शाखेच्या परावलंबित्वामध्ये वृद्धी किंवा निर्भरतेच्या वृद्धिक्रमाचा सिद्धांत असतो असे कॉम्ट म्हणतो.

कॉम्टच्या मते, जे विज्ञान जितके अधिक प्रमाणात इतर विज्ञानावर अवलंबून असेल ते तितकेच अधिक नवीन मानले जाईल. थोडक्यात, विज्ञानाच्या वर्गीकरण आणि सोपानमध्ये प्रत्येक विज्ञानाची श्रेणी ही पूर्वीच्या विकसित श्रेणीच्या नियम आणि सिद्धांतावर अवलंबून असते. याचा परिणाम असा होतो की, विज्ञानाची एक शाखा नवीन विकासाबरोबर विज्ञानाच्याच दुसऱ्या शाखांवर परावलंबी होत जाते.

**२) घटत जाणारी सामान्यता आणि वाढत जाणाऱ्या जटिलतेचा सिद्धांत (Principles of Decreasing Generality and Increasing Complexity):** कॉम्ट यांनी विज्ञानाच्या वर्गीकरणामध्ये घटत जाणारी सामान्यता आणि वाढत जाणाऱ्या जटिलतेच्या सिद्धांताचा आधार घेतला आहे. या सिद्धांतानुसार प्रत्येक विज्ञानाची स्थिती वस्तुतः त्याच्या विषय वस्तूच्या आधारावरच निश्चित केली जाते. त्यानुसार ज्या विज्ञानाची विषय वस्तू जितकी सोपी असेल तितके ते विज्ञान कमी परावलंबी असेल. कारण सोप्या आणि सामान्य घटनांचे अध्ययन करणारे विज्ञान हे प्रथम निर्माण झाले. ज्या विज्ञानाची विषय वस्तू जितकी जटिल असेल तितके ते विज्ञान दुसऱ्या विज्ञानावर अधिक आधारीत असेल. विशेष म्हणजे समाजाच्या विकास आणि ज्ञानाच्या प्रगतीबरोबरच जटिलता देखील वाढत जाते.


कॉम्ट वरील सिद्धांताच्या आधारे स्पष्ट करतो की, जे विज्ञान सर्वात प्रथम अस्तित्वात आले ते अधिक सामान्य आणि सर्वात कमी जटिल तसेच सर्वात कमी विषयाशी संबंधित होते. त्यानंतर येणारे विज्ञान हे उत्तरोत्तर कमी सामान्य आणि अधिक जटिल होत गेले. कारण साध्या घटनेच्या प्रभावातून दुसऱ्या घटना निर्माण होतात आणि त्या क्रमशः जटिल होत जातात. म्हणून घटना उत्तरोत्तर क्रमाने जटिल होत जातात आणि त्याचे अध्ययन करणारे विज्ञान देखील क्रमशः जटिल होतात.

कॉम्ट स्पष्ट करतो की, प्रत्येक विज्ञान हे त्या पूर्वीच्या विज्ञानावर केवळ अवलंबूनच राहत नाही तर नवीन शोधाद्वारे ते पूर्वीच्या विज्ञानास समृद्ध देखील करतात. म्हणून सर्वाधिक जटिल आणि विशिष्ट विज्ञानाच्या सोपान किंवा संस्तरणामध्ये ते शेवटी राहतात.

वरील दोन सिद्धांताच्या आधारे संपूर्ण विज्ञानांचा संस्तरणात्मक क्रम कॉम्टने पुढीलप्रमाणे दर्शविला आहे.



**विज्ञानांचे सोपान (संस्तरण)**




**१) गणित विज्ञान (Mathematics) :** कॉम्टच्या मते, 'गणित प्राचीन पहिले आणि आधारभूत विज्ञान आहे आणि असा दावा करता येईल की, सर्व विज्ञानांमध्ये हे पूर्ण किंवा निर्दोष विज्ञान आहे. (Mathematics is the oldest, first and basic sciences and can claim the highest perfection among all other sciences.)

गणित विज्ञान हे सर्व विज्ञानांपेक्षा सामान्य घटनांचे अध्ययन करणारे विज्ञान आहे. हे एक मौलिक उपकरण आहे. आणि संपूर्ण विज्ञानांचा विकास याच मौलिक उपकरणाच्या आधारावर झाला आहे. सर्व विज्ञानाच्या संशोधनाच्या क्षेत्रात गणिताच्या आधारावरच योग्य माप आणि विविध तथ्यांचा सुनिश्चित संबंध दर्शविणे शक्य आहे. पुढे कॉम्ट स्पष्ट करतो की, गणित विज्ञानाद्वारे सामाजिक आणि साध्या नैसर्गिक घटनांच्या संदर्भात संशोधन आणि नियमांचा शोध घेणे संभव आहे. गणित विज्ञानाशिवाय सर्व विज्ञान हे अपंग आहेत. म्हणून सर्व विज्ञानाचा आधार गणित विज्ञान आहे. गणित विज्ञान हे सर्वात पहिले विज्ञान आणि साध्या घटनांचे अध्ययन करणारे विज्ञान असल्यामुळे हे इतर विज्ञानावर सर्वात कमी प्रमाणात अवलंबून आहे. कॉम्टच्या मते, गणित विज्ञानाच्या अंतर्गत अंकगणित (Arithmatic), बीजगणित (Algebra), रेखागणित (Geomentry) आणि यंत्रविज्ञानाच्या (Mechanics) शाखांचा समावेश होतो. सर्व विज्ञान हे धार्मिक, तात्विक आणि विज्ञान या तीन मानवी चिंतनाच्या स्तरातून जातात. परंतु गणित विज्ञानाने चिंतनाच्या स्तरात प्रवेश केला आहे.

२) खगोल विज्ञान (Astronomy) : कॉम्ट यांनी इतर विज्ञानांच्या क्रमास स्पष्ट करतांना सर्व नैसर्गिक घटनांचे - १) अजैविक (**Inorganic**) आणि २) जैविक (Orgnic) अशा दोन प्रकारात विभाजन केले आहे. तसेच अजैविक घटनांचे - अ) खगोलीक आणि ब) भूमीवरील (**Terestrial**) घटना अशा दोन उप-विभागात विभाजन केले आहे.

खगोलिक घटनांमध्ये अत्यंत सामान्य घटना असतात. ज्याचा संबंध सूर्य, चंद्र, तारे, उल्का, ग्रह आणि उपग्रहाशी असतो. खगोल विज्ञानात ग्रह, उपग्रह आणि नक्षत्रांच्या ब्रह्मांडांमध्ये स्थिती, त्यांचे पारस्पारिक अंतर, पृथ्वीपासून अंतर, पारस्पारिक आकर्षण आणि आकाशातील घटनांचे अध्ययन केले जाते. आकाशातील ताऱ्यांमध्ये सर्वांत कमी प्रमाणात परिवर्तन होते. त्याशिवाय यामध्ये पृथ्वीवरील (भूमी) पदार्थांच्या तुलनेत अधिक यथार्थता आणि निश्चितता आढळून येते. खगोल विज्ञानाच्या माध्यमातून सूर्य, चंद्र, पृथ्वी, मंगळ, बृहस्पती इत्यादी ग्रहांच्या गतिविधीचे ज्ञान प्राप्त केले जाते.

खगोल विज्ञानाच्या अध्ययनाचा मानवास फायदा कोणता? किंवा आकाशातील घटनांशी मानवाचा कोणता संबंध आहे? असे प्रश्न उपस्थित होतात. याचे उत्तर असे की, पृथ्वीवर घडणाऱ्या घटनांची योग्य माहिती आणि ज्ञान तेव्हाच शक्य आहे जेव्हा आकाशातील चंद्र, तारे, नक्षत्र आणि सूर्याचे पृथ्वीशी असलेल्या संबंधाचे ज्ञान असेल. आकाशातील सूर्य, चंद्र, तारे आणि नक्षत्रे यांच्यात होणारे परिवर्तन हे पृथ्वीला प्रभावित करतात. हे सर्व ज्ञान खगोल विज्ञानाद्वारे प्राप्त होते. कॉम्टने गणित विज्ञानानंतर खगोल विज्ञानास स्थान दिले. कारण हे विज्ञान केवळ गणितावर अवलंबून आहे. गणिताच्या आधारावरच खगोल विज्ञानात अध्ययन केले जाते.

३) भौतिक किंवा पदार्थ विज्ञान (Physics) : पृथ्वी अर्थात भूमीवरील घटनांचे अध्ययन करणारे भौतिक विज्ञान आणि रसायन विज्ञान हे दोन वेगळे विज्ञान आहेत. या दोन्ही विज्ञानात अजैविक (Inorganic) घटनांचे अध्ययन केले जाते. भौतिक विज्ञानात भौतिक घटनांचे आणि रसायन विज्ञानात रसायनाचे अध्ययन केले जाते. कॉम्टच्या मते भौतिक विज्ञान हे रसायन विज्ञानापेक्षा अधिक सामान्य आहे आणि रासायनिक घटना या भौतिक विज्ञानाच्या नियमांवर आधारीत आहेत. परंतु भौतिक विज्ञानाचे नियम रासायनिक घटनांद्वारा प्रभावित होत नाही. म्हणून भौतिक विज्ञानाचा क्रम हा रसायन विज्ञानाच्या आधी येतो. भौतिक विज्ञानावर गणित आणि खगोल या दोन्ही विज्ञानाचा प्रभाव पडतो. कारण विविध प्रकारचे ग्रह आणि उपग्रहांचा सर्व भौतिक वस्तूंवर एक विशिष्ट आणि निश्चित प्रभाव पडत असतो. अशा प्रकारे अजैविक घटनांचे अध्ययन खगोल, भौतिक आणि रसायन या तिन्ही विज्ञानाद्वारे केले जाते.

४) रसायन विज्ञान (Chemistry) : रसायन विज्ञानात पदार्थांची रासायनिक रचना, रासायनिक प्रक्रिया आणि रासायनिक स्वरूपाचे अध्ययन केले जाते. रासायनिक



[illegible] भौतिक प्रक्रिया आणि गणिताचा प्रभाव पडतो. परंतु रसायन विज्ञानाचा [illegible] भौतिक विज्ञान आणि गणितावर पडत नाही. रासायनिक प्रक्रिया उष्णता, [illegible], विद्युत इत्यादींद्वारे संचालीत आणि प्रभावित होतात. म्हणून रसायन विज्ञानाचा क्रम भौतिक विज्ञानानंतर येतो.

५) जीव विज्ञान (Biology) : कॉम्टने जैविक घटनांचे व्यक्तिगत आणि सामूहिक अशा दोन भागांमध्ये विभाजन केले आहे. व्यक्तिगत जैविक घटनांच्या अंतर्गत, मानव, पशू आणि वनस्पतींशी संबंधित संपूर्ण शारीरिक रचना आणि क्रियांचा समावेश होतो. ज्याचे अध्ययन जीव विज्ञानात केले जाते. जीव विज्ञान हे गणित, खगोल, भौतिक आणि रसायन या सर्व विज्ञानांवर अवलंबून आहे. जीव विज्ञानात यथार्थता, निश्चितता आणि विश्वसनीयता आढळून येते, जी गणित विज्ञानातील नियमांवर आधारीत आहे. ग्रह, नक्षत्रे इत्यादींची स्थिती आणि गतीमुळे प्राण्यांची संरचना आणि क्रिया प्रभावित आणि परिवर्तित होतात. म्हणून जीव विज्ञान हे खगोल विज्ञानावर अवलंबून आहे. कारण खगोल विज्ञान हे सांगते की, जर पृथ्वीची गती ही तिच्या वर्तमान गतीपेक्षा वाढली तर शारीरिक प्रक्रियांमध्ये तीव्रता निर्माण होते. ज्याचा परिणाम प्राण्यांचे आयुष्यमान कमी होण्यावर होतो. जीव विज्ञान भौतिक विज्ञानावर देखील अवलंबून आहे. कारण जीव विज्ञान हे भौतिक विज्ञानाकडून जिवंत प्राण्याचा भार आणि तापमान इत्यादीचे ज्ञान प्राप्त करते. जीव विज्ञान रसायन विज्ञानाचा देखील ऋणी आहे. कारण जीव विज्ञान हे रसायन विज्ञानाकडून पोषण आणि ग्रंथीतून [illegible] काढण्याच्या संदर्भात ज्ञान प्राप्त करते. कॉम्टच्या मते, 'इतर विज्ञानाच्या तुलनेत जीव विज्ञान हे सर्वात कमी निश्चित अवस्थेपर्यंत पोहचू शकले. म्हणून जीव विज्ञान हे भौतिक, रसायन आणि इतर सर्व विज्ञानांवर अवलंबून आहे. कॉम्टने मानसविज्ञानास (**Psychology**) शरीर विज्ञान (**Psychology**) आणि जीव विज्ञानाचे एक अंग मानले आहे.

६) **समाज विज्ञान किंवा समाजशास्त्र** (Sociology) : कॉम्टच्या मते, सामूहिक जैविक किंवा सावयवी घटनांचे अध्ययन करणारे विज्ञान म्हणजे समाज विज्ञान किंवा समाजशास्त्र (Sociology) होय. समाज विज्ञान हे अन्य विज्ञानाच्या तुलनेत सर्वाधिक विशिष्ट आणि जटिल असून ते सर्वच विज्ञानावर अवलंबून आहे. कॉम्टच्या मते, सामाजिक जीवनाशी संबंधित सर्व घटनांचे अध्ययन एकाच विज्ञानाच्या अंतर्गत करणे उपयुक्त होईल. ज्यास त्याने समाज विज्ञान म्हटले आहे. समाज विज्ञान हे आपल्या पूर्वीच्या सर्व विज्ञानांवर अवलंबून आहे. म्हणून या विज्ञानात सर्वात कमी निश्चितता आढळून येते. परंतु ज्या प्रकारे इतर विज्ञान अनिश्चिततेकडून निश्चिततेकडे गेलेत, त्याचप्रकारे समाजशास्त्र देखील मानवी चिंतनाच्या तीन स्तरातून जाऊन निश्चिततेच्या उद्दिष्टाकडे अग्रेसर आहे.

अशाप्रकारे कॉम्टने विज्ञानांचे सोपान स्पष्ट केले आहे. कॉम्टच्या मतानुसार समाजशास्त्र हे एक नवीन आणि विशिष्ट विज्ञान आहे. म्हणून ते आपल्या पूर्वीच्या

सर्व विज्ञानावर अवलंबून आहे. तसेच ते जटिल आहे. विज्ञानाच्या सोपानावरून विज्ञानाचा क्रम आणि त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे थोडक्यात सांगता येईल.

१) **गणित विज्ञान** : स्वतंत्र, संपूर्ण आणि सर्वाधिक प्राचीन विज्ञान.

२) **खगोल विज्ञान** : गणित विज्ञानावर अवलंबून.

३) **भौतिक विज्ञान** : गणित आणि खगोल विज्ञानावर अवलंबून.

४) **रसायन विज्ञान** : गणित, खगोल आणि भौतिक विज्ञानावर अवलंबून.

५) **जीव विज्ञान** : गणित, खगोल, भौतिक आणि रसायन विज्ञानावर अवलंबून.

६) **समाज विज्ञान (समाजशास्त्र)** : गणित, खगोल, भौतिक, रसायन आणि जीव विज्ञानावर अवलंबून. नवीन विशिष्ट आणि जटिल विज्ञान.

कॉम्ट म्हणतो की, सर्व प्रकारच्या विज्ञानाचे अध्ययन हे त्याच क्रमामध्ये केले पाहिजे, ज्या क्रमाने ते विज्ञानाच्या सोपानक्रमामध्ये आले आहे. उदा. जर समाजशास्त्राचे अध्ययन करायचे असेल तर गणित, खगोल, भौतिक, रसायन आणि जीव विज्ञानांसंबंधी नियमांची माहिती करून घेतली पाहिजे. जीव विज्ञान संपूर्ण जीवांचे स्वरूप, जीवांचा उद्भव आणि विकास, त्याचे जीवन इत्यादींच्या संदर्भात माहिती देते. म्हणून मानवाच्या सामाजिक जीवनाबाबत अध्ययन करण्यापूर्वी जीव विज्ञानाचे अध्ययन आवश्यक आहे. कॉम्टद्वारे प्रस्तुत विज्ञानांच्या सोपानाचा उद्देश समाजशास्त्रीय अध्ययनाविषयी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास करून समाजशास्त्रास एक सुदृढ आधार प्रदान करणे हा आहे. विज्ञानांच्या सोपानामध्ये कॉम्टने समाजशास्त्रास सर्वात वर ठेवले कारण हे एक नवीन विशिष्ट आणि जटिल विज्ञान आहे.

♦♦♦